म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. 9333
१९६५.



REFBK-0014477

# बहादुर शास्त्री

लेखक : दि. रा. मणकेकर

अनुवादक : कॉ. ह. लिमये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 20855 वि: चरित्र
9333 नों: दि: 20/5/54
क्र. 11477

# लाल बहादूर शास्त्री

( राजकीय व्यक्तिरेखा )

लेखक : द. रा. मंकेकर

अनुवाद : अ. ह. लिमये

किंमत साडेतीन रुपये

REFBK-0014477

प्रकाशक
ग. ल. ठोकळ, बी. ए.; बी. टी.
ठोकळ प्रकाशन
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणें २

पहिली आवृत्ति : फेब्रुवारी १९६५

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
४६१।४ सदाशिव, पुणें २

# लेखकाचें हृद्गत

'नेहरूंच्या नंतरच्या युगाची सुरुवात' असें या पुस्तकाला आणखी एक शीर्षक देतां येईल.

कारण एका विशाल आणि विस्तीर्ण पार्श्वभूमीवर लाल बहादूर शास्त्री यांचें जीवन आणि कार्य यांचें चित्रण या ग्रंथांत करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. एरवीं प्रकाशांत न येणाऱ्या घटना आणि व्यक्ति यांचाहि या ग्रंथांत अंतर्भाव झाला आहे.

तसें पाहिलें तर नेहरूंच्या नंतरच्या नजीकच्या काळाला भारतीय इतिहासांत एक वेगळेंच स्थान प्राप्त झालें आहे.

नाहीं म्हटलें तरी सतरा वर्षें नेहरूंनीं या देशावर अखंड सत्ता चालविली. त्यांच्या निधनानंतर राज्यशकट मोडून पडतो कीं काय असें क्षणभर वाटूं लागलें होतें. पण ती भीति निराधार ठरली. एवढ्या प्रचंड देशाचा कारभार व्यवस्थित रीत्या व खंबीर पायावर उभा राहूं शकेल अशी आशा निर्माण झाली. या स्थित्यंतराचे थोडेफार तरी बरेवाईट परिणाम होणें अपरिहार्य आहे. पण एकंदर परिस्थितीचा साकल्यानें आणि सामग्र्यानें विचार करतां, हा राज्यशकट अप्रतिहतपणें आपलें मार्गक्रमण प्रगतीच्या दिशेनें करील, अडथळे आणि संकटें त्याच्या परिक्रमेच्या आड येणार नाहींत, असा लेखकाला विश्वास वाटतो.

तसें पाहिलें तर नेहरू गेल्यानंतरच भारतीय राजकारण सज्ञान झालें.

हें संक्रमण ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें आणि उत्साहवर्धक आहे. हा क्षण मोलाचा आहे, टिपण्याजोगा आणि भूषणास्पद आहे.

ढेकळानें जगाचा वारसा घ्यावा हें फक्त अध्यात्माच्या क्षेत्रांतच शक्य असतें असा समज रूढ आहे. पण आजच्या भारतांत आणि तेथील गुंतागुंतीच्या राजकारणांत असा साक्षात्कार दृष्टीस पडावा हें आश्चर्यकारक आहे. मार्दवानें मात करावी, स्वभावांतील सौजन्य हा प्रगतीच्या बाबतींत अडसर होण्याऐवजीं अलंकार व्हावा असा प्रकार आज या भारतांत घडला आहे. सौजन्यमूर्ति लाल बहादूर आज भारताचे कणखर कर्णधार झाले आहेत हें तें आश्चर्य होय !

म्हणून त्यांचें जीवन नेहमींच्या चाकोरींतून न रेखाटतां, आजचे लाल बहादूर कसे खंबीर झाले, त्यांच्या जीवनाला कोणीं कलाटणी दिली, त्यांना कसा आकार मिळाला, भारतीय राजकारणांतील या महान् व्यक्तीला कशी व कोठून प्रेरणा मिळाली हें या चरित्रांत सांगावयाचें ठरलें आहे. मला आशा आहे कीं वाचकांना ही पद्धति पसंत पडेल.

या पुस्तकांत कांहीं ठिकाणीं लाल बहादूर यांच्या तोंडचीं वाक्यें दिलेलीं आढळतील. या ग्रंथाच्या संदर्भात मी श्री. लाल बहादूर शास्त्री यांना अनेक वेळां भेटलों. तसेंच एक मोठी प्रश्नावलीहि मीं त्यांजकडे पाठविली होती. या भेटी आणि प्रश्नावलीला आलेलीं उत्तरें यांच्या साहाय्यानें हीं अवतरणें घेतलेलीं आहेत.

श्री. लाल बहादूर शास्त्री यांचा दिनक्रम अत्यंत गर्दीचा आणि घाईचा

असतो. अशा गर्दीत आणि घाईतहि त्यांनीं वेळ काढून माझ्याशीं चर्चा केली आणि माझ्या प्रश्नांना उत्तरें दिलीं—त्यांतील कांहीं प्रश्न तर खासगी आणि वैयक्तिक स्वरूपाचे होते—याबद्दल मीं त्यांचा ऋणी आहें. प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं कधीं कधीं त्यांना रात्री जागवाव्या लागल्या !

या ग्रंथाच्या हस्तलिखिताचा बराचसा भाग त्यांनीं वाचून पाहिला आहे. विशेषंकरून गेल्या १३ वर्षांतील घडामोडी आणि त्यांचें राजकीय आयुष्य हा भाग त्यां ां चाळला आहे. त्यांच्या चांगुलपणाचाच हा एक विशेष होय.

लाल बहादूरजींचे निकटचे स्नेही आणि मंत्री श्री. त्रिभुवन नारायण-सिंग यांचाहि मी आभारी आहें. श्री. सिंग यांना मीं वेळोवेळीं प्रश्न विचारून, शास्त्रीजींच्या पूर्वायुष्याची माहिती करून घेतली. त्यांनीं ती आस्थेनें दिली, इतकेंच नव्हें तर या ग्रंथाच्या तत्संबंधींचा भागहि वाचून पाहिला.

याखेरीज असंख्य स्नेह्यांनीं मला मदत केली आहे. त्यांचाहि मी आभारी आहें.

श्री. एन्. जी. जोग यांनीं हस्तलिखित वाचून पाहिलें व उपयुक्त सूचना केल्या. त्यांना धन्यवाद.

—लेखक

# आणि
# अनुवादाच्या निमित्तानें

'लाल बहादूर शास्त्री : पोलिटिकल बॉयोग्रफी' हें श्री. डी. आर्. मंकेकर यांचें मूळ पुस्तक वाचावयास सुरुवात केल्यानंतर पुरें केल्याशिवाय खालीं ठेववेना. त्या पुस्तकानें मला वेड लावलें. या ग्रंथाचा मराठी अनुवाद मराठी वाचकांना उद्‌बोधक वाटेल असा मला विश्वास आहे.

हें भाषांतर नव्हे; हा अनुवाद आहे याची वाचकांनीं कृपया नोंद घ्यावी. शब्दशः भाषांतरानें अर्थ व रस यांची हानि होते असें माझें मत आहे.

पण अनुवाद करतांना चरित्रनायक श्री. लाल बहादूर शास्त्री यांच्या व्यक्तिमत्त्वाला अथवा प्रतिष्ठेला धक्का लागणार नाहीं अशी मीं खबरदारी घेतली आहे

श्री. मंकेकर यांचा भाषेचा फुलोरा वेधक असला तरी अनुवादकाची सक्त परीक्षा घेणारा आहे, याची मला अनुवाद करतांना प्रत्यहीं जाणीव होत होती. पण येथेंहि श्री. मंकेकर यांचा आशय अर्थशः मराठींत उतरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मीं केला आहे.

विशेष नांवांच्या मागें श्री., सौ., सर्वश्री, श्रीमती अशा उपाधि मीं लावलेल्या नाहींत. राष्ट्राचे हे आधारस्तंभ परके थोडेच आहेत ?

हा अनुवाद मीं करण्यास श्री. मंकेकर यांनीं संमति दिली व श्री. ग. ल. ठोकळ यांनीं तो प्रकाशांत आणला याबद्दल उभयतांस धन्यवाद.

जय हिंद !

पुणें
२६ जानेवारी, १९६५

अ. ह. लिमये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

## अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | उपोद्घात | १ |
| २ | निष्फळ कर्मयोग | ९ |
| ३ | अनाथ भारत | २३ |
| ४ | वाटाघाटींचें पर्व | ३१ |
| ५ | पुढारी मिळाला | ३९ |
| ६ | लाल बहादूरच कां ? | ४७ |
| ७ | पहिलीं पावलें | ५६ |
| ८ | काशी विद्यापीठ | ६५ |
| ९ | क्षितिज विस्तारलें | ७९ |
| १० | कार्यक्षेत्र गवसलें | ८८ |
| ११ | प्रगतिपथावर | ९९ |
| १२ | भुवनेश्वरला काय झालें ? | १०९ |
| १३ | प्रभावी व्यक्तिमत्त्व | ११९ |
| १४ | लायक वारसा | १२९ |
| १५ | पंतप्रधानांचा राष्ट्रास संदेश | १४१ |

१४४८७

# उपोद्घात

पंडितजी गेले ! पंडितजींनंतर भारताचें भवितव्य काय होईल याबद्दल अनेकांच्या मनांत शंकाकुशंका होत्या. पण सुदैवानें पंडितजींनंतर काय या प्रश्नाचें उत्तर लगेच मिळालें. भारताचा प्रवास आत्मविश्वासानें सुरू झाला. सर्वांना ग्रासणाऱ्या या प्रश्नाचें उत्तर निःसंदिग्ध, शिस्तशीर, प्रतिष्ठा आणि सभ्यता यांनीं भरलेलें होतें.

असं वाटतं कीं पंडितजींच्या कृपाछत्राखालीं भारताचें राजकारण शैशवावस्थेंत होतें. पंडितजींनीं आपुकीनें त्याचें वर्धन केलें. पंडितजी गेले त्यावेळीं राजकीय भारत वयांत आला होता. पंडितजीरूपी अवाढव्य वटवृक्ष उन्मळून पडला. वटवृक्षाच्या छायेखालीं इतर वृक्ष फोफावत नाहींत असें म्हणतात, पण या महान् वटवृक्षाच्या छायेखालीं कितीतरी रोपटीं आकार घेऊं लागलीं होतीं.

हा बदल निर्विघ्नपणें पार पडला. नेहरूंच्या काळांत एकसूत्री राज्यपद्धति रूढ होती. पण आतां संघटित आणि सामूहिक नेतृत्वानें ती जागा घेतली आहे. साहजिकच अधिकारारूढ पक्षाला आतां स्थैर्य आणि खंबीरपणा येणार आहे. नेहरूंच्या आकस्मिक निधनानें परिस्थिति बिकट होते कीं काय असें वाटलें होतें, पण तसें घडलें नाहीं. राष्ट्राभिमान उफाळून वर आला आणि आपल्या लोकशाहीला आतां धोका नाहीं, ती टिकेल, फोफावेल अशी प्रसादचिन्हें आतां दिसूं लागलीं आहेत.

सात महिन्यांपूर्वीं भुवनेश्वर येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत श्री.

कामराज यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. जणू कांहीं राष्ट्रावर लौकरच मोठा घाला पडणार होता आणि या परिस्थितीला तोंड देण्यासाठींच दैवानें ही घटना योजिली होती. कारण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खंबीर, कणखर व्यक्तिमत्त्व असलेला, देशाभिमानी, दृढनिश्चयी आणि विचारी असा अध्यक्ष याच वेळीं बहुधां प्रथम मिळाला आहे.

श्री कामराज हे कर्तबगार आहेतच, पण ते अचल व संयमी आहेत. त्यांचें कोणाशीं भांडण नाहीं कीं ते कोणाच्याहि आहारी जाणारे नाहींत, कॉंग्रेसमधील सर्व प्रवृत्तीच्या कॉंग्रेसजनांनां त्यांच्याबद्दल नितांत आदर आहे.

मुखाचें मुख्यप्रधानपद झुगारून देशकार्यासाठीं स्वतःला वाहून घेण्याचा त्यांनीं ज्यावेळीं निर्णय जाहीर केला, त्यावेळीं तर त्यांचें व्यक्तिमत्त्व अखिल भारतीय पातळीवरहि उठून दिसलें. त्यांनीं आखलेल्या कामराज योजनेची मुहूर्तमेढ स्वतःच्या अधिकारत्यागानें त्यांनीं प्रथम रोविली आणि नंतर ती अखिल भारताला लागू करण्याचा त्यांनीं विचार केला.

कामराज यांच्या निवडीनें आणखी एक गोष्ट आपोआप साधली. कामराज हे दक्षिण भारतांतील आहेत. शिवाय ते ब्राह्मणेतर आहेत. ते केवळ होयबा नाहींत. अशा व्यक्तीची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं अविरोध निवड होणें याचें विशेष महत्त्व आहे. त्यांच्या निवडीमुळें दक्षिण भारताला वाटणारी उत्तरभारताबद्दलची असूया मुळांतच उखडली गेली. उत्तर भारताचा दक्षिण भारतावर वरचष्मा आहे अशी द्रवीड मुन्नेळ कालिझम पक्षाची जी हाकाटी होती, तिच्यांतील वाफहि या निवडणुकीमुळें निघून गेली. कारण कामराजांच्या निवडीमुळें आपला प्रतिनिधि आतां भारताच्या मूर्धस्थानीं बसणार, त्याचें अखिल भारतावर आधिपत्य राहाणार ही कल्पनाच दाक्षिणात्यांना सुखावह वाटूं लागली होती.

कामराज ही व्यक्ति प्रभावी आहे. कॉंग्रेसमधील सर्व लोकांना आपण एकत्र आणूं शकूं असा त्यांना आत्मविश्वास आहे. नेहरूनंतर सामुदायिक नेतृत्वाची कल्पना त्यांनीं साकार केली. भारत सरकारला राज्य सरकारांच्या मुख्यप्रधानांचें सहकार्य मिळवून दिलें. यामुळें राष्ट्राचें आणि कॉंग्रेस पक्षाचें सामर्थ्य व प्रतिष्ठा स्थिरावेल असें जनतेला वाटूं लागलें. आपल्यांत असलेल्या उणीवांवर मात करून ही सिद्धि ते मिळवतील अशी खात्री वाटूं लागली.

अर्थातच हें सर्व आपोआप घडलें नाहीं. पंडित नेहरूंनीं आपल्या कारकीर्दींत

भारतीय लोकशाहीचा पाया दृढ केला होता. म्हणूनच त्यांच्या मृत्यूनंतर उद्-भवलेल्या या बिकट परिस्थितींतून योग्य मार्ग निघूं शकला. आज राष्ट्राचें सुकाणू ज्या कर्णधाराच्या हाती आहे तो भारतांतील लोकशाही टिकवील आणि भविष्य-काळांत उद्भवणाऱ्या वादळांना यशस्वी तोंड देईल, अशी जनतेला खात्री पटत आहे ती यासाठींच.

कामराज–लालबहादूर युति जोंवर अभेद्य आहे, तोंवर भारत सरकारच्या भवितव्यतेबद्दल चिंता बाळगण्याचे बिलकुल कारण नाहीं. शिवाय लालबहादूर शास्त्री यांचें व्यक्तिमत्त्व, त्यांची कर्तबगारी, त्यांचा दृढनिश्चय, त्यांची लोकप्रियता आणि त्यांना जनतेनें दिलेली साद यामुळें तर काळजीचा लवलेशहि राहिलेला नाहीं. आजच्या काळांत भारताचें पंतप्रधानपद स्वीकारण्यासाठीं त्यांच्याइतकी लायक दुसरी व्यक्तीच नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

पं. नेहरूंच्या जागीं दुसरी व्यक्ति निवडण्याची वेळ आली, कारण आपली राज्यपद्धति लोकसत्ताक आहे. हुकूमशाही राजवटींत वारस निवडण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. तेथें हुकुमशहाकडूनच वारसाची नेमणूक करण्यांत येते. तसें न केल्यास गोंधळ माजतो, सत्तेसाठीं स्पर्धा निर्माण होते, अथवा अनुयायांचे आपापसांत झगडे सुरू होतात. लोकशाहींत असें घडत नाहीं. कारण तींत जनतेचा साक्षात् संबंध येतो. म्हणून काँग्रेस पार्लमेंटरी पक्षानें ज्यावेळीं एकमतानें शास्त्रींची निवड केली, त्यावेळी भारतीय जनता आणि भारतीय लोकशाही यांवर असलेली पंडित नेहरूंची श्रद्धा जगाच्या दृष्टोत्पत्तीस आली.

अर्थातच हें असें घडणार याबद्दल भारतीयांना शंकाच नव्हती. परकीयांना मात्र वाटत होतें कीं कोणत्याहि कारणांमुळें नेहरू जर निवृत्त झाले, तर भारतांत लाथाळ्या सुरू होतील आणि त्या देशाच्या ठिकऱ्या उडतील. असला विचार आमच्या मनांतहि आला नाहीं. आमच्यांत उणीवा आहेत, स्पर्धा आहेत हें आम्हांला माहीत होतें. पण या गोष्टी भारताला अधःपतनाच्या खाईत कधींच लोटणार नाहीं हें आम्हीं जाणून होतों. याचा असा अर्थ मात्र नाहीं कीं नेहरूंच्या काळांत ज्याप्रमाणें निवडणुका जिंकणें सोपें होतें त्या प्रमाणेंच यापुढील निवडणुका काँग्रेस सहज जिंकेल. काँग्रेसच्या कर्तबगारीवरच तें अवलंबून राहील. काँग्रेसनें जनतेचा विश्वास यापुढें संपादन केला नाही तर लोकशाहीच्या मार्गानेंच तिला कटु फळें भोगावी लागतील.

येथें प्रश्न असा उद्‌भवतो कीं पाश्चात्त्य निरीक्षकांचे नेहरूंच्या मृत्यूनंतरच्या भारताबद्दलचे अंदाज कां व कसे फसले ? नेहरूंच्या निधनानंतर भारतावर अनर्थ परंपरा कोसळतील, असे त्यांना वाटलें होतें ! या प्रश्नाचें उत्तर देणें अतिशय सोपें काम आहे. नेहरू आणि भारतीय जनता यांची लोकशाही पद्धतीवर संपूर्ण श्रद्धा आहे, हें पाश्चात्त्य निरीक्षकाना उमगलें नाही. नेहरूंच्या मृत्यूबरोबर भारतांतील लोकशाहीसुद्धां अस्तंगत होईल, असें त्यांस वाटत होतें. पण त्यांचें निरीक्षण वरवरचें होतें. वरवर दिसणाऱ्या मतभेदांच्या तळाशी भावनैक्य नांदत आहे, हें त्यांना कळलेंच नाहीं.

त्यांचीं मते हीं पुष्कळवेळां भारतीय वृत्तपत्रांत व्यक्त झालेल्या विचारांवर आधारलेली असत. भारतांत वृत्तस्वातंत्र्य आहे. या वृत्तपत्रांतून भारत सरकारच्या धोरणावर अहोरात्र कडक टीका करण्यांत येतात. भारतासारख्या विशाल प्रदेशांत राज्यकारभारांत चुका राहाणारच. कोणत्याहि मोठ्या खंडप्राय राष्ट्रांच्या राज्यव्यवस्थेंत चुका होणें असंभवनीय नाहीं. पण या टीका एकांगी असत.

या एकांगी टीकांमुळें पाश्चात्त्य निरीक्षकांना भारताची फक्त उणेपणाची बाजू दिसली. भारतांत कांहीं चांगल्या गोष्टी आहेत, केवळ दोषांनींच भारत भरलेला नाहीं, हें त्यांच्या ध्यानांतच आलें नाहीं. त्यामुळें त्यांचीं निदानें आत्यंतिक आणि चुकीचीं ठरली. शिवाय आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत पंडित नेहरूंनीं पाश्चात्त्यांचा अनुनय करण्यास नकार दिला होता. याचा रागहि त्यांच्या मनांत होताच. भारताला आतां नवा पंतप्रधान मिळाल्यामुळें हें धोरण आतां बदलेल अशी वेडी आशाहि त्यांना असावी !

गार्डियन या वृत्तपत्रांत जॉन ग्रिग लिहितात—पंडितजी हयात असेतोपर्यंत त्यांच्या मोठेपणाची वास्तव परीक्षा पाश्चात्यांना झालीच नव्हती. पंडितजींनीं भारताच्या स्वातंत्र्यासाठीं आपलें तन, मन व धन अर्पण केलें होतें हें विदारक सत्य पाश्चात्त्य जगाला पंडितजींच्या मृत्यूनंतरच कळलें. यामुळें त्यांना धक्का बसला. लोकशाही राष्ट्राचा नेता होणें सोपें नाहीं. नागरिकांचें राहणीचें मान उच्च असलें आणि ऐक्य व स्वातंत्र्य या भावना नागरिकांत प्रभावीपणानें दिसत असल्या तरी अशा जनतेचें नेतृत्व स्वीकारणें हें अवघड असते. मग ज्या राष्ट्रांत अनेक धर्म आहेत, भाषा आहेत, संस्कृति आहेत, जेथें बहुसंख्याक नागरिक अशिक्षित व दरिद्री आहेत, अशा राष्ट्राचें पुढारीपण ही सुळावरची पोळी

नाहीं का ?

इतरहि अनेक अपसमज परराष्ट्रांत रूढ होते. युरोप आणि उत्तर अमेरिका हींच लोकशाहीचीं माहेरघरें आहेत, लोकशाहीचीं मुळें इतरत्र कोठें रुजूंच शकणार नाहींत हा एक अपसमज होता. आशिया आणि आफ्रिका येथील रूक्ष जमिनींत लोकशाहीचें नाजुक रोपटें रुजूं शकणार नाहीं असें पाश्चात्त्यांचे मत होतें. ते म्हणत, नेहरू भारतांत जन्मले असले तरी त्यांच्यावर झालेले संस्कार पाश्चात्त्य होते. हॅरो व केंब्रिज येथील इंग्रजी परंपरेंत वाढलेले हे नेहरू! त्यांनीं आपल्या पाश्चात्त्य विचारसरणीच्या आधारावर भारतावर लोकशाही लादली ! म्हणून वादाकरितां आपणांस एवढेंच म्हणतां येईल कीं या प्रयोगांत नेहरू जरी यशस्वी झालेले दिसले तरी त्यांच्यानंतर भारतांत लोकशाही नांदूं शकणार नाहीं. या प्रकरणीं लंडन टाइम्स तर म्हणतो—नेहरू गेल्यामुळें यानंतर भारत पुन्हां आशियांत सामील होईल. तेथील नेत्यांना आतां पौर्वात्य विचार आचरणांत आणावे लागतील. ”

ही विचारप्रणाली पाश्चात्त्यांच्या मनावर इतकी ठसली आहे कीं, भारतांतील लोकशाही गेलीं १७ वर्षें टिकली आहे, जगांतील सर्वांत अधिक संख्या असलेल्या मतदारांनीं एक नव्हे, दोन नव्हे तीन निवडणुकांत सक्रिय भाग घेतला आहे, या तीनहि निवडणुका शांततेनें आणि शिस्तीनें पार पडल्या आहेत, ही वस्तुस्थिति त्यांच्या ध्यानांतच आली नाहीं. अर्थात् याला तसेंच कारण घडलें होतें. आशिया आणि आफ्रिका यांतील राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर थोड्याच काळांत तेथील लोकशाह्या धडाधड कोसळून पडल्या आणि हुकूमशाह्यांनीं आपल्या ताब्यांत सत्ता घेतली. पण भारत याला अपवाद ठरला. गांधी आणि नेहरू यांनीं दिलेली राष्ट्रीयत्वाची शिकवण हा देश विसरला नव्हता. भारताच्या राजकारणांत लोकशाहीला आज या दोघांच्या प्रेरणेनें मानाचें स्थान मिळालें आहे.

भारताबद्दल पाश्चात्त्यांना आणखी एक भीति वाटते. पंतप्रधानांच्या निवडीच्या बाबतींत जरी एकमत दिसून आलें असलें तरी तो तात्पुरता देखावा आहे; हें सोंग फार काळ टिकणार नाहीं, आपापसांतील दुहीच्या भावना थोड्याच काळांत डोकें वर काढतील, कॉंग्रेस पक्षांत बंडाळ्या होतील आणि सरकारांत वादळें माजतील, अशी पाश्चात्त्यांची भावना आहे.

अशी परिस्थिति कधींच घडून येणार नाहीं असें मानणें अविचारी ठरेल. पण आम्हां भारतीयांना आमची जनता आणि आमच्या संस्था यांची पाश्चात्यांपेक्षां अधिक माहिती आहे. गेलीं ७९ वर्षें कॉंग्रेसमध्यें दुफळी माजली आहे, सत्तेसाठीं उठाव झाले आहेत आणि तात्विक मतभेदांचें प्रदर्शनहि झालेलें आहे. पण या परिस्थितींतूनहि आम्हीं मार्ग काढलाच ना? यापुढेंहि असे प्रसंग उद्भवतील हें आम्हीं जाणून आहों. त्यांची आम्हांस भीति वाटत नाहीं, हें पाश्चात्यांनीं खूप समजून असावें.

नेहरूंच्या मृत्यूनंतर भारताच्या ठिकऱ्या उडतील अशी कांहींची अपेक्षा होती. सुदैवानें ती खोटी ठरली. आम्हांला जगावयाचें आहे. आमचें राजकीय स्वास्थ आणि एकी यांना कोणी धक्का लावण्याचा प्रयत्न केल्यास आम्हीं प्राणपणानें त्याचा प्रतिकार करूं हें या पाश्चात्त्य निरीक्षकांच्या लक्षांत आलेलें दिसत नाहीं. आमच्या राष्ट्रावर अनेकवेळां परकीय आक्रमणें आलीं, परकीयांनीं आमचा देश जिंकला, आमच्यांतील दुहीचा त्यांनीं फायदा घेतला, हें कटु सत्य आम्हांला स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें उपकारकच ठरलें आहे. १९६२ च्या ऑक्टोबरांत चीननें आमच्यावर केलेल्या आक्रमणाचेंच उदाहरण घ्या. त्यावेळीं आम्हीं आपापसांतील मतभेद विसरून एकत्र आलों ना? त्याचप्रमाणें पंडितजींच्या निधनामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीशीं आम्हीं मतभेद विसरून एकजुटीनें तोंड देणार आहों, तोंड देत आहों.

विचारस्वातंत्र्याच्या आमच्या कल्पनांमुळें पाश्चात्त्यांना आम्हीं आमच्या दोषांचें खाद्य पुरविलें खरें, पण त्यांवरून त्यांनीं जीं अनुमानें काढलीं, त्यामुळें आम्हीं थक्क झालों. आमचें सार्वजनिक जीवन समाधानकारक नाहीं हें आम्हींहि जाणतों, आमची आर्थिक परिस्थिति फारशी संतोषजनक आहे, असें आम्हांलाहि वाटत नाहीं, आमच्यांतील फुटीर वृत्ति आमच्या राष्ट्रीय ऐक्याला बाधक ठरणार आहे हेंहि आम्हीं ओळखून आहों.

पण परिस्थिति प्रतिकूल असली, संकटांचे डोंगर असले तरी लोकशाही तत्त्वांना अनुसरूनच जगण्याची आम्हांला इच्छा आहे. लोकशाही आमच्या हाडामासांत भिनली आहे, लोकशाहीवर आमची नितांत श्रद्धा आहे. लोकशाही भारतांत स्थिर व्हावी अशी आमची प्रबळ इच्छा आहे. या इच्छेच्या बळावरच आमचें राजकीय ऐक्य आणि प्रादेशिक एकात्मता टिकेल. त्यासाठीं

आम्हीं सर्व प्रकारचा त्याग करावयास सिद्ध आहों. वायफळ बडबड करणें हा आमचा राष्ट्रीय छंद असला तरी ध्येयसिद्धीसाठीं आम्हीं तोहि हौसेनें आणि मनापासून सोडून देऊं !

पाश्चात्त्यांकडून आतां आपण पौर्वात्य टीकाकारांकडे वळूं. कैरो, तेहेरान, कोलंबो, रंगून आणि मनिला येथील आमच्या टीकाकारबंधूंनीं याबाबतींत जी सहानुभूतीची वृत्ति दाखविली आहे, त्यामुळें आमचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येत आहें. पाश्चात्त्यांशीं तुलना करतां आशियायी बांधवांना आमच्याबद्दल कमी माहिती आहे. पण नेहरूंच्या निधनामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल त्यांनीं निष्कारण बाऊ निर्माण केला नाहीं. एवढेंच नव्हें तर नेहरूंच्या निधनामुळें भारतांत जी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून येईल, नेहरूंचें अपुरें कार्य पुरें करण्यासाठीं घटनात्मक आणि लोकशाही—पद्धतीनें निवडलेला वारस निर्माण होईल आणि त्याच्या नेतृत्वाखालीं भारत स्थिर होईल असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला आहे. तेहेरान येथील बमशद या वृत्तपत्रांतील हा मजकूर पाहा. हें वृत्तपत्र म्हणतें– " भारताच्या भवितव्याबद्दल ज्यांना शंका वाटते त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं भारतांत एक समर्थ पक्ष अस्तिवांत आहे, तेथील वृत्त-पत्रांना स्वातंत्र्य आहे, आणि तेथील न्यायालयें संशयातीत आहेत. अशा गुणवान राष्ट्रांत दुही अथवा हुकूमशाही कशी उद्‌भवेल ? ज्या राष्ट्रांत सत्तेचा वापर मूठभर लोकांच्या फायद्यांसाठीं केला जात नाहीं, जेथे लोकांच्या संमतीनें आणि अनुमतीनें राज्यकारभार चालविण्यांत येतो, तेथें परचक्रच काय पण त्याहीपेक्षां भीषण अशा संकटांवर, दुहीवर, धार्मिक मतभेदांवर आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या मृत्यूनें निर्माण झालेल्या अडचणींवर सहज मात करतां येईल. "

खाटमांडू येथील ' समीक्षा ' म्हणतें– " नेहरूंच्या मृत्यूमुळें भारतीय लोक-शाहीलाच जणूं कांहीं आव्हान मिळालें आहे. भारतांतील राज्यकर्त्यांनीं आत्मविश्वासानें हें आव्हान स्वीकारलें आहे. कारण आपल्या कार्यक्षमतेवर त्यांचीं श्रद्धा आहे." मनीला येथील सॅटरडे क्रॉनिकल म्हणतें—" गेलीं १७ वर्षें पंडितजींच्या कृपाछत्राखालीं भारतांत लोकशाहीची वाटचाल झालेली आहे. पुरीं १७ वर्षें त्यांनीं भारतांत लोकशाहीचें वातावरण प्रस्थापित केलें आहे. भारतांत झालेल्या तीन यशस्वी निवडणुका याचीं प्रतीकें आहेत. पंडितजींनीं भारताच्या विचारसरणीला वळण लावलें आहे. हें वळण बदलणें सोपें नाहीं "

जॉन ग्रिगनें पंडित नेहरूंवर जो मृत्युलेख लिहिला त्यांत या परिस्थितीचें त्यानें सत्य निदान केलें आहे. तो म्हणतो–"पंडित नेहरूंच्या जागीं असलेल्या कोणा-सहि सर्वसाधारणपणें अविवेकी व्हावेसें वाटलें असतें. त्यांची सत्ता निरंकुश असती, आणि व्यक्तिमत्त्व बलाढ्य असतें तर ! पण जनतेचें बलिदान करून आपलीं इप्सितें साध्य करण्याची हांव नेहरूंनीं कधींच धरली नाहीं."

## २

# निष्फळ कर्मयोग

प्रश्न— गांधीजींनीं आपला ठेवा म्हणून तुम्हांला भारताच्या स्वाधीन केलें असें लोक म्हणतात. भारताला आतां तुम्हीं कोणता ठेवा देणार ?

उत्तर— आपला नेता निवडण्याचें कौशल्य भारताच्या ४० कोटी लोकांत आहे. त्यांचा हक्क मीं कसा हिरावून घेऊं ? मीं तें करणें उद्धटपणाचें ठरेल.

प्रश्न— पण त्या लोकांत तें कौशल्य नसलें तर ?

उत्तर— असं कां म्हणतां ? भारतीयांजवळ तें कौशल्य आहे. आपला राज्य-कारभार आपणच चालवावा ही कल्पना जनमनांत बाणविण्याची आम्हीं आज-वर जी धडपड केली, ती वाया जाणार असेल तर मला दुःखच होईल. पण आमची धडपड वाया गेली आहे असें मला वाटत नाहीं. निदान याबाबतींत तरी ती खासच वाया गेली नाहीं.

प्रश्न— तुमचे मित्र म्हणे असें म्हणतात कीं तुम्हीं जर तुमचा वारस नेमला नाहीं तर राष्ट्राचीं शकलें होतील. तुमची जागा घेणारा माणूस तुम्हीं जर तयार केला नाहीं तर तुमच्या कार्याचा विचका होईल, असेंहि लोक म्हणतात.

उत्तर — मला नाहीं वाटत त्याबाबत कांहीं अडचण उपस्थित होईल. आमचें राष्ट्र हें कार्य व्यवस्थितपणें पार पाडील.

' सॅटरडे रिव्ह्यू ' चे संपादक श्री नॉर्मन कझिन्स आणि पं. नेहरू यांच्यांत हें संभाषण झालें. पंडितजींच्या मृत्यूनंतर ही मुलाखत त्या पत्रांत प्रसिद्ध झाली.

कझिन्स आपल्या लेखांत पुढें म्हणतात.— " पंडितजींच्या काळांत असा विश्वास व्यक्त करणें फक्त त्यांनाच शक्य होतें. पण त्यांचा हा विश्वास किती योग्य होता, हें आज भारतीयांना पटलें आहे. एका चांगल्या आणि हुशार व्यक्तीला नेता म्हणून निवडण्यांत भारतीयांना यश आलें आहें. विशेष म्हणजे ही निवड होत असतांना कसलाहि गोंधळ झाला नाहीं कीं व्यत्यय आला नाहीं. "

पण मला मात्र असं वाटतं, कीं गेलीं १७ वर्षे नेहरू आपल्या वारसाच्या शोधांत होते. आपला राजकीय वारस व अनुयायी शोधण्याची त्यांची सदैव खटपट होती. आपला ध्येयवाद आणि आपली बुद्धि त्या वारसांत त्यांना हवी होती. आपले विचार त्यानें व्यक्त करावेत, आणि आपलीं ध्येयधोरणें त्यानें चतुराईनें आणि प्रामाणिकपणानें चालवावींत अशी त्यांची इच्छा होती. पण पंडितजींचे ते प्रयत्न निष्फळ ठरले. माझें हें मत साधार आहे.

असा वारस पंडितजींना आढळून आला असता तर त्यांनीं त्याची नक्कीच निवड केली असती. पण अविश्रांत परिश्रम करूनहि त्यांना लायक वारस मिळूं शकला नाहीं.

कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षाचा नेता नेहरूंनीं निवडावा अशी लोकांची अपेक्षा असती तर ती नेहरूंनीं मान्य केली नसती. कारण तसें करणें लोकशाहीच्या तत्त्वांच्या विरुद्ध झालें असतें. नेता पक्षानें निवडला पाहिजे त्याबद्दल आपण आग्रह धरूं नये असें त्यांचें मत होतें.

व्हिन्सेंट शीन यांनीं नेहरूंना हा प्रश्न एकदां विचारला होता. नेहरू म्हणाले, " लोकसत्ताक नेते कधीं आपले नेते निवडतात कां ? आपण रोमन बादशाहा कां आहों ? लोकशाहीवर माझी नितांत श्रद्धा आहे. लोकशाहीच्या प्रचलित तत्त्वांतूनच माझा वारस उदयाला येईल. "

आपला वारस कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षाचा नेता असावा आणि त्या पदावरून भारताच्या पंतप्रधानाचें पद त्याला मिळावें, असा बहुधां नेहरूंचा आशय असावा.

गांधींनीं ज्यावेळीं नेहरूंची आपला वारस म्हणून घोषणा केली, त्यावेळीं आपला वारस हा सबंध देशाचा नेता असावा, तो केवळ कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षाचा नेता असूं नये. असें बहुधां त्यांच्या मनांत असेल.

हा परिपाठ विचारांत घेऊनच कॉंग्रेस पक्षाचा नेता म्हणून कोणाचीहि निवड

करण्यास नेहरूंनीं नकार दिला.

खरं म्हटलं तर नेहरूंच्या भोंवताली अनेक लोक होते. आपापल्या क्षेत्रांत हीं माणसं चमकलीं होतीं. कांहींचें व्यक्तिमत्त्व प्रभावी होतें, पण बुद्धिमत्तेंत हीं माणसं थिटीं होतीं, व्यापक दृष्टिकोनाचा त्यांच्याजवळ अभाव होता. नेहरूंच्या मनांत साकार झालेल्या समाजसत्ताक विचारसरणीची झेंप त्यांजजवळ नव्हती, लांब मुदतीच्या अर्थव्यवस्थेचा आवाका त्यांना आला नव्हता. खरं म्हणजे सुप्रतिष्ठित अर्थ व्यवस्था हें नेहरूंचें एक लाडकें स्वप्न होतें. शिवाय आंतरराष्ट्रीय राजकारणांत तुल्यबळ असा कोणी लायक पुढारीहि नेहरूंना आढळेना.

अलिप्ततावाद आणि शांततामय जीवन यांचा आग्रही पुरस्कार नेहरू करूं लागले कीं कित्येकांना तें विवेचन कंटाळवाणे वाटावें. लोकशाही व शांतता यांच्या गप्पा मारणारे लोक अनेक होते, पण हीं वक्तव्यें करणारीं माणसें स्वतः मात्र स्वार्थी व खुज्या मनाचीं होतीं.

नेहरूंच्या मंत्रिमंडळाचें एक मजेदार वर्णन एकदां एकानें मजजवळ केलें होतें. एखाद्या विद्वान् प्राध्यापकाचें विद्वत्ताप्रचुर विवेचन त्यांच्या वर्गातील बालबच्चांनीं ऐकावें, आणि तें न कळल्यानें केवळ स्तब्ध व्हावें असा कांहींसा प्रकार तेथें घडे. त्या बैठकींतील वादविवाद म्हणजे नेहरूंचें विवेचन. कोणाला शंका नाहीं, पृच्छा नाहीं. नेहरूंचें विवेचन ऐकावें आणि तें मान्य व्हावें असेंच बहुधां घडे.

नेहरूंना अर्थातच ही परिस्थिति मान्य नव्हती. जयप्रकाश नारायण हे त्यांच्या मनांत भरले होते. आपला वारस म्हणून त्यांना मान्यता देण्याची नेहरूंची इच्छा होती. म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांचा विरोध होता तरी नेहरूंनीं काँग्रेसमध्ये परत येण्याविषयी जयप्रकाश नारायण यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसमध्यें उपपक्ष असूं नयेत असें नुकतेंच काँग्रेसनें सरदार वल्लभभाईंच्या सूचनेवरून ठरविलें होतें आणि त्यानुसार समाजसत्तावाद्यांची काँग्रेसमधून हकालपट्टीहि झालेली होती.

पण नेहरूंचा आग्रह जसजसा जोराचा होऊं लागला, तसतसा जयप्रकाशांचा प्रतिरोधहि वळावूं लागला. अखेर नाइजानें नेहरूंनी जयप्रकाशांचा नाद सोडून दिला.

या घटनेची सूचना फेब्रुवारी १९४८ मध्यें केलेल्या एका भाषणांत नेहरूंनीं

दिली होती. ते म्हणाले होते, "जयप्रकाश नारायण यांच्या कर्तृत्वाबद्दल मला कधींच शंका नव्हती व नाहीं. ते माझे स्नेही आहेत आणि भारताचें भवितव्य घडविण्याच्या बाबतींत त्यांचा कधींतरी मोठा हातभार लागेल असा मला विश्वास आहे."

पण याबाबतींत नेहरूंना अपयश आलें १९५२ मध्यें झालेल्या स्वतंत्र भारतांतील पहिल्या निवडणुकीनंतर जयप्रकाशांचें मन वळविण्याचा नेहरूंनीं पुन्हां एकदां प्रयत्न केला. प्रजासमाजवादी पक्षानें कॉंग्रेसमध्यें पुन्हां परत यावें अशी यावेळीं नेहरूंची इच्छा होती.

पण हीं बोलणी फिसकटलीं, सहा महिने चालू असलेल्या या वाटाघाटी अयशस्वी ठरल्या. कारण समाजसत्तावाद्यांना यावेळीं आपल्या सामर्थ्याबद्दल भलत्याच कल्पना होत्या. त्या कल्पनांचा वस्तुस्थितीशीं संबंध नव्हता, ही गोष्ट निराळी. म्हणून कॉंग्रेसला स्वीकारणें अशक्य होईल अशा अटी त्यांनीं मांडल्या. निवडणुकींत कॉंग्रेसला ४.५ कोटि व समाजवादी पक्षाला १.७ कोटि मतें पडलीं होतीं आणि वरवर पाहातां समाजवादी पक्षाला जनतेचा बऱ्याच प्रमाणावर पाठिंबा मिळाला होता. हें जरी खरें असलें तरी कॉंग्रेसवर अटी घालण्याइतकें सामर्थ्य समाजवादी पक्षाचें नव्हतें हें खास.

यांतून मार्ग काढण्यासाठीं पंडिजींनीं पुन्हां एकदां प्रयत्न केले. मार्च १९५३ मध्यें काढलेल्या एका पत्रकांत पंडितजी म्हणतात—"कॉंग्रेस व प्रजासमाजवादी यांत मतभेद असतील; पण या दोन पक्षांत साम्यस्थळेहि पुष्कळ आहेत. त्यांची इच्छा असल्यास अजूनहि त्यांना सहकार्याचा हात पुढें करतां येईल. अराष्ट्रीय आणि जातीय वृत्ति समाजाला भलतीकडे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेंच आपल्याला नवा आणि संपन्न भारत निर्माण करावयाचा आहे. त्यासाठीं तरी आपण सहकार्य करूं या."

पण नेहरूंची ही कळकळींची विनंती प्रजासमाजसत्तावादी पक्षानें मानली नाहीं. त्यांना आपलेंच घोडे पुढें दामटावयाचें होतें आणि कॉंग्रेसकडून संपूर्ण शरणागति हस्तगत करावयाची होती. या एकाच अटीवर ते कॉंग्रेसशीं सहकार्य करण्यास तयार होते. त्यांच्या कार्यकारी सभेनें या बाबतींत केलेलें हें निवेदन पाहा—"आमचें असें म्हणणें आहे कीं आम्हां उभयतांमधील कार्यक्रम समान असल्याखेरीज सरकारी व इतर क्षेत्रांतील सहकार्याच्या कल्पना मतभेद

निष्फळता आणि अपयश यांतच विरून जातील. ”

प्रजासमाजवादी पक्षानें एक १८ कलमी कार्यक्रम काँग्रेसला सादर केला होता. हा कार्यक्रम किमान आहे असें त्यांत म्हटलें होतें. बँकांचें व प्रमुख उद्योग धंद्याचें राष्ट्रीयीकरण, घटनेंत दुरुस्त्या वगैरें कलमें या कार्यक्रमांत अंतर्भूत करयांत आलीं होतीं. घटनादुरुस्तीचें कलम मान्य केलें असतें तर खुद्द काँग्रेसमध्येंच तट पडले असते. नेहरूंना अर्थातच हें मान्य होणें शक्य नव्हतें. काँग्रेस ही केवळ पक्ष न राहातां जिवंत चळवळ म्हणून चालावी, त्यासाठीं काँग्रेसमध्यें मतैक्य राहावें अशी नेहरूंची इच्छा होती. म्हणून या वाटाघाटी अयशस्वी झाल्या, हें सांगतांना नेहरू म्हणाले, “ अशा वाटाघाटींच्या वेळीं एकमेकाला बांधून घेण्यांत अर्थ नसतो. या वाटाघाटींत असा प्रकार घडला म्हणून वाटाघाटी अयशस्वी झाल्या. ”

नेहरूंना एकच खंत वाटली. आपल्याच मतप्रणालीचे आपले बांधव आपले विरोधक व्हावेत यांचें त्यांना वाईट वाटलें. काँग्रेसचें जहाज समाजसत्तावादी बंदराला पोंहोंचविण्याचें दुर्घट कार्य करणाऱ्या समाजवादी नेहरूंना समाजवादी पक्षानें विरोध करावा याचा त्यांना खेद झाला.

या वाटाघाटींच्या वेळीं असा विपरीत अनुभव आल्यामुळें आपल्या राजकीय वारसाबाबत घोषणा करण्यास त्यांचें मन घेईना. आपल्या खांद्यावरील अवजड ओझें पेलूं शकेल, आपल्या ध्येयधोरणांची प्रामाणिकपणानें अंमलबजावणी करील अशी व्यक्तीच त्यांना आपल्याभोंवतीं दिसेना.

या घटनेला आतां पुष्कळच काळ लोटला आहे. जयप्रकाशजी राजकारणांतून निवृत्त होऊन सर्वोदयाकडे वळले आहेत. अर्थातच मधूनमधून ते राजकारणांत भाग घेतात हें सर्वश्रुत आहे. “ जयप्रकाशजी हे राजकारण व भूदान यांचा लपंडाव खेळत आहेत, ” असा नेहरूंनीं त्यांच्यावर स्पष्ट आरोप केला होता. आणखी दोन निवडणुका झाल्या. प्रजासमाजवादी पक्ष हा पक्ष म्हणून घरंगळूं लागला आणि आज तर तो नाममात्रच राहिला आहे. काँग्रेस व प्रजासमाजवादी पक्ष यांची युति व्हावी असें आतां जयप्रकाशजी जाहीररीत्या म्हणूं लागले आहेत. पण बैल गेल्यावर झोपा करण्यांत काय अर्थ ?

नेहरूंच्या निधनानंतर जयप्रकाशजींनीं मद्रास येथें एका जाहीर सभेंत भाषण केलें. १९४८ मधील पंडित नेहरूंची सूचना आपण अमान्य केली ही आपली

मोठी चूक झाली असे त्या भाषणांत त्यांनीं कबूल केलें. समाजवाद्यांनीं नेहरूंचें आवाहन स्वीकारून, भारतांत समाजवादी लोकशाही स्थापन करण्याच्या त्यांच्या कार्यास त्यावेळीं मदत करावयास हवी होती, असेंहि ते म्हणाले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल, बाबू राजेंद्रप्रसाद, श्री. राजगोपालाचारिअर यांच्या हातीं कॉंग्रेसचीं सूत्रें जातील आणि समाजसत्तावाद झुगारून देऊन कॉंग्रेस भांडवलशाहीच्या आहारी जाईल असा आपला अंदाज होता, पण तो चुकीचा ठरला असें त्यांनी या भाषणांत मान्य केलें. ते म्हणाले. "कालांतरानें सरदार वल्लभभाई वारले, राजेंद्रप्रसाद राष्ट्राध्यक्ष झाले, आणि राजाजींनीं कॉंग्रेसच्या बाहेर पडून स्वतंत्र पक्ष स्थापन केला. साहजिकच कॉंग्रेसचीं सूत्रें एकट्या नेहरूंच्या हातीं राहिली."

जयप्रकाशांचें सहकार्य मिळत नाहीं असें आढळून आल्यानंतर पुढील पावलें टाकण्याच्या आधीं नेहरू कांहीं काळ थांबले, पण त्यांचे सहकारी एकामागून एक निधन पावूं लागले. पंडितजी पुन्हां एकाकी राहिले. आपला राजकीय वारस निवडण्याचा यक्ष प्रश्न त्यांच्यापुढें अधिक तीव्रतेनें उभा राहिला. यावेळीं बहुधा त्यांच्यासमोर कृष्ण मेनन असावेत. कारण त्या दिशेनें त्यांनीं जोरानें प्रयत्न करण्यास सुरवात केली.

मेनन यांचें नांव नेहरूंच्या मनांत बराच काळ असलें पाहिजे. पण मेनन यांचा भांडखोर स्वभाव, कांटेरी व्यक्तिमत्त्व यांमुळें आंतरराष्ट्रीय प्रांगणांत ते अप्रिय झाले होते आणि त्यामुळें नेहरूंना त्रास होत होता. यामुळें नेहरूंनीं मेनन यांच्या नांवाचा विचार तात्पुरता बाजूस ठेवला. मात्र कोणत्याहि प्रकरणांत मेनन यांची बाजू घेण्यास नेहरू चुकले नाहींत.

कृष्ण मेनन हे नेहरूंचे जुने दोस्त. त्यांचा त्याग, त्यांचा झुंझार ध्येयवाद, कुशाग्र बुद्धि, आणि लोकशाहीवरील प्रेम यांनीं नेहरू आकर्षित झाले होते. म्हणूनच कीं काय भारताचे ब्रिटनमधील पहिले हायकमिशनर म्हणून नेहरूंनीच मेनन यांचे नेमणूक केली. पण तेथें मेनन यांचें ब्रिटनमधील वृत्तपत्रें आणि पुढारी यांच्याशी जमलें नाही. म्हणून १९५२ मध्यें मेनन यांची तेथील मुदत संपल्यानंतर नाखुशीनेंच पंडितजींनीं मेनन यांना परत बोलाविलें. १९५२ पासून १९६२ पर्यंत मेनन हे राष्ट्रसंघांतील भारतीय शिष्टमंडळाचे नेते म्हणून काम पाहात होते. आपलें वक्तृत्व, कौशल्य आणि बोचरी जिव्हा यांच्या सहाय्यानें

त्यांनी राष्ट्रसंघ गाजवला. अडलेल्या प्रसंगांतून तोड काढणें, अचूक शब्द वापरणें, समिति पद्धतीचा अवलंब करणें या गुणांमुळें त्यांनीं तेथें आपलें वैशिष्ट्य प्रस्थापित केलें.

साहजिकच आपल्या चेल्याचा आंतरराष्ट्रीय कार्यांत झालेला हा विजय पाहून नेहरूंना मूठभर मांस चढलें आणि मेनन यांचा आपल्या मंत्रिमंडळांत समावेश करण्याचें त्यांनीं ठरविलें. इतर मंत्र्यांचा विरोध हळूहळू कमी करीत करीत नेहरूंनीं मेनन यांना मंत्रिमंडळांत तर घेतलें. १९५६ मध्यें बिनखात्याचे मंत्री म्हणून मेनन याचा शपथविधि झाला.

१९५७ मध्यें संरक्षणमंत्री म्हणून मेनन यांची नेमणूक करण्यात आली. तेथेंहि त्यांनी आपली चमक थोड्याच काळांत दाखविली. त्यांच्या कारकीर्दीत संरक्षण खात्याला महत्त्व प्राप्त झालें. आतापर्यंत या खात्याला मंत्रिमंडळात फारसे स्थान नव्हतें. १९६२ ची सार्वत्रिक निवडणूक झाली. आचार्य कृपलानींसारख्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून मुंबई शहर मतदार संघातर्फे मेनन लोकसभेवर निवडून आले.

मेनन हे अहोरात्र काम करणारे. देशांत आणि पक्षोपक्षांत मतभेद राहूं नयेत यासाठी त्यांनीं जिवापाड कष्ट केले. काँग्रेसमधील उजवे आणि डावे या दोघांवरहि आपल्या टीकेचें वज्र फेंकण्यास ते मागेपुढें पाहात नसत. पण आपलें स्थान बळकट करण्याचेहि त्यांचे प्रयत्न चालू असावेत अशीं हळूहळू चिन्हें दिसूं लागलीं. मोक्याच्या जागीं आपले लोक असावेत यासाठीं त्यांनीं घडवून आणलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि आपल्या ताटाखालचीं मांजरें बनण्यास तयार नसलेल्यांस बाजूस टाकण्याची त्यांची वृत्ति अनेकांच्या डोळ्यांत खुपूं लागली.

सुमारें बारा वर्षेपर्यंत मेनन हे नेहरूंच्या लोभातले होते. परदेशांतील वकील, राष्ट्रसंघाचे सभासद, जिनीव्हा येथील निःशस्त्रीकरण परिषदेचे सदस्य, आफ्रो-आशियायी परिषदांचे घटक अशा अनेक नेमणुका त्यांनीं पार पाडल्या. मेनन हे नेहरूंचे परराष्ट्रीय खात्याचे सल्लागारहि होते. आणि भारताचे परराष्ट्रीय धोरण त्यांच्याच सल्ल्याने चाले. हें धोरण तटस्थतेचें आहे पण तें थोडेसें रशियाकडे झुकलेलें आहे असेंहि पाश्चात्य राष्ट्रांस वाटूं लागलें. मेनन हेच नेहरूंचे वारस ठरणार, अशी सर्वत्र भाषा ऐकूं येऊं लागली आणि बहुधा मेनन यांचाहि कांहीं

काळ तसा समज झालेला असावा.

भारतीय मंत्रिमंडळांतहि बुद्धिमत्तेच्या बाबतींत मेनन हेच नेहरूंच्या खालोखाल होते. नेहरूंचीच भाषा जणू कांहीं ते बोलत आणि नेहरूंच्या विचारांशीं तेच एकरूप होऊं शकत. योजना, अणुबॉंब, आफ्रो–आशिया प्रश्न या प्रकरणांवर मंत्रिमंडळांत चर्चा झाली कीं बाकीचे मंत्री गप्प बसत आणि मेनन हेच महत्त्वाचे विचार मांडीत.

राष्ट्रसंघाच्या बैठकींतहि अलिप्तता, शांततामय सहजीवन, निःशस्त्रीकरण, वसाहतवाद, काश्मीर वगैरे प्रश्नांवर मेनन नेहरूंच्या मतांचाच पुरस्कार करीत. पण हें करतांना ते पाश्चात्यांना चिमटे घेत. एक दोनदा तर त्यांनीं इतकी विषारी टीका केली कीं अमेरिकेंत त्यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण झाला. आफ्रिका आणि आशिया या राष्ट्रांच्या प्रश्नाबद्दल मतें मांडतांना त्यांनी इतका दंभ दाखविला आणि त्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींशीं त्यांनीं अशी वर्तणूक केली कीं त्या देशांचेंहि मेनन आणि भारत यांच्याबद्दलचें मत गढूळ झालें.

भारताच्या लोकसभेंत मेनन यांच्यावर हल्ले व टीका सुरू झाल्या. देशांत त्यांच्याविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण झाली. खुद्द कॉंग्रस सभासदांनीहि मेनन यांच्याविरुद्ध मतें व्यक्त करण्यास सुरवात केली. याही वेळीं नेहरू मेनन यांच्या मदतीस आले. त्यांचीं विधानें आणि त्यांच्या कृति यांचा नेहरूंनी आवेशानें पाठपुरावा केला. त्यामुळें नेहरूंबद्दलहि गैरसमज निर्माण होऊ लागले. मेनन यांच्या सर्व चुकांचीं व टीकांची जबाबदारी, नेहरूंनीं आपल्या शिरावर घेतली.

याचवेळीं माओत्से तुंग प्रकरण निर्माण झालें. १९६२ मध्यें चीननें भारताच्या उत्तर सरहद्दीवर क्रूर हल्ला केला. या हल्ल्याला तोंड देण्यासाठीं आपली कसलीच सिद्धता नव्हती. भारतावर चीन कधींच हल्ला करणार नाहीं, नेफा अघाडीवर चीनचें आक्रमण होणारच नाहीं, असें मेनन वारंवार सांगत होते.

चीनच्या हल्ल्यामुळें संरक्षणमंत्र्यांवर टीकेची झोड उठली. त्यांचे अंदाज फसल्याबद्दल प्रचंड लोकक्षोभ माजला. याबाबतींत मेनन यांना नेहरूंचें सहाय्य मिळणें अशक्य होतें. थोड्याच अवधींत मेनन यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी झाली आणि विस्मृतीच्या गर्तेत ते फेकले गेले.

चीनच्या या आक्रमणामुळें नेहरू कमींतकमीं दहा वर्षांनीं तरी वृद्ध झाले.

ते खचले. आपला स्नेही माओ-त्से तुंग यानें असलें कृत्य करावें ही गोष्ट त्यांना जिव्हारीं लागली. पंचशील करारावर सही करणाऱ्या माओ-त्से तुंगनें असें अघोर कृत्य करावें? अलिप्ततावादाची आपण हिरीरीनें जपणूक केली. आपलें तें तत्त्वज्ञान होतें. आंतरराष्ट्रीय राजकारणांतील आपला तो हुकमाचा एक्का होता. हें तत्त्वज्ञान एखाद्या पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें कोसळून पडावें! हा एक्का मारला जावा?

या घटनेचा नेहरूंच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला. आपल्या राजकीय वारसाची निश्चिति आपण केलीच पाहिजे आणि ती त्वरित केली पाहिजे हा विचार त्यांच्या मनांत ओघानेंच आला. या वेळीं नेहरूंच्या पुढें बिजू पटनाईक यांचें नांव आलें. पटनाईक हे ओरिसांतील एक बडे कारखानदार होते, होतकरू होते.

भारतीय मुत्सद्द्यांच्या मानानें ४८ वर्षांचे पटनाईक हे लहान होते. पण त्यांच्याभोंवतीं पराक्रमाचें वलय होतें. दुसऱ्या महायुद्धांत धाडसी वैमानिक म्हणून त्यांनीं नांव कमावलें होतें. हवाईदलांत काम करीत असतांनाच 'भारत छोडो' चळवळींतील भूमिगतांस मदत केल्याबद्दल त्यांना तुरुंगवासहि घडला होता. युद्धाच्या अखेरीस तर इंडोनेशियाचे लोकसत्ताक पुढारी शहरिआर यांना विमानानें जकार्तांहून दिल्लीस आणल्याबद्दल त्यांचें सर्वत्र कौतुक होत होतें.

विमानविद्येबरोबर कारखानदारीहि हस्तगत करून पटनाईक यांनीं कीर्ति मिळविली होती.

त्यांच्याच असामान्य प्रयत्नांमुळें मागासलेला ओरिसा झपाट्यानें पुढें आला. ओरिसाचें राजकारण त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. पटनाईक यांचें व्यक्तिमत्त्व मोठें आकर्षक असल्यानें आणि त्यांचे विचार पुरोगामी असल्यानें एखादी गोष्ट करून घ्यावयाची असल्यास लोक पटनाईक यांच्याकडे धांव घेऊं लागले. त्यांची धंद्यांतील आजची गुंतवण १२ कोटी रुपयांची असून त्यांच्या हाताखालीं १२,००० कामगार काम करीत आहेत, असें म्हणतात. गिरण्या, ट्यूब्स्, विमान-कंपनी वगैरे अनेक उद्योगधंदे त्यांनीं सुरू केले असल्याचें वृत्त आहे.

पटनाइकांनीं ओरिसाच्या राजकारणांतहि आपली चमक दाखविली. तेथील विधानसभेच्या निवडणुकींत एकूण १४० जागांपैकीं ८२ जागांवर त्यांनीं काँग्रेसचे उमेदवार निवडून आणले. ओरिसामधील काँग्रेस त्यांच्या हातांतलें बाहुलें बनली.

ओरिसाचे ते मुख्य प्रधान झाले. कामराज योजनेनुसार १९६३ च्या ऑगस्ट-मध्यें राजीनामा देईपर्यंत ते त्या जागेवर होते.

चिनी आक्रमण येतांच, पटनाईक भारतीय क्षितिजावर धूमकेतूप्रमाणें उदयास आले. धूमकेतूप्रमाणेंच नंतर ते अस्तंगत झाले ही गोष्ट निराळी. नेहरूंनीं त्यांना कांहीं काळ जवळ केलें खरें, पण थोड्याच अवधींत पटनाईक बाजूला पडले. या अल्पकाळांत पटनाईक हे नेहरूंचे संरक्षण प्रश्नावरील सल्लागार होते. दिल्लींतील परराष्ट्र कचेरींत त्यांची खास कचेरी होती. शिवाय ओरिसाचे ते मुख्य मंत्री होतेच. शस्त्रास्त्रें मिळविण्यासाठीं याच वेळीं त्यांनीं अमेरिकेचीहि वारी केली.

पटनाइकांचा अविवेकीपणा त्यांच्या अधःपाताला कारणीभूत झाला असावा. त्यांचें वर्चस्वहि कॉंग्रेसवाल्यांना व इतरांना सहन झालें नसावें. कारण थोडक्याच काळांत पटनाईक नेहरूंच्या मनांतून उतरले.

यानंतर नेहरूंच्या मनःचक्षूंसमोर आपल्या कन्येचें नांव आलें असावें. इंदिराबाई कांहीं काळानंतर, विशेषेंकरून १९६७ च्या निवडणुकांनंतर आपलें स्थान घेऊं शकतील असा अंधुक विचार नेहरूंच्या मनांत आला असावा. खुद्द कॉंग्रेस गोटांतहि या तर्काला आधार सांपडतो. नेहरूंचे टीकाकार आणि त्यांचे निकटवर्ती सुद्धां ही गोष्ट मान्य करतात.

आणि इंदिराबाईजवळ गुणहि तसेच होते. प्रगत शिक्षण, ध्येयवादित्व, बुद्धि-कौशल्य, राजकारणाचा अनुभव, आंतरराष्ट्रीय प्रश्नांची माहिती, कॉंग्रेस संघटनेवर वजन हे नेहरूंचे गुण त्यांनीं उचलल्यामुळें नेहरूंच्या मनांतील वारसा-संबंधींच्या कल्पना इंदिराबाईंत साकार होण्यास वाव होता. शिवाय १९५९ मध्यें त्यांनीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वी रीत्या पार पाडली होती.

केरळमध्यें कम्युनिस्टांचें मंत्रिमंडळ आलें. या प्रसंगीं कॉंग्रेसच्या अध्यक्ष या नात्यानें राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांची भेट घेऊन त्यांनीं त्यांचें मन वळविलें व केरळमध्यें राष्ट्रपतींची सत्ता सुरू केली. नेहरूंचा या प्रकरणीं फारसा पुढाकार नव्हता. पूर्व आफ्रिका व अमेरिका येथेंहि त्यांनीं राजकीय स्वरूपाच्या यशस्वी वाटाघाटी केल्या होत्या. इंदिराबाई या दृढनिश्चयी व उदार मनाच्या आहेत. पंजाबांतील कैरॉं प्रकरणीं कडक धोरण अवलंबण्यास नेहरू तयार नव्हते, पण इंदिराबाईनीं त्यांचें मन वळविलें.

पंडितजींना आणखी तीन वर्षें आयुष्य मिळालें असतें तर इंदिराबाई त्यांच्या तालमींत तयार झाल्या असत्या आणि नेहरूंची गादी त्यांनीं चालविली असती. पंडितजी स्वेच्छेनें आणि आनंदानें निवृत्त झाले असते. नेहरूंचा तसा विचार होता असें त्यांचे निकटवर्ती सांगतात.

पण मनसा चिंतितं कार्यम् । दैवम् अन्यत्र चिंतयेत् । १९६४ च्या जानेवारींत नेहरू आजारी पडल्यानंतर, आपण तीन वर्षें तरी जगूं कीं नाहीं याची नेहरूंना शाश्वती वाटेना. त्यांची जागा घेण्यास त्या वेळीं तरी इंदिराबाई पात्र झालेल्या नव्हत्या !

या वेळीं नेहरूंचें लक्ष लाल बहादूर शास्त्री यांच्याकडे वळलें. ५ महिन्यांपूर्वींच मोरारजी देसाई, स. का. पाटील व जगजीवनराम यांच्यासमवेत कामराज योजनेनुसार शास्त्री मंत्रिमंडळांतून बाहेर पडले होते. नेहरूंनीं शास्त्रींना परत बोलाविलें, बिनखात्याचे मंत्री म्हणून त्यांची नेमणूक केली, आणि पंतप्रधान व परराष्ट्र मंत्रिपदाचीं आपलीं महत्त्वाचीं कामें त्यांच्याकडे सुपूर्त केलीं. येथें असा प्रश्न निर्माण होतो कीं, पंडितजींनीं या वेळीं लाल बहादूर शास्त्री यांची उपपंतप्रधान म्हणून कां नेमणूक केली नाहीं ?

यासंबंधीं ३० मार्च रोजीं लोकसभेंत पंडितजींना प्रश्न विचारण्यांत आला होता. त्या वेळीं ते म्हणाले— " खरं सांगायचं तर हा प्रश्न माझ्यापुढें आजवर उपस्थितच झाला नव्हता. " असें म्हणतात कीं लाल बहादूर शास्त्री यांना लोकसभेचा नेता करावें अशी पंडितजींची इच्छा होती. पण यामुळें आपल्या ज्येष्ठत्वाला धक्का पोहोंचतो या मुद्द्यावर कांहीं मंत्र्यांनीं पंडितजींच्या सूचनेला विरोध केला.

आपल्या मागून इंदिरानें आपली जागा घ्यावी असें जरी पंडितजींच्या मनांत होतें, तरी गेलीं अनेक वर्षें लाल बहादूर हे नेहरूंच्या विश्वासांतले होते, त्यांचे सच्चे अनुयायी होते ही गोष्ट मान्य करणें आवश्यक आहे.

मंत्रिमंडळांतील आपल्या इतर सहकाऱ्यांपेक्षां शास्त्री नेहरूंना अधिक जवळचे वाटत होते ही गोष्ट सर्वश्रुत होती. पण जोंपर्यंत पंडितजींच्या मनांत इंदिराबाई आपली वारस व्हावी असें होतें तोंवर लाल बहादूर हा त्यांनीं एक हातचा ठेवला होता.

येथें आणखी एक प्रश्न असा उत्पन्न होतो कीं मंत्रिमंडळांत मोरारजी देसाई

हे सर्वांत ज्येष्ठ मंत्री असतांना नेहरूंनीं त्यांना कां डावललें? पंडित गोविंद वल्लभ-पंत यांच्या मृत्यूनंतर मंत्रिमंडळांत पंडितजींच्या खालोखाल मोरारजी देसाईंचा क्रमांक होता. पंडितजींनीं मोरारजींना तें स्थान दिलें नाहीं. वारे कोणत्या दिशेनें वाहात आहेत हें स्पष्ट झालें.

पंडितजींनीं आणखी एक गोष्ट केली. लोकसभा व राज्यसभा यांसाठीं त्यांनीं दोन उपनेते नेमले. उपनेतेपदावर एकाऐवजीं दोघांची नेमणूक झाल्यामुळें उपनेत्यानें आपोआप नेत्याची जागा घ्यावी असा संभवच निर्माण होऊं शकला नाहीं. याचा अर्थच असा होता कीं मोरारजी देसाई यांना कॉंग्रेस पक्षाचें नेतृत्व व पंतप्रधानपद मिळूं नये अशीच नेहरूंची इच्छा होती.

आपल्या वारसाची निवड करण्याचा अधिकार व अंतिम निर्णय निवृत्त होणाऱ्या नेत्याकडेच असावा असा जगांतील प्रत्येक राजकीय पक्षाचा संकेत आहे. मग तें राष्ट्र लोकशाहीचें असो कीं हुकूमशाहीचें असो!

निवृत्त होणाऱ्या नेत्यानें असा निर्णय घेण्याचीं वैयक्तिक कारणें कोणतींहि असोत; पण हें तत्त्व रूढ करण्यापाठीमागें ( १ ) आपला पक्ष आपल्यानंतरहि संघटित राहावा आणि ( २ ) पक्षाचें ध्येयधोरण अबाधित राहावें, हेच प्रधान हेतु असतात.

या रूढीला इतिहासांत दाखला आहे. १९५५ मध्यें इंग्लंडमधील मजूर पक्षाचे नेते ॲटली यांनीं आपला उपनेता हरबर्ट मॉरिसन यांच्या हातीं आपलें नेतृत्व देण्यास नकार दिला. हें साध्य करण्यासाठीं आणि लायक असा दुसरा नेता शोधण्यास वेळ मिळावा म्हणून त्यांनीं पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याचें लांबणीवर टाकलें. ह्यूज गेटस्केल यांची आपल्यानंतर नेमणूक केल्यानंतरच ते निवृत्त झाले.

ॲटली यांचा मॉरिसनबद्दल दूषित ग्रह होता ही घटना जरी या प्रकरणाच्या मुळाशीं असली, तरी प्राप्त परिस्थितींत मॉरिसन हे आपली जागा घेण्यास योग्य नाहींत असें ॲटली यांचें प्रामाणिक मत होतें. मजूर पक्षाचें भवितव्य मॉरिसन यांच्या हातीं सुरक्षित राहणार नाहीं असें ॲटली यांस वाटत होतें. मजूरपक्षाचा मॉरिसन यांना पाठिंबा मिळणार नाहीं हें ते ओळखून होते. ते हट्टी आहेत ही गोष्ट ते जाणून होते.

आपल्यानंतर ॲंथनी इडन हेच इंग्लंडचे पंतप्रधान होतील, अशी खात्री पटल्या-

वरच चर्चिल निवृत्त झाले. मॅक्‌मिलन इस्पितळांत आजारी होते, पण आपला दुय्यम नेता बटलर यांच्याऐवजीं लॉर्ड ह्यूम यांना इंग्लंडचें पंतप्रधानपद मिळेल, अशी खात्री पटल्यानंतर त्यांनीं राजीनामा दिला.

मोरारजींच्या बाबतींत असेंच घडलें. लोकशाही आणि आपलें अंतर्गत व आंतरराष्ट्रीय ध्येयधोरण मोरारजी देसाई यांच्या हातीं सुरक्षित राहील अशी नेहरूंना बहुधा खात्री नसावी. मोरारजी देसाई हे संकुचित, हट्टी, आंतल्या गांठीचे व असह्य वृत्तीचे आहेत, असें नेहरूंचें मत होतें. काँग्रेसमधील उजव्या मतप्रणालीचे ते आहेत असें त्यांस वाटे. राष्ट्राच्या सध्यांच्या आणीबाणीच्या वेळीं लागणारी युक्ति व एकसूत्रीपणा मोरारजींच्याजवळ नाहीं असाहि विचार नेहरूंच्या मनांत आला असेल. काँग्रेस पक्षाचा त्यांना एकमतानें पाठिंबा मिळणार नाहीं, असेंहि त्यांना वाटलें असेल.

याबाबतींत ' मँचेस्टर गार्डियन 'च्या राजकीय निरीक्षकानें केलेलें निवेदन विचारार्ह आहे. तो म्हणतो—" मोरारजींचा वारसाप्रश्न २६ एप्रिल १९६३ रोजींच निकालांत निघाला. सक्तीच्या बचत ठेवींच्या सूचनेवर त्या दिवशीं लोकसभेंत चर्चा चालू होती. ही योजना कितपत कायदेशीर आहे याची माहिती देण्यासाठीं सरकारी वकिलाला बोलवावें असें बऱ्याचशा सभासदांचें मत होतें. पण मोरारजींनीं या सूचनेला नकार दिला. ' लोकसभेनें एकमतानें जरी अशी मागणी केली तरी ती मी मान्य करणार नाहीं ' असें त्यांनीं सांगितलें. मोरारजी देसाई हे किती अरेरावी, हट्टी व लोकशाहीविरोधी वृत्तीचे आहेत, हें त्या दिवशीं सर्वांच्या प्रत्ययाला आलें. "

पण माझ्या मतें नेहरूंनीं मोरारजींसंबंधींचा आपला निर्णय याच्यापूर्वींच म्हणजे १९६१ सालींच घेतला होता. वास्तविक रीत्या पंडित पंत यांच्या मृत्यूनंतर मोरारजींनाच उपपंतप्रधान पद मिळावयास हवें होतें. तें त्यांना देण्यांत आलें नाहीं. २६ एप्रिलची घटना ही नेहरूंच्या पूर्वींच्या मतावरील काळ्या दगडावरची रेषा ठरली इतकेंच.

लोकशाहीच्या राज्यांत मोरारजींची कडक व स्नेहशून्य वृत्ति आणि सहानुभूतीचा अभाव बाधकच ठरणार होता. नेहरूंच्यानंतर आपणच पक्षनेता झालें पाहिजे हें त्यांचें गृहीत तत्त्व टिकणें शक्य नव्हतें. स्वतःला पाठिंबा मिळविण्यासाठीं त्यांनीं स्वतः होऊन तर कोणापुढें हात पसरलाच नाहीं, उलट इतरांनीं त्यासाठीं

आपली मनधरणी करावी, आपणांस पाठिंबा द्यावा अशी त्यांची अपेक्षा होती. या बाबतींत वृत्तपत्रांनीं आपल्यावर अन्याय केला, अशी त्यांची तक्रार होती आणि त्यांत तथ्यांशहि होता.

म्हणून कामराज योजना अमलांत आली हें नेहरूंच्या पथ्यावरच पडलें. ( कुणी म्हणतात कीं मोरारजी देसाई व स. का. पाटील यांना मंत्रिमंडळांतून हुसकावून लावण्यासाठींच ही योजना जन्मास आली ).

याचें आणखी एक प्रत्यंतर भुवनेश्वरला आलें. नेहरू आजारी पडले त्या वेळीं त्यांनीं मोरारजींना परत न बोलावितां — मंत्रिमंडळांतील त्यांचें स्थान नेहरूंनंतरचें होतें तरी— लाल बहादूर शास्त्री यांनाच बोलाविलें आणि आपलीं खातीं सांभाळण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली.

" मीं कोणतें काम करावें अशी आपली इच्छा आहे ! " लाल बहादूर शास्त्रींनीं पंडितजींना प्रश्न केला. पंडितजी म्हणाले—" माझीं कामें पाहा. "

डेहराडून येथील आपली विश्रांति संपवून २६ मे १९६४ रोजीं पंडितजी दिल्लीस परतले. विमानतळावरून घरीं जातांना लाल बहादूर शास्त्री त्यांच्याबरोबर होतेच. त्यांच्याकडे वळून पंडितजी एकदम म्हणाले—" लंडन येथें भरणाऱ्या राष्ट्रकुल परिषदेला तुम्हांला माझ्याबरोबर यावयाचें आहे. तयारी करा. "

वारसाबद्दल आतां प्रश्नच उरला नव्हता. पंडितजींनीं लाल बहादूर शास्त्री यांचीच आपला वारस म्हणून निवड केली होती.

म्हणून पंतप्रधानपदासाठीं मोरारजीविरुद्ध लाल बहादूर शास्त्री अशी ज्या वेळीं चुरस लागली आणि काँग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज यांनीं लाल बहादूर शास्त्री यांच्या बाजूनें कौल दिला त्या वेळीं त्यांनीं पंडित नेहरूंची इच्छाच पुरी केली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि ....................

३

# अनाथ भारत

दिल्लींतला मे महिना हा उकाड्याचा महिना. पण १९६४ मधील मे महिना आणि विशेषेंकरून त्या महिन्यांतली त्या वर्षाची २७ तारीख अधिकच बेचैनी करणारी होती. वार बुधवार होता. आकाश ढगाळ होतें. वातावरण अतिशय उष्ण होतें त्या दिवशीं. जणूं आभाळच गदगदून उठलें होतें. झाडाचीं पानें मान टाकून पडलीं होतीं. आकाशावर मृत्यूचें जणूं कांहीं सावट आलें होतें. कांहींतरी अघटित घडणार होतें. सगळें शहर कसें सुनेंसुनें वाटत होतें.

या दिवसांत लोकसभेची बहुधा बैठक नसते. पण घटनेंतील एका कलमांत तांतडीनें दुरुस्ती मंजूर करून घ्यावयाची होती. गेल्या अधिवेशनांत ही दुरुस्ती फेटाळली गेली होती. म्हणून खासदार दिल्लीला जमले होते. घटनेच्या कलमांत दुरुस्ती झाली असती, पण अवघ्या भारताच्या इतिहासांत दुरुस्त न होणारी हानि होणार आहे, घटनेचें १९ वें कलमच काय, सबंध घटनेलाच धक्का बसणार आहे याची कोणाला कल्पना असणार !

नेहमींप्रमाणें ११ वाजतां लोकसभेची बैठक सुरू झाली. पण काय झालें होतें कोण जाणे ! प्रत्येकाला अस्वस्थ, बेचैन आणि गुदमरल्यासारखें वाटत असावें. आकाशांत काळे ढग अधिक संख्येनें जमले. सगळें कसें उदास आणि भयानक वाटत होतें. गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा अत्यंत कातर आणि शोकविव्हल आवाजांत म्हणाले, “ आपल्या आवडत्या पंतप्रधानांची प्रकृति अतिशय

बिघडली आहे. अतिशय चिंताजनक आहे त्यांची स्थिति. ”

अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णमाचारी यांनीं राज्यसभेंत अशीच घोषणा केली. ही बातमी विद्युत्‌वेगानें देशभर पसरली. राष्ट्रभर दुपारपर्यंत दुःखाचा वणवा पेटला.

नव्या दिल्लीमधील तीनमूर्तीजवळील पंतप्रधानांच्या निवासस्थानीं सकाळपासूनच दैवानें आपल्या शोकपर्यवसायी नाटकास सुरुवात केली होती.

आदल्या दिवशीं संध्याकाळींच पंडितजी डेहराडून येथून परतले होते. विश्रांति मिळाल्यामुळें ते आनंदी आणि उत्साही दिसत होते. त्यांची प्रकृतीहि सुधारलेली वाटत होती. अवघ्या पांच दिवसांपूर्वींच वृत्तपत्रप्रतिनिधींच्या एका मेळाव्यांत ते म्हणाले होते, “ मला अजून उदंड आयुष्य आहे. यमराजाचें मला लौकर बोलावणें येईलसें वाटत नाहीं. ” त्यांच्या या आत्मविश्वासानें जनता सुखावली होती. मे महिन्यांत त्यांनीं एकूण तीन दौरे केले होते, आणि त्यांपैकीं दोन दौरे तर कष्टदायक होते.

तारीख ४ मे रोजीं त्यांनीं नेपाळ सरहद्दीवरील भाइसलोतन या गांवाला भेट दिली होती. हा प्रवास त्यांनीं विमानानें केला होता. गंडक नदीवरील धरणाचें उद्‌घाटन करण्यासाठीं हा दौरा होता. पुढल्याच आठवड्यांत त्यांना मुंबईस जावें लागलें होतें. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीला हजर राहण्यासाठीं या वेळीं ते गेले होते. आणि त्यानंतरची सफर डेहराडूनला विश्रांतीसाठीं. कांहीं दिवसांनंतर अधिक विश्रांतीसाठीं ते कालिंगपॉंग येथें जाणार होते.

२६ मे रोजीं सायंकाळीं ते दिल्लीला परतले. नेहमींप्रमाणें रात्रीं ११ वाजेपर्यंत त्यांनीं काम केलें. कांहीं काम शिल्लक राहिलेलें नाहीं ना याची त्यांनीं खात्री करून घेतली आणि मगच ते बिछान्यावर पडले. उद्यांच्या दिवसाची आणि त्या दिवशीं त्यांच्यावर पडणाऱ्या काळाच्या क्रूर हल्ल्याची त्यांना सुतराम् कल्पना नव्हती.

पण पहाटे ४ वाजतां त्यांना अस्वस्थ वाटूं लागलें आणि ते जागे झाले. या अस्वस्थतेची त्यांनीं फारशी दखल घेतली नव्हती. ते पुन्हा बिछान्यावर पडले. पण त्यांची पाठ दुखूं लागली. झोंप येईना.

सकाळचे सहा वाजले आणि पाठ अधिकच दुखूं लागली. नाइलाजानें त्यांनीं

नथूला हांक मारली. नथू हा त्यांचा एकनिष्ठ नौकर. इंदिराबाईहि जाग्या झाल्या. तावडतोब डॉक्टरांना बोलावणीं गेलीं आणि अवघ्या कांहीं मिनिटांतच डॉक्टर येऊन थडकले. नेहरू अत्यंत थकलेले दिसत होते आणि त्यांचा आवाज ओढलेला वाटत होता. डॉक्टरांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं त्यांनीं उत्तरें दिलीं. रक्तदाब २००% वरून १४० वर आला होता. हा रक्तदाब वाढावा म्हणून डॉक्टरांचे प्रयत्न सुरू झाले.

शेजारच्या खोलींत सगळे डॉक्टर जमले आणि त्यांनीं आपापसांत चर्चा केली. ही सगळी मंडळी फार तर दोन मिनिटेंच नेहरूंपासून दूर गेली होती. पण तीं दोन मिनिटेंच घातक ठरलीं—प्राणघातक ठरलीं. कारण त्या दोन मिनिटांतच नेहरू उठले आणि कसेबसे न्हाणीघराकडे जाऊं लागले. त्या वेळीं त्यांच्याजवळ कोणीच नव्हते आणि ते कष्टानें पावलें टाकीत होते. आपली स्थिति चिंताजनक आहे, चालण्याचे एवढे श्रमहि आपल्याला झेपणार नाहींत याची जाणीव त्यांना आली नाहीं कीं काय?

पण हे श्रम त्यांना खरोखरच झेपले नाहींत. डॉक्टर लगेच धांवले, पण ते पोचण्यापूर्वीच पंडितजी धाडकन् जमिनीवर पडले आणि त्यांची शुद्ध हरपली. त्यांनीं डोळे उघडले त्या वेळीं सकाळचे आठ वाजून दहा मिनिटें झालीं होतीं. त्यांनीं सगळीकडे दृष्टि टाकली. इंदिरेकडे त्यांनीं एकवार पाहिलें पण त्यांच्या तोंडून शब्द उमटेना. ते पुन्हा बेशुद्ध झाले. ती बेशुद्धि काळझोंप ठरली.

नेहरूंची स्थिति सुधारणेपलीकडे गेली आहे हें डॉक्टरांनीं ओळखलें होतेंच. त्यांचा शेवट जवळ, अगदीं जवळ आला आहे असें त्यांना वाटलें. पण हा झुझार योद्धा प्रत्यक्ष कृतांताबरोबर सामना देत होता. सहा तासपर्यंत पंडितजी यमराजाशीं अक्षरशः प्राणपणानें लढत होते.

दुपारीं १ वाजून ५५ मिनिटें ही ती अत्यंत अशुभ वेळ! इंदिराबाई, गुलझारीलाल नंदा, कृष्णमाचारी नेहरूंच्या शेजारीं हताश मुद्रेनें बसलीं होतीं! ते कांहींच करूं शकत नव्हते. नेहरूंच्या आजाराची बातमी कळतांच राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् आणि उपराष्ट्राध्यक्ष डॉ. झकीर हुसेन धांवत आले होते.

सगळें राष्ट्र त्या मे महिन्याच्या दुपारीं अंधारांत लोटलें गेलें होतें. दोन वाजले. दोन वाजून वीस मिनिटें झालीं. विपण्ण झालेल्या लोकसभेंत नीरव शांतता पसरली होती. ज्येष्ठ मंत्र्यांपैकीं लोकसभेंत कुणीच नव्हतें. सगळे डोळे तीन

मूर्तीकडे लागले होते. पोलाद आणि खाण खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् यांनीं ती दुःखद वार्ता सभेला सांगितली. कसेबसे ते म्हणाले—"आपल्याला आणि राष्ट्राला एक अत्यंत वाईट बातमी कळविण्याचें दुर्भाग्य माझ्या वांट्याला आलें आहे. आपले पंतप्रधान यापुढें आपल्याला कधींच दिसणार नाहींत. दिवा विझला आहे."

हां हां म्हणतां ही बातमी वणव्यासारखी सर्व देशभर पसरली. प्रत्येक शहर, खेडेगांव दुःखांत बुडालें. सर्व देशावर जणूं कांहीं प्रेतकळा आली. सगळ्या हालचाली थांबल्या. दुकानें, कचेऱ्या, कारखाने बंद झाले. दिल्लींतले रस्ते निर्जन झाले. गर्दीचा गोंगाटच काय, पण टॅक्सी आणि मोटारगाड्या यांचेहि आवाज ऐकूं येईनात.

कोपऱ्याकोपऱ्यावर लोकांचे थवे जमत, वेड्यासारखे कांहींतरी कुजबुजत, कांहींतरी बोलण्याचा प्रयत्न करीत. नेहरू गेले! गेलीं १७ वर्षें ज्यांना आपण आपल्या हृदयसिंहासनावर आदरानें आणि प्रेमानें बसविलें होतें, ज्यांची आपण अहर्निश पूजा केली होती, तो देवच नाहींसा झाला! हें कसें शक्य आहे? असें होणारच नाहीं! आतां आम्हीं काय करावें? आम्हांला हंसविणारा, रागावणारा, आमच्या प्रगतीचा, संस्कृतीचा शास्ता गेला! छेः छेः! असें कालत्रयींहि घडणार नाहीं. हें खोटें आहे!

जगांतील कोणत्याहि राष्ट्रनेत्याच्या मृत्यूच्या बातमीनें त्या राष्ट्राच्या जनतेला इतकें वाईट वाटलें नसेल! इतके अश्रु ढाळले नसतील! प्रेमाच्या अधिकारानें जनतेवर राज्य करणारा, जनतेचीं अंतःकरणें काबीज करणारा, जनतेच्या मनांत कायमचें मानाचें स्थान मिळविणारा नेहरूंसारखा नेता आणि शास्ता आजवर कोठेंच आणि कधींच झाला नसेल!

नेहरूंना कोणत्या आजारानें मृत्यु आला हें डॉक्टरांनीं अधिकृत रीत्या कधींच सांगितलें नाहीं. हृदयविकार हें त्यांच्या मृत्यूचें कारण असावें असें प्रथम डॉक्टरांना वाटलें. मेंदूंतील रक्तस्रावामुळें त्यांचें देहावसान झालें असावें असें नंतरचें त्यांचें निदान होतें. हृदयाच्या अशा क्षीण अवस्थेंत चालण्याचे त्यांना जे परिश्रम पडले, त्यामुळें त्यांचें निधन झालें, असा नंतरचा अंदाज करण्यांत आला.

पण कारण कांहीं कां असेना! कृत्य केवढें भीषण होतें! घटना केवढी क्रूर

होती ! राष्ट्रावर हा केवढा घाला होता ! राष्ट्राचें आतां काय होणार होतें ! नको होतें तें घडलें होतें ! पण काळ थोडाच कोणासाठीं थांबतो ! कालचक्र चालू राहिलेंच पाहिजे. राज्यकारभाराचा जगन्नाथाचा रथ मध्यें थांबवितां येणार नाहीं ! मार्ग काढलाच पाहिजे. व्यक्ति अनाथ होते, जन्मभर अनाथ राहूं शकते, पण राष्ट्र मात्र क्षणभरहि अनाथ राहूं शकत नाहीं. एक गडी गेला म्हणून खेळ थोडाच थांबतो ! दुसऱ्या गड्यानें पहिल्याची जागा घेतलीच पाहिजे !

नेहरूंच्या आयुष्याची दोरी तुटूं लागली आहे हें सकाळीं १०–३० वाजतांच डॉक्टरांनीं ओळखलें होतें. त्यांनीं तसें सांगितलेंहि होतें. लगेच नंदा, कृष्णमाचारी आणि लाल बहादूर यांची बैठक झाली. मंत्रिमंडळांतील ज्येष्ठ सभासद या नात्यानें नंदांनीं तात्पुरतें पंतप्रधानपद स्वीकारावें, त्यांच्या नेतृत्वाखालीं काळजीवाहू सरकार स्थापन करावें असें या बैठकींत ठरलें. नवीन नेत्याची निवडणूक नंतर करण्यांत यावयाची होती.

भारताच्या मंत्रिमंडळांत उपपंतप्रधान असा कोणीच नसल्यानें आणि पंतप्रधानाखेरीज मंत्रिमंडळ अस्तित्वांतच असूं शकणार नसल्यानें कोणाची तरी पंतप्रधान म्हणून ताबडतोब नियुक्ति करावी असा कायदाखात्यानें सल्ला दिलाच होता. ( भारतांतील राज्यकारभार हा सर्वस्वीं राष्ट्रपतीचा असतो, पंतप्रधानाला घटनेंत महत्त्वाचें स्थान नाहीं असें आणखी कांहीं कायदेपंडितांचें मत आहे ही गोष्ट निराळीं. )

म्हणून पंडितजींच्या निधनानंतर अडीच तासांनी म्हणजे दुपारीं ४-३० वाजतां राष्ट्रपतींपुढें नंदा यांचा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथविधि झाला. या सर्व घडामोडींत डॉ. राधाकृष्णन् यांनीं अत्यंत संयमाची, आधाराची आणि सहानुभूतीची वृत्ति दाखविली. आपल्या अधिकाराचा या राष्ट्रीय आपत्तीच्या वेळीं त्यांनीं कधींहि दुरुपयोग केला नाहीं. सर्व गोष्टी शिस्तीनें, कायदेशीर रीतीनें आणि सुरळीतपणें पार पडाव्या याची त्यांनीं दक्षता घेतली.

कॉंग्रेसचे अध्यक्ष कामराज या वेळीं दिल्लींत नव्हते. मद्रासच्या दौऱ्यावर ते गेले होते. मद्रासपासून १५०० मैलांवर ते असतांना सकाळीं १० वाजतां नेहरूंच्या चिंताजनक प्रकृतीचें वृत्त त्यांना सांगण्यांत आलें. ते लगेच विमानानें दिल्लीस निघाले.

विमानांत कामराजांचें विचारचक्र विमानाच्या वेगापेक्षांहि अधिक वेगानें

सुरू झालें. समजा, होऊं नये तें घडलें तर ? काँग्रेसपक्षाची एकी टिकेल का ? नेहरूनंतर कोण ? या घटनेमुळें गोंधळ माजेल का ? पण त्यांनीं एक निर्णय ठरवला. नेहरूंचें ध्येयधोरण प्रामाणिकपणानें पुढें चालविणारा, नेहरूंना मान्य झाला असता, असाच नवा पंतप्रधान असला पाहिजे. हा तो निर्णय होता. हा नवा नेता काँग्रेसमधील सर्व पक्षोपपक्षांना मान्य असलेलाच हवा याची दक्षता घेण्याचें त्यांनीं ठरविलें.

कामराज दिल्लीला पोहोंचण्यापूर्वींच पंडितजींचें निधन झालें होतें. त्यानंतर दोन तासांनीं त्यांचें विमान दिल्लीला पोहोंचलें. तेथून ते तडक तीनमूर्तीकडे गेले. गुलझारीलाल नंदा यांचा नवे पंतप्रधान म्हणून शपथविधि झाल्याचें वृत्त त्यांना तेथें कळलें, तेव्हां ते जरा अस्वस्थ झाले. नंदांची नेमणूक ही केवळ तात्पुरती आहे, घटनेच्या दृष्टीनें आवश्यक आहे आणि नेहरूंच्या वारसाची निवडणूक योग्य वेळीं काँग्रेस पक्षाकडून व्हावयाची आहे असें त्यांना ज्या वेळीं काँग्रेसचे सरचिटणीस श्री. राजगोपालन् यांनीं सांगितलें, त्या वेळीं त्यांचें समाधान झालें.

दुसरा दिवस नेहरूंच्या अंत्ययात्रेच्या व्यवस्थेंतच गेला. या महान् नेत्याची अभूतपूर्व यात्रा निघाली. नेहरूंबद्दलचें प्रेम आणि आदर व्यक्त करण्याची लोकांत जणूं कांहीं अहमहमिका लागली होती. कारण तो प्रसंगच तसा होता.

महात्माजींच्या समाधीपासून ३०० यार्डांच्या अंतरावर यमुनेच्या कांठीं नेहरूंचें दहन होणार होतें. कामगारांनीं रात्रभर जागून तांबड्या विटांचा एक चौथरा तयार केला होता. त्याच्याभोंवतीं कुंपण घालण्यांत आलें होतें.

पंडितजींच्या निवासस्थानाकडे दिवसभर लोकांची रीघ लागली होती. लोक हजारों, नव्हे लाखों ! त्यांची गणनाच करणें शक्य नव्हतें. ते असंख्य होते. अंत्ययात्रेच्या सहा मैल लांबीच्या रस्त्यावर दोहों बाजूंना दहा हजार सैनिक उभे होते. वीस लाख लोक प्रेतयात्रेंत सामील झाले होते. शिवाय रस्त्याच्या दोहों बाजूंना एकामागें एक अशा २० ते २०० लोकांच्या रांगा स्तब्धपणें, मूकपणें, अश्रु ढाळीत उभ्या होत्या. घरादारांवरून, झाडांवरून, जेथें जागा मिळेल तेथून आणखी लाखों लोक नेहरूंचें महाप्रयाण आंसवांनीं भरलेल्या डोळ्यांनीं पाहात होते.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं एक वाजून दहा मिनिटांनीं तीनमूर्तीजवळील नेहरूंच्या निवासस्थानापासून प्रेतयात्रा सुरू झाली. पंडितजींचें शव तिरंगी झेंड्यांत गुंडा

ळलें होतें. माळा आणि फुलें यांचा त्या देहावर अक्षरशः सडा पडला होता. एका लष्करी गाडीवर पंडितजींचें शव ठेवण्यांत आलें होतें. लष्कर, आरमार व हवाई दल यांच्या प्रत्येकीं वीस प्रतिनिधींनीं ती गाडी ओढण्याचें काम पत्करलें होतें. तिन्ही दलांचे प्रमुख, दोन लेफ्टनंट जनरल, दोन ॲडमिरल व दोन एअर व्हाईस मार्शल त्या गाडीबरोबर चालले होते.

मुत्सद्दी, अनेक राष्ट्रांचे नेते व प्रतिनिधि खास विमानानें आपापल्या देशांतून पंडितजींना आदरांजलि अर्पण करण्यासाठीं मुद्दाम आले होते. इंग्लंडचे पंतप्रधान सर अलेक डग्लस ह्यूम, राणीचे प्रतिनिधि आणि पंडितजींचे स्नेही अर्ल माउंटबॅटन, अमेरिकेचे मंत्री डीन रस्क, रशियाचे उपपंतप्रधान कोसिजिन, फ्रान्सचे मंत्री लुई जॉट, ही मंडळी हजर होती. सीलोनच्या पंतप्रधान श्रीमती भंडारनायके, संयुक्त अरब फेडरेशनचे उपाध्यक्ष हुसेन शफई, युगोस्लाव्हियाचे पंतप्रधान पीटर स्टॅंबोलिकी, पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री भुट्टो, नेपाळचे तुलसी गिरी, इराणचे गृहमंत्री, ब्रिटिश मजूर पक्षाचे उपनेते जॉर्ज ब्राउन, सिक्किमचे महाराज ही मंडळीहि या प्रसंगासाठीं मुद्दाम आली होती.

तो अवाढव्य जनसागर शांतपणें, खिन्नपणें यमुना नदीच्या कांठाकडे निघाला. उन्हाळा इतका कडक होता कीं अनेकांना मूर्च्छा आल्या. गर्दी इतकी झाली कीं पोलिसांची व्यवस्था कोसळून पडली. रहदारी बंद पडली. ठिकठिकाणीं मोठमोठे लोक अडकून पडले. माउंटबॅटन मोटारींतून उतरून पायीं निघाले. राष्ट्रपति भवनांतील एका रक्षकानें त्यांस ओळखलें आणि पुढें आणलें. गर्दींत तीन लोक मेले व शेंकडों जखमी झाले.

दहनभूमीवर पोंचण्यास प्रेतयात्रेस तीन तास लागले. संध्याकाळचे चार वाजून सदतीस मिनिटें झालीं होतीं. वेदांतील ऋचांचें पठण चालू होतें. नेहरूंचा नातू सोळा वर्षांचा संजीव चितेपाशीं आला आणि त्यानें चितेला अग्नि दिला. त्याची आई आणि नेहरूंची कन्या इंदिरा त्याला आधार देत होती. पण तिचा आधार तुटला होता. चितेंत चंदनाचीं काष्ठें टाकण्यांत आलीं, तुपाचे डबे रिकामे करण्यांत आले. चिता पेटली, ज्वाला भडकल्या आणि त्या ज्वालांनीं नेहरूंचा पार्थिव देह भस्मसात् केला. लोकांच्या अश्रूंना वाटा फुटल्या. रडक्या आवाजांत ते धाय मोकलूं लागले, म्हणूं लागले, “ जवाहरलाल अमर रहे ! नेहरू झिंदाबाद ! ” आधुनिक भारताच्या इतिहासांतील एक पर्व संपलें. नेहरू युग !

वैभवशाली, संस्मरणीय, नेहरूयुगाचा अस्त झाला. काम आणि घाम या नेहरूंच्या कार्याच्या जाणिवा आहेत. नेहरूंच्या कामामध्यें कांहीं उणीवा राहिल्या असल्या तर तो दोष त्यांचा नाहीं. त्यांचा ध्येयवाद, त्यांची दूरदृष्टि, त्यांची कामाची झेप हीं ज्यांच्या आवाक्यापलीकडची होती त्या लोकांचा तो दोष आहे. दोष नेत्याचा नाहीं, अनुयायांचा आहे. आपल्या भारताच्या भवितव्यतेचीं केवढीं मोठमोठीं स्वप्नमंदिरें नेहरूंनीं उभारलीं होतीं ! काळालाहि मागें टाकणारी त्यांची धांव, प्रगतीच्या रस्त्यावर जलद पाऊल उचलण्यासाठीं त्यांनीं जनतेला केलेली घाई ! असा माणूस पुन्हा होणार नाहीं. असें काम पुढें होणार नाहीं !

जवाहरलाल यांनीं लावलेली ज्योत, त्यांचेच पट्टशिष्य लाल बहादूर शास्त्री यांच्या हातीं आतां आली आहे. नेहरूंची भव्य आणि उज्ज्वल परंपरा पुढें चालविण्याची जबाबदारी लाल बहादूर शास्त्री यांच्या लहानसर पण बळकट खांद्यावर येऊन पडली आहे.

नेहरूंचें एक आवडतें कवन होतें. रॉबर्ट फ्रॉस्ट यानें लिहिलेल्या त्या काव्य-पंक्ति नेहरूंच्या टेबलावर सतत असत—

‘ उपवनें सुंदर आहेत, काळीं आहेत, दाट आहेत.
पण मलाहि कर्तव्यें करायचीं आहेत.
निद्रा येण्यापूर्वीं मला मोठी परिक्रमा करायची आहे.
खरेंच माझी परिक्रमा फार मोठी आहे ! ’

# ४

## वाटाघाटींचें पर्व

नेहरू गेले. नेहरू अमर झाले.

पण राज्याचा गाडा तर चालला पाहिजे ! म्हणून राष्ट्र जरी दुःखसागरांत बुडालें होतें, नेहरूंची जागा कोणीहि भरून काढूं शकणार नाहीं असें जरी सर्वांस वाटत होतें, तरी त्यांचा वारस निवडणें अवश्य होतें. भारताच्या पंतप्रधानपदीं कोणाची तरी स्थापना करणें अपरिहार्य होतें आणि हें काम लांबवून फायदा नव्हता. कारण खलबतें, कट, प्रचार, डावपेंच यांचें पेंवच फुटलें असतें. अशा वेळीं मतैक्याची सर्वांत अधिक गरज होती.

पण कांहीं लोकांचें, विशेषेंकरून डाव्या गटाचें मत या विचारास अनुकूल नव्हतें. आहे तीच परिस्थिति सध्यां चालूं ठेवावी, नव्या नेत्याची निवड लांबणीवर टाकावी म्हणजे सगळीं वादळें आपोआप थांबतील असें त्यांना वाटत होतें. बहुधा श्री. गुलझारीलाल नंदा यांच्याकडे त्यांचा कल असावा. कॉंग्रेस पक्षाला स्थिरस्थावर व्हायला कांहीं काळ द्यावा, असें ते म्हणत होते.

नेहरूंनंतर कॉंग्रेसमधील डाव्या गटाकडे सर्व सूत्रें राहावींत या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न चालू होते. कृष्ण मेनन आणि केशव देव मालवीय मंत्रिमंडळांतून बाहेर पडल्या-मुळें मंत्रिमंडळांतील डाव्या गटाचें पारडें हलकें झालें होतेंच. अशा वेळीं त्यांच्या गटाचा जर मुख्य प्रधान झाला, तरच त्यांचा निभाव लागणार होता. लाल बहादूर शास्त्री जर मुख्य प्रधान झाले तर आपला भाव कमी होईल, अशी त्यांस भीति

वाटत होती. एवढेंच नव्हे तर वेळ पडल्यास या बाबतींत मोरारजीगटाशीं हातमिळवणी करण्यासहि ते तयार होते. कॉंग्रेसच्या नेत्याच्या निवडीचें काम वर्किंग कमिटीकडे देऊं नये, कारण तो हक्क कॉंग्रेसपक्षाचा आहे या श्री. संतानम् यांच्या मताला डाव्यांनीं पाठिंबा दिला होता. या बाबतींत वर्किंग कमिटीवर त्यांचा विश्वास नव्हता. कामराज हे लाल बहादूर शास्त्री यांच्या बाजूचे आहेत हें जाहीर होतें. नेत्याच्या निवडीबाबत वर्किंग कमिटीनें हस्तक्षेप केला नाहीं, तें काम जर कॉंग्रेसपक्षाकडे सोपविण्यांत आलें, तर नव्या पंतप्रधानाच्या जागीं मोरारजी देसाई यांची निवड होईल, असा त्यांस भरंवसा वाटत होता.

साहजिकच श्री. मोरारजी यांनीं संतानम् यांचें म्हणणें उचलून धरलें. पार्लमेंटरी पक्षाचें धोरण एखाद्या तिऱ्हाइतानें हाताळल्यास कॉंग्रेसपक्षाच्या स्वातंत्र्यावर तो घाला ठरेल, या श्री. कृष्ण मेनन यांच्या मताशीं ते सहमत होतेच.

श्री. कामराज यांनीं संतानम् यांचें मत धुडकावून लावलें. पक्षनेत्याच्या निवडीच्या बाबतींत कॉंग्रेस वर्किंग कमिटीचेंच म्हणणें मान्य केलें पाहिजे, असें त्यांनीं ठासून सांगितलें. जयपूर येथें नोव्हेंबर १९६३ मध्यें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या वेळीं नेहरूंनीं केलेल्या वक्तव्याचा त्यांनीं आपल्या म्हणण्यास आधार दिला. त्या वेळीं नेहरू म्हणाले होते, " पक्षनेत्याच्या निवडीच्या बाबतींत सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाचें मत विचारांत घेतलेंच पाहिजे, असें माझें ठाम मत आहे. "

म्हणून नेहरूंच्या अंत्ययात्रेहून परत आल्याबरोबर कामराज यांनीं आपल्या सहकाऱ्यांबरोबर वाटाघाटी करण्यास सुरुवात केली. आपल्या सल्लागारांच्या गुप्त बैठकी त्यांनीं भरविल्या. या सभांस हजर राहिल्याबद्दल अतुल्य घोष, एस्. के. पाटील व संजीव रेड्डी यांच्यावर गटबाजीचे आरोप करण्यांत येऊं लागले. राजस्थानचे मुख्य प्रधान श्री. मोहनलाल सुखडिया, कर्नाटकचे श्री. हनुमंतय्या व मल्लया यांच्याशीं कामराजांनीं बोलणीं केलीं.

दुसऱ्या दिवशींच नवीन पंतप्रधानासंबंधींच्या वावड्या उठूं लागल्या. आपापल्या उमेदवारासाठीं प्रचार सुरू झाले. राज्यांच्या मुख्य मंत्र्याकडे हे लोक हेलपाटे घालूं लागले. पण निश्चित अशी कसलीच बातमी लागेना.

मोरारजी देसाई पंतप्रधानपदाच्या निवडणुकीच्या आखाड्यांत उतरणार आहेत अशी बातमी लौकरच प्रसृत झाली. जगजीवनराम यांनींहि आपले हात

या गंगेंत धुऊन घेण्याचें ठरविलें. सध्यांचें नंदांचेंच मंत्रिमंडळ आणखी कांहीं काळ चालू राहावें, कॉंग्रेसमधील वातावरण स्थिर झालें कीं कांहीं महिन्यांनीं या प्रश्नाचा विचार करावा, असें डाव्या गटाचे पुढारी नंदांना सुचवूं लागले.

या बाबतींत लालबहादूर शास्त्री मात्र तटस्थ राहिले होते. पंतप्रधानाच्या जागेसाठीं आपण उभे राहणार किंवा नाहीं याचा त्यांनीं कोणासहि थांगपत्ता लागूं दिला नाहीं. या शर्यतींत लालबहादूर जिंकणार आणि ती घटना सर्वांच्या हिताची होणार, याबद्दल कॉंग्रेसमधील व कॉंग्रेसबाहेरील प्रत्येकास मनोमन वाटत होतें. लालबहादूर यांची निवड एकमतानें होणार कीं त्याबाबत मतदान करावें लागणार एवढाच याबाबतींत प्रश्न होता.

या वेळीं इंदिरा गांधी यांचें नांव पुढें आलें आणि त्यांच्यासाठीं मोरारजी आणि लालबहादूर शास्त्री यांनीं आपलीं नावें मागें घ्यावीं असा प्रयत्न करण्यांत आला. ही सूचना जगजीवनराम यांनीं केली असावी. त्यांनीं या स्पर्धेंतून आपलें अंग जवळजवळ काढून घेतलेंच होतें.

पण मोरारजींनीं या सूचनेस विरोध केला. लालबहादूर शास्त्री यांना म्हणे ही सूचना पसंत होती. पण त्यांनीं आपलें नांव मागें घेऊं नये असा त्यांना आग्रह करण्यांत आला व त्यांनीं तो मानला. पण लौकरच इंदिराबाईसंबंधींची सूचना बारगळली. ती बहुधा इंदिराबाईपर्यंत पोहोंचलीच नाहीं आणि शिवाय जरी ती त्यांच्यापर्यंत गेली असती तरी आपल्या पित्याच्या निधनाच्या दुःखांत त्या इतक्या बुडून गेल्या होत्या कीं त्यांनीं त्या सूचनेचा विचारहि केला नसता.

जगांतल्या वृत्तपत्रांत हें प्रकरण या वेळीं केवढें गाजत होतें! वारसाबद्दल झगडे होणार, देशांतल्या शांततेला तडे जाणार अशा वदंता जगभर फैलावत होत्या. म्हणून कामराज यांनीं या अफवांवर आळा घालण्याचें ठरविलें. नेहरूंच्या वारसाची निवड शिस्तीनें, पद्धतशीर रीतीनें आणि एकमतानें व्हावी यासाठीं त्यांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें. याबाबतींत अनेकांचीं मतें अजमावण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्यांत संस्था होत्या, व्यक्तीहि होत्या.

कामराजाचा कल लालबहादूर शास्त्री यांजकडे होता हें त्यांनीं लपवून ठेवलें नाहीं. दक्षिण व पूर्व भारत बहुमतानें त्यांच्या पाठीशीं असल्यानें आणि भारताच्या इतर राज्यांतूनहि लालबहादूर शास्त्री यांना पाठिंबा मिळण्याचा संभव असल्यानें, नेत्याबाबत स्पर्धा निर्माण झाली तरी लालबहादूर शास्त्री विजयी

होतील, याची त्यांना खात्री होती. तामिळनाड, आंध्र, कर्नाटक, केरळ, पश्चिम बंगाल व आसाम येथील मतें लालबहादूर यांनाच मिळावयाचीं होतीं.

मोरारजींच्या बाजूला गुजराथ, ओरिसा, पंजाब व मध्यप्रदेश होते. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार आणि राजस्थान यांच्याबद्दल निश्चितपणें सांगतां येत नव्हतें.

गुजराथचे बलवंतराय मेहता यांनीं याबाबत एक नवीनच कल्पना काढली. स्वातंत्र्यानंतर ज्याप्रमाणें जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल हे दोघेहि मंत्रिमंडळाचे नेते होते, त्याप्रमाणें आतांहि लालबहादूर आणि मोरारजी यांनीं संयुक्तपणें मंत्रिमंडळाचें नेतृत्व स्वीकारावें अशी त्यांची सूचना होती.

पण दोघांपैकीं पंतप्रधान कोणीं व्हावें याबद्दल बलवंतराय मेहता यांचा निर्णय होईना. ज्या भारत सेवा संघाचे बलवंतराय मेहता सभासद होते, त्याचे लालबहादूर शास्त्री अध्यक्ष होते. अशा परिस्थितींत बलवंतराय मेहता कात्रींत सांपडले. ओरिसाच्या बिजू पटनाइकांनीं मात्र शेवटपर्यंत मोरारजीभाईंना पाठिंबा दिला.

कृष्ण मेनन आणि केशवदेव मालवीय हे उघडपणें लालबहादूर शास्त्री यांच्याविरुद्ध होते. शास्त्रींनींच मंत्रिमंडळांतून आपली उचलबांगडी केली होती, ही गोष्ट ते कसे विसरतील ?

नेहरूंच्या निधनानंतर दुसऱ्याच दिवशीं मालवीयांच्या घरीं ही सर्व मंडळी जमली. नेतृत्वाच्या निवडणुकींत कोणती बाजू स्वीकारावयाची यासंबंधीं तेथें वाटाघाटी झाल्या. लालबहादूर यांना विरोध करावयाचा असें जरी तेथें ठरलें असलें तरी हजर असलेल्या अनेकांनीं या ठरावास विरोध केला असें कळतें.

जगजीवनराम यांनींहि आपल्या घरीं कॉंग्रेसमधील हरिजन पुढाऱ्यांची सभा घेतली. लालबहादूर शास्त्री यांना विरोध करून मोरारजींना पाठिंबा द्यावा असा त्यांनीं तेथें प्रस्ताव मांडला.

" तुम्हीं निवडणुकीसाठीं उभे राहिलांत तर आमचीं सर्व मतें तुम्हांस मिळतील, पण तसें नसल्यास मोरारजी अथवा शास्त्री यांच्यापैकीं आम्हीं कोणास मत द्यावें हें आम्हीं ठरवूं , " असें हजर असलेल्या सभासदांनीं या सभेंत सांगितल्याचें कळतें.

लालबहादूर यांना वाढत्या प्रमाणांत पाठिंबा मिळत आहे असें कळतांच

मोरारजी पक्षांतील कांहीं लोक मोरारजींना सोडून गेले. यशवंतराव चव्हाण आणि डी. पी. मिश्रा हे लालबहादूर शास्त्री यांच्या पक्षाला या वेळीं मिळाले असा मोरारजींच्या पक्षपात्यांचा दावा आहे.

असें म्हणतात कीं, महाराष्ट्राचा लालबहादूर शास्त्री यांना पाठिंबा आहे असें महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक, आणि महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांनीं श्री. यशवंतराव चव्हाण अमेरिकेहून परत येण्यापूर्वीच श्री. कामराज यांस सांगितलें होतें. श्री. यशवंतराव चव्हाण परत आल्यावर त्यांना महाराष्ट्राची ही भूमिका कळली आणि त्यांनीं त्याप्रमाणें लालबहादूर शास्त्री यांना पाठिंबा देण्याचें ठरविलें.

मध्यप्रदेशमधील पुढाऱ्यांनीं मात्र श्री. मिश्रा यांचा कौल धुडकावून लावून लालबहादूर शास्त्री यांनाच पाठिंबा दिला.

वाटाघाटींचें पर्व संपलें त्या वेळीं महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहार यांचा शास्त्रींना पाठिंबा निश्चित झाला. आपली बाजू घसरत आहे, हें मोरारजी देसाई यांना या वेळीं दिसत होतें, पण त्यांनीं आपला विचार बदलला नाहीं.

कामराजांना स्पर्धा नको होती. या आणीबाणीच्या वेळीं कॉंग्रेसमध्यें एकी आहे, शिस्त आहे, समजूत आहे हें जगाच्या निदर्शनाला आणण्याचा त्यांचा हेतु होता.

पण निवडणुकींतील बाकीच्या उमेदवारांची समजूत कशी घालावयाची! एकच मार्ग होता त्यांच्यापुढें. लालबहादूर शास्त्री या निवडणुकींत हमखास निवडून येतील हें त्यांना पटवून देणें हाच तो एकमेव मार्ग. यासाठीं त्यांनीं एक युक्ति काढली. त्या वेळीं दिल्लींत राष्ट्रांतील सर्व लहानमोठे पुढारी हजर होते. त्यांपैकीं निवडक अशा ५०० पुढाऱ्यांचें या प्रश्नावर मत अजमावल्यास हा प्रश्न सुटेल अशी त्यांच्या मनांत कल्पना आली. हा प्रकार जगभर रूढ आहे. इंग्लंडमधील नेत्याच्या निवडीबाबत हाच मार्ग अवलंबिण्यांत येतो. मात्र टोरीपक्ष अशीं मतें नोंदीत नाहीं, अथवा या मतांवर आधारलेलें मत निर्णायक समजत नाही. या दोन्ही गोष्टी कामराजांनीं केल्या, अशी त्यांजवर या बाबतींत टीका करण्यांत येते.

या प्रकाराचा अवलंब करतांना कामराजांनीं उघडपणें मतें घेतलीं म्हणून

तीं मतें खरीं मनापासूनचीं मानतां येणार नाहींत असेंहि कांहींजण म्हणतात. कामराजांची ही पद्धत म्हणजे जणूं कांहीं एक यंत्र आहे. या यंत्रांत एका बाजूला मतदाररूपी ऊंस घातला कीं दुसऱ्या बाजूला मतरूपी साखरच बाहेर पडावयाची, आपणांस हव्या असलेल्या उमेदवाराचेंच नांव यायचें, अशी टीकाकारांची तक्रार आहे.

या निवडणुकींत खरी लढत लालबहादूर शास्त्री व मोरारजी या दोघांतच होती. जगजीवनराम यांचें नांव जवळजवळ गळलें होतें. नंदांनीं यांत भाग घेतला नव्हता आणि इंदिरा गांधी अलिप्तच होत्या.

२९ मे रोजीं वर्किंग कमिटीची पहिली बैठक भरली. नेहरूंच्या निधनानंतर भरलेली ही पहिली बैठक! या बैठकींत नेहरूंच्या मृत्यूबद्दल दुखवटा व्यक्त करण्यांत आला आणि त्यांनीं देशासाठीं केलेल्या अभूतपूर्व, अमोल आणि विविध सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली.

३१ मे रोजीं भरविण्यांत आलेली वर्किंग कमिटीची बैठक नव्या नेत्याच्या निवडणुकीसाठीं होती. कमिटीचे २१ सभासद, राज्यांचे १५ मुख्य मंत्री व ६ निमंत्रित असे एकूण ४२ सभासद या बैठकीस हजर होते.

उमेदवारांच्या नांवासंबंधींच्या ऊहापोहांत न शिरतां निवडणूक कोणत्या पद्धतीनें करावी याचा या बैठकींत प्रथम विचार करण्यांत आला. कामराजांनीं आपल्या भाषणांत सर्वांनीं एकीनें व दृढपणानें वागावें असें आवाहन केलें. त्याचा योग्य तो परिणाम झाला आणि नेत्याची निवड एकमतानें व्हावी असें ठरलें. याबाबत कामराजांनीं दिल्लींत हजर असलेल्या कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या मताचा अदमास घ्यावा असाहि कमिटीनें ठराव मंजूर केला.

दुसऱ्या दिवशीं कामराज या कामाला लागले. सकाळीं ८ पासून रात्रीं ८ पर्यंत त्यांनीं सुमारें २०० कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या व त्यांचीं वैयक्तिक मतें अजमावलीं. या लोकांत कॉंग्रेस पुढारी, राज्यांचे मुख्य मंत्री, लोकसभेचे सभासद वगैरे होते.

लालबहादूर शास्त्री यांच्या नांवालाच लोकांनीं पाठिंबा दिल्याचें कामराज यांना या मुलाखतींत आढळून आलें. या प्रकरणीं कॉंग्रेसच्या अध्यक्षांनींच निकाल द्यावा, असेंहि बऱ्याच जणांनीं सांगितलें. भेटीस आलेल्या लोकांपैकीं कांहींनीं व्यक्तिशः एक मत तर इतरांच्या बरोबर निराळें मत दिलें.

रात्रीं ९ वाजतां आपल्या भेटीचा निष्कर्ष कामराज यांनीं वर्किंग कमिटीला कळविला. रात्रीं १० वाजतां कामराज यांनीं मोरारजी देसाई यांना टेलिफोन करून आपण भेटीला येत असल्याचें त्यांस कळविलें. पण मोरारजीच स्वतः कामराजांना भेटले. कामराज यांनीं त्यांना घडलेला वृत्तांत विदित केला.

मोरारजींना यासंबंधींचा अंदाज होताच. कामराजांकडून हकीकत कळतांच त्यांनीं आपलें नांव मागें घेतलें. एवढेंच नव्हे तर नेतेपदासाठीं श्री. लालबहादूर शास्त्री यांचें नांव सुचविण्याचें काम स्वतःकडे घेतलें.

अशा रीतीनें नेहरूंच्या वारसाचा प्रश्न निर्विघ्नपणें पार पडणार असा रंग दिसूं लागला. नेहरूंनंतर काँग्रेस रसातळास जाणार अशीं केलेलीं भाकितेंच रसातळाला गेलीं !

अर्थात् या सर्व कामगिरीचें श्रेय एकट्या कामराजांनाच द्यावयास हवें. कामराजांची राजकीय मुत्सद्देगिरी, त्यांची चतुराई, आणि त्यांनीं हुशारीनें हाताळलेली कठीण परिस्थिति यांमुळेंच हें स्थित्यंतर सुरळीतपणें, शिस्तीनें व प्रतिष्ठेने पार पडलें.

नेहरूंच्या मृत्यूनंतर दोन तासांनीं कामराज दिल्लीला येऊन पोहोंचले, पण आल्याबरोबर त्यांनीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. भारत सरकारचे मंत्री गोंधळून गेले होते, त्यांना कांहीं सुचत नव्हतें. अशा वेळीं कामराजांनीं दाखविलेलें हें कौशल्य असामान्य आहे.

आपल्यापुढें वाढून ठेवलेलें काम आणि त्यांतील महत्त्वाचे भाग यांची त्यांच्या मनांतील आंखणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ होती. नेहरूंनंतर काँग्रेसमध्यें सामुदायिक नेतृत्व ठेवावें लागेल असा सिद्धांत त्यांनीं पूर्वींच बांधला होता. नव्या पंतप्रधानाचें व्यक्तित्व नेहरूंइतकेंच असामान्य असणार नाहीं. त्याला नेहरूंइतकी अबाधित सत्ता उपभोगावयास मिळणार नाहीं, ' बरोबरीच्या लोकांतील पहिला ' एवढेंच त्याचें महत्त्व राहील हें त्यांनीं अगोदरच ओळखलें होतें

नवा नेता हा अखिल भारतीय महत्त्वाचा असावा, तो लोकप्रिय असावा, ज्याबद्दल जनतेला आदर वाटेल, ज्याबद्दल देशांतील सर्व विभाग आणि सर्व पक्ष यांना जवळीक वाटेल, असा असावा एवढी मात्र त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनीं राज्यांचे मुख्य मंत्री आणि राष्ट्रांतील पुढारी यांना प्रथम विश्वासांत घेतलें. हें नवें सामुदायिक नेतृत्व एकसंधी, परिणामकारक, एकजीव व निर्विघ्न

असावें, भारत सरकार व राज्य सरकारें यांच्यांतील यापुढील संबंध जवळिकीचे राहावेत असें त्यांच्या मनींमानसीं होतें.

याच हेतूनें नव्या पंतप्रधानाच्या निवडणुकीच्या बाबतींत राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना कामराजांनीं विश्वासांत घेतलें. भारताचें राज्य हें एक संघराज्य आहे. त्यांतील घटक आर्थिकदृष्ट्या वा सांस्कृतिकरीत्या भले भिन्न असतील, आपल्या स्वायत्ततेची त्यांना भले कदर असेल, पण हें एकजीव संघराज्य आहे व व्हावें अशी त्यांची धारणा होती. नेहरूंच्या कारकीर्दीत आपल्या व्यक्तिमत्त्वानें नेहरूंनीं सर्व राज्यांना एकाच दावणींत बांधलें होतें खरें, पण नेहरूंबरोबर तो काळ गेला. नव्या पंतप्रधानाला राज्यांतील कॉंग्रेस पुढाऱ्यांचा व राज्य सरकारांचा पाठिंबा असला पाहिजे. यांची त्यांनीं याच हेतूनें काळजी घेतली होती. कारण खुद्द नेहरूंच्या कारकीर्दींतच कांहीं राज्यांचे ज्येष्ठ मुख्य मंत्री भारत सरकारला बाजूस सारण्याचे प्रयत्न करीत होते आणि आपल्या राज्यांतील कॉंग्रेसपक्षाला मुठींत ठेवणारे पुढारी दिल्लीपतींना आपल्या महत्त्वाची जाणीव करून देत होते. नेहरूंनंतर तर काय भारत सरकारची राळ उडण्याचा संभव होता. कामराजांना हें नको होतें.

पण हें घडवून आणीत असतां राष्ट्रीय आणि इतर बाबतींत पंतप्रधानांच्या आचारस्वातंत्र्याला धक्का लागणेंहि इष्ट नव्हतें. राज्य सरकारांना स्वैरसंचार करूं दिला असता तर त्यांनीं भारत सरकारलाहि एखादे वेळीं गुंडाळून ठेवण्याचा प्रयत्न केला असता. कामराजांनीं ही तारेवरची कसरत केली. त्यांत त्यांना यश आलें हें भारताचें सुदैव होय !

बरें, सामुदायिक नेतृत्व स्वीकारावें तर पंतप्रधानाच्या अधिकारावर पायबंद बसतो, अनाहूत आणि त्रयस्थांच्या तंत्रानें वागावें लागतें, त्यामुळें सरकार दुबळें बनतें. ही आपत्तीहि कामराजांनीं युक्तीनें टाळली.

नेत्याची निवड कशी करावी याचा कामराज यांनीं या निवडणुकीच्या निमित्तानें जणूं कांहीं एक आदर्शच घालून दिला आहे. टोरी पक्षाची लोकमत अजमावण्याची प्रथा आणि मजूर पक्षाची नेत्याची निवड करण्याची पद्धति यांचा सुरेख संगम या वेळीं दिसून आला.

५

# पुढारी मिळाला

२ जून उजाडली. नेहरू जाऊन सहा दिवस झाले होते. पार्लमेंटच्या सभागृहांत जवळजवळ ५०० कॉंग्रेसचे सभासद जमले होते. शंका, कुशंका आणि काळज्या यांचा थैमान आज नव्हता. प्रत्येकानें सुटकेचा निःश्वास टाकला होता. झालेली घटना अभिनंदनीय अशी होती. आणि या आनंदाच्या छटा त्या घोर दुःखांतहि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होत्या. एकमेकांचे ते अभिनंदन करीत होते. या दोन बलाढ्य पुढाऱ्यांमधली लढत सुखासुखीं थोडीच होणार होती ? त्यामुळें कटुता निर्माण होणार होती. ती कटुता आतां टळली होती. आतां फक्त उपचार राहिला होता. आतां फक्त त्यांना आपल्या आवडत्या व्यक्तीचीच नेता म्हणून निवड करावयाची होती.

अर्थातच यांतहि एक प्रकारचें गांभीर्य होतें. हा क्षण ऐतिहासिक होता. आजवर सर्वत्र नेहरूंचें कृपाछत्र होतें. त्यांच्याअभावीं घडणारी अशी हीच पहिली घटना होती. आज निर्णय घेण्यास नेहरू नव्हते. जबाबदारीचें ओझें इतरांना उचलावें लागणार होतें. पण नेत्यांनीं या संस्मरणीय क्षणीं आपलें धैर्य खचूं दिलें नाहीं. शरीरानें नेहरू दिल्लींत नसले तरी त्यांचा आत्मा जणूं कांहीं दिल्लींतच घोटाळत होता.

कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे २१ सभासद आले आणि त्यांनीं आपल्या जागा घेतल्या. सर्वत्र नीरव शांतता नांदत होती. मागील बाजूला महात्माजींची भव्य

तैलाकृति होती. बारा मोठे पंखे सभागृहांतील कुंदपणा जणूं दूर करीत होते. ते पंखे नव्हतेच. वादळाच्या वेळीं हमखास उपयोगी पडणारीं तीं जणूं दीपगृहेंच होतीं. याच दिवाणखान्यांत १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीं, सतरा वर्षांपूर्वीं भारतानें आपलें स्वातंत्र्य उद्घोषित केलें होतें. नेहरूंनीं याच सभागृहांत आपलें संस्मरणीय भाषण केलें होतें. राष्ट्रीय झेंड्याशीं एकनिष्ठ राहण्याच्या शपथा स्वतंत्र भारताच्या प्रतिनिधींनीं येथेंच घेतल्या होत्या.

आजच्या सभेचे अध्यक्ष अर्थातच कामराज होते. वातावरण गंभीर होतें. कामराज तामिळमध्यें बोलले. आपला नवा नेता एकमतानें निवडण्याचें आपल्या भावपूर्ण भाषणांत त्यांनीं सभासदांस आवाहन केलें. देशाचें ऐक्य आणि पक्षाची जूट सांभाळण्याची जबाबदारी सभासदांची आहे याची त्यांनीं आठवण करून दिली.

ते म्हणाले—" या पूर्वीं आपल्या सरकारनें चुका केल्या असतील, मीं नाहीं म्हणत नाहीं. पण हा सर्व उणेपणा नेहरूंच्या प्रचंड व प्रभावी व्यक्तिमत्त्वाखालीं झाकून जात असे. पण आज मात्र एखादी क्षुल्लक चूक जरी आपल्या हातून घडली तरी ती राक्षसी वृत्ति धारण करील. त्याबद्दल जनता कधींहि क्षमा करणार नाहीं. "

यानंतर श्री. गुलझारीलाल नंदा यांनीं श्री. लालबहादूर शास्त्री यांचें नेतेपदासाठीं नांव सुचविलें. मोरारजी देसाई यांनीं या सूचनेस अनुमोदन दिलें. अनेक वक्ते शास्त्रींच्या गुणगौरवपर बोलले. आपल्या भाषणांत नव्या नेत्याचें प्रत्येकानें अभिनंदन केलें. त्यांच्याशीं एकनिष्ठ राहण्याची आणि त्यांस सहकार्य देण्याची प्रत्येकानें शपथ घेतली.

कॉंग्रेसच्या अध्यक्षांचा प्रत्येकानें गौरव केला. कामराज हे कॉंग्रेसमधील एकीचे प्रतीक आहेत, असें नंदांनीं सांगितलें. गेले तीन दिवस त्यांनीं केलेल्या महान् कामगिरीचा त्यांनीं गौरवपूर्वक उल्लेख केला. या आणीबाणीच्या काळांत कॉंग्रेसपक्ष मानानें आणि संयमानें उठून दिसला, जगाला त्यांनीं आपल्या ऐक्यानें आश्चर्यचकित केलें, असेहि धन्योद्गार वक्त्यांच्या भाषणांतून ऐकूं येत होते.

लालबहादूर मात्र अगदीं मोजकेच बोलले. आपल्या भाषणांत त्यांनीं आपलें अंतःकरण ओतलें होतें. सभा गाजविण्याची त्यांना हाव नव्हती कीं आपलें

ध्येयधोरण जाहीर करण्याची त्यांना घाई झालेली नव्हती. ते म्हणाले, "या देशाचा कारभार हातीं घेतांना माझें मन भयाकुल होत आहे. आजवर हें काम करण्यास पंडित नेहरू होते. आज ते आपल्यांत नाहींत, पण आपण त्यांचाच कित्ता गिरवूं या. समाजसत्तावाद हेंच आपलें यापुढेंहि ध्येय राहील." नेहरूंच्या स्मृतींनीं त्यांचा आवाज कातर झाला होता. त्यांची शालीनता उठून दिसत होती. ते म्हणाले, दारिद्य आणि बेकारी या दोन महान् शत्रूंशीं यापुढें आपणांस मुकाबला करावयाचा आहे. इंदिराबाईंचा उल्लेख करतांना त्यांचा कंठ दाटून आला. कांपऱ्या आवाजांत ते म्हणाले, "इंदिराबाईंवर तर आकाशींची कुऱ्हाड कोसळली आहे. पण या आपत्तीला त्या धीरानें तोंड देत आहेत. आतां आम्हांला त्यांचाच आधार आहे. त्यांचें सहकार्य आम्हांला हवें आहे." ते पुढें म्हणाले, "मोरारजी देसाईंचें मला विशेष अभिनंदन केलें पाहिजे. कारण काँग्रेस अध्यक्षांच्या इच्छेला मान देण्याचा मोठेपणा त्यांनीं दाखविला आहे. कामराजांचे आभार कोणत्या शब्दांत मानावे! तुमच्यावर पडलेली जबाबदारी तुम्ही अत्यंत कौशल्यानें पार पाडलीत याचें मला विशेष कौतुक वाटतें."

"आपल्या नव्या नेत्याला सर्व प्रकारचें सहकार्य देणें आपलें कर्तव्य आहे. माझी तशी तुम्हांला आग्रहाची विनंती आहे" असें कामराज यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत सांगितलें. ते पुढें म्हणाले, "केवळ नेत्याच्या निवडीनें आपलें कार्य संपलें असें मानूं नका. आपलें कार्य तसें पाहिलें तर आतांच सुरू होत आहे. आपण शास्त्रींना जितकें सहकार्य देऊं, त्यांच्याबद्दल आपण जितकी आत्मीयता व आस्था दाखवूं तेवढें त्यांचें सामर्थ्य वाढेल. सुदैवानें पंडितजींनीं अशी ध्येयधोरणें आंखून दिलीं आहेत कीं केवळ तीं आपण अमलांत आणलीं तरी आपला कार्यमार्ग साधेल. जनतेचें आपल्याला सहकार्य मिळेल. चला तर, एकजुटीनें आपण आगेकूच करूं या. आणि आपल्या नव्या नेत्याचे हात अधिक बळकट करूं या."

यानंतर शास्त्रींनीं आपल्या नव्या भूमिकेंत वृत्तपत्रकारांना पहिली मुलाखत दिली. आपल्या धोरणाचा खुलासा करतांना ते म्हणाले, "आमच्या कारकीर्दींत मूठभर लोकांच्याच हातीं संपत्ति राहणार नाहीं अशी आम्हीं खबरदारी घेऊं. भाववाढ हा आमच्या डोळ्यांसमोरचा अत्यंत बिकट प्रश्न आहे, पण आपण थोडी कळ सोसली पाहिजे. संयम दाखविला पाहिजे." अल्पसंख्यांकांचे हितसंबंध अबाधित

ठेवण्याची या मुलाखतींत त्यांनीं कळकळीची विनंती केली.

शास्त्रींनीं आपलें भावी धोरण ठामपणें मांडलें. राष्ट्राची संरक्षणक्षमता, बेकारी व दारिद्र्य यांचें निर्मूलन, आणि राष्ट्रीय ऐक्य या राष्ट्रासमोर आज असलेल्या तीन महत्त्वाच्या समस्या आहेत असें ते म्हणाले. परराष्ट्रीय धोरणाच्या तपशीलांत न शिरतां आपल्या या पहिल्या मुलाखतींत आपल्या स्वभावानुसार त्यांनीं अंतर्गत प्रश्नावरच अधिक भर दिला होता.

अर्थातच याचा असा मात्र अर्थ नाहीं कीं शास्त्रींनीं परराष्ट्रीय धोरणाचा ऊहापोह टाळला. नेहरूंचें धोरण आजवर राष्ट्राला पोषक ठरलें आणि यापुढेंहि पोषक ठरेल, असा त्यांनीं निर्वाळा दिला. ते म्हणाले— " आपल्याला कोणत्याहि परराष्ट्रीय गटाला सामील होणें परवडणार नाहीं. जगांतील प्रत्येक राष्ट्राशीं आपले संबंध स्नेहाचेच राहतील. "

नेता म्हणून निवड झाल्यापासून अवघ्या सात तासांत शास्त्रींनीं राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली. राष्ट्राध्यक्षांनीं त्यांना मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितलें. नेतेपदीं निवड झाल्यानंतर तीन दिवसांतच त्यांनीं कॉंग्रेस पक्षाची सभा बोलविली. या सभेंत त्यांनीं चीन व पाकिस्तान यांसंबंधींचें आपलें धोरण जाहीर केलें. ते म्हणाले, " या दोन राष्ट्रांचें मन वळविण्याचें आमचें सरकार प्रयत्न करील. पण हें करतांना आमचीं मूलभूत तत्त्वें मात्र आम्हीं सोडणार नाहीं. "

पाकिस्तानबद्दल त्यांनीं सौहार्द व्यक्त केलें. लंडन येथें भरणाऱ्या राष्ट्रकुल पंतप्रधान परिषदेच्या वेळीं पाकिस्तानचे अध्यक्ष आयूब खान यांची व आपली भेट होणार आहे, याचा त्यांनीं उल्लेख केला. पण शास्त्रींची अचानकपणें प्रकृति बिघडल्यामुळें त्यांचें लंडनला जाणें रहित झालें व ही नियोजित भेट होऊं शकली नाहीं.

तटस्थ राष्ट्रांच्या कैरो येथें भरलेल्या परिषदेहून परत येतांना १२ ऑक्टोबर रोजीं कराची येथें आयूब खान व शास्त्री यांची भेट घडून आली.

चीनच्या बाबतींत शास्त्री प्रथमपासूनच खंबीर होते. चीनशीं वाटाघाटी व्हावयाच्या असतील तर कोलंबो योजनेवरच त्या आधारल्या जातील हें त्यांनीं प्रथमच स्पष्ट केलें. त्यापलीकडे कांहीं होणें शक्य नाहीं असें त्यांनीं जाहीर केलें. कोलंबो योजना मान्य करणें हीच आमची कमाल मर्यादा आहे, असा त्यांनीं इशारा दिला.

मंत्रिमंडळ स्थापन करणें हें आतां पहिलें व महत्त्वाचें कार्य उरलें होतें. नेहरू मंत्रिमंडळांतील सर्व मंत्री नव्या मंत्रिमंडळांत असावे असा सूर निघाल्यानें हें काम बरेंच हलकें झालें. इंदिराबाईंनीं हाच मनोदय व्यक्त केला. असें न केल्यास नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाला धक्का पोहोंचेल असें कांहींचें मत होतें. कांहींना ही सूचना अव्यवहार्य वाटली आणि असें केल्यास मंत्र्यांची निवड करण्याच्या बाबतींत नव्या पंतप्रधानांचे हात बांधल्यासारखे होईल, त्यांना वाव मिळणार नाहीं असें या मताच्या लोकांचें म्हणणें होतें.

केवळ लायकी हें मंत्र्याचें गमक होऊं शकणार नाहीं, त्याबरोबर इतर गोष्टींचा विचार करणें अवश्य आहे, अशी शास्त्रींची भावना होती. भारतासारख्या प्रचंड देशांत मंत्र्यांची संख्या एखादे वेळीं वाढवावी लागेल, असें त्यांचें मत होतें. ते म्हणत, "भारत सरकार अथवा राज्य सरकारें येथें मंत्रिमंडळ बनविण्याच्या वेळीं बंधनें असूं नयेत. याचा मात्र असा अर्थ नव्हे कीं ज्या ज्या पक्षांनीं अथवा विभागांनीं मला पंतप्रधानपदीं निवडण्यांत मदत केली आहे त्या सर्वांचा मंत्रिमंडळांत अंतर्भाव करावयास हवा. माझें मंत्रिमंडळ मतैक्य असणारें हवें आणि त्या दृष्टीनेंच मीं माझ्या सहकाऱ्यांची निवड करीन."

मंत्र्यांचें खातेंवांटप ही शास्त्रीजींची खरी डोकेंदुखी होती. कामराज योजनेखालीं मंत्रिमंडळांतून बाहेर पडलेल्या सहकाऱ्यांना मंत्रिमंडळांत पुन्हा घेण्याची शास्त्रींची इच्छा होती. पाटील यांनीं रेल्वे खातें स्वीकारण्याचें मान्य केल्यानें त्यांच्या बाबतींत अडचण नव्हती. (एक वर्षापूर्वी नेहरूंनीं पाटलांना अन्न व शेतकी खात्याऐंवजीं रेल्वेखातें स्वीकारण्याची विनंती केली होती आणि त्या वेळीं पाटलांनी ती सूचना अमान्य केली होती!)

खरा प्रश्न होता मोरारजी देसाईबाबत–आपल्याला मंत्रिमंडळांत शास्त्रींच्या खालोखाल स्थान मिळालें तरच आपण मंत्रिपद स्वीकारूं अशी त्यांनीं अट घातली होती. इंदिरा गांधी यांना हें मान्य नव्हतें, कारण नंदा हे तेरा दिवस कां होईना, भारताचे पंतप्रधान होते, त्यामुळें त्यांचा या बाबतींत अग्रहक्क होता. मोरारजींचें महत्त्व लक्षांत घेतां हा मुद्दा फारसा बिनतोड नव्हता, पण कामराज, इंदिराबाई आणि कृष्णमाचारी यांनीं नंदांना अग्रहक्क दिला.

स. का. पाटील व संजीव रेड्डी यांनीं मात्र मोरारजींच्या म्हणण्याला पाठिंबा दिला. वास्तविक पंतप्रधानपदाच्या निवडीच्या वेळीं त्यांनीं लालबहादूर यांनाच

पाठिंबा दिला होता.

म्हणून मोरारजीभाईंना ज्या वेळीं शास्त्रींनीं व्यापार व उद्योग खातें देऊं केलें आणि त्यांचा क्रम नंदांच्या खालोखाल लावला, त्या वेळीं मोरारजींना तो अपमान वाटला आणि शास्त्रींची विनंती त्यांनी धुडकावून लावली. नव्या मंत्रिमंडळाला संपूर्ण सहकार्य देण्याचें मात्र त्यांनीं आश्वासन दिलें.

मोरारजींचें भारतांतील स्थान आणि काँग्रेसपक्षांतली त्यांची प्रतिष्ठा यांचा विचार करतां त्यांना मंत्रिमंडळांत नंदांच्या वरचें स्थान मिळावयास हवें होतें, असें पुष्कळांना वाटत होतें. शिवाय नंदा हे मोरारजींच्या तुलनेनें कनिष्ठ होते. कामराज योजनेनुसार ज्या वेळीं मोरारजी, लालबहादूर शास्त्री, एस्. के. पाटील व जगजीवनराम हे मंत्रिमंडळांतून बाहेर पडले, त्याच वेळीं नंदांना मंत्रिमंडळांत बढती मिळाली. म्हणून या वेळीं आपण जर आग्रह धरला नाहीं, तर आपल्या स्वाभिमानाला व प्रतिष्ठेला धक्का बसेल असें मोरारजींना वाटलें असावें.

मोरारजींचा प्रश्न अशा प्रकारें संपल्यानंतर जगजीवनराम यांना वगळणें सोपें होतें. कामराज योजना या नवीन मंत्रिमंडळाच्या वेळीं डावलली गेली असाहि आरोप येऊं शकला नाहीं.

सतत सात दिवस मंत्रिमंडळासंबंधीं वाटाघाटी चालू होत्या. तरीसुद्धां मंत्रिमंडळ घाईनें व गर्दीनें बनविलें गेलें असें आपणांस म्हणतां येईल. खातेंवांटपाच्या बाबतींत ही गोष्ट आधिक्यानें प्रत्ययास आली. ठाम विचाराच्या ऐवजीं काम लौकर उरकणें हेंच ध्येय डोळ्यांसमोर ठेवलें असावें, पण त्याला इलाज नव्हता. यामुळें पुढेंहि मंत्रिमंडळांतील खांदेपालटी पुष्कळ दिवसपर्यंत चालूंच होत्या.

या बनावांत एक गोष्ट मात्र चांगली घडली. माहिती व नभोवाणी खात्याच्या मंत्री म्हणून इंदिरा गांधी यांचा मंत्रिमंडळांत समावेश करण्यांत आला. त्या बहुधा मंत्रिपद स्वीकारणार नाहींत, असा लोकांचा कयास होता.

लालबहादूर शास्त्री यांनीं परराष्ट्रीय खातें स्वतःकडे ठेवल्याबद्दल त्यांजवर सडकून टीका झाली, पण ही तात्पुरती व्यवस्था होती. कारण एका महिन्याच्या आंतच सरदार स्वर्णसिंग यांची तेथें नियुक्ति झाली. हा बदल सर्वांस उचित वाटला.

श्री. सुब्रह्मण्यम् यांजकडून पोलाद व भारी उद्योगधंदे काढून घेऊन त्या

जागीं मंत्रिमंडळांत नव्यानेंच आलेल्या संजीव रेड्डी यांची नेमणूक करण्यांत आली. सुब्रह्मण्यम् यांनीं हें खातें चांगल्या प्रकारें सांभाळलें होतें आणि रेड्डी हे नवथर होते. याबद्दलहि कडक टीका सुरू झाली. मजूर आणि उद्योगधंदे या खात्याच्या मंत्र्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा दिल्याबद्दल आणि त्या खात्यासाठीं आणखी एक राज्यमंत्री नेमल्याबद्दल टीका झाली. हें खातें मोठें तर नव्हतेंच, पण सार्वजनिक संरक्षण हा त्या खात्यांतील महत्त्वाचा विभाग दुसऱ्या खात्याकडे देण्यांत आला होता.

मंत्रिमंडळाची यादी पुरी होईतोंपर्यंत मध्यरात्र झाली. लालबहादूर शास्त्री यांची राष्ट्रपति वाट पाहातच होते. पहाटे ३ वाजतां मंत्रिमंडळाची यादी प्रसिद्धीला देण्यांत आली. या वेळीं वृत्तपत्रांच्या शहर आवृत्त्या नेहमीं तयार होतात, पण यादीसाठीं अंकांचें प्रकाशन लांबविण्यांत आलें होतें. ९ जून रोजीं दुपारीं नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधि पार पडला.

अमेरिकेंत केनेडींच्या नंतर लिंडन जॉन्सन अचानकपणेंच अध्यक्ष झाले. त्यांनीं केनेडी यांचींच ध्येयें पुढें चालविलीं, पण तीं अमलांत आणतांना मात्र नवा मार्ग, नवें तंत्र आचरण्यांत आलें. नेहरूंनंतर त्यांचीं धोरणें चालू राहणें स्वाभाविक होतें, पण त्याच्या अंमलबजावणींत शास्त्रीजींच्या व्यक्तित्वाचा ठसा असणें अपरिहार्य होतें.

एक गोष्ट मात्र खरी कीं लालबहादूर शास्त्री यांचें मंत्रिमंडळ अल्पजीवि ठरणार नाहीं. कारण त्या मंत्रिमंडळाची रचना राजकीय दृष्टीनें केलेली नाहीं. तत्त्वापेक्षां व्यवहाराला या मंत्रिमंडळांत प्राधान्य दिलें जात आहे. नेहरू मंत्रिमंडळाचा कल डाव्या बाजूकडे असे. नव्या मंत्रिमंडळांत असा प्रकार दिसून येत नाहीं.

हें नवें मंत्रिमंडळ बहुधा उजव्या गटाकडे झुकेल असा आज रंग दिसत आहे. लालबहादूर शास्त्रींप्रमाणें कामराजहि राजकारणांतलीं दोन्हीं टोकें सांभाळणारे आहेत, पण नव्या मंत्रिमंडळावर त्यांचा दबदबा राहील अशीं चिन्हें दिसत आहेत.

सध्यांच्या मंत्रिमंडळांतील नंदा, इंदिरा गांधी व सुब्रह्मण्यम् हे डाव्या गटाकडे झुकणारे तर स. का. पाटील व संजीव रेड्डी हे उजव्या बाजूचे आहेत. कृष्ण मेनन अथवा मालवीय यांच्याप्रमाणें कट्टर डावे कोणीच नाहींत, ही गोष्ट

येथें लक्षांत घेतली पाहिजे. देशांतील उद्योगपतींनीं लालबहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळाचें मनापासून स्वागत केलें. लालबहादूर यांच्या पुरोगामी व प्रागतिक विचारांचा त्यांनीं आवर्जून उल्लेख केला आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्राची प्रगति व्यवहारदक्षतेनें आणि जोमानें होईल असा आशावाद त्यांनीं प्रकट केला.

कम्युनिस्ट आणि पाश्चात्य राष्ट्रें लालबहादूर शास्त्रींना सहानुभूति दाखवीत आहेत. पाश्चात्य राष्ट्रांनीं शास्त्रींबद्दल अधिक आपुलकी दाखविली आहे. कारण शास्त्रींचें राजकारण कम्युनिस्ट मतप्रणालीकडे वळणार नाहीं, असा त्यांना विश्वास आहे. नेमकी हीच गोष्ट रशियाला खटकलेली दिसते. कारण त्याबाबत त्यांनीं भीति व्यक्त केली आहे.

इंग्लंडनें लालबहादूर शास्त्रींबद्दल विशेष आत्मीयता व्यक्त केली आहे. ब्रिटिश वृत्तपत्रांनीं अग्रलेख लिहून लालबहादूर शास्त्री यांचें मनापासून स्वागत केलें. लंडन रेडियोनें तर लालबहादूर शास्त्री आणि त्यांचें नवें मंत्रिमंडळ यांच्याविषयीं एक खास कार्यक्रम आयोजित केला.

# ६

## लाल बहादूरच कां ?

अवाढव्य शरीरसंपदा हें नेतेपणाचें एकमेव गमक ठरूं शकत नाहीं. किरकोळ शरीरयष्टि आणि खंबीर इच्छाशक्ति यांच्या साहाय्यानेंहि साध्या व्यक्ति विभूति होऊं शकतात. छत्रपति शिवाजीमहाराज थोडेच अवाढव्य शरीराचे होते ! पण महाराष्ट्रभर विखुरलेल्या मावळ्यांचें त्यांनीं बलिष्ठ असें राष्ट्र निर्माण केलेंच ना ? लहानसर दिसणाऱ्या नेपोलियननें तर १५० वर्षांपूर्वीं जवळजवळ सगळें जग पादाक्रान्त केलें होतें.

नेल्सन, फ्रेडरिक द ग्रेट, ईव्हेना, मुसलिनी, डॉलफस हीं माणसें दिसायला लहान होतीं, पण त्यांचें व्यक्तिमत्त्व दांडगें होतें. त्यांनीं नेते निर्माण केले आणि प्रचंड कार्यें यशस्वी केलीं. कदाचित् असें असेल कीं आपल्या शरीराची चण लहान आहे या गंडामुळें अविश्रांत परिश्रम करून आपल्या बरोबरीच्या लोकांपेक्षां आपण श्रेष्ठ व्हावें, त्यांच्यावर हुकमत गाजवावी आणि आपल्या शरीराचीं मोजमापें, बुद्धिमत्ता आणि मनःसामर्थ्य यांनीं झाकून टाकावें असेंहि घडत असेल.

लहानपणीं आपल्यापेक्षां ताकदवान आणि गुंड मुलांनीं केलेल्या चेष्टा आणि दिलेला त्रास याचा या लोकांवर चिरकालीन परिणाम होतो. एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. या न्यूनगंडांतच महत्त्वाकांक्षेचीं बीजें रोवलीं जातात. आपलें शारीरिक दौर्बल्य झाकून टाकण्यासाठीं हीं माणसें कष्टांची पराकाष्ठा

करतात आणि मोठ्यांवर मात करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यावर मात करणें, त्यांच्यावर आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित करणें हा जणूं कांहीं त्यांनीं मोठ्यांवर घेतलेला सूडच होय.

आपल्या लहानशा शरीराची जाणीव लालबहादुरांना लहानपणापासूनच असावी. त्यांनीं आयुष्यांत जें यश मिळविलें त्याचेंहि हेंच कारण असावें. ऐयालूर येथें झालेल्या रेल्वे अपघातासंबंधीं १९५६ मध्यें लोकसभेंत ते एक निवेदन करीत होते. या प्रकरणामुळेंच त्यांनीं रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्या वेळेस ते म्हणाले, " माझी लहान अंगकाठी आणि जिव्हेचें मार्दव यामुळें मी दृढनिश्चयी होऊं शकत नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. मी एवढेंच सांगूं इच्छितों कीं मी शरीरानें दुबळा असलों तरी मनानें खंबीर आहें. "

खुजी माणसें हीं स्वतःला अहंमन्य समजतात. या विधानाला लालबहादूर अपवाद आहेत. स्वभावानें ते शालीन व विनयशील आहेत. आपली चूक ते चटकन कबूल करतात. लोकांना व्यक्तिशः भेटणें त्यांना आवडतें. गोविंद वल्लभपंतांचा खाक्या निराळा असे. त्यांच्या घरीं रोज दरबार भरे आणि व्यक्तिगत गाऱ्हाणींहि सार्वजनिक रीत्या मांडावीं लागत. आलेल्या पाहुण्यास पोहोंचविण्यास शास्त्री दारापर्यंत जातील. आपले पादवंदन ते कुणालाहि करूं देत नाहींत. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकींत तर ते व्यासपीठावर कधींच सांपडावयाचे नाहींत. सामान्य माणसांच्या मेळाव्यांत कोठेंतरी खालीं बसलेले आढळतील.

लालबहादूर विनोदी वृत्तीचे आहेत. स्वतःवर विनोद करणें त्यांना आवडतें. आपली उंची हा त्यांच्या विनोदाचा नेहमीचा विषय. मुलांच्या एका मेळाव्यांत बोलतांना ते म्हणाले, " माझ्या उंचीमुळेंच मला बहुधा येथें आमंत्रण मिळालें असावें. " या शारीरिक दोषामुळेंच कीं काय ते स्वतःकडे कमीपणा घेतात. स्वतःला फार मोठा न समजतां एक सामान्य माणूस अशी उपाधी ते स्वतःला लावतात. मुलांशीं खेळणें, त्यांच्यांत मिसळणें त्यांना भारी आवडतें. एकदां ते म्हणाले, " मी इतका लहान आहे कीं माझ्याशीं खेळायलाच कुणी तयार नसतं, म्हणून मी मुलांत मिसळतों. "

१९६३ ची गोष्ट. राजकोट येथील राष्ट्रीय शाळेचा कोनशिला समारंभ त्यांच्या हस्तें झाला. त्यांच्याबद्दल बोलताना शाळेचे व्यवस्थापक म्हणाले, " आपल्या

गृहमंत्र्यांना जगांत कोठेंहि शत्रु नाहीं." लालबहादूर चटकन उद्गारले, "माझ्यासारख्या लहान माणसाला शत्रु असून कसें चालेल ?"

मुंबईला काँग्रेस पक्षाची एक सभा होती. कामराज योजनेनुसार मंत्र्यांची संख्या कमी करण्याचा विचार चालू होता. त्यासंबंधीं विचारणा करण्यांत आली असतां शेजारीं बसलेले महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. पी. के. सावंत यांजकडे बोट दाखवून ते म्हणाले, "या गृहस्थांना १४४ कलम पुकारण्याचा अधिकार आहे. त्या आपत्तींत सांपडण्याची माझी इच्छा नाहीं. म्हणून महाराष्ट्राच्या बाहेर सुखरूपपणें गेल्यानंतरच मी या प्रश्नाचें उत्तर देईन."

पण लालबहादूर हे कुसुमाप्रमाणें कोमल असले तरी वज्राप्रमाणें कठीणहि आहेत. त्यांचें लाघवी भाषण आणि शालीन वागणूक ह्यांच्यामागें खंबीर मन आहे. त्यामुळें कोणत्याहि प्रश्नाचा त्यांना लौकर उलगडा होतो. प्रश्नाचें मूळ सांपडतें, त्यासंबंधीं निर्णय घेतां येतो आणि तो अमलांत आणतां येतो. १९६१ ते १९६३ पर्यंत अमेरिकेचे भारतांत वकील असलेले प्रा. गालब्रेथ शास्त्रींबद्दल म्हणतात, "शास्त्रींच्या चेहऱ्यावर जितका कणखरपणा दिसतो त्यापेक्षां कितीतरी पटीनें त्यांचें मन खंबीर आहे. प्रत्येक प्रश्नाचा ते साधकबाधक विचार करतात. त्यासंबंधीं निर्णय ठरवितात आणि एकदां कां त्यांनीं निर्णय ठरविला कीं त्यांत बदल व्हावयाचा नाहीं. जणूं काळ्या दगडावरची रेघच. म्हणूनच इतरांचा त्यांच्यावर विश्वास आहे." चीननें आक्रमण केलें तेव्हां कृष्ण मेनन यांची मंत्रिमंडळांतून हकालपट्टी करावी, असा पंडितजींजवळ शास्त्रींनीं आग्रह धरला. सिराजउद्दीन प्रकरण निर्माण झालें; त्यासंबंधीं चौकशी झाली आणि त्यांत गोवल्या गेलेल्या कृष्णदेव मालवीय यांनीं मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा असें शास्त्रींनीं त्यांस सांगितलें. प्रतापसिंग कैरों यांच्याविरुद्ध असलेल्या आरोपांबाबत शास्त्रींनींच कार्यवाहीची मागणी केली. काश्मीरचा राज्यकारभार आणि तेथील राजकारण यांना जबाबदार असलेल्या बक्षी गुलाम महंमद यांना राजीनामा देण्यास भाग पाडण्याचें श्रेय शास्त्रींनाच आहे.

रूझवेल्टनंतर दुसरा रूझवेल्ट झाला नाहीं, त्याप्रमाणेंच नेहरूंनंतर दुसरे नेहरू होणें शक्य नव्हतें. रूझवेल्टनंतर ट्रूमन अमेरिकेचे अध्यक्ष झाले. ट्रूमन हा एक सामान्य मुत्सद्दी, पण जपानवर अॅटम बॉंब टाकण्याचे धैर्य त्यांनीं दाखवलें. दुसऱ्या महायुद्धाचे दुष्परिणाम भोगीत असलेल्या अमेरिकेला त्यांनींच

कोरियाच्या युद्धांत भाग घ्यायला लावलें. जनरल मॅक्आर्थर हे अमेरिकेचे जपान-मधील राष्ट्रदूत, अमेरिकेच्या गळ्यांतील ताईत होते. पण त्यांची वृत्ति वरचढ होत आहे, असें दिसतांच त्यांची ट्रूमन यांनीं उचलबांगडी केली.

बाल्डविन हा एक साधा मनुष्य. त्याच्या सहकाऱ्यांचा तो चेष्टेचा विषय होत असे. पण ब्रिटनचा एक यशस्वी पंतप्रधान म्हणून त्यानें ख्याति मिळवली. एका अमेरिकन घटस्फोटितेशीं विवाह करण्यासाठीं आठव्या एडवर्डनें राज्य त्याग केला आणि हें प्रकरण बाल्डविन यांनींच कौशल्यानें हाताळलें.

इंग्लंडचे आणखी एक पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांच्याबद्दल अर्नेस्ट बेव्हिन म्हणतात, " ॲटली यांनीं विधायक असें कसलेंच कार्य केलें नाहीं. पण आम्ह सर्वांची मोट बांधण्यांत त्यांचेच कौशल्य दिसून आलें. "

जॉन केनेडी या ध्येयवादी तरुण अध्यक्षाच्या खुनानंतर उपाध्यक्ष लिंडन जॉन्सन हे अध्यक्षपदावर आले. सहा महिन्यांतच त्यांनीं आपला वचक इतका बसवला कीं अमेरिकेच्या अंतस्थ प्रश्नांत व इतरत्रहि त्यांनीं केनेडींपेक्षांहि अधिक नांव कमावलें. आंतरराष्ट्रीय राजकारणांतसुद्धां त्यांनी केनेडींची बरोबरी केली.

लालबहादूर शास्त्री हे लहानखोर खरेच पण त्यामुळेंच त्यांचे पाय जमिनींत घट्ट रोवलेले होते. अस्मानात भराऱ्या मारण्याइतके ते उंच नव्हते. ध्येयवादी आणि तत्त्वज्ञ नेहरूंपेक्षां ते निराळे वाटतात तें यामुळेंच. नेहरूंची दृष्टि जगाला गवसणी घाली. त्या गरुडझेपेंत कधीं कधीं त्यांच्या पायाखालची वाळूहि सरक-ल्याचा भास होई. शास्त्रींच्या बाबतींत तसें घडण्याचा संभव नव्हता. रूझवेल्ट आणि ट्रूमन; केनेडी आणि लिंडन जॉन्सन; अशीच नेहरू आणि शास्त्री यांची परंपरा होती.

नेहरूंचें जनतेवर प्रेम असे खरें, पण विशाल आणि भव्य अशा व्यासपीठा-वरून ते लोकांशीं बोलत. लालबहादूर मात्र लोकांच्यांत बसत. त्यांच्यापैकींच एक होत. त्यांचीं सुखदुःखें अनुभवीत आणि त्यांचीच भाषा बोलत. कंटाळवाण्या आणि रुक्ष तपशिलांत नेहरूंचें मन रमत नसे. पक्षसंघटनेकडे त्यांचें लक्ष नसे. नेहरू हे कॉंग्रेसचे नेते खरे. पण पक्षसंघटनेच्या खाचाखोचा माहीत नस-ल्यानें त्यांची कधीं कधीं पंचाईत होई. त्यासंबंधींचा त्वरित व अचूक निर्णय देणें त्यांना कठीण होई.

लालबहादूर हे लहानपणापासूनच संघटनाचतुर होते. अनेक वर्षें त्यांनीं संघटना करण्यांत घालविलें होते; संघटनाशास्त्राची अगदीं बारीकसारीक माहिती त्यांना होती. पक्षांत कोठेंहि अथवा कसलीहि अडचण निर्माण झाली कीं लालबहादुरांनीं, वर्मावर अचूक बोट ठेवावें त्याप्रमाणें, त्या अडचणीचें कारण शोधून काढावें. १९३७ सालापासून भारतीय अथवा राज्यवार ज्या ज्या निवडणुका झाल्या, त्या त्या ठिकाणीं शास्त्रींनी सूत्रें हलविलीं आहेत, महत्त्वाचीं कार्यें केलेलीं आहेत.

आपल्या राष्ट्रासंबंधींचीं स्वप्नें रंगविणें नेहरूंना आवडत असे. तीं स्वप्नें साकार होण्यासाठीं अनुकूल वातावरण निर्माण करणें, लोकांना कार्यप्रवण करणें हें नेहरूंना जमे. पण तें साधण्यासाठीं लागणारें संघटनकौशल्य त्यांच्या-जवळ नव्हतें, त्यासाठीं त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागे. त्यांच्या भव्य योजनांना एखादे वेळीं धक्का बसे. दुसऱ्यावर ते चटकन् विश्वास ठेवीत त्याची बाजू घेतांना त्यांना स्वत:कडे कमीपणा घेण्याची एखादे वेळीं पाळी येई. लालबहादूर स्वप्नाळू नाहींत. ते जागरूक आहेत. हातीं घेतलेलें काम पुरें करण्याची त्यांच्यांत जिद्द आहे.

लालबहादूर शास्त्री यांची नेतेपदीं एकमतानें निवड झाली. एका अत्यंत लोकप्रिय व स्वीकार्य माणसाची कॉंग्रेसनें निवड केली. नेहरूंची जागा घेण्यासाठीं दुसरा इतका योग्य माणूसच सांपडला नसता. ते अजातशत्रु आहेत. त्यांचे ८४ वर्षांचे चुलते रामप्रसाद मात्र काळजीच्या सुरांत म्हणाले– " हं, लालबहादूर पंतप्रधान झाले. हें पद स्वीकारून त्यांनीं हजारों शत्रु निर्माण केले. "

लालबहादुरांची निवडणूक म्हणजे भारताच्या हांकेला परमेश्वरानें दिलेली साद ! नेहरूंनंतर भारतीय प्रतिष्ठेचा नेता आपणाला मिळेल कीं नाहीं याविषयीं जनता साशंक होती. या अवाढव्य आणि आत्मनिष्ठ राष्ट्राला पसंत पडणारा आणि आदरणीय वाटणारा नेता तरी कोण आहे ? तसा नेता मिळाला नाहीं, तो थिटा पडला तर राष्ट्राच्या ऐक्याच्या ठिकऱ्या उडतील, भारतांतील राज्यें अशा नेत्याच्या अभावीं फुटीरपणा दाखविण्यासहि उद्युक्त होतील.

नेहरूंनंतर येणारा पुढारी अल्पसंख्याकांच्या हिताचें रक्षण करील कीं नाहीं, उत्तरेकडील पुढारी भारताचा पंतप्रधान झाल्यास दक्षिणेकडील हिंदीविरोधी

राज्यांच्या तक्रारी तो दूर करील कीं नाहीं, स्वभाषेच्या अभिमानानें तो हिंदीची जबरदस्ती आपल्यावर करील कीं काय, अशा अनेक शंकाकुशंका या वेळीं सर्वत्र फैलावत होत्या.

पण शास्त्रींनीं या सर्व शंका मुळांतच फोल ठरविल्या. अल्पसंख्याकांबद्दल त्यांना अतीव आपलेपणा वाटतो आणि ते निःपक्षपाती आहेत, अशी लोकांची खात्री पटली. भारतीयांचीं मनें त्यांनीं अल्पावधींत जिंकलीं. अल्पसंख्याकांचें संरक्षण करणें, त्यांना न्यायानें वागविणें ही जबाबदारी प्रामुख्यानें बहुसंख्याक पक्षावर असते असा त्यांचा सिद्धांत आहे. त्यांनीं इंग्रजीला राजभाषेचें स्थान दिलें, याबाबतींत दाक्षिणात्यांची मागणी त्यांनीं मान्य केली. साहजिकच लालबहादुरांबद्दल दाक्षिणात्यांना जिव्हाळा वाटूं लागला.

उत्तर व दक्षिण असे भारताचे दोन भाग आहेतच. शास्त्री उत्तरेकडचे आणि कामराज दक्षिणेकडचे. या दोघांची एकजूट झाल्यानें भारताच्या या दोन्ही भागांची एकजूट झालेली आहे. या निवडणुकीचें हे वैशिष्टय आहे आणि त्यामुळें मंत्रिमंडळाचें स्थैर्य बळावलें आहे. लालबहादूर यांना कॉंग्रेसचे अध्यक्ष कामराज यांचा पाठिंबा सर्वतोपरी मिळाला आहे. दक्षिणेकडून शास्त्रींना संपूर्ण पाठिंबा मिळण्याचें श्रेय सर्वस्वीं कामराजांना आहे. दक्षिणेकडील जनतेचा पाठिंबा मिळून एका उत्तर भारतीयानें भारताचा पंतप्रधान व्हावें, ही एक अभूतपूर्व घटना या वेळीं घडली.

याहिपेक्षां विशेष म्हणजे लालबहादूर शास्त्री हे नेहरूंच्या विश्वासांतले आहेत. त्यांनींच आपल्यानंतर पंतप्रधान व्हावें अशी नेहरूंची इच्छा होती हें लोकांना माहीत होतें. नेहरूंच्या या इच्छेच्या खुणा गेलीं ५ वर्षे लोकांच्या दृष्टिपथांत येत होत्या. कॉंग्रेसच्या कार्याबाबत गेलीं १२ वर्षे लालबहादूर शास्त्री हे पंडित-जींच्या विश्वासांतले आणि लोभांतले होते. याबाबतींतील नेहरूंचे ते सल्लागार होते. गेलीं ५ वर्षे तर पंडितजी भारताच्या राज्यकारभाराबाबतहि लालबहादूर यांचा सल्ला घेत. कॉंग्रेस आणि पंतप्रधान यांना जोडणारा दुवा म्हणजे शास्त्री असें समीकरण रूढ झालें होतें.

पंडित पंतांच्या मृत्यूनंतर शास्त्रींकडे गृहमंत्रिपद आलें. कुठें कांहीं अस्वस्थता निर्माण झाली कीं तिकडे शास्त्रींची रवानगी होई. या सर्व घटनांचा अर्थ उघड होता.

भुवनेश्वर येथें लोकशाही व समाजवाद यासंबंधींचा महत्त्वाचा ठराव मांडण्याचा मान शास्त्रींना मिळाला. या वेळीं ते मंत्रिमंडळांतहि नव्हते. पंडितजी भुवनेश्वरहून परत आले ते आजारी पडूनच. याच वेळीं बिनखात्याचे मंत्री म्हणून लालबहादूर शास्त्री यांचा मंत्रिमंडळांत अंतर्भाव झाला. नेहरूंनीं लालबहादूर यांचा आपला राजकीय वारस म्हणून साक्षात् उल्लेख केलेला नसला, तरी त्यांच्या मनांत काय होते, याचा सुगावा वरील घटनांवरून कोणालाहि सहज झाला असता.

कॉंग्रेसमध्यें डावे आणि उजवे गट असले तरी कॉंग्रेसचा गाभा या दोहोंच्या मधला आहे. लालबहादूर या पंथांतले आहेत. त्यांना जनतेचा सार्वत्रिक पाठिंबा आहे. ते कोणत्याहि गटाकडे झुकलेले नाहींत. ते सहनशील आहेत, प्रागतिक आहेत आणि हाडाचे समाजवादी आहेत. नेहरूंचें ध्येयधोरण एकनिष्ठेनें ते पाळणारे आहेत. नेहरूंचा शास्त्रींवर अढळ विश्वास होता. आपल्या कार्याचा शास्त्री खेळखंडोबा करणार नाहींत, याची नेहरूंना खात्री होती. या बाबतींत नेहरूंना थोडीसुद्धां काळजी नव्हती.

लालबहादूर शास्त्रींविषयीं बोलतांना प्रसिद्ध उद्योगपति घनश्यामदास बिर्ला एकदां म्हणाले — "शास्त्री हे डाव्या गटाचेहि नाहींत, कीं उजव्या गटाचेंहि नाहींत. ते एक सत्प्रवृत्त सरळ वृत्तीचे गृहस्थ आहेत."

महात्माजी जर आज हयात असते तर त्यांनाहि लालबहादुरांच्या निवडीनें आनंद झाला असता. सौजन्य आणि शांतपणा, लोकांचा खऱ्या अर्थानें नेता, सेवक, समंजस, मत्सरापासून अलिप्त असलेला, दृढनिश्चयी, आचार आणि विचार यांत अहिंसक, सोशिक आणि मनमिळावू, असें गांधीजींनीं शास्त्रींचें वर्णन केलें असतें.

मंत्रिपदावर असतांना शास्त्री हे विरोधी पक्षांतहि प्रिय होते. प्रामाणिकपणा, खंबीरपणा आणि मनमोकळेपणा या गुणांच्या साहाय्यानें त्यांनीं आपल्या विरोधकांनाहि जिंकलें होतें. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक एकदां म्हणाले — "लालबहादूर शास्त्रींचें भाषण ऐकलें कीं त्यांच्या युक्तिवादाबद्दल माझ्या मनांत आदर निर्माण होतो. अशा माणसाशीं न पटणें कसें शक्य आहे ?" असा सुस्वभावी, तर्कवादी, सौम्य, अनहंकारी नेता मिळाल्यानंतर राष्ट्रांतील लोकांना दिलासा कां न वाटेल ?

कोणत्याहि प्रश्नाचा निःपक्षपातीपणानें आणि समजुतीनें विचार करणें हें शास्त्रींचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. १ जानेवारी १९६३ रोजीं हैदराबाद येथें त्यांचें भाषण झालें. विषय होता दारूबंदी. शास्त्री म्हणाले—" दारूबंदी हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तो आम्ही टाळणार नाहीं. दारूबंदीच्या आम्हीं विरुद्धहि नाहीं. पण जेथें दारूबंदी चालू आहे आणि जेथें ती अयशस्वी झाली आहे, तेथें तत्संबंधींच्या धोरणांत दुरुस्त्या करण्याचा विचार करावा लागेल. "

राजकारणांत यशस्वी होण्यासाठीं नेत्याजवळ जे गुण आवश्यक लागतात त्यांचा शास्त्रींजवळ अभाव आहे असें कांहींना वाटतें. मृदुपणा आणि नम्रपणा हे राजकीय पुढाऱ्यांच्या अंगीं दुर्गुणच समजले जातील. कारण राजकारणांत यश मिळवावयाचें तर कडकपणा, आपल्या मताला चिकटून राहणें, निर्दय व निर्लज्ज असणें या गुणांची आवश्यकता असते. आपल्या सहकाऱ्यांच्या प्रेतांवर पाय ठेवून यशाचा सोपान चढून जाण्याची तयारी ठेवावी लागते. शारीरिक-रीत्या शास्त्री हे बलाढ्य नाहीत. व्यासपीठें गाजविण्याइतकें वक्तृत्वहि त्यांज-जवळ नाहीं. बुद्धिवैभवाच्या बाबतींत ते पर्वतप्राय नाहींत. मग त्यांच्या यशाचें गुपित कोणतें आहे ?

त्यांचा सौम्यपणा हें त्यांच्या यशाचें गमक आहे असें मला वाटतें. या सौम्य-पणाच्या जोरावर त्यांनीं मोरारजी देसायांसारख्या प्रबळ प्रतिस्पर्ध्याशीं टक्कर दिली आणि या सामन्यांत ते विजयी झाले. त्यांचीं राजकीय निदानें अचूक असतात. ते त्वरित निर्णय घेऊं शकतात. कोणत्याहि प्रश्नांतील गुंता ते लगेच सोडवूं शकतात. हे त्यांचे गुण असामान्य आहेत. या गुणांना राजकारणांत मोठें स्थान आहे.

कोणताहि प्रश्न लौकर समजणें, त्याच्या मुळाशीं जाणें आणि त्यांतून सर्व-मान्य असा निष्कर्ष काढणें हें लालबहादूर शास्त्री यांचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. त्यांची वाणी मृदु आहे, ते लोकांचें मन सहजपणें जिंकूं शकतात, पण वेळ आल्यास ते ठामपणा दाखवूं शकतात. आपले निर्णय खंबीरपणें कृतींत आणूं शकतात. अलाहाबाद येथील लोकसेवक समाजांत बाबू पुरुषोत्तमदास टंडन यांचे शास्त्री हे अनेक वर्षें सहकारी होते. " मूल्यमापन करणें, अड-चणीच्या प्रसंगांतून मार्ग काढणें, समेट घडवून आणणें यांत शास्त्रींचा हातखंडा आहे. पण त्यांच्या मार्दवामागें खंबीरपणाचा पहाड उभा आहे हें विसरून

चालणार नाहीं," असें बाबूजी शास्त्रींबद्दल म्हणत.

१९५१ मध्यें कॉंग्रेसचे सरचिटणीस म्हणून शास्त्रींनीं दिल्लींत पाऊल ठेवलें. पंडितजी त्या वेळीं कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. तेव्हांपासूनच दैवानें शास्त्रींवर कृपा-दृष्टि ठेवण्यास प्रारंभ केला असें म्हणतां येईल. शास्त्रींचें पोलादी व्यक्तिमत्त्व त्या वेळेपासूनच नेहरूंना दिसूं लागलें. त्यांचा युक्तिवाद आणि संयम, कष्ट करण्याची त्यांची तयारी आणि फलासाठीं थांबण्याची त्यांची तयारी, त्यांचें संघटनाकौशल्य, मतभेदांवर मात करण्याचें, ते नेस्तनाबूद करण्याचें त्यांचें वैशिष्ट्य, यांचा नेहरूंवर प्रभाव पडला. नेहरूंच्या मनांत शास्त्रींबद्दल विश्वास निर्माण झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंद दिः ........

## ७

# पहिलीं पावलें

तो म्हातारा ब्राह्मण खूप संतापला होता. त्याचें अंगण विस्कटून गेलें होतें. नव्यानें तयार केलेल्या त्या अंगणांत एका रात्रींत गुरांनीं हैदोस घातला होता. मऊ जमीन उखडून टाकली होती.

पण त्यानें जरा बारकाईनें पाहिलें मात्र. क्षणार्धांत त्याचा राग मावळला. तो आश्चर्यचकित नजरेनें पाहूं लागला. त्या अंगणांत उठलेल्या पावलांच्या ठशांकडे. तीं पावलें वेगळींच होतीं.

" अरे, या पावलांवर तर राजचिन्हें दिसतात. कोणाचीं बरें हीं पावलें असावी ! त्या गवळ्याची ? " म्हातारबुवा त्या गवळ्याच्या शोधासाठीं निघाले. गुराख्याचें तें पोर बिचारें अगदीं घाबरून गेलें होतें. त्याच्या गुरांनींच म्हाताऱ्याच्या अंगणाचें वाटोळें केलें होतें ना ? भीतीनें कांपत कांपत, क्षमा-याचना करीत तें पोर ब्राह्मणापुढें आलें. पण काय चमत्कार ! त्या ब्राह्मणानें त्याला मारलें तर नाहींच, पण तो त्या पोरावर रागावलाहि नाहीं. त्यानें त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरविला आणि तो म्हणाला, " बाळा, रडूं नको. हांस. तूं राजा होणार आहेस. "

त्या मुलानें एकदां डोळे मिचकावले, आपलीं लक्तरें साफसूफ केलीं, हातानें नाक पुसलें. तो आश्चर्यचकित झाला. त्याला कांहीं सुचेना, कांहीं समजेना. आपला मार चुकला, या आनंदांतच तो होता.

२०० वर्षांपूर्वी म्हैसूर संस्थानांत ही गोष्ट घडली. त्यानंतर अवघ्या वीस वर्षांतच तें पोरगें सुलतान हैदरअली या नांवानें ओळखलें जाऊं लागलें. हैदर-अलीनें आपलें राज्य स्थापन केलें. तो आपल्या पूर्वीच्या खेड्यांत गेला, आपलें भविष्य सांगणाऱ्या त्या ब्राह्मणाचा त्यानें तपास केला आणि त्याला जहागीर देऊन त्याचा त्यानें सत्कार केला.

नन्हेचें ज्योतिष कोणी वर्तविलें होतें कीं काय, हें समजण्यास मार्ग नाहीं. लालबहादूर यांचें घरांतील नांव नन्हे होतें. नन्हे म्हणजे लहान. गंगेच्या तीरावर लालबहादूर लहानपणीं खेळत. त्यांना एखादा ज्योतिषी भेटला असता तर त्यानें लालबहादुरांच्या उज्ज्वल भविष्यकाळाचें भविष्य खासच सांगितलें असतें. ‘ झोंपडीपासून राजवाड्याकडे ’ असा त्यांचा जीवनक्रम घडला आहे.

लालबहादूर हे गवळींच व्हावयाचे. ते अगदीं लहान असतांनाची गोष्ट. कसली तरी जत्रा होती आणि लालबहादुरांची आई रामदुलारी देवी गंगा-स्नानासाठीं गेली होती. गर्दी खूपच होती. त्या गर्दीत चेंगराचेंगरी झाली आणि रामदुलारी बाजूला फेकल्या गेल्या. हातांतील मूल फेकलें गेलें आणि लक्षावधि लोकांच्या मेळाव्यांत दिसेनासें झालें.

सुदैवानें लालबहादूर – तेंच तें मूल होतें – एका गवळ्याच्या हाऱ्यांत फेकले गेले. आपल्या ओटींत पडलेलें हें मूल म्हणजे गंगामाईचा प्रसाद आहे असें त्या गवळ्याला वाटलें. त्या मुलासह तो घरीं गेला. घरांत आनंदीआनंद झाला. जणूं दिवाळी–दसरा उजाडला. आपल्या पोटीं संतान नाहीं. गंगामातेनें आपली प्रार्थना ऐकली, आपल्यावर कृपा केली, आपल्याला बाळ दिलें ! त्या घरांतला त्या दिवशींचा आनंदोत्सव अपूर्व होता.

पण इकडे रामदुलारींची स्थिति शोचनीय झाली होती. मुलाच्या विरहानें त्या बेचैन झाल्या होत्या. व्याकूळ झाल्या होत्या. त्यांनीं त्रिखंड शोधलें पण मुलाचा पत्ता लागेना. अखेर पोलिसांत वर्दी देण्यांत आली. पोलिसांचा तपास सुरू झाला आणि शेजारच्या खेड्यांत गवळ्याच्या घरीं मुलाचा तपास लागला. गवळ्याच्या घरचा आनंद मावळला, त्यांच्या विनवण्या आणि अविरत अश्रुधारा यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पोलिसांनीं मायलेकरांची पुन्हा गांठभेट करून दिली.

लालबहादूर शास्त्री यांचा ज्योतिषावर विश्वास नाहीं. आपल्याजवळ आपली जन्मकुंडलीसुद्धां नाहीं असें त्यांनीं जाहीरपणें सांगितलें होतें. आपल्या घरीं इतकें दारिद्र्य होतें कीं जन्मकुंडली तयार करून घेणेंहि शक्य नव्हतें, असें ते म्हणाले होते.

'अर्थातच ज्योतिषशास्त्र हें सब झूट आहे असें मात्र मीं मानीत नाहीं', असें ते मला म्हणाले. पण सतत ज्योतिषांचा सल्ला घेणें, राजकारणांत त्यांना भविष्य विचारणें हें त्यांना मंजूर नाहीं. आपण वारंवार ज्योतिषाच्या तंत्रानें चालूं लागलों कीं आपला आत्मविश्वास ढळतो, असें त्यांचें मत आहे. ज्योतिषाचें हें खूळ सध्यां वाढत आहे. पंडितजींचा ज्योतिषावर अजीबात विश्वास नव्हता, यांत मला विशेष अपूर्वाई वाटत नाहीं, हें लालबहादूर यांचें निदान सार्थ वाटतें.

२ ऑक्टोबर १९०४ रोजीं एका कायस्थ कुटुंबांत मोंगलसराई येथें लालबहादूर यांचा जन्म झाला. काशीपासून मोंगलसराई केवळ ७ मैल दूर आहे. त्यांचा जन्म महात्माजींच्या जन्मदिनींच झाला, पण लालबहादूर यांना हा योगायोग कसासाच वाटतो. या बाबतींत महात्माजींशीं स्वतःची तुलना होणें नापसंत आहे, म्हणून पंचांगानुसार आपला वाढदिवस साजरा करण्याचा त्यांचा विचार आहे.

उत्तर प्रदेशांतले कायस्थ पुढारलेले, सुशिक्षित आणि महत्त्वाकांक्षी आहेत. ते बहुतेक नौकर पेशाचे आहेत आणि सरकारी व इतर नोकऱ्यांत त्यांनीं मोठमोठ्या अधिकाराच्या जागा भूषित केलेल्या आहेत. लोकसंख्येच्या मानानें पाहिलें तर त्यांची शेंकडेवारी ५ टक्केच भरते, पण सरकारी नौकरींतील त्यांचें प्रमाण शेंकडा ३५ आहे.

लालबहादूर हे श्रीवास्तव. हें उपपद त्यांनीं पुढें टाकलें. कारण जातिसंस्थेवर त्यांचा विश्वास नाहीं. लालबहादूर या नांवानेंच पुढें ते ओळखले जाऊं लागले.

लालबहादूर यांचें शास्त्री हें नांव पाहून कांहीं लोक त्यांना ब्राह्मण समजतात, पण शास्त्री ही त्यांना मिळालेली पदवी आहे. काशी विद्यापीठांत चार वर्षे अभ्यास करून व तत्त्वज्ञान हा विषय घेऊन ते शास्त्री या परीक्षेंत पास झाले व तेव्हांपासून लोक त्यांना लालबहादूर शास्त्री असें संबोधूं लागले.

लालबहादूर यांचे वडील श्रीशारदा प्रसाद हे एक प्राथमिक शिक्षक होते.

नंतर अलाहाबाद येथें त्यांनीं कारकुनाची नोकरी पत्करली. लालबहादूर दीड वर्षांचे असतांच त्यांचे वडील वारले. आईला अवघ्या २० व्या वर्षी वैधव्य आलें. लालबहादूर आणि दोन मुली यांना घेऊन श्री. रामदुलारी आपल्या वडिलांकडे गेल्या.

लालबहादूर म्हणतात–" माझी आई आपल्या वडिलांची सर्वांत थोरली मुलगी. त्यामुळें त्यांची ती फार लाडकी होती. माझे वडील वारल्यानंतरहि त्या-वेळच्या रूढीप्रमाणें माझ्या आईनें सासरीं राहावयास पाहिजे होतें, पण माझे आजोबा तिला आपल्या घरीं घेऊन आले, त्यानंतर त्यांनीं तिला कधींहि सासरीं पाठविलें नाहीं. इतक्या लहान वयांत आपल्या मुलीला वैधव्य यावें याची त्यांना अतीव हळहळ वाटे. "

हजारीलाल हें लालबहादूर यांच्या आजोबांचें नांव. त्यांचें कुटुंब खूपच मोठें होतें. आजोबा, आज्या, चुलते, चुलत्या, भाचे, भाच्या आणि इतर अनेक नातलग त्या घरांत असत. आपल्या घरांत त्यांचें अधिराज्य असे. तसे ते स्वभावानें खूप प्रेमळ होते. घरांतल्या सर्वांची ते काळजीपूर्वक विचारपूस करीत. लालबहादुरांवर त्यांचें विशेष प्रेम असे. ' माझ्या वडिलांनींसुद्धां माझी इतकी काळजी घेतली नसती, ' असें लालबहादूर म्हणतात.

आपल्या वयाच्या १० व्या वर्षापर्यंत लालबहादूर मोंगलसराई येथें आजो-बांच्या घरीं राहिले. तेथेंच ते सहाव्या यत्तेंत होते. पुढील शिक्षणासाठीं नंतर बनारस येथें आपले मावसे रघुनाथप्रसाद यांच्याकडे गेले. तेथील हरिश्चंद्र हायस्कूलमध्यें त्यांचें नांव दाखल करण्यांत आलें. रघुनाथ प्रसाद हे बनारस नगरपालिकेंत सरकारकून होते. मोठ्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा नमुना होता तो.

त्यांची शिस्त आणि त्यांचें प्रभावी चारित्र्य यांचा लालबहादूर यांच्या कोंवळ्या मनावर प्रभाव पडला. निष्काम कर्म हें त्यांचें ध्येय होतें आणि या त्यांच्या ध्येयानें लालबहादूर भारून गेले होते. लालबहादुरांना त्यांच्याबद्दल अतीव आदर वाटत असे.

रघुनाथप्रसाद हे अत्यंत गरीब होते. त्यांनीं आपल्या कुटुंबियांना धनदौलत दिली नाहीं, पण प्रेम आणि श्रद्धा यांनीं त्यांना त्यांनीं न्हाऊन टाकलें. मुलांच्या शिक्षणाची मात्र त्यांनीं आबाळ केली नाहीं. वयाच्या ६० व्या वर्षी ते निवृत्त

झाले, पण वाढता खर्च भागविण्यासाठीं त्यांनीं धंद्यांत शिरण्याचें ठरविलें आणि एक दुकान थाटलें.

गंगानदी ओलांडण्यासाठीं नावेचें भाडें देण्यास पैसे नाहींत, म्हणून लालबहादूर शास्त्री हे पोहत पोहत नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर असलेल्या शाळेंत जात असत ही कथा असत्य आहे. दुसऱ्या एका घटनेशीं या गोष्टीचा संबंध जोडण्यांत आला आहे.

बनारसला त्या वेळीं अनेक जत्रा भरत. एक जत्रा नदीच्या पलीकडच्या कांठीं होती. लालबहादूर आपल्या कांहीं मित्रांसह या जत्रेला गेले होते. दिवसभर जत्रेंत रमतगमत संध्याकाळीं मंडळी परत निघाली. बाकीचे लोक बोटीजवळ आले, पण लालबहादूर मागेंच रेंगाळत होते. सगळे लोक बोटींतून पलीकडे गेले. अंधार पडूं लागला. लालबहादूर यांनीं नदींत उडी मारली. लोक आश्चर्यचकित झाले. नदीचा प्रवाह अर्धा मैल रुंद होता, पण लालबहादुरांनीं तड गांठली.

वस्तुस्थिति अशी होती कीं लालबहादूर यांजवळ परत भाड्याचे पैसे नव्हते. त्यांचा स्वभाव संकोची असल्यामुळें आपल्या मित्रांना ही गोष्ट कळूं नये, अशी त्यांची इच्छा होती. म्हणून आपल्याला आणखी थोडा वेळ येथें थांबावयाचें आहे असें त्यांनीं मित्रांना सांगितलें. मित्रमंडळी बोटींतून परत फिरल्यावर त्यांनीं नदींत उडी घेतली व पोहून ते पलीकडच्या कांठावर पोंचले. लालबहादूर हे धाडसी व पट्टीचे पोहोणारे आहेत. पण बुडण्याचे त्यांच्यावर दोनदां प्रसंग आले होते. पण हे प्रसंग तळ्यांतच घडले. एकदां तर त्यांनीं आपल्या शिक्षकाच्या मुलाला खांद्यावर घेतलें होतें आणि ते बुडूं लागले. ही गोष्ट सांगतांना लालबहादूर यांच्या अंगावर अजून शहारे येतात.

शाळेंतून संध्याकाळीं परत आल्यावर आपल्या सवंगड्यांबरोबर फुटबॉल, हॉकी वगैरे खेळ खेळण्याचा त्यांचा प्रघात असे. पण फुटबॉल अथवा हॉकीच्या काठ्या यांसाठीं पैसे कसे व कोठून मिळणार? म्हणून खुजराचीं फुलें त्यांनीं गोळा करावी, त्यांचा चेंडू करावा आणि तो चेंडू फडक्यांत गुंडाळावा असा त्यांचा परिपाठ होता. चेंडू लहान झाला तर हॉकीचा बॉल व मोठा झाला तर फुटबॉल!

झाडांच्या लहान फांद्या तोडाव्या व इंग्रजी एलचा आकार येईतों त्या

तासाव्या, अशी हॉकीच्या काठ्या तयार करण्याची त्यांची युक्ति असे.

घराभोंवतालचें मोकळें मैदान हें त्यांचें ग्राउंड. पण मोठमोठ्या सामन्यां-इतकेच हे खेळ रंगत व चुरशीनें खेळले जात.

लालबहादूर यांना लहानपणापासूनच वाचनाचा अफाट नाद होता. हातीं येईल तें पुस्तक वाचावें, मग तें कळो वा न कळो, असा त्यांचा खाक्या असे.

गुरु नानक यांच्या काव्यांतील एक श्लोक मात्र त्यांना वेदवाक्याप्रमाणें आवडत असे. हा श्लोक कितीदां तरी ते स्वतःशीं गुणगुणत असत.

या श्लोकामुळें आत्मश्रद्धा आणि आत्मविश्वास या गुणांची त्यांच्यांत जोपासना झाली. तो श्लोक त्यांचें ब्रीद बनलें. तें त्यांचें ध्येय झालें. लालबहादुरांना कुटुंबांतील इतर लोक नन्हे म्हणत. श्लोक असा होता—

नानक तुम्हीं सान रहा, जणुं पातें गवताचें।
झाडेंझुडपें झडून जातिल, उदंड राहिल तृण साचें ॥

लालबहादूर यांच्या लहानपणची आणखी एक आठवण सांगण्यासारखी आहे. यावरून त्यांचा स्वभाव किती भावनावश होता याची कल्पना येईल. या वेळीं त्यांचें वय अवघें सहा वर्षांचें होतें. वेळ दुपारची होती. आणि पोरांना दांडगाई करण्याची इच्छा झाली. गांवांतल्या सार्वजनिक बागेकडे या कंपूचा मोर्चा वळला. बाकीचीं पोरें माकडासारखीं झाडावर चढलीं आणि फळें तोडूं लागलीं. बिचारा नन्हे खालींच उभा होता. एक फूल मात्र त्यानें तोडलें होतें.

इतक्यांत एका मुलानें धोक्याची सूचना दिली. नन्हेखेरीज बाकीचीं सर्व मुलें पळून गेलीं. माळ्यानें नन्हेला पकडलें आणि बेदम ठोकलें.

नन्हे म्हणाला—" अहो, मला वडील नाहींत हो! मी गरीब आहें. मला कां उगाच मारतां ? "

" मग तर तुझ्यावर चांगलें वागण्याची अधिक जबाबदारी आहे. " माळीबुवा फुरफुरले.

हें वाक्य नन्हेच्या चांगलेंच जिव्हारीं लागलें. ' मग तर तुझ्यावर चांगलें वागण्याची अधिकच जबाबदारी आहे, ' हें माळ्याचें वाक्य घोकतच तो घरीं आला. इतरांपेक्षां अधिक चांगलें वागण्याची त्यानें शपथ घेतली. आपल्याला पितृछत्र नसल्यानें आपलें भावी आयुष्य आपल्यालाच घडवावें

लागणार आहे, याची या प्रसंगानें त्याला जाणीव झाली.

शाळेंत असतांना लालबहादूर हे एक साधारणच विद्यार्थी होते. स्वभावानें शांत आणि अबोल. आपलें मन कुणाजवळ उघडें न करणारे – पण त्यांच्या शिक्षकांचें त्यांच्यावर अतीव प्रेम असे. आपल्या लहानपणच्या आठवणी सांगतांना लालबहादूर म्हणाले, " माझ्यावर माझ्या शिक्षकांनीं कां इतकें प्रेम केलें हें मला कळत नाहीं. ते मला आपल्या घरीं घेऊन जात आणि स्वतःच्या मुलाप्रमाणें मला वागवीत. "

लालबहादूर यांचें अंकगणित कच्चें होतें. बीजगणित आणि भूमिति यांत जास्ती गुण मिळवून ते अंकगणितांतील कमी पडलेल्या गुणांची भर करीत. त्यांचें इंग्रजी चांगलें होतें. ती भाषा आणि इतिहास हे त्यांचे आवडते विषय. त्यांच्या इंग्रजी उच्चारांबद्दल त्यांचे शिक्षक त्यांस नेहमीं शाबासकी देत.

लालबहादूर इंग्रजी चौथींत होते, त्या वेळची गोष्ट. त्यांच्या शाळेंत तपासनीस आले होते. आपल्या वर्गातील पहिल्या क्रमांकाचा विद्यार्थी म्हणून ज्या वेळीं शिक्षकांनीं त्यांची ओळख करून दिली, त्या वेळीं साहजिकच त्यांच्या अंगावर मूठभर मांस चढलें. शिक्षकांनीं लालबहादूर यांना एक इंग्रजी उतारा वाचण्यास सांगितला. तो ऐकल्यावर दिपोटी त्यांच्याजवळ आले. त्यांनीं त्यांची पाठ थोपटली आणि त्यांचें कौतुक केलें.

वर्गात गुंड मुलें असणारच ! आणि लालबहादूर यांच्यासारख्या दुबळ्या आणि भावनावश विद्यार्थ्यांस त्यांच्याकडून उपद्रव होणारच ! पण लाल-बहादूर यांना तसा अनुभव आला नाहीं. ते म्हणतात – " माझें शालेय आयुष्य सुखाचें गेलें. माझे सोबती माझ्याशीं मित्रत्वानें वागत. एकाद्या दांडग्या मुलानें मला त्रास दिलेला आहे, असें एकदांहि घडल्याचें मला आठवत नाहीं. "

ते पुढें म्हणाले, " असहकारितेच्या चळवळींत मीं शाळा सोडली, त्या वेळीं माझ्याभोंवतीं मुलांचा गराडा पडला. माझें वक्तृत्व त्यांनीं शांतपणें व आदरयुक्त भावनेनें ऐकून घेतलें. मीं कोणाला उपद्रव दिला नाहीं, आणि माझे मित्र माझ्याशीं प्रेमानें वागले. माझे सगळेच मित्र चांगले व सुस्वभावी होते. "

हळूं हळूं लालबहादूर यांचीं क्षितिजें विकसित होऊं लागलीं. त्यांचे विचार

प्रगल्भ होऊं लागले आणि जीवनाच्या गंभीर समस्यांचा ते विचार करूं लागले. समाजाचें आपल्यावर ऋण आहे, तें आपण फेडलें पाहिजे. जीवनाला आपण वळण लावलें पाहिजे. आपलें ध्येय आपण ठरविलें पाहिजे असा निर्णय घेण्याचें त्यांच्या मनांत येऊं लागलें. स्वराज्याची आरोळी त्यांच्या कानांत दुमदुमूं लागली.

काँग्रेस चळवळीसंबंधींच्या बातम्या, त्यासंबंधींचें वाङ्मय यांकडे त्यांचें मन धांव घेऊं लागलें. गोपाळ कृष्ण गोखले, विपिनचंद्र पाल, सुरेंद्रनाथ बानर्जी, बाळ गंगाधर टिळक यांचीं भाषणें आणि विवेचनें ते आवडीनें वाचूं लागले. त्यांनीं त्यांचें मन उचंबळून आलें.

लोकमान्य एकदां बनारसला आले होते. लालबहादूर त्या वेळीं बनारसहून ५० मैलांवर होते. टिळकांचें भाषण ऐकण्यासाठीं आणि त्यांचें दर्शन घेण्यासाठीं त्यांचा आत्मा तळमळत होता. पण बनारसला येण्यापुरतें रेल्वेचें भाडेंहि त्यांजवळ नव्हतें. ते स्वतःवरच चिडले. पण चिडून, दांतओठ खाऊन उपयोग काय ? त्यामुळें भाड्याची रक्कम थोडीच उत्पन्न होणार होती ? अखेर दुसऱ्याकडून उसनवार रक्कम घेऊन त्यांनीं बनारस गांठलें. लोकमान्यांचें भाषण ऐकून आपलें जीवन सार्थ झालें असें त्यांना वाटलें. या सभेंत लोकमान्य म्हणाले-" आपल्या शत्रूची अडचण हीच आपली संधि. " हें वाक्य वारंवार उच्चारीतच लालबहादूर घरीं परतले.

वयाच्या ११ व्या वर्षी त्यांना गांधीजींचें पहिल्यांदा दर्शन घडलें. १९१५ सालीं गांधीजी बनारस हिंदु विश्वविद्यालयाची कोनशिला बसविण्यासाठीं बनारसला आले होते. या वेळीं केलेल्या भाषणांत परकीय ब्रिटिश सत्ता आणि भारतांतील त्यांचे हस्तक संस्थानिक यांजवर त्यांनीं कडक टीका करण्यास सुरुवात केली.

भाषण चालू असतांच सरकारी अधिकारी व संस्थानिक एका मागोमाग उठून गेले. बडोद्याचे महाराज या समारंभाचे अध्यक्ष होते. थोड्या वेळानें तेहि निघून गेले. शेवटीं गांधीजी म्हणाले— ' अध्यक्षसुद्धां निघून गेल्यामुळें मला माझें भाषण संपविणें प्राप्त आहे. '

शाळेंत नाट्यप्रयोग होत आणि त्यांत शास्त्रीजी भूमिका करीत.

महाभारतांतील एका कथानकावर आधारलेल्या एका नाटकांत त्यांनीं

कृपाचार्यांचें काम केलें होतें. कृपाचार्य हा एक ज्येष्ठ मुत्सद्दी. कौरव व पांडव या दोघांनाहि त्यांच्याबद्दल आदर! खरें पाहिलें तर कृपाचार्य हे दुर्योधनाचे सल्लागार! पण लालबहादूर यांची ही भूमिका त्यांच्या भावी जीवनाची पाळण्यांतलीं पावलें नव्हतीं काय?

याच वेळीं बालवीर चळवळींत लालबहादूर यांनीं नांव दाखल केलें. अर्थातच सरकारप्रणीत बेडन पॉवेल चळवळींत ते शिरणें शक्य नव्हतें. भारत सेवा समितींत ते गेले. सहली, खेळ वगैरे या संस्थेच्या सर्व कार्यक्रमांत ते भाग घेत. सहलींच्या वेळीं वादविवाद होत, गप्पा रंगत. लालबहादूर हे पुष्कळदां या वादविवादांत श्रोत्याची भूमिका घेत. पण परकीय सत्ता, तिच्यामुळें भारतावर ओढवलेल्या आपत्ति हे विषय आले कीं शास्त्रींना स्फुरण चढावें, आणि वक्तृत्वानें त्यांनीं फड जिंकावा.

आयरिश जनतेनें ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध जो लढा सुरू केला होता, त्याची चर्चा या वादविवादांच्या ओघांत येणें अपरिहार्य होतें. आयरिश क्रांतिकारक व्हॅलेरानें रोमांचकारकरीतीनें करून घेतलेली आपली सुटका, मायकेल कॉलिन्स या बहाद्दरानें ब्रिटिशांशीं दिलेली झुंज यांचीं रोमहर्षक वर्णनें या वेळीं करण्यांत येत.

पण लालबहादूर या वयांतसुद्धां इतर तरुणांप्रमाणें बावरे नव्हते. आपला मार्ग त्यांनीं निश्चित केला होता. त्यांचे एक जिवलग स्नेही आणि सहकारी श्री त्रिभुवन नारायण सिंग म्हणतात, "बाह्यात्कारीं जरी ते मृदु दिसले तरी अंतरीं ते कणखर होते. आपला युक्तिवाद आणि वाक्चातुर्य यांच्या साहाय्यानें ते आपलीं मतें इतरांस पटवूं शकत. आपण काय बोलत आहों याची त्यांना जाणीव होती."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि ..................

# ८

# काशी विद्यापीठ

बनारस येथील हरिश्चंद्र हायस्कूलमधील निष्कामेश्वर मिश्र हे केवळ शिक्षक नव्हते. मध्यम बांधा, बोलके डोळे, कोरलेल्या मिशा, विरळ होत चाललेले केस आणि तेजस्वी मुद्रा यांमुळें त्यांचा विद्यार्थ्यांवर चटकन् प्रभाव पडे.

शाळेंतल्या जेमतेम मिसरूड फुटलेल्या तरुण विद्यार्थ्यांचे तर ते आदर्श होते. प्राचीन गुरूंप्रमाणें विद्यार्थी त्यांना मानीत. विभूति, गुरु, प्रेरक, मित्र, सल्लागार, हितचिंतक, तत्त्वज्ञानी अशीं त्यांचीं किती रूपें सांगावीं? विद्यार्थ्यांचें तन, मन व धन वाढविणें हें त्यांनीं आपलें जीवितकार्य मानलें होतें. क्रमिक पुस्तकें आणि शालेय अभ्यास हें त्यांचें क्षेत्र नव्हतें. आपल्या विद्यार्थ्यांना सर्वंकष ज्ञान मिळावें यासाठीं त्यांची धडपड होती.

त्यांच्या तासाचीं मुलें उत्कंठेनें वाट पाहात. राणा प्रताप आणि शिवाजी महाराज यांनीं देशासाठीं केलेलीं साहसें, लोकमान्यांनीं एकट्यानें व धीरानें परकीय सत्तेविरुद्ध दिलेला लढा, यांचीं ते वर्णनें करूं लागले म्हणजे विद्यार्थी मंत्रमुग्ध होत. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच" ही लोकमान्यांची घोषणा ते अशा आवेशानें सांगत कीं त्या तरुण विद्यार्थ्यांच्या चित्तवृत्ति थरारून जात.

मिश्राजी चतुर होते. आपले धडे तास संपण्यापूर्वी अर्धा तास आधीं ते संपवीत. राहिलेला अर्धा तास राष्ट्रीय कथांनीं उजळून निघे. लालबहादूर शास्त्री

यांची राष्ट्रीय वृत्ति येथें अंकुरली. या शिक्षणाचा परिणाम असा झाला कीं, ब्रिटिशांशीं लढा देण्यासाठीं गांधींनीं ज्या वेळीं असहकाराची हांक दिली त्या वेळीं मिश्राजींच्या ३० विद्यार्थ्यांपैकीं ६ विद्यार्थ्यांनीं त्या हांकेला साद दिली. लालबहादूर शास्त्री, त्रिभुवन नारायण सिंग आणि अलगुराई शास्त्री हे या सहांत होते.

मिश्राजींचें अध्यापन शालेय शिक्षणापुरतेंच मर्यादित नव्हतें. वादविवाद आणि नाट्यप्रयोग यांत ते विद्यार्थ्यांना तयार करीत. ते त्यांचे स्काउटमास्तरहि होते. आपला बहुतेक वेळ ते विद्यार्थ्यांच्या सहवासांत घालवीत. त्यांचें शील आणि व्यक्तिमत्त्व साकार करण्याचें त्यांनीं कंकण बांधलें होतें.

१९२१ मध्यें महात्माजींनीं असहकाराची चळवळ पुकारली. शास्त्रींचें वय या वेळीं होतें १६ आणि ते मॅट्रिकच्या वर्गांत होते. आपल्या झंझावाती दौऱ्यांत ते बनारसला आले. कानांचे डोळे करून शास्त्रींनीं गांधींचें भाषण ऐकलें. महात्माजींच्या मागोमाग जावयाचा, त्यांचें नेतृत्व स्वीकारण्याचा निर्धार त्यांनीं तेथल्या तेथें केला.

१९१७ मध्यें चंपारण्य येथें अभूतपर्व व नेत्रदीपक चळवळ झाली तेथील निळीच्या कारखानदारांविरुद्ध मजुरांना गांधींनीं न्याय मिळवून दिला. त्यांना यश मिळालें. १९१८ सालीं गुजराथेंतील खेडा जिल्ह्यांत कायदेभंगाची चळवळ यशस्वी झाली. १९१९ सालीं रौलट ॲक्टविरुद्ध प्रचंड आंदोलन झालें यानिमित्त अमृतसर येथील जालियनवाला बागेंत भरलेल्या सभेवर क्रूर गोळीबार करण्यांत आला. ४०० लोक मृत्युमुखीं पडले व हजारांवर जखमी झाले. या घटनेनें अवघा भारत पेटला.

वणव्याच्या वेगानें राष्ट्रीय वृत्ति देशभर फोंफावूं लागली. गांधीजींची प्रतिष्ठा आणि लोकप्रियता या वेळीं शिगेस पोहोंचली होती. ब्रिटिश सरकारशीं प्रत्येक बाबतींत असहकार करावा हा त्यांचा आदेश अभूतपूर्व आणि देशव्यापी होता.

डिसेंबर १९२० मध्यें नागपूर येथें कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन भरलें. कायदेभंगाची चळवळ करावी हा गांधीजींचा ठराव या ऐतिहासिक अधिवेशनांत प्रचंड बहुमतानें संमत झाला. सरकारकडून मिळालेल्या पदव्या परत कराव्यात, सरकारशीं असहकार पुकारावा, कचेऱ्या, कोर्टें, शाळा, कॉलेजें, परकीय व्यापार यांवर बहिष्कार घालावा, कर देऊं नयेत, वस्त्रांबाबतींत स्वावलंबी

व्हावें, आणि राष्ट्रीय चळवळीसाठीं सर्वस्वाचा त्याग करावा असें या ठरावांत म्हटलें होतें.

नागपूरच्या या आदेशानुसार १९२१ मध्यें बनारस हिंदु विद्यापीठांतील राष्ट्रीय वृत्तीच्या प्राध्यापकांनीं आपल्या जागांचे राजीनामे दिले. आचार्य कृपलानी हे राजीनामा देणाऱ्यांपैकीं एक होते. या प्राध्यापकांनीं बनारस शहरांत मिरवणुका काढल्या आणि शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं बाहेर पडावें व स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घ्यावी असें आवाहन केलें. ही हांक ऐकतांच लालबहादूर शास्त्री, त्रिभुवन नारायणसिंग, अलगुराय शास्त्री आणि इतर तिघे शाळेंतून बाहेर पडून मिरवणुकींत सामील झाले.

या कृतीमुळें लालबहादुरांचें भवितव्यच अस्थिर झालें. त्यांचे चुलते व इतर नातलग यांना धक्का बसला. आईनें मान टाकली. आपला एकुलता एक मुलगा, आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ. त्यानें असें करावें? बहीण अजून लग्नाची आहे. तिची जबाबदारी आतां कोण घेणार?

लालबहादूर यांचें हें कृत्य म्हणजे केवळ बेजबाबदारपणा आहे असें मत अनेकांनीं व्यक्त केलें.

"हा मार्ग विनाशकारी आहे, तूं यांत पडूं नकोस" असा हितचिंतकांनीं सल्ला दिला. पण लालबहादुरांचा निर्णय ठरला होता. तो वज्रलेप होता. त्यांत बदल होणें आतां शक्य नव्हतें. शिवाय त्यांचें हें कृत्य अविचारीपणाचें, उतावीळपणाचें का होतें? त्यांनीं या प्रश्नाचा साधकबाधक विचार केला होता. आपण योग्य तेंच करीत आहों असा त्यांच्या मनानें कौल दिला होता.

१९२१ मध्यें एका बेकायदा ठरलेल्या सभेंत व मिरवणुकींत भाग घेतल्या-बद्दल त्यांना अटक करण्यांत आली. लालबहादूर यांच्या सरकारविरोधी लढाईची ही मुहूर्तमेढ. या वेळीं खटला अथवा शिक्षा वगैरे कांहीं प्रकार न घडतां त्यांस तसेंच सोडण्यांत आलें.

जुनी शाळा सुटली होतींच. अभ्यास चालूं करावयाचा होताच. म्हणून त्यांनीं काशी विद्यापीठांत नांव घातलें.

काशी विद्यापीठ ही संपूर्णपणें राष्ट्रीय संस्था होती. सरकारचा या संस्थेवर डोळा होता. देशांतील या स्वरूपाच्या इतर संस्थांप्रमाणेंच ही संस्थाहि राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षणतज्ज्ञांनीं स्थापन केली होती. कायदेभंगाच्या चळवळींत ज्यांनीं

भाग घेतला होता, आणि त्या चळवळींमुळें ज्यांचें शिक्षण खंडित झालें होतें, त्यांची शिक्षणाची सोय करण्यासाठीं या संस्था स्थापन झाल्या होत्या.

काशी विद्यापीठाचे प्राचार्य होते प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ. भगवानदास. आचार्य नरेंद्र देव, डॉ. संपूर्णानंद, आचार्य कृपलानी, आणि श्री. श्रीप्रकाश ही मंडळी या विद्यापीठांत प्राध्यापक म्हणून काम करीत असत. विद्यापीठांतील वातावरण निर्मळ, निर्दोष होतें. विद्यार्थ्यांना तेथें स्वातंत्र्य होतें. स्वतंत्र विचारांना वाव होता.

विद्यापीठांत वादविवाद होत. स्वातंत्र्यसंपादनाच्या कामीं योग्य साधन कोणतें ? हिंसा कीं अहिंसा ? राष्ट्राचा उत्कर्ष कशात आहे – मोठमोठ्या उद्योगधंद्यांत कीं ग्रामोद्योगांत ? असे, या वादविवादासाठीं विषय असत. या वादविवादांत लालबहादूर यांनीं मोठ्या उद्योगधंद्यांची बाजू घेतली होती ! टॉलस्टॉय, लेनिन, विवेकानंद, रामकृष्ण परमहंस यांचें वाङ्मय येथील विद्यार्थी आस्थेनें वाचीत.

काशी विद्यापीठांतील लालबहादूर शास्त्री यांचे अलगुराय शास्त्री, हरिहरनाथ शास्त्री, बाळकृष्ण केसकर, त्रिभुवन नारायण सिंग, विभूति मिश्र, राजाराम शास्त्री वगैरे काँग्रेसमधील सध्यांचे नेते हे सहाध्यायी होते. लालबहादुरांनीं काशी विद्यापीठांत चार वर्षें काढलीं. शास्त्री या पदवीसाठीं त्यांनीं तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता आणि सर्व विद्यार्थ्यांत ते पहिल्या वर्गांत आले. राजाराम शास्त्री आणि लालबहादूर शास्त्री हे दोघेच त्या वर्षी पहिल्या वर्गांत आले होते.

काशी विद्यापीठांतील वास्तव्याचा लालबहादूर यांनीं भरपूर फायदा करून घेतला. ज्ञान आणि अनुभव यांचा त्यांना तेथें साक्षात्कार घडला. पाठ्यपुस्तकें त्यांनीं वाचलीं, इतर पुस्तकांचें भरपूर आलोडन केलें, आणि शाळेंतील सर्व चळवळींमध्यें मनापासून भाग घेतला.

दारिद्र्यामुळें त्यांना घरून कॉलेजपर्यंत रोज सहासात मैल पायीं जावें लागे. वेळ आणि श्रम यांचा त्यांचेवर अतीव ताण पडे. कधीं वर्ग सकाळ–दुपार असत. दुपारीं जेवायला घरीं यावयाचें म्हणजे एकूण १६ मैलांचा फेरा पडे. सायकल विकत घेणें तर दूरच राहिलें !

काशी विद्यापीठांत लालबहादूर शास्त्री यांनीं आपल्या तत्त्वज्ञानाला स्वरूप आणलें. बाबू भगवानदास हे त्यांच्या कॉलेजचे प्राचार्य होतेच पण लालबहादूर

यांनीं तत्त्वज्ञान हा खास विषय घेतल्यानें त्यांचे साक्षात् शिक्षकहि होते. त्यांच्या शिक्षणाचा व चिंतनाचा शास्त्रींवर इष्ट आणि अनुकूल परिणाम झाला होता.

लालबहादूर म्हणतात, भगवानदासांचें व्यक्तिमत्त्व अलौकिक होतें. त्यांची सौंदर्यदृष्टि वाखाणण्याजोगी होती. त्यांचें आचरण साधें होतें, अभिरुचि आणि रुचि श्रेष्ठ होती. तत्त्वज्ञानावरचीं त्यांचीं व्याख्यानें अप्रतिम होत. त्यांचे विचार नित्य नवीन असत. त्यांत बुरसटपणा नसे.

डॉ. भगवानदास हे समन्वयवादाचे उपासक होते. कोणत्याहि बाबतींत विरोधी दृष्टिकोन समजावून घ्यावा, ढालीच्या दोन्ही बाजू पाहाव्या, समेट आणि समन्वय यांचा विचार करावा असें समन्वयवाद सांगतो. लालबहादूर हे त्या दृष्टीनें समन्वयवादी आहेत. विरोधी मतप्रणालींत ते खुषीनें समेट घडवून आणवतात. विद्यार्थिदशेंत आत्मसात् केलेला समन्वयवाद त्यांना सदैव उपयोगी पडतो.

आपल्या व्यक्तिगत अथवा राजकीय आयुष्यांत एकांतिक मतें न बाळगणारा कोणी दाखवा असें म्हटलें तर लालबहादूर शास्त्री यांचेंच नांव चटकन डोळ्यां-समोर येईल. अहिंसा हें त्यांच्या जीवनाचें तत्वज्ञान झालें आहे. कोणत्याहि वादाच्या ते पलीकडे आहेत. तो त्यांचा स्वभावच झाला आहे. मग तो वाद कॉंग्रेसमधील तत्त्वाचा असो कीं एखाद्या घटनेसंबंधींचा असो.

राजकारणाचीं लक्तरें जेथें धुतलीं जातात त्यांच्यापासून ते दूर राहतात. राजकारणी उचापतींपासून ते अलिप्त असतात.

या त्यांच्या स्वभावधर्माचा भारताचे पंतप्रधान व कॉंग्रेसपक्षाचा नेता म्हणून काम करतांना त्यांना उपयोग होतो. त्यांचा निःपक्षपातीपणा आणि त्यांचा कणखरपणा आज सर्वमान्य झाला आहे याचेंहि कारण हेंच होय.

१९२६ मध्यें काशी विद्यापीठांतील शास्त्रींचा अभ्यासक्रम पार पडला. लगेच पीपल्स ऑफ द सर्व्हंट्स सोसायटी या संस्थेचे ते आजीव सेवक झाले. या संस्थेचें सदस्यत्व मिळणें सोपें नव्हतें, पण लाला लजपतराय यांनीं या तरुणाची चिकाटी, लोकसेवेची वाटत असलेली कळकळ ओळखली होती. म्हणून त्यांनीं या संस्थेंत लालबहादूर यांना बोलावून घेतलें.

ही संस्था लालाजींनींच १९२१ मध्यें स्थापन केली होती. महात्माजींनीं

तिचें उद्घाटन केलें होतें. राष्ट्रीय कार्यासाठीं मिशनरी वृत्तीचे सेवक तयार करणें हा या संस्थेचा मुख्य हेतु होता. देशाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याचें कार्य ही संस्था करणार होती.

या संस्थेच्या प्रत्येक सभासदानें वीस वर्षें तरी सेवा केली पाहिजे, आणि त्याचें वैयक्तिक आयुष्य निष्कलंक असलें पाहिजे अशी अट होती. दारिद्र्य आणि साधेपणा हे त्याचे सांगाती व्हावयाचे होते. आणि यासाठीं सुरुवातीला दरमहा साठ व शेवटीं रुपये शंभर याप्रमाणें या सेवकांना जीवनवेतन मिळावयाचें होतें. देशाचा विचार सर्वप्रथम मनांत बाळगावयाचा, स्वार्थाचा लवलेशहि बाळगावयाचा नाहीं, अशी या सेवकांना सांगी होती.

उमेदवारांनीं मिळेल तें काम करणें आवश्यक होतें. तसेंच सुरुवातीचीं दहा वर्षें कायदेमंडळाच्या निवडणुकांसाठीं उभें राहण्यास त्यांस मनाई होती.

लालबहादूर शास्त्री या संस्थेंत दाखल झाल्याबरोबर त्यांची मुजफरनगर येथें नेमणूक करण्यांत आली. त्यांच्या आधीं संस्थेंत दाखल झालेले श्री. अलगुराई शास्त्री यांच्या हाताखालीं हरिजनउद्धाराचें काम त्यांना देण्यांत आलें. उमेदवारीची मुदत संपल्यानंतर संस्थेचे ते पक्के सभासद झाले व अलाहाबाद येथें बाबू पुरुषोत्तमदास टंडन यांच्या हाताखालीं ते काम करूं लागले.

शास्त्रीजी या प्रसंगाला उद्देशून म्हणतात, "या संस्थेचा सभासद झाल्यामुळेंच देशाची सर्वांगीण सेवा करण्याची मला संधि मिळाली. आमच्या संस्थेचें नांवच लोकसेवक समाज असें आहे. या नामाभिधानाचा खरा अर्थ या संस्थेनें मला शिकविला."

या संस्थेचे लालबहादूर शास्त्री सध्यां अध्यक्ष आहेत. बाबू पुरुषोत्तमदास टंडन यांच्या निधनानंतर अध्यक्षपदीं शास्त्री आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष लाला लजपतराय होते. त्यांच्यानंतर टंडनजी अध्यक्ष झाले.

१९२७ सालीं मिर्झापूरच्या ललितादेवींशीं लालबहादूर यांचा विवाह झाला. कांहीं वार खादी व एक चरखा एवढा हुंडा त्यांना मिळाला. लालबहादूर शास्त्रींचे सासरे हवा तेवढा हुंडा देण्यास तयार होते. पण या हुंड्याचा आग्रह लालबहादूर यांनींच धरला.

रावी नदीच्या तीरावर १९२९ मध्यें भरलेल्या कॉंग्रेसचे अध्यक्ष पंडित

जवाहरलाल होते. त्यांच्या हस्तें स्वातंत्र्यध्वज उभारण्यांत आला. या प्रसंगाची संस्मरणीय आठवण लालबहादूर अजून सांगतात. त्या वेळीं त्यांचें वय अवघें २५ वर्षांचें होतें. पण तो प्रसंग, त्या क्षणाचा तो अभूतपूर्व आनंद आणि त्यामुळें देशांत उसळलेली देशप्रेमाची लाट यांचें चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर अजून ताजें आहे.

त्यानंतर एक वर्षांतच म्हणजे १९३० सालीं कायदेभंगाची मोहीम सुरू झाली. २६ जानेवारी १९३० रोजीं संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घेण्यांत आली. तिचें अनुकरण देशभर झालें. हा ठराव असा होता—

> "कोणत्याहि सत्तेपुढें यानंतर मान झुकविणें हा मानवाच्या आणि परमेश्वराच्या दारीं गुन्हा आहे असें आमचें ठाम मत आहे. पारतंत्र्या-मुळें आमच्या राजकीय, सांस्कृतिक व आध्यात्मिक भावनांना धक्का बसला आहे. अहिंसावादावरची आमची श्रद्धा अढळ आहे. म्हणून हें ध्येय साध्य करण्यासाठीं ब्रिटिश सरकारशीं सर्व बाबतींत असहकार करण्याची, सरकारला करहि न देण्याची आम्ही आज शपथ घेत आहों."

महात्माजींनीं आपल्या नेहमींच्या रिवाजानुसार आपण काय करणार आहों याची व्हाइसरॉयला पूर्वसूचना दिली व १२ मार्च १९३० रोजीं कायदेभंगाची चळवळ सुरू केली. प्रसिद्ध दांडीयात्रा व मिठाचा सत्याग्रह याच दिवशीं त्यांनीं केला. विजेची कोठेंतरी ठिणगी उडावी आणि सर्वत्र भडका उडावा असें यानें साधलें. सर्व देशभर वणवा पेटला.

लालबहादूर यांनीं या चळवळीचें अलाहाबाद येथील नेतृत्व स्वीकारलें. तेथील जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे ते या वेळीं चिटणीस होते. सत्याग्रहाच्या कार्यक्रमाला पंडित मोतीलाल नेहरू यांची संमति मिळविणें हें कठीण काम या वेळीं कार्यकर्त्यांना करावयाचें होतें. कायदेभंगाची चळवळ करणें कितपत हितावह आहे आणि अशा प्रकारचा क्रांतिकारक कार्यक्रम हातीं घ्यावा कीं नाहीं याबद्दल मोतीलालजी साशंक होते. पण अखेर तरुण पिढीनें बाजी जिंकली. भीष्माचार्यांची संमति मिळाली.

सरकारनेंहि आपल्या बाजूनें जोराची तयारी केली. या चळवळीचें उग्र स्वरूप सरकारच्या ध्यानीं आलें होतें. या मोहिमेचा लालबहादूर यांनीं नारळ

फोडला तो अलाहाबादजवळच्या एका खेड्यांत. सरकारला सारा देऊं नये असें या भाषणांत त्यांनीं सांगितलें. त्यांना लगेच अटक करण्यांत आली आणि अडीच वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली.

यानंतर १९४५ पर्यंत एक पाऊल तुरुंगांत तर दुसरें पाऊल बाहेर असें लालबहादूर यांचें आयुष्य झालें होतें. १९३२, १९३४, १९४१, १९४२! सात वेळां त्यांना शिक्षा झाल्या आणि नऊ वर्षे त्यांनीं तुरुंगांत काढलीं.

काशी विद्यापीठांत लालबहादूर यांनीं अभ्यास केला खरा. पण त्याहिपेक्षां अधिक काळ ब्रिटिशांचा तुरुंग हें त्यांचें एक मोठें विद्यापीठ झालें होतें. त्यांचेंच नव्हे अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांचें तें अध्ययन केंद्र झालें होतें. या विद्यापीठाचें लालबहादूर यांनीं केलेलें हें वर्णन पाहा : " राजकीय चळवळींत पदार्पण केल्यानंतर प्रत्येक वेळीं मला तुरुंगवास घडला. पण अनेक दृष्टींनीं त्याचा मला फायदा झाला. तुरुंगांत माझें कितीतरी वाचन झालें ! "

तुरुंगांत असतांना त्यांनीं, कांट, हेगेल, हॅराल्ड लास्की, बरट्रांड रसेल आणि आलडस् हक्सले यांचे ग्रंथ वाचले. मार्क्स व लेनिन यांचीं पुस्तकें वाचून कम्युनिस्ट विचारांचा त्यांनीं परिचय करून घेतला. मॅडम क्यूरी यांच्या चरित्राचा त्यांनीं तुरुंगवासांतच हिंदी अनुवाद केला. १९४२ च्या ' चलेजाव ' चळवळीवर लिहावयाच्या पुस्तकाचा ३०० पृष्ठांचा हस्तलिखित भाग त्यांच्या-जवळ अजून पडून आहे. वेळ मिळतांच तो पुरा करण्याचा त्यांचा संकल्प आहे!

तुरुंगवासांत लालबहादूर हे एक आदर्श बंदी म्हणून मानले जात. त्यांची वर्तणूक चांगली असे. शिस्त आणि नेटकेपणा यांचें त्यांना बाळकडूच होतें. सत्याग्रहाच्या निमित्तानें अनेक लोक तुरुंगांत आले. त्यांच्या आपापसांत कुरबुरी, तंटेबखेडे चालत. पण लालबहादूर यांचा असल्या लोकांवर विलक्षण दरारा असे. आपलें व्यक्तिमत्त्व आणि लोकांना आपलेसें करण्याची कला यांनीं इतर कैद्यांचीं मनें लालबहादुरांनीं जिंकून घेतलीं. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं लढत असतां किरकोळ हेवेदावे, मत्सर सोडून द्यावेत, वाचन करावें, खेळ खेळावेत, आणि तुरुंगांतील आपलें आयुष्य, सुखानें, समाधानानें आणि शांततेनें घालवावें असें इतर कैद्यांना ते पटवून देत.

कित्येक राजकीय बंदी विड्या, अन्न असल्या वस्तूंसाठीं जेल अधिकाऱ्यांची याचना करीत. लालबहादूर यांनीं स्वतः कसल्याच वस्तूची कधींहि याचना केली

नाहीं. आपल्या सहकाऱ्यांबरोबर जें मिळेल त्यांतच त्यांनीं समाधान मानलं. दोन कैद्यांना मिळून एक दिवा मिळे. त्यामुळें पाळीपाळीनें प्रत्येकाला दिवा वापरावा लागे. आपल्या सहकाऱ्याला अधिक वेळ वाचन करतां यावें म्हणून लालबहादूर यानीं स्वसंतोषानें दिव्यावरचा आपला हक्क सोडून दिला. त्यागाची आणि भ्रातृभावाची केवढी ही तयारी !

एरंडेल तेलांत कापडाची चिंधी बुडवायची. तिची वात करून ती पेटविली कीं लालबहादूर यांचा दिवा तयार होई. आपलें रात्रींचें वाचन या दिव्याच्या साहाय्यानें ते करीत. टॉलस्टॉय यांची ॲना कॅरेनिना ही कादंबरी असल्या दिव्याच्या उजेडांत रात्रभर त्यांनीं वाचून काढली. कोठडीवरील पहारेकरी मधून मधून ओरडे तेवढाच काय तो व्यत्यय ! त्यांचा तुरुंगांतील जीवनक्रम आंखीव आणि रेखीव होता. झोंप, जेवण, अभ्यास, प्रार्थना आणि व्यायाम यांच्या वेळा ते चुकवीत नसत. त्यांच्याबरोबरच्या तरुण कैद्यांना लालबहादूर यांच्या नियमबद्धतेचें कौतुक वाटे, पण तो जीवनक्रम आचरणांत आणणें त्यांना शक्य होत नसे.

अलाहाबाद तुरुंगांत बॅडमिंटन खेळण्याची सोय होती. पंडित नेहरूसुद्धां या खेळांत सामील होत. एकदां लालबहादूर व एक अँग्लोइंडियन कैदी विरुद्ध नेहरू आणि जेलर यांत बॅटमिंटनचा सामना झाला. लालबहादुरांनीं हा सामना सहज जिंकला. बॅटमिंटनबरोबरच व्हॉली बॉलचीहि तेथें सोय करण्यांत आली होती. या दोन्ही खेळांत लालबहादुरांनीं चांगलें प्रावीण्य मिळविलें होतें.

नैनीच्या तुरुंगांतील एका यात्रेच्या वेळीं लालबहादूर यांना आपली मुलगी अत्यवस्थ आहे अशी बातमी मिळाली. लालबहादुरांना आपल्या मुलीच्या भेटीस जाण्याची सशर्त परवानगी मिळूं शकत होती. आपल्या या तात्पुरत्या मुक्ततेच्या काळांत आपण काँग्रेसच्या कोणत्याहि चळवळींत भाग घेणार नाहीं असें लेखी हमीपत्र लालबहादूर यांनीं दिलें तरच ही सुटका होणार होती. या काळांत चळवळीशीं संबंध ठेवण्याची लालबहादूर यांची तिळमात्र इच्छा नव्हती. पण तसें लेखी आश्वासन देणें त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला पटत नव्हतें.

जेलरला लालबहादुरांचा बाणा माहीत असल्यानें अखेर लेखी हमीपत्र न घेतां पंधरा दिवसांच्या मुदतीसाठीं त्यांना तुरुंगांतून बाहेर जाण्याची परवानगी देण्यांत आली. हें सर्व घडून येण्यांत अर्थातच कालापव्यय झाला आणि ज्या

दिवशीं लालबहादूर घरीं पोहोंचले, त्याच दिवशीं त्यांच्या कन्येचें देहावसान झालें. लालबहादूर यांनीं कन्येचे अंत्यसंस्कार केले, आणि मुदत संपण्याची वाट न पाहतां ते तडक तुरुंगाकडे परतले.

पुढील वर्षीच त्यांचा चार वर्षांचा मुलगा विषमज्वरानें आजारी पडला. शास्त्री तुरुंगांतच होते. मुलाचा ताप १०४ अंशांपर्यंत गेला. या वेळीं मात्र कसलीहि आडकाठी न येतां अथवा लेखी हमीपत्र न द्यावें लागतां लालबहादुरांची एक आठवड्यासाठीं मुक्तता करण्यांत आली.

पण ही मुदत संपण्याच्या सुमारासच मुलाची प्रकृति अधिक बिघडली. रजेची मुदत वाढविण्याच्या वेळीं तुरुंगाधिकाऱ्यांनीं लेखी हमीपत्राचा आग्रह धरला. या सूचनेस लालबहादुरांनीं तत्काळ व स्पष्ट नकार दिला.

लालबहादुरांची तुरुंगांत परत जाण्याची वेळ आली. मुलाचा ताप १०५-१०६ अंशापर्यंत वाढला. आपले डोळे मुलाकडे लावून लालबहादूर कितीतरी वेळ उभे होते.

मुलगा कसाबसा म्हणत होता, "बाबा, जाऊं नका ना." लालबहादुरांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. पण त्यांनीं आपलें मन घट्ट केलें. जणूं स्वप्नांतून जागे झाल्याप्रमाणें ते तडक उठले, आणि सर्वांचा निरोप घेऊन, मुलाकडे पाठ फिरवून त्यांनीं तुरुंगाची वाट धरली.

या वेळीं लालबहादुरांच्या घरांत अठरा विश्वें दारिद्य होतें. अन्नाची भ्रांत होती. औषधांना पैसे नसल्यामुळें उपचारांच्या अभावीं मुलीला मृत्यु आला होता.

१९६४ च्या ऑगस्टची गोष्ट. भारत सरकारच्या सचिवांच्या सभेंत लालबहादूर बोलत होते. ते म्हणाले, "दारिद्याचे चटके कसे बसतात हें मला माहीत आहे. दरमहा अडीच रुपयांवर माझ्या कुटुंबाचा मला गुजारा करावा लागला आहे. म्हणूनच मी ज्या वेळीं भारत सरकारचा मंत्री झालों, अलिशान बंगल्यांत राहूं लागलों, त्या वेळीं अधिकाराच्या आणि वैभवाच्या मोहाला बळी न पडतां माझें पूर्वीचेंच साधें जीवन जगण्याचा मीं निश्चय केला."

१९३५ चा सुधारणा कायदा पास झाला आणि १९३७ मध्यें निवडणुका झाल्या. कॉंग्रेसनें या निवडणुका हिरीरीनें लढवल्या आणि सर्वत्र बहुमत मिळविलें. कॉंग्रेसची मंत्रिमंडळेंहि स्थापन झालीं पण १९३९ च्या सप्टेंबरमध्यें

दुसरें महायुद्ध सुरू झालें. कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. अडीच वर्षें गादीवर बसल्यानंतर कॉंग्रेस पुन्हा बाहेर पडली. ब्रिटिश सरकार व कॉंग्रेस यांच्यांतील संघर्ष पुन्हा सुरू झाले.

कॉंग्रेसपुढें पेंचप्रसंग उभा राहिला. नाझीशाही आणि फॅसिझम यांना विरोध करण्याच्या बाबतींत कॉंग्रेस व ब्रिटिश सरकार यांचें मतैक्य होतें. कॉंग्रेसनें हुकूमशाहीचा अनेक वेळां उघडपणें धिक्कार केला होता. पण हें युद्ध जगांतील लोकशाही व स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं ब्रिटन व दोस्त राष्ट्रें लढवीत आहेत हें ब्रिटिश सरकारचें म्हणणें कॉंग्रेसला मान्य नव्हतें. कारण भारताला मुक्त करण्याचा ब्रिटिश सरकार उच्चारहि करीत नव्हतें.

१९४० ऑक्टोबरपर्यंत हे मतभेद चिघळत गेले. त्या वेळीं विनोबा भावे यांनीं वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. त्यांना ताबडतोब अटक करण्यांत आली. जवाहरलालजींना तर सत्याग्रह करण्याच्या आधींच तुरुंगांत टाकण्यांत आलें. पण अनेकांनीं वैयक्तिक सत्याग्रह पुकारले. अशा वेळीं लालबहादूर मागें कसे राहतील? त्यांनीं सत्याग्रह केला. त्यांस अटक झाली. एक वर्षाची शिक्षा भोगण्यासाठीं ते पुन्हा तुरुंगांत गेले.

ब्रिटिश सरकारच्या युद्ध प्रयत्नांना मनुष्यबळ आणि द्रव्यबळ पुरविणें चूक आहे, अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करून ह्या युद्धाला विरोध करणें हेंच आपलें कर्तव्य आहे, अशा घोषणा सत्याग्रही या वेळीं करीत.

युद्ध संपण्याच्या वेळीं वर्किंग कमिटीचे ११ सभासद, अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे १७६ सदस्य, २९ माजी मंत्री, आणि भारतीय व प्रादेशिक कायदेमंडळांचे ४०० सभासद तुरुंगांत होते. या सत्याग्रहाच्या चार अवस्था होत्या. शेवटच्या अवस्थेंत तर कॉंग्रेसमधील लहानथोर लोक सत्याग्रहांत सामील झाले. त्यावर्षी २०,००० सत्याग्रह्यांना अटक झाली आणि त्यांपैकीं १४००० सत्याग्रही तुरुगांत धाडण्यांत आले.

७ ऑगस्ट १९४२. मुंबईला अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक भरली होती. वातावरण तंग होतें. बराच काळपर्यंत वाटाघाटी झाल्या. ८ ऑगस्ट रोजीं 'भारत छोडो'चा क्रांतिकारक ठराव मंजूर झाला. लक्ष्मणरेषा ओलांडली गेली होती. 'कर्तव्य करा अगर मरा' ही गांधीजींनीं राष्ट्राला नवी घोषणा दिली.

या ठरावामुळें स्वातंत्र्याच्या मागणीला अधिकच धार चढली. जनतेच्या अपेक्षा शिगेला पोहोंचल्या. हुकूमशाहीशीं लढणें, लोकशाही व स्वातंत्र्य अबाधित ठेवणें या दोस्त राष्ट्रांच्या ज्या आकांक्षा होत्या, त्या आकांक्षांच्या पार्श्वभूमीवर ४२ च्या चळवळीचें तेज अधिकच झळकूं लागलें.

हा ठराव असा होता—

"भारतांतील ब्रिटिशांचें राज्य संपुष्टांत येणें ही तांतडीची व महत्त्वाची गोष्ट आहे. हें होण्यावर युद्धाचें भवितव्य आणि लोकशाही व स्वातंत्र्य ह्या गोष्टी अवलंबून आहेत. साम्राज्यवाद, नाझीशाही आणि हुकूमशाही यांविरुद्ध भारत सर्वतोपरी साहाय्य देईल, आक्रमणांस विरोध करील— पण भारत स्वतंत्र होईल त्या वेळींच. भारताला स्वातंत्र्य मिळालें तर युद्धाचें भवितव्य खात्रीनें पालटेल. एवढेंच नव्हे तर परतंत्र व त्रस्त अशी जगांतील सर्व जनता संयुक्त राष्ट्रांच्या झेंड्याखालीं गोळा होईल. या दलित राष्ट्रांना भारत जगाचें नेतृत्वहि देईल. भारत परतंत्र राहणें याचाच अर्थ साम्राज्यशाही अजून कायम आहे. साम्राज्यवादाचा हा कलंक दोस्त राष्ट्रांना सदैव घातक ठरणारा आहे, म्हणून स्वतंत्र व मुक्त होण्याचा आपला हक्क शाबीत करण्यासाठीं भारतानें सार्वत्रिक सत्याग्रह पुकारण्याचें ठरविलें आहे. हा सत्याग्रह अहिंसात्मक असेल आणि तो शक्य तितका सर्वव्यापी करण्याचे प्रयत्न करण्यांत येतील."

९ ऑगस्ट १९४२ रोजीं पहाटे ४ वाजतां मुंबईचे पोलीस कमिशनर बिर्ला हाउसवर हजर झाले. त्यांनीं महात्माजींना अटक केली. त्याच वेळीं वर्किंग कमिटीचे सर्व सभासद व प्रमुख काँग्रेस कार्यकर्ते यांचीहि धरपकड करण्यांत आली. बोरीबंदरवर उभ्या असलेल्या एका खास आगगाडींत या सर्वांना बसविण्यांत आलें. चिंचवड येथें ही गाडी थांबविण्यांत आली. गांधीजींना आगाखान पॅलेसमध्यें ठेवण्यांत आलें. आणि बाकीच्यांना लॉऱ्यांतून येरवडा तुरुंगाकडे रवाना करण्यांत आलें.

या धरपकडींतून सुटलेले काँग्रेस कार्यकर्ते आपापल्या गांवीं निघाले. गांवाला पोहोंचण्यापूर्वींच आपल्याला अटक होणार हें त्यांना दिसत होतें.

कांहींजण ताबडतोब भूमिगत झाले आणि त्यांनीं गनिमी काव्याचा लढा सुरू केला. हा लढा अर्थातच अहिंसक होता. दळणवळण तोडणें, मोक्याच्या

जागा उडविणें हे कार्यक्रम सुरू झाले.

गांधीजी आणि इतर पुढारी यांच्या अटकेची बातमी वाऱ्याप्रमाणें सर्वत्र पसरली. लोकक्षोभ उसळला, देशभर खळबळ माजली. सरकारनें कठोर दडपशाहीचा अवलंब केला. कॉंग्रेसचाहि आम्ही कांटा काढूं शकतों हें सरकारला दाखवावयाचें होतें.

हाउस ऑफ कॉमन्समध्यें पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनीं भाषण करून "भारतांतील आमच्या सरकारनें ही चळवळ मोडून काढली" अशी प्रौढी मिरविली. त्याच्या या बोलण्याला विषारी धार होती. ते पुढें म्हणाले— "मला याबाबत एक निःसंदिग्ध खुलासा करावयाचा आहे. आमचें भारतांतील आधिपत्य आम्हांला कायम ठेवावयाचें आहे. याबद्दल कोणाच्याहि मनांत कसलाहि संदेह राहूं नये. ब्रिटिश साम्राज्याचें दिवाळें काढण्यासाठीं इंग्लंडचा पंतप्रधान मी झालेलों नाहीं."

मुंबईचें अधिवेशन संपल्यावर लालबहादूर आणि त्यांचे सहकारी अलाहाबादकडे निघाले. पोलिसांच्या हातीं सांपडूं नये म्हणून अलाहाबादच्या अलीकडे असलेल्या नैनी स्टेशनवर लालबहादूर गुपचुपपणें उतरले. प्लॅटफॉर्मवरील मोठ्या दरवाजांतून बाहेर पडण्याऐवजीं ते मागल्या बाजूनें रेल्वेरूळ ओलांडून बाहेर पडले. आणि लगेच भूमिगत झाले. या वेळीं अलाहाबाद येथील पंडित नेहरूंच्या निवासस्थानीं आनंदभुवनच्या वरच्या मजल्यावर त्यांचा मुक्काम असे. एक छापखाना त्यांनीं येथें आणला होता, त्यांतून दररोज हजारों पत्रकें छापून वाटण्यांत येत. भूमिगत कार्यकर्त्यांसाठीं या पत्रकांत सूचना असत आणि भावी कार्यासाठीं आदेश दिले जात.

पण एके दिवशीं आनंदभुवनवर पोलिसांची धाड आली. विजयालक्ष्मी पंडित त्या वेळीं तेथें होत्या. त्यांना अटक करावयाची आणि आनंदभुवनची झडती घ्यावयाची असा पोलिसांना हुकूम होता. पोलीस आल्याची बातमी विजयालक्ष्मींनीं हलकेंच वर कळविली; पोलिसांशीं गप्पा मारण्यांत बराच वेळ घालविला, आणि सावकाशपणें पोलिसांबरोबर जाण्यास त्या तयार झाल्या.

पोलिसांनीं फक्त तळमजला शोधला, वरच्या मजल्याची झडती घेण्याचें त्यांना सुचलें नाहीं आणि विजयालक्ष्मींच्या अटकेवर ते संतुष्ट झाले. हा केवळ दैवयोग होय.

विजयालक्ष्मींकडून सूचना येतांच लालबहादूर लगेच कामाला लागले. शिल्लक असलेल्या पत्रकांचीं चिठोरीं करून त्यांनीं तीं चिठोरीं संडासांत टाकलीं. कारण या पत्रकांतच महत्त्वाचा मजकूर होता. हे कपटे इतके होते कीं त्यांनीं शौचकूप तुंबून बसला. दुसऱ्या दिवशीं गवंडी बोलावून शौचकूप उकरून मोकळा करावा लागला. वेळ मात्र निभावून गेली. लालबहादूर यांनीं आपलें काम चोखपणें बजावलें होतें !

आनंदभुवनमध्यें राहणें धोक्याचें आहे असें आढळून येतांच लालबहादुरांनीं आपलें वास्तव्य केशवदेव मालवीय यांच्या घरीं हलविलें. स्वतः मालवीय दुसरीकडे राहात होते. त्यांचें ठिकाण अज्ञात होतें. आजूबाजूच्या खेड्यांतून हिंडणें, तेथील भूमिगत कार्यकर्त्यांना दिलासा देणें, त्यांना सूचना देणें हें काम मालवीय करीत. पण एके दिवशीं त्यांनीं प्रकटपणें कायदेभंग करण्याचें ठरविलें. अलाहाबादमध्यें एका टांग्याच्या पायरीवर उभे राहून त्यांनीं घोषणा करण्यास सुरुवात केली. त्यांना लगेच पोलिसांनीं अटक केली आणि तुरुंगाकडे त्यांची रवानगी करण्यांत आली.

९

# क्षितिज विस्तारलें

जवाहरलाल नेहरू हें लालबहादुरांचें दैवत होतें. नेहरूंचेंहि लालबहादुरांवर सुरुवातीपासूनच लक्ष होतें. लालबहादूर अलाहाबादला आल्यापासूनच ! तेथील राजकारणांत जवाहरलालांच्या सूचनेवरूनच लालबहादुरांचा प्रवेश झाला. तेथपासून लालबहादुरांच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. यशाच्या पायऱ्या चढत चढत पंतप्रधान झाल्यानंतर १९६४ मध्यें त्यांच्या कार्याच्या यशोमंदिरा-वर जणूं कळस चढला आहे.

जवाहरलाल यांचें ऋण शास्त्रीजी मोकळेपणानें मान्य करतात. "जवाहरलाल यांनीं आपणांस भरपूर वाव दिला. त्यांच्यामुळें १९३० मध्यें मीं अलाहाबाद शहर व जिल्हा कॉंग्रेसचा अनुक्रमें चिटणीस व अध्यक्ष झालों" असें सांगतांना अजून त्यांचा कंठ दाटून येतो. जवाहरलाल उत्तर प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाल्याबरोबर त्यांनीं सरचिटणिसाच्या जागेवर नेमणूक केली ती लालबहादूर यांचीच. १९५१ मध्यें पंडितजी कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले त्या वेळीं सरचिटणीस म्हणून लालबहादूर शास्त्री यांनाच त्यांनीं मागून घेतलें. लालबहादूर शास्त्री यांच्यावर कोणतेंहि काम सोंपविलें कीं निष्ठेनें तें काम ते पुरें करतील असा नेहरूंना विश्वास होता.

उत्तर प्रांतांत लालबहादूर यांचा लौकिक दिवसेंदिवस वाढत होता. तुरुंग-यात्रा करणें, पोलिसांच्या लाठ्या खाणें, त्याग-कष्ट अस्थिरता यांना ते कधींच

भीक घालीत नसत. तें त्यांच्या अंगवळणीं पडलें होतें. ते अहिंसावादी होते खरे, पण त्यांचें साहस प्रचंड होतें, अंगीकृत कार्याला ते पुरेपूर वाहून घेत असत. फलाची त्यांनीं अपेक्षा केली नाहीं कीं शिव्याशापांची त्यांनीं कदर बाळगली नाहीं. महात्मा गांधींनीं सांगितलेल्या आदर्श सत्याग्रहीचें प्रतीक म्हणजे लालबहादूर शास्त्री.

पण केवळ एक कार्यकर्ता एवढ्यापुरताच लालबहादुरांचा लौकिक नव्हता. त्यांचें कर्तृत्व अमाप होतें; ते कुशल संघटक होते. हातीं घेतलेलें काम यशस्वी करण्याबद्दल त्यांची ख्याति होती. प्रत्येक प्रश्नाचा साधकबाधक विचार करणें, तो प्रश्न इतरांना पटवून देणें; यामुळें एक कुशल सभासंचालक अशी त्यांना मान्यता मिळूं लागली. सौजन्य आणि निरपेक्षपणा यांच्या साहाय्यानें ते केव्हांहि सभा जिंकीत.

त्यांच्या संघटनकौशल्याची कसोटी लागली ते अलाहाबाद नगरपालिकेच्या निवडणुकीस उभे राहिले त्या वेळीं. ते निवडून तर आलेच, पण सतत ७ वर्षे. अलाहाबाद सुधार समितीचेहि ते चार वर्षे सभासद होते. विजयालक्ष्मी पंडित आणि त्यांचे पति कै. रणजित पंडित हे त्यांचे नगरपालिकेंतील सहकारी.

या निमित्तानें नेहरू कुटुंबाशीं लालबहादूर यांचा घनिष्ठ संबंध आला. मोतीलालांकडे शास्त्री पित्याच्या भावनेनें पाहात. जवाहरलालांना ते अत्यंत प्रिय वाटत.

१९३६ मध्यें लालबहादूर यांनीं अलाहाबादहून लखनौकडे स्थलांतर केलें. कारण त्यांच्या कार्याला लखनौ येथें अधिक वाव होता. त्याच सालीं प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका झाल्या. अलाहाबाद मतदारसंघातर्फे लालबहादूर व विजयालक्ष्मी निवडून आले. इंदिराबाई या वेळीं लहान होत्या. बाहुल्यांशीं खेळण्याचें त्यांचें वय होतें. पण नेहरू घराण्यांतच देशप्रेमाच्या चळवळीचें बाळकडू जन्मतःच मिळे. मग इंदिराबाईच्या बाहुल्यासुद्धां लाठीधारी पोलिसांपुढें सत्याग्रह करूं लागल्या तर त्यांत आश्चर्य तें कसलें ? उत्तर प्रदेश कॉंग्रेसमय झाला याचें सारें श्रेय जवाहरलाल नेहरू, पुरुषोत्तमदास टंडन व लालबहादूर शास्त्री यांजकडे जातें.

संयुक्त प्रांतांतील शेतजमिनींची पाहणी करण्यासाठीं १९३३ मध्यें तेथील कॉंग्रेसनें एक समिति नेमली. आतांपर्यंत येथें जमीनदारांचें प्रस्थ पुष्कळच

बोकाळलें होतें. या समितीचे निमंत्रक म्हणून लालबहादूर यांची योजना करण्यांत आली. हातीं घेतलेलें काम तडीस नेणें हें लालबहादूर यांचे ब्रीद !

रात्रींच्या रात्री जागून या प्रश्नासंबंधींचें सर्व उपलब्ध वाङ्मय त्यांनीं वाचून काढलें. कादगपत्रें तपासलीं. त्यांनीं या समितीतर्फे जो अहवाल सादर केला त्यामुळें कॉंग्रेस पुढारीच नव्हे तर सरकारी अधिकारीहि आश्चर्यचकित झाले. लालबहादूर यांच्या कर्तबगारीचा एक नवा पैलू या निमित्तानें दिसला.

हा अहवाल इतका परिपूर्ण व उपयुक्त होता कीं १९३७ मध्यें संयुक्त प्रातांत ज्या वेळीं कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केलें, त्या वेळीं या अहवालाच्या आधारें जमिनीसंबंधीं कायदा करण्यांत आला.

दोन अडीच वर्षांतच म्हणजे १९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झालें आणि कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. २॥ वर्षांच्या अल्पमुदतींत कायदे-मंडळांत लालबहादूर शास्त्री आपली चमक ती काय दाखविणार ? पण आपलें काम करायला कायदेमंडळें हीच शास्त्रींना जागा नव्हती. कधीं भूमिगत राहून तर कधीं उघडपणानें लालबहादूर यांचें कार्य चालूंच होतें.

लालबहादूर यांचे गुण लक्षांत घेऊन, त्यांना वाव देण्याचें श्रेय पंडित गोविंद वल्लभपंत यांचेकडेहि जातें. पंतजींनीं व्यक्त केलेल्या या तरुणाबद्दलच्या अपेक्षा आणि टाकलेल्या जबाबदाऱ्या शास्त्रीजींनीं निष्फळ होऊं दिल्या नाहींत.

१९४६ मध्यें दुसरें महायुद्ध संपलें. पुन्हा निवडणुकांची वेळ आली. या निवडणुका लढविणें व जिंकणें कॉंग्रेसनें पत्करलें. संयुक्त प्रांतांतील कॉंग्रेस उमेदवार नियुक्त करण्यासाठीं जी समिति नेमण्यांत आली होती तिचें चिटणीसपद लालबहादूर यांजकडे देण्यांत आलें. उमेदवार निवडणें व निवडणुका जिंकणें हें काम लालबहादुरांकडे आलें.

या निवडणुकांच्या निमित्तानें शास्त्रीजींचें संघटनाकौशल्य, निवडणुकीच्या तंत्राचें त्यांचें ज्ञान व माहितीचा त्यांचेजवळील सांठा याची सर्वांस कल्पना आली.

निवडणुकीच्या काळांत शास्त्रींचा मुक्काम कायम कॉंग्रेसच्या कचेरींत असे. जेवण व मिळाल्यास झोंप तेथेंच होई. कॉंग्रेस उमेदवार व कार्यकर्ते यांना शास्त्रीजींची टेलिफोनवर अथवा समक्ष भेट केव्हांहि घेतां येई. साहजिकच या निवडणुकींत कॉंग्रेसला घवघवीत विजय मिळाला. मुस्लिम लीगच्या पदरांत केवळ

एकदोनच जागा पडल्या.

पंडित गोविंद वल्लभपंत हे खरे मुत्सद्दी होते. ते संयुक्त प्रांताचे मुख्य मंत्री झाले. आपल्याला राज्यकारभार यशस्वी करावयाचा असेल तर होतकरू तरुणांना हाताशीं घेऊन, त्यांना शिकवून तयार केलें पाहिजे हें त्यांनीं ओळखलें होतें. या संदर्भात लालबहादूर शास्त्री यांचें नांव सुचविण्यांत आलें. पंतजींना शास्त्रींची फारशी माहिती नव्हती. पण त्यांचा लौकिक त्यांनीं ऐकला होता. संयुक्त प्रांत कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस म्हणून शास्त्रींनीं केलेलें काम पंतजींच्या डोळ्यांसमोर होतेंच. म्हणून त्यांनीं आपले पार्लमेन्टरी सेक्रेटरी म्हणून शास्त्रींची नेमणूक केली. त्यांच्याबरोबर चंद्रभान गुप्ता, केशवदेव मालवीय व जे. पी. रावत यांचीहि पार्लमेन्टरी सेक्रेटरी म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. थोडक्याच काळांत कामाच्या बाबतींत लालबहादूर हे इतरांच्यापेक्षां पुढें गेले. सर्वांना आवडणारा, कामसू, एकनिष्ठ, विश्वासू आणि अविरोधी असें पंतांनीं लालबहादुरांचें गुणगान केलें आहे.

लालबहादूर शास्त्री आणि पंत हेच रात्रीं उशीरापर्यंत आपल्या कचेरींत काम करीत बसत. बाकीची मंडळी लौकर जात. काम संपलें कीं पंतजींच्या मोटारींतून ते दोघे घरीं जात. यामुळें पंतजींना लालबहादुरांचें काळजीपूर्वक निरीक्षण करतां आलें; त्यांच्यावरील पंतजींचा लोभ वाढूं लागला.

१९४७ सालीं संयुक्त प्रांत सरकारचे मंत्री रफी अहमद किडवाई मध्यवर्ती मंत्रिमंडळांत गेले आणि त्यांच्या जागीं लालबहादूर शास्त्री यांची पोलीस व दळणवळण खात्याचे मंत्री म्हणून पंतजींनीं नेमणूक केली. या दोन्ही खात्यांच्या व्यवस्थेबाबत लालबहादूर यांनीं नांव कमाविलें. पोलीस खात्याची कार्यक्षमता वाढविणें व जनतेशीं पोलिसांचे सलोख्याचे संबंध राखणें ही बहुमोल कामगिरी लालबहादुरांची.

संयुक्त प्रांतांत या वेळीं जातीय दंगे मोठ्या प्रमाणावर होत होते पण लालबहादुरांनीं आपलें वर्तन निःपक्षपाती ठेवलें. अत्यंत दृढपणानें त्यांनीं प्रांतांत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. उत्तर प्रदेशांत त्यांनीं प्रांतीय रक्षादलाची स्थापना केली. या संस्थेंत तरुणांनीं सामील व्हावें असा त्यांनीं आदेश दिला. १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या वेळीं या दलानें प्रांताच्या सरहद्दीवर मोलाची कामगिरी केली.

१९४२ मध्यें तुरुंगांत गेलेल्या तरुणांच्या त्यांनीं पोलीस खात्यांत अधिकारी म्हणून नेमणुका केल्या. त्यामुळें पोलिस खात्याचा कारभार जनताभिमुख होऊं लागला. आजपर्यंत या खात्याचा जनतेशीं जवळचा संबंध नव्हता. पोलीस खात्याबद्दल जनतेला विश्वास वाटत नव्हता.

सरकारच्या मालकीची आणि सर्व प्रांतभर चालणारी बस सर्व्हिस त्यांनीं चालू केली. त्यामुळें राज्यांतील बस-वाहतूक नियमित व वक्तशीरपणें होऊं लागली. बस कंडक्टर म्हणून स्त्रियांची नेमणूक करण्याची कल्पना शास्त्रींचीच. ही पद्धत क्रांतिकारक समजण्यांत येऊं लागली. कारण स्त्रियांनीं असलीं कामें करणें तोंपर्यंत कोणाच्या स्वप्नींहि नव्हतें. लोकांना अर्थातच ही सुधारणा मानवली नाहीं. आणि लालबहादूर दिल्लीस गेल्याबरोबर ती बंद करण्यांत आली.

लालबहादूर यांच्या लखनौ येथील कचेरींत दुय्यम मदतनीस म्हणून एक महिला काम करीत असे. आपल्या कामांत ती वाकबगार होती आणि शांत व उद्योगशील अशी तिची वृत्ति होती.

पोलीसखात्याचे मंत्री सहसा लोकप्रिय होत नाहींत, पण लालबहादूर हे या समजुतीला अपवाद होते. दंगेखोरांना हटविण्यासाठीं पाण्याचा मारा करण्याची सुरुवात त्यांनीं केली. १९४९ सालीं लखनौ येथील विद्यार्थ्यांनीं संप पुकारला आणि त्यांनीं गडबड करण्यास सुरुवात केली. या विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्यास त्यांनीं नकार दिला. पाण्याचे लोट विद्यार्थ्यांच्या अंगावर सोडून त्यांनीं जमाव हटवला.

लालबहादूर यांची लोकप्रियता किती अपूर्व होती याचें हें एक उदाहरण पाहा. विद्यार्थ्यांच्या एका जमावाला पोलिसांनीं हटविलें. याबद्दल पोलीसखात्याचा मंत्री म्हणून लालबहादुरांचा धिक्कार व्हावयास हवा होता. पण 'लालबहादूर हाय हाय'च्या ऐवजीं शिक्षणमंत्री संपूर्णानंद यांचाच विद्यार्थ्यांनीं निषेध केला आणि 'संपूर्णानंद हाय हाय' असें ते ओरडूं लागले.

लालबहादूर यांच्यांतील माणुसकी अधिकाराच्या मदानें कधींच लुप्त झालेली नव्हती. एके ठिकाणीं एकदां गडबड झाली. लोक अनावर झाले; ते हटेनात. लालबहादूर तेथें हजर होते. अखेर जमाव इतका बेभान झाला कीं, त्यांनीं पोलिसांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. लालबहादुरांनीं पोलिसांना शांत राहण्यास सांगितलें. दगडांच्या आणि विटांच्या माऱ्यानें या वेळीं अनेक

पोलीस जखमी झाले. त्यांना इस्पितळांत पोंचवावें लागलें. सायंकाळीं लालबहादूर स्वतः इस्पितळांत गेले. त्यांनीं जखमी पोलिसांची विचारपूस केली व त्यांना धीर दिला. पण स्वसंरक्षणासाठींसुद्धां आपण पोलिसांना शस्त्र वापरूं दिलें नाहीं. हें आपलें कृत्य समर्थनीय होतें काय असा त्यांच्या मनांत एकसारखा विचार घोळत होता.

या घटनेला कांहीं वर्षें लोटलीं. लालबहादूर हे भारताचे गृहमंत्री होते. पोलिसांचें जीवित धोक्यांत आल्यास त्यांनीं स्वसंरक्षणार्थ प्रतिकार करावा काय याबद्दल लोकसभेंत चर्चा चालूं होती. लालबहादूर यांनीं सभेला लखनौचा वृत्तांत सांगितला. समाजवादी पक्षाचे नेते नाथ पै लगेच उठून म्हणाले—" तुमच्यासारखी दूरदृष्टि आणि धैर्य असलेले लोक आपल्यांत नाहींत, हीच तर खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. "

अधिकारारूढ पक्ष आणि विरोधी पक्ष यांचे परस्परसंबंध फारसे सलोख्याचे नसतात. अधिकारारूढ पक्षाबद्दल एकहि चांगला शब्द न बोलण्याची विरोधी पक्षानें शपथ घेतलेली असते. पण लालबहादूर शास्त्री यांचे सर्वांशीं अत्यंत सलोख्याचे संबंध होते हें वरील घटनेवरून लक्षांत येईल.

लालबहादूर शास्त्री यांना क्रिकेटचा अतीव नाद आहे. विशेषेंकरून कसोटी सामने तर ते अवश्य पाहतात. १९४९ मध्यें राष्ट्र संघ विरुद्ध भारत यांतील एक कसोटी सामना कानपूर येथें शास्त्रीजी पाहात होते. इतक्यांत गडबड माजली. मुलींच्या तंबूकडे मुलें जाऊन गोंधळ करीत होतीं. पोलिसांनीं मुलांना आवरण्याचा प्रयत्न केला पण मुलांनीं पोलिसांवरच हल्ले करण्यास सुरुवात केली.

लालबहादूर मध्यें पडले. शब्दाशब्दी झाली. मुलांनीं गप्प राहण्याचें कबूल केलें. पण दुसऱ्या दिवशीं ग्राउंडवर पोलीस दिसतां कामा नयेत अशी त्यांनीं अट घातली. लालबहादुरांनीं ही अट मान्य केली.

दुसऱ्या दिवशीं ग्राउंडवर पोलीस दिसतांच मुलें चवताळलीं. त्यांनीं लालबहादुरांना गराडा घातला व त्यांस जाब विचारूं लागलीं. लालबहादूर हंसून म्हणाले, " मीं माझें वचन पुरें केलें आहे. उद्यां ग्राउंडवर ' लाल पगडी ' दिसतां कामा नये असें तुम्हीं म्हणालां होतां. पाहा बरं एक तरी लाल पगडी आहे का ? "

आदल्या दिवशीं पोलीस लाल पगड्या घालून बंदोबस्तासाठीं आले होते.

विद्यार्थ्यांनीं पोलिसांचा उल्लेख ' लाल पगडी ' असा केला होता. म्हणून दुसऱ्या दिवशीं पोलीस खाकी पगड्या घालून आले. लालबहादुरांनीं आपणांवर मात केली असल्याचें विद्यार्थ्यांस आढळून आलें आणि एकत्र हंशा पिकला.

आग्रा येथें एकदां अशीच गम्मत झाली. पोलीसखात्याचे मंत्री म्हणून आग्रा येथील त्यांची प्रथमच भेट होती. लालबहादूर यांचें स्वागत करण्यासाठीं सरकारी अधिकारी व प्रतिष्ठित नागरिक यांची गर्दी जमली होती.

गाडी स्टेशनांत शिरली. लालबहादूर शास्त्री यांचा डबा पुढें गेला. गर्दी मागेंच राहिली. लालबहादूर सरळ खालीं उतरले आणि तिसऱ्या वर्गाच्या द्वारांतून बाहेर पडले. तेवढ्यांत एक पोलीस तेथें आला. मंत्रिमहाशय बाहेर पडल्याखेरीज कोणालाहि स्टेशनच्या बाहेर पडतां येणार नाहीं असें त्यानें दरडावून सांगितले. " अरे, हेच पोलीसखात्याचे मंत्री आहेत " असें कोणींतरी त्या पोलिसाच्या कानांत सांगितलें. तो पोलिस मोठ्यानें हंसला आणि म्हणाला, " अरे जा, एवढा लहानसा मनुष्य पोलीसखात्याचा मंत्री असेल कसा ? " लालबहादूर यांनीं या उद्गाराबद्दल पोलिसाला कांहीं शिक्षा होणार नाहीं अशी व्यवस्था केली.

पण संयुक्त प्रांतांत लालबहादूर यांचें वास्तव्य फार काळ टिकणार नव्हतें. त्यांनीं दिल्ली येथें जाऊन मध्यवर्ती मंत्रिमंडळांत जावें व भारताच्या दृष्टीनें महत्त्वाची कामगिरी करावी असें विधिलिखित होतें.

१९५० चें काँग्रेसचें अधिवेशन नाशिक येथें भरलें. पंडितजींच्या विरोधाला न जुमानतां पुरुषोत्तमदास टंडन हे काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. साहजिकपणें नेहरू वर्किंग कमिटीच्या बाहेर राहिले. पुढील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनाच्या वेळीं टंडनजींनीं राजीनामा देऊन हा पेंचप्रसंग सोडविला. नेहरू हें राष्ट्राचें प्रतीक असल्यानें आपण त्यांच्याविरुद्ध जाऊं इच्छित नाहीं असें त्यांनीं आपल्या राजिनाम्याचें कारण दिलें होतें. उत्तर प्रदेशाच्या या दोन झुंझार पुढाऱ्यांच्या रस्सीखेचींत बिचाऱ्या लालबहादुरांची मात्र पंचाईत झाली. पुरुषोत्तमदास टंडन हे लोकसेवक संघाचे अध्यक्ष—आणि शिवाय शास्त्रींचे सहकारी व गुरु. नेहरू हे लालबहादुरांचे नेते आणि दैवत !

या वेळची आपली अनुकंपनीय स्थिति वर्णन करतांना लालबहादूर म्हणतात, "नेहरूंची समजूत घालण्यासाठीं मी लखनौहून दिल्लीला आलों. त्यांची तीनदां

मीं भेट घेतली. सकाळीं, दुपारीं व रात्रींहि त्यांच्याशीं मीं बोललों. आमची पुष्कळ काळ चर्चा झाली. या पेंचप्रसंगांतून मार्ग हा काढलाच पाहिजे असें मीं आग्रहानें सांगितलें. माझ्या या बोलण्याचा पंडितजींवर अनुकूल परिणाम झाला. पण दुर्दैवानें टंडनजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन हें प्रकरणच संपविलें. ''

यावरून लालबहादूर यांचें व्यक्तिमत्त्व आणि त्यांची निष्ठा यांचा आढळ होतो. परस्परांवर विश्वास नसलेल्या या दोघां पुढाऱ्यांनीं लालबहादूर यांच्यावर विश्वास टाकावा, आणि दोघांचाहि दुरावा न येतां लालबहादुरांनीं दोघांचाहि विश्वास मिळवावा हें विशेष होय. टंडनजींच्या राजीनाम्यानंतर जवाहरलाल नेहरू कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. अध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेतल्याबरोबर त्यांनीं ताबडतोब लालबहादूर यांना दिल्लीस बोलाविलें आणि कॉंग्रेसच्या सरचिटणीस-पदाची धुरा त्यांच्यावर सोंपविली. लालबहादूर यांनींहि क्षणाचासुद्धां विचार न करतां आपलें मंत्रिपद सोडलें आणि ते दिल्लीला आले.

स्वातंत्र्यानंतर पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीचा हा काळ होता. आपल्या नव्या भूमिकेवरून निवडणुकीची संपूर्णपणें तयारी करावयाची जबाबदारी लाल-बहादुरांवर येऊन पडली.

कामाच्या बाबतींत राक्षस आणि संघटनेच्या बाबतींत ब्रह्मदेव असें त्यांचें या कामगिरीच्या बाबतींत वर्णन करतां येईल. त्यांनीं सर्व देश पालथा घातला. कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या सर्वत्र बैठका घेतल्या, स्थानिक परिस्थितीच्या अनुरोधानें निवडणुकीची तयारी केली, कॉंग्रेस उमेदवारांची यादी तयार केली. कॉंग्रेस उमेदवारांची तपासणी केली, स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेसमध्यें कोणते वारे वाहात आहेत याचाहि अदमास घेतला. करावयाचें असें कांहींहि त्यांनीं बाकी ठेवलें नाहीं.

लालबहादूर यांचा मुक्काम या वेळीं दिल्लींतील तीन मूर्ति येथील पंडितजींच्या निवासस्थानींच होता. ते सदैव कामांत इतके गढलेले असत कीं जेवणाचें ताट नोकर त्यांच्या खोलींत आणून ठेवी आणि वेळ मिळेल त्या वेळीं ते जेवीत. कधींकधीं ताट उष्टावलेलेंहि नसे. या निवडणुकींतील कॉंग्रेसच्या नेत्रदीपक यशाचें माप लालबहादूर यांच्याच पदरांत घातलें पाहिजे.

निवडणुकीनंतर पार्लमेंटचें अधिवेशन भरलें. कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून

शास्त्री राज्यसभेच्या निवडणुकीस उभे राहिले आणि अर्थातच निवडून आले. नेहरूंच्या मंत्रिमंडळांत रेल्वे आणि वाहतूक या खात्याचे मंत्री म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली.

दैवयोग असा कीं १९५७ च्या निवडणुकांतहि कॉंग्रेसला लालबहादूर यांच्या नेतृत्वाचा लाभ झाला. कारण यापूर्वी एक वर्षच आपल्या मंत्रिपदाचा त्यांनीं राजीनामा दिला होता. त्याचें असें झालें. दक्षिण भारतांतील ऐयालूर येथें रेल्वेचा एक मोठा अपघात झाला. मंत्री या नात्यानें लालबहादूर यांनीं या अपघाताची सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली. या अपघातांत एकूण १४४ उतारू ठार झाले. शास्त्रींनीं तत्त्वपालनासाठीं राजीनामा दिला हें ध्यानांत घेऊन पंडित नेहरूंनीं शास्त्रींची निवडणूक-संघटक म्हणून लगेच नेमणूक केली.

लालबहादुरांच्या मार्गदर्शनाखालीं झालेलीं कॉंग्रेसची ही दुसरी निवडणूक. या कार्यामुळें अनेक कार्यकर्त्यांशीं त्यांचा निकटचा संबंध आला आणि हा दुर्मिळ अनुभव त्यांना पुढें उपयोगी पडला.

१९६२ सालच्या निवडणुकांतहि शास्त्रींनीं सर्व जबाबदारी उचलली होती. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या तिघांच्या समितीनें कॉंग्रेस उमेदवारांची पक्की यादी तयार केली. या निवडणुकींत एक-तृतीयांश उमेदवार नव्या रक्ताचे व ताज्या दमाचे होते याचें श्रेय लाल-बहादूर यांनाच दिलें पाहिजे.

# १०

## कार्यक्षेत्र गवसलें

मंत्री म्हणून शास्त्रींनीं नांव कमावलें. आपला गृहपाठ व्यवस्थितरीत्या करून शाळेंत लक्ष देणारा विद्यार्थी जसा चमकतो, त्याप्रमाणें आपले सर्व कागदपत्र काळजीपूर्वक वाचून निर्णय देण्याचें नाजुक काम शास्त्री यशस्वीरीत्या पार पाडीत.

लालबहादूर यांनीं आपलें काम उरकण्याची एक खास पद्धति अमलांत आणिली होती असें त्यांचे एक सहकारी सांगतात.

कोणत्याहि खात्याची जबाबदारी आली कीं शास्त्री सर्व कागदपत्र पाहतील. प्रत्येक प्रश्नाची पूर्वपीठिका ध्यानांत घेतील आणि आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांचें मूल्यमापन करतील. या त्यांच्या वैशिष्टयांमुळें लोकसभेतींल प्रश्नोत्तरांचा त्यांना धसका बसत नाहीं. आपले अधिकारी आणि जनता यांचें ते समाधान करूं शकतात.

त्यांच्या खात्यांचे चिटणीस तर लालबहादुरांवर अगदीं खूष असतात. कारण चिटणीसांचीं मतें ते नेहमीं विचारांत घेतात, त्यांचा सल्ला ते मानतात. मगच ते आपलें धोरण किंवा निर्णय ठरवतात. एकदां त्यांचें धोरण पक्कें झालें कीं त्याच्या अंमलबजावणीची कामगिरी ते आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांवर सोपवितात, इतर कांहीं मंत्र्यांप्रमाणें त्यांत ते ढवळाढवळ करीत नाहींत.

१९५२ मध्यें मध्यवर्ति मंत्रिमंडळांत त्यांचा प्रवेश झाला. त्या वेळीं रेल्वे व

दळणवळण हीं दोन खातीं त्यांच्याकडे आलीं. हीं खातीं महत्त्वाचीं असल्यानें लालबहादुरांचा एक प्रकारें सन्मानच झाला. कारण परराष्ट्रकारण, गृह, अर्थ, व्यापार-उद्योगधंदे यानंतर दळणवळणाच्या खात्याचें महत्त्व होतें.

रेल्वे ही भारतांतील सर्वांत मोठी संघटना. या खात्यांत १२ लाख लोक काम करतात. सरकारी अथवा खासगी नियंत्रणाखालीं असलेली एवढी मोठी संस्था दुसरी कोणतीहि नाहीं. राष्ट्राच्या दृष्टीनें रेल्वेचें महत्त्व फार. राष्ट्राचें अर्थकारण दळणवळणावर अवलंबून. योजना, रहदारी, वाहतूक यांची मदार रेल्वेच्या कार्यप्रवणतेवर – उद्योगधन्दे, व्यापार यांच्या नाड्या या खात्याच्या हातीं.

या खात्यांत सुसूत्रता आणणें ही गोष्ट लालबहादुरांनीं प्रथम हातीं घेतली. फाळणीनंतर त्यांत पुष्कळच विस्कळीतपणा आला होता. अडचणी दूर करणें, वाढत्या गरजांसाठीं रेल्वेमार्गांची वाढ करणें, अन्नधान्य, कोळसा वगैरे उपयुक्त वस्तूंची नेआण करणें हीं कामें तावडतोबीचीं होतीं.

तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या सुखसोयी हा तर या खात्यांतील ज्वलंत प्रश्न होता. पहिला वर्ग आणि तिसरा वर्ग यांतील सुखसोयींत जमीनअस्मानाचें अंतर होतें. हा फरक कमी करण्याचें कार्य त्यांनीं प्रथम हातीं घेतलें. जुना पहिला वर्ग त्यांनीं रद्द केला, दुसऱ्या वर्गाचे डबे पहिल्या वर्गासाठीं वापरले आणि डब्यांची पुनर्रचना केली. इतर देशांतल्या प्रमाणें श्रेष्ठ व कनिष्ठ असे रेल्वेचे दोनच वर्ग कायम ठेवण्याचा त्यांचा अंतिम हेतु होता.

तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांस बसल्या ठिकाणीं जेवण देण्याची सोय त्यांनीं केली. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठीं झोंपण्याच्या जागा राखीव करण्यांत त्यांनीं यश मिळविलें. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत त्यांनी पंखे बसविले. डी लक्स या नांवाच्या केवळ तिसऱ्या वर्गाचे डबे असलेल्या गाड्या त्यांनीं सुरू केल्या. दिल्लीहून मुंबई, कलकत्ता व मद्रास येथें या गाड्या धांवूं लागल्या.

देशांतील कनिष्ठ वर्गाच्या लोकांच्या सुखसोयींकडे लालबहादूर यांचें किती बारीक लक्ष होतें याची वरील सुधारणांवरून कल्पना येईल.

रेल्वेची कार्यक्षमता वाढावी यासाठीं त्यांनीं संशोधनें आणि चांचणी सुरू केली. या खात्याचें केंद्र लखनौ येथें होतें. शिवाय चित्तरंजन येथें रासायनिक व यांत्रिक संशोधनें होत आणि लोणावळें येथें इमारती, कॉंक्रीट वगैरे प्रश्नांबाबत संशोधन होई.

या वेळीं दुसरी पंचवार्षिक योजना अमलांत येऊं पाहात होती. ही योजना यशस्वी होण्यासाठीं रेल्वेचें सहकार्य तर हवेंच होतें–म्हणून या खात्याच्या प्रचलित दरांसंबंधीं त्यांनीं पाहणी करण्याचें काम हातीं घेतलें. या कामासाठीं सर रामस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांनीं एक समिति नेमली. रेल्वेवर होणारे अपघात, दरांसंबंधींचे प्रश्न वगैरे कामगिरी या समितीकडे चौकशी व सत्यशोधन यांसाठीं सोंपविण्यांत आली होती. या समितीच्या शिफारशी लालबहादूर यांनीं स्वीकारल्या.

रेल्वेचीं खातीं अनेक, कामेंहि अनेक. या विभागांतील दोष नाहींसे व्हावेत, आणि निरनिराळ्या खात्यांत एकसूत्रीपणा यावा म्हणून लालबहादुरांनीं एक स्वतंत्र विभाग सुरू केला. या विभागाचा पुष्कळच उपयोग झाला आहे.

पूर्वीं रेल्वेचे विभाग पद्धतशीर नव्हते. ते सुसूत्र असावेत, त्यांत कमीअधिकपणा राहूं नये म्हणून शास्त्रींनीं नव्या नव्या योजना आंखण्यास सुरुवात केली. हे नवीन विभाग कामें, व्यवस्था वगैरेंबाबतींत समान कसे राहतील याचीहि त्यांनीं खात्री करून घेतली. उदाहरणार्थ, पूर्व रेल्वेवर कामाचा ताण फार पडत आहे आणि पंचवार्षिक योजनेनुसार तें काम अधिक वाढण्याचा संभव आहे असें एका चौकशींत आढळून येतांच त्यांनीं त्या रेल्वेचे दोन विभाग केले. १ ऑगस्ट १९५५ पासून जुनी बंगाल-नागपूर रेल्वे साउथ ईस्टर्न रेल्वे म्हणून ओळखण्यांत येऊं लागली.

उद्योगधंदे वाढूं लागल्यानें प्रवासी आणि माल यांची वाहतूक मोठ्या प्रमाणांत वाढूं लागली. म्हणून शास्त्रींनीं रेल्वेचे विभाग वाढविले. असे विभाग उत्तर व पूर्व रेल्वेवर पूर्वीं होतेच. ही योजना मध्य व इतर रेल्वेंना लागू करण्यांत आली. १९५५–५६ मध्यें मध्य रेल्वेचे दोन नवे विभाग मुंबई व सिकंदराबाद येथें सुरू झाले. १९५६–५७ मध्यें दक्षिण व पश्चिम रेल्वेमध्यें नवे विभाग निर्माण करण्यांत आले.

रेल्वेंतील चोऱ्यांना आळा घालण्याचा शास्त्रींनीं कसून प्रयत्न केला. प्रवासांत अथवा रेल्वेच्या यार्डांमध्यें चोरांच्या टोळ्या असून त्यांच्या उद्योगांमुळें मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होतात व त्यांतून रेल्वेवर वाढत्या प्रमाणांत लावण्यांत आलेले नुकसानभरपाईचे खटले निर्माण होतात असें त्यांना आढळून आलें. म्हणून रेल्वेच्या सुरक्षितता विभागाची पाहणी व पुनर्रचना करण्यासाठीं त्यांनीं

रेल्वे बोर्डांत एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली.

या अधिकाऱ्याच्या शिफारशीनुसार रेल्वेच्या सुरक्षा खात्यांत सुधारणा करण्यांत आल्या. या कामासाठीं एका इन्स्पेक्टर जनरलच्या हाताखालीं रेल्वे सुरक्षा पोलीस दल स्थापन करण्यांत आलें. या अधिकाऱ्याला रेल्वे बोर्डावर सल्लागार म्हणून घेण्यांत आलें. रेल्वेचें हें खातें एरवींच्या पोलीस खात्याच्या सहकार्यानें काम करतें व हें नवीन खातें निर्माण झाल्यापासून रेल्वे व प्रवासी यांच्या मालमत्तेच्या चोऱ्यांचें प्रमाण पुष्कळ कमी झालें आहे. रेल्वे प्रवाशांच्या समित्या स्थापन करण्याची कामगिरी श्री. शास्त्री यांचीच. वेगवेगळ्या पातळीवर या समित्या स्थापन करण्यांत आल्या. स्थानिक समितीपासून केंद्र-समितीपर्यंत वेगवेगळ्या विभागांत या समित्या काम करतात. या समित्यांमुळें रेल्वे व जनता यांचा अधिक निकटचा संबंध आला.

१९५४–५५ सालीं लालबहादुरांच्या कारकीर्दीत गंगा नदीवर बिहारमध्यें एक प्रचंड पूल बांधण्यांत आला. या पुलावरून रेल्वेरस्ता व सडक बांधण्यांत आली. या योजनेस एकूण १४.६२ कोटी रुपये खर्च लागला आणि रेल्वे व दळणवळण खात्यांनीं या खर्चाचा ६० व ४० टक्के हिस्सा पत्करला होता. बिहारमध्यें आजवर गंगा नदीवर पूल असा नव्हता. या पुलामुळें दक्षिण व उत्तर बिहारमध्यें सरळ दळणवळण सुरू झालें. आजवर रेल्वेच्या वाघिणीहि बोटींतून गंगेच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्यवर न्याव्या लागत.

चित्तरंजन येथील रेल्वेचीं एंजिनें तयार करण्याचा कारखाना लालबहादूर यांच्याच कारकीर्दीत वाढला. जेथें पूर्वीं दरवर्षी १२० एंजिनें तयार होत, तेथें आतां २०० तयार होऊं लागलीं. रेल्वेचे डबे बांधण्याचें काम वेगानें सुरू होण्याचे त्यांनीं हुकूम दिले. २० जानेवारी १९५५ रोजीं लालबहादूर यांच्याच हस्तें या कारखान्यांत यंत्रसामग्री बनविण्यांत आली. या डब्यांना लागणारे सुटे भाग भारतांत तयार करण्यासाठीं त्यांनीं एक स्वतंत्र समिति नेमून तिचें अध्यक्षपद श्री. जी. बी. कोटक यांजकडे सोंपविलें.

फाळणीनंतर रेल्वेखात्याचा कारभार ढिला झाला होता. एंजिनें मोडकळीस आलीं होतीं. सुटे भाग मिळेनासे झाले होते. यांमुळें रेल्वेवरील अपघातांचें प्रमाण वाढलें होतें. गाड्या उशीरां येत. मालाच्या वाहतुकींत अत्यंत दिरंगाई होई.

नोव्हेंबर १९५६ मध्यें दक्षिणेंत अरियालूर येथें झालेल्या रेल्वे अपघातानें यावर कळस चढविला. १४४ उतारू मृत्युमुखीं पडले. त्याच्यापूर्वी तीनच महिने मेहबूबनगर येथें रेल्वेचा अपघात होऊन ११२ उतारू मरण पावले होते. मेहबूबनगर येथील अपघाताची जबाबदारी स्वतःवर घेऊन लालबहादुरांनीं त्याच वेळीं आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शविली होती. पण पंतप्रधान नेहरूंनीं शास्त्रींचा राजीनाम स्वीकारला नाहीं. अरियालूर येथील अपघातानंतर मात्र शास्त्रींनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला व तो परत घेण्याचें नाकारलें.

लोकसभेंतील आपल्या भाषणांत नेहरूंनीं शास्त्रींच्या राजीनाम्याचा उल्लेख केला आणि त्यांच्या कार्याविषयीं गौरवाचे उद्गार काढले. पंडितजींना शास्त्रीं-विषयीं किती ममत्व होतें हें या भाषणावरून स्पष्ट दिसतें. ते म्हणाले—" सरकारां-तच नव्हे तर काँग्रेस-संघटनेंतहि मला लालबहादुरांचें सहकार्य व मदत मिळाली हें मी माझें भाग्य समजतों. कोणत्याहि कार्यांत त्यांच्यापेक्षां अधिक लायक स्नेही किंवा सहकारी मिळणार नाहीं. त्यांची निष्ठा, ध्येयवाद, चिकाटी, सदसद्विवेक-बुद्धि आणि कष्टाळूपणा हे गुण असीम आहेत. त्यांच्यापेक्षां अधिक चांगला माणूस मिळणारच नाहीं. आपल्याला नेमून दिलेल्या कामांत कसलीहि चूक झाली तरी त्याची खंत वाटण्याइतकी सदसद्विवेकबुद्धि त्यांच्याजवळ आहे.

मला त्यांच्याबद्दल अतीव आदर आहे आणि मला आशा आहे कीं कोणत्या ना कोणत्या तरी भूमिकेंत यापुढेंहि आम्हीं एकत्र काम करूं व सह-कारी राहूं."

यानंतर लगेच १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुका आल्या. काँग्रेस पक्षाचें निवडणुकांचें संचालन करण्याची जबाबदारी नेहरूंनीं शास्त्रींवर टाकली. शास्त्रींच्या बाबतींत ही इष्टापत्ति ठरली. देशांतील नव्या रक्ताच्या तरुणांशीं या निवडणुकीच्या निमित्तानें शास्त्रींचा संबंध आला. जुन्या लोकांपासून अधि-काराच्या जागा व सत्ता जिंकून घेण्याचा या तरुण गटानें निश्चय केला होता.

१९५७ च्या या निवडणुकींत पश्चिम अलाहाबाद मतदार संघातर्फे लाल-बहादूर लोकसभेवर निवडून आले. दळणवळण खात्याचे मंत्री म्हणून केंद्रसरकारांत त्यांची लागलीच नेमणूकहि झाली. ही त्यांची नेमणूक थोड्या काळापुरतीच राहिली. तरीसुद्धां या अल्पमुदतींत विशाखापट्टम् येथें त्यांनीं जहाजें बांधण्याचा

कारखाना सुरू केला. पोस्ट व तारखात्यांतील कामगारांचा देशव्यापी संपहि याच काळांत झाला. आणि त्यांत शास्त्रींनीं सर्वसंमत असा समेट घडवून आणला.

पुढील वर्षी मुंदडा-प्रकरण उपस्थित झालें. कृष्णमाचारींनीं अर्थमंत्रिपदाचा राजीनामा दिला व मोरारजी देसाई अर्थमंत्री झाले. शास्त्रींना बढती मिळाली. मोरारजींचें व्यापार–उद्योगधंद्यांचें खातें शास्त्रींकडे आलें.

ऑक्टोबर १९५९ मध्यें अलाहाबाद विभागांतील दुष्काळी विभागाची पाहणी करण्यास ते गेले असतां त्यांना हृदयविकाराचा सौम्यसा झटका आला.

व्यापारमंत्री म्हणून लालबहादुरांचे व्यापाऱ्यांशीं सलोख्याचे संबंध होते. नेहरूंच्या उद्योगधंद्यांविषयींच्या समाजवादी दृष्टिकोनाच्या धोरणाचें ते पालन करीत होतेच. याच वेळीं परकीय चलनाबाबतचें एक गंडांतर भारतावर आलें. पण लालबहादुरांनीं तें निभावून नेलें. कंपनी कायद्याविषयींचे त्यांचे निर्णय व्यापारीवर्गाला पसंत पडले नाहींत. पण मतभेद असूनहि लालबहादुरांविषयीं सर्वत्र प्रेमाची व आदराचीच भावना होती.

रशिया व झेकोस्लोव्हाकियां यांच्या सहकार्यानें भारतांत सुरू झालेली ‘ हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशन ’ ही संस्था म्हणजे लालबहादुरांच्या कारकीर्दीतील मोठीच बाब होती. या योजनेसाठीं यंत्रसामग्री तयार करण्याचे कारखाने चालू करावयाचे होते. रांची येथें एक मोठा कारखाना सुरू करण्याबाबत प्राथमिक तयारी झाली होती. उटकमंड येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना निघावयाचा होता. या कारखान्यास एका फ्रेंच कंपनीचें साहाय्य मिळणार होतें.

बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स् या कारखान्यांतील उत्पादन दुपटीनें वाढलें होतें. या कारखान्यांतून दर वर्षी २००० यंत्रें तयार व्हावयाचीं होतीं. पंजाबांतील नानगल येथें खतांचा कारखाना सुरू झाला होता आणि बंगलोर येथील घड्याळांच्या कारखान्यानें कामास सुरुवात केली होती. या कारखान्यास जपानकडून सहकार्य मिळालें होतें. शक्य तितक्या कमी किमतींत घड्याळें देण्याचा हा कारखाना स्थापन करण्यामागें हेतु होता. भोपाळ येथें हेवी इलेक्ट्रिकल लि. या कारखान्यांत अवजड यंत्रसामग्री तयार करण्यांत येत असे.

१९६० मध्यें उद्योगधंद्यांच्या प्रगतीला गति मिळाली. पंचवार्षिक योजनांच्या कितीतरी क्षेत्रांत अपेक्षेपेक्षां अधिक प्रगति होऊं लागली. अपेक्षेपेक्षां १४ ते १५

टक्के वाढ झाल्याचें आढळून आलें. याचा देशांतील उद्योगपतींवर इष्ट असा परिणाम दिसूं लागला. देशांतील सर्व भागांतून नवे नवे उद्योगधंदे चालू करण्यासाठीं अर्जावर अर्ज येऊं लागले. मोटारी आणि इतर स्वयंचलित साधनांच्या निर्मितीनें तर कमाल मर्यादा गांठली.

१९६१ हें वर्ष मागील वर्षांपेक्षां अधिक गडबडीचें गेलें. तांत्रिक व आर्थिक क्षेत्रांत सुमारें ४०० परकीय संस्थांशीं सहकार्याचे करार झाले. जानेवारी ते सप्टेंबर या ९ महिन्यांत १२५२ नव्या कंपन्या स्थापन झाल्या. उद्योगधंद्याच्या वाढत्या कार्यास भरपूर वाव मिळावा म्हणून देशाच्या औद्योगिक बाबतींत मागासलेल्या विभागांत हे नवे कारखाने उभारण्यात येऊं लागले. सात ठिकाणीं प्रचंड कारखाने दृष्टीस पडूं लागले.

देशाची औद्योगिक व शेतकी उन्नति व्हावी, त्यांचा आपापसांत मेळ बसावा म्हणून लालबहादुरांनीं एक नवी योजना आंखली.

खेड्यांतील बेकारी नाहींशी व्हावी म्हणून उद्योगधंदे व शेतीव्यवसाय यांचा मिलाफ करणें आवश्यक आहे असें त्यांचें मत होतें. येत्या २०–३० वर्षांत खेड्यांतील उद्योगधंद्यांचें छोट्या उद्योगधंद्यांत रूपांतर होणें आवश्यक आहे असें त्यांना वाटे. याच विचारांतून नव्या नव्या कल्पनांचा उगम झाला.

पण लालबहादूर यांना खरा वाव मिळाला तो गृहखात्यांत. गृहमंत्री पंडित पंत आजारी पडले आणि उद्योगधंद्यांचें मंत्रिपद सांभाळून त्यांना गृहखात्याची जबाबदारी सांभाळावी लागली. एप्रिल १९६१ मध्यें पंतांचें देहावसान झालें आणि गृहखातें लालबहादुरांकडे कायमचें आलें. व्यापार व उद्योगधंदे यां खात्यांचें मंत्रिपद सरदार स्वरणसिंग यांना देण्यांत आलें.

लालबहादुरांच्या कामाचा फुलोरा येथें दिसूं लागला. गृहमंत्रिपद म्हणजे सुळावरची पोळी. कायदा आणि सुव्यवस्था राखणें, राज्यकारभाराची यंत्रणा सांभाळणें, हीं कामें या खात्याला सांभाळावीं लागत. सर्व देशभर या खात्याचा अंमल चालतो.

राजकीय गुंतागुंती सोडविणें, कटकटींतून मार्ग काढणें या कार्यांत लालबहादुरांचें कौशल्य पणास लागलें. कार्य करण्यासाठीं त्यांना भरपूर वाव मिळाला.

कोणताहि प्रश्न लांबणीवर टाकून तो अनिर्णित ठेवणें हें पंडित पंतांचें

वैशिष्ट्य. पण हातीं असलेला प्रश्न यशस्वी रीतीनें सोडविणें हें लालबहादुरांचें वैशिष्ट्य.

आसामांतील भाषेच्या प्रश्नावर झालेल्या दंगली ही लालबहादुरांपुढील पहिली महत्त्वाची समस्या होती. एप्रिल १९६० पासून सुरू झालेल्या या दंगलींनीं मे १९६१ मध्यें उग्र स्वरूप धारण केलें.

तोंपर्यंत आसाममध्यें आसामी, बंगाली व इंग्रजी या तीन भाषांना राज-भाषा म्हणून मान्यता देण्यांत आली होती. आसामी ही एकच भाषा आसामांत राज्यभाषा म्हणून मानण्यांत यावी असें आसामी लोकांचें म्हणणें होतें. आसाम साहित्य सभेनें हें मत १९५९ मध्यें मांडलें होतेंच, पण लौकरच या मतानें चळवळीचें रूप घेतलें. बंगाली लोकांविरुद्ध प्रामुख्यानें हा लढा होता.

जुलै १९६० मध्यें दंगे उग्र स्वरूपांत उसळले. २० लोक मृत्युमुखीं पडले, आणि ४०,००० बंगाली निर्वासित झाले. त्यांपैकीं ३२,००० लोक आश्रया-साठीं पश्चिम बंगालमध्यें गेले. तीन खेडेगांवें जाळून फस्त करण्यांत आलीं, बंगाली लोकांच्या ६०० घरांना आगी लावण्यांत आल्या. १७ व १९ जुलै या दिवशीं पंडित नेहरूंनीं या दंगलग्रस्त भागास भेट दिली. तेथील दृश्यें पाहून दुःखावेगानें ते म्हणाले — " आपल्याच देशांत आपल्याच लोकांना निर्वासित व्हावें लागलें अशी शोचनीय अवस्था येथें झाली आहे. "

या चळवळींत विद्यार्थी, राजकीय पक्ष, एवढेंच नव्हे तर कांहीं कॉंग्रेसवाल्यांनीं सुद्धां भाग घेतला. दंगलींत पक्षपात केल्यांचे अधिकाऱ्यांवर आरोप करण्यांत आले; आणि आपल्या कामांत हयगय केल्याचे २५ अधिकाऱ्यांवर आरोप ठेवण्यांत आले. अखेर १९६० च्या ऑक्टोबरमध्यें तेथील कायदेमंडळानें राज्यभाषा कायदा पास केला तेव्हां हें प्रकरण थंडावलें.

आसामची एकूण लोकसंख्या ८७ लक्ष आहे. त्यांत १८ लक्ष बंगाली असून १० लक्ष इतर जातींतील लोक आहेत. अर्थातच ५९ लक्ष लोकांची आसामी ही भाषा असावयास पाहिजे. पण १९५१ मध्यें झालेल्या खानेसुमारींत ५५ टक्के आसामी व १९ टक्के बंगाली अशी आंकडेवारी मिळाली. ही खानेसुमारी खरी नाहीं, राज्यांतील ३३ टक्के लोकांची भाषा बंगाली आहे असा बंगाली लोकांचा दावा होता.

राज्यांतील एकूण लोकसंख्येपैकीं ७० अथवा अधिक टक्के लोकांची भाषा

एक असेल तरच तें राज्य एकभाषिक समजण्यांत यावें असें राज्यपुनर्रचना समितीनें सुचविलें होतें. राज्यांतील ३० टक्के लोकांची एकच भाषा असेल आणि ते लोक जर अल्पसंख्यांक असतील तर तें राज्य द्विभाषिक समजावें अशीहि समितीची शिफारस होती.

१९६१ च्या मे महिन्यांत दंगलींनीं पुन्हा उचल खाल्ली. बंगाली ही आसामची आणखी एक भाषा व्हावी अशी बंगाल्यांनीं चळवळ सुरू केली. पोलिसांनाहि ते जुमानीनात. काचार जिल्ह्यांत बंगाल्यांची संख्या अधिक आहे. तेथें दंगली होऊन त्यांत ११ लोक मरण पावले, ७७ जखमी झाले, शेंकडों लोकांना अटक करण्यांत आली. ४ जुलै रोजीं गौहत्ती येथें खवळलेल्या व अनावर झालेल्या विद्यार्थ्यांच्या जमावावर पोलिसांनीं गोळीबार केला. त्यांत एक विद्यार्थी मारला गेला व ६ जखमी झाले. अखेर लष्कराची मदत घ्यावी लागली.

या वेळीं लालबहादूर यांनीं गृहखात्याचीं सूत्रें घेतल्याला जेमतेम महिनाभर झाला होता. त्यांना हा प्रश्न सोडविण्याचें काम प्रथम हातीं घ्यावें लागलें. एका राज्यांतील दोन भाषिकांत, देशाच्या—भारतीयांच्या दोन विभागांत रक्त सांडलें जावें याचें शास्त्रींना अतीव दुःख झालें.

या दोन जमातींत किती द्वेष, अविश्वास आणि कटुता भिनली होती याचें प्रत्यंतर म्हणजे हे दंगे. परिस्थिति चिघळत जाणार, त्याचे पडसाद आसाम व पश्चिम बंगाल या दोन राज्यांत उमटणार अशी साधार भीति निर्माण झाली होती. बंगालमध्यें तर सहानुभूति व निषेधप्रदर्शक हरताळ पाळण्यांत आले आणि बंगालच्या सरहद्दीवर गडबड सुरू झाली.

आपलें सर्वस्व पणाला लावून हा प्रश्न सोडविण्याचें शास्त्रींनीं ठरविलें. ३१ मे रोजीं ते विमानानें आसामकडे तांतडीनें रवाना झाले आणि दोन्ही पक्षांशीं त्यांनीं वाटाघाटी सुरू केल्या. प्रत्येक पक्ष, आणि त्यांचे पुढारी यांचें म्हणणें त्यांनीं शांतपणें ऐकून घेतलें. या वाटाघाटींतून शास्त्री-सिद्धांत निर्माण झाला. हा सिद्धांत सरळ आणि व्यवहार्य होता. त्यांतील महत्त्वाचीं कलमें खालीलप्रमाणें होतीं—

( १ ) १९६० च्या राज्यभाषाविषयक कायद्यान्वयें काचार जिल्ह्यांत बंगालीऐवजीं आसामी ही राज्यभाषा ठरविण्यांत आली होती. हा विभाग रद्द करण्यांत यावा.

( २ ) कोचर व डोंगरी प्रदेशांत पत्रव्यवहारासाठीं सरकारतर्फें इंग्रजीचा वापर करण्यांत येईल. कांहीं काळानें इंग्रजीच्या जागीं हिंदी येईल.

( ३ ) राज्यपातळीवर तूर्त फक्त इंग्रजीचा वापर करण्यांत येईल. कांहीं काळानंतर इंग्रजीच्या जोडीला आसामीचा वापर करण्यांत येईल.

( ४ ) भारताच्या घटनेंत अल्पसंख्यांकांचें शिक्षण व नोकऱ्या याबाबतींत जीं संरक्षणें ठेवण्यांत आलीं आहेत, आणि राज्यपुनर्रचना समितीनें ज्यांना मान्यता दिली आहे त्यांचें पूर्णपणें प्रतिपालन करण्यांत येईल.

( ५ ) सर्व कायदे, वटहुकूम, नियम, आदेश इंग्रजी व आसामी या दोन्ही भाषांत प्रसिद्ध करण्यांत येतील.

या सिद्धांतानें इंग्रजी, आसामी व बंगाली या तीनहि भाषांचा वापर चालू ठेवण्यांत आला. बंगाली भाषाधिक्य असलेला काचार जिल्हा व आसाम सरकार यांच्यांतील पत्रव्यवहार इंग्रजींतून करण्याचें ठरलें. काचार जिल्ह्यांतील कचेऱ्या व शाळा यांत आसामी व बंगाली या दोन्ही भाषांचा वापर करण्यास मुभा देण्यांत आली. पण या जिल्ह्यांत बंगाली भाषेचें आधिक्य असल्यानें तेथें बंगालीला प्राधान्य देण्यांत आलें.

या तडजोडीमुळें दंगली थांबल्या आणि शांतता प्रस्थापित झाली. आज तर आसाम मंत्रिमंडळांत काचार जिल्ह्याचा एक प्रतिनिधि घेण्यांत येतो. याचा परिणाम असा झाला कीं १९६२ च्या निवडणुकांत कॉंग्रेसला आणखी मताधिक्य मिळालें. लालबहादूर शास्त्रींच्या प्रयत्नांचेंच हें फळ नव्हे काय ?

पण लालबहादूर यांना शांतता मिळावयाची नव्हती. १९६१ च्या ऑगस्ट-मध्यें मास्टर तारासिंग यांनीं अकाली चळवळ सुरू केली. ही चळवळ हाताळ-तांना लालबहादुरांचें एक वेगळेंच व्यक्तिमत्त्व दिसलें. कोणी दमदाटी करूं लागला, भीति दाखवूं लागला तर लालबहादूर वांकत नाहींत, ते खंबीर राहूं शकतात हें तें नवें स्वरूप होतें.

तारासिंगांचा सरकारविरुद्ध चळवळ करण्याचा बरेच दिवस प्रयत्न चालू होता. त्यांना स्वतंत्र असा पंजाबी सुभा हवा होता – केवळ शीखांचें राज्य हवें होतें. शीख समाजाच्या बाबतींत सरकार पक्षपातानें वागतें असा त्यांचा सरकारवर आरोप होता.

तारासिंगांनीं मोर्चे काढले, त्यांनीं निदर्शनें केलीं. पण एवढ्यावरच ते थांबले

नाहींत. त्यांनीं आपला प्रख्यात उपास सुरू केला.

तारासिंग प्रकरणाला लालबहादूर शास्त्री यांनीं खंबीरपणानें तोंड दिलें— सरकारी नौकरींत शीखांवर पक्षपाताचा अन्याय होत आहे, याचा विचार करण्यासाठीं त्यांनीं एक चौकशी समिति नेमली. या समितींत तारासिंगांचा प्रतिनिधि घेतला जाईल या आश्वासनाचा सरकारनें भंग केला आहे यासबबी-खालीं तारासिंगांनीं समितीवर बहिष्कार जाहीर केला. पण या आरोपाचा पंडित नेहरूंनीं ताबडतोब इन्कार केला.

चौकशी समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि तारासिंगांच्या आरोपाचा फुगाच फुटला. पंजाबचें राज्यसरकार व भारतसरकार यांत शीखांना प्रमाणा-पेक्षां अधिक प्रमाणांत नौकऱ्या मिळाल्या आहेत असें चौकशी समितीनें सिद्ध केलें.

तारासिंगांच्या उपवासालाहि लालबहादुरांनीं महत्त्व दिलें नाहीं. भारतसरकारनें या उपवासाची दखल घेतली नाहीं. उपवास ४० दिवस चालला आणि शेवटीं आपोआप सुटला. महात्माजींनींहि म्हणे एका वेळीं इतक्या दिवसांचा उपवास केलेला नव्हता ! लोकांनाहि या उपवासाचा कंटाळा आला होता. अखेर उपेक्षेनें आणि दुर्लक्षानें अकाली चळवळे थंड पडले. त्यांच्यांत फूट पडली. तारासिंगांचें नेतृत्व संत फत्तेसिंगांच्या नव्या गटानें धुडकावून लावलें. सतत १४ वर्षें अप्रति-हतपणें चालू असलेली तारासिंगांची मिरासदारी संपली.

पंजाबी सुभा मान्य न केल्यास आपण यमुना नदीला आग लावूं असा तारासिंग वारंवार दम देत असत. पण लालबहादूर यांनीं हें प्रकरण कायमचें संपविलें. या चळवळीचा वींमोड करण्यांत पंजाबच्या कैरों मंत्रिमंडळानें पुष्कळ मदत केली.

अकाली लोकांच्या दडपणाला पंजाबचे मुख्य मंत्री प्रतापसिंग कैरों बळी पडले नाहींत. त्यांच्या कणखरपणामुळें आणि कौशल्यामुळें या चळवळीचा बींमोड झाला. यशामागून यश व अपयशामागून अपयश हा सृष्टीचाच सिद्धांत आहे. कैरोंच्या भक्कम पाठिंब्यामुळें भारतसरकारचें कणखर स्वरूप अकाली बंडखोरांना कळून चुकलें. तारासिंगांचें पानिपत झालें.

# ११

## प्रगतिपथावर

मित्र कसे मिळवावे आणि लोकांना वश कसें करून घ्यावें या डेल कार्नेजीच्या तत्त्वांचें सगुण स्वरूप म्हणजे लालबहादूर शास्त्री. त्यांना शत्रु तर नाहींच पण आपल्या सान्निध्यांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें तन व मन आकर्षित करून घेण्याचा गुण त्यांच्याजवळ आहे. त्यांचा सुस्वभाव आणि मनमिळावूपणा हें त्यांच्या हातचें प्रभावी शस्त्र आहे. कोणत्याहि प्रश्नाकडे तिऱ्हाईत नजरेनें पाहण्याचें त्यांचें कसब हा त्यांचा हुकमी एक्का आहे.

गृहमंत्रिपदाच्या सुरुवातीच्या काळांतील गोष्ट. भारत सरकारच्या कारभारांत इंग्रजीऐवजीं हिंदीचा वापर व्हावा, हें दाक्षिणात्यांना मंजूर नव्हतें. त्यांची ही तक्रार रास्त होती. लालबहादूर यांनीं ही तक्रार त्वरित व निःसंकोचपणानें मान्य केली.

उत्तर हिंदुस्थानांतील आणि विशेषेंकरून हिंदीचें आगर असलेल्या ठिकाणाहून येणाऱ्या लालबहादुरांनीं ही गोष्ट मान्य करावी याचें अर्थातच दाक्षिणात्यांना कौतुक वाटलें. लालबहादुरांना त्यांचा हार्दिक पाठिंबा मिळाला. नेहरूंनंतर पंतप्रधानाच्या निवडणुकीच्या वेळीं शास्त्रींना दक्षिणेकडील पुढाऱ्यांचा पाठिंबा मिळण्याचें हें एक कारण कां असूं नये ?

१९६२ च्या सप्टेंबरमध्यें तिरुपति येथें भरलेल्या अखिल भारतीय युवक परिषदेच्या ५ व्या अधिवेशनाच्या वेळीं शास्त्रींचें भाषण झालें. या अधिवेश-

नाला दक्षिण भारतीय मोठ्या संख्येनें हजर होते. शास्त्रीजी म्हणाले–" हिंदीचा प्रथम सर्वत्र प्रसार झाला पाहिजे. आपल्या देशांतील लोकांनीं ती शिकली पाहिजे, तोंपर्यंत इंग्रजीशिवाय दुसरें माध्यम असूं शकणार नाहीं. व्यापार व राज्यकारभार यांसाठीं, तसेंच दोन राज्यांच्या उपयोगासाठीं इंग्रजीचाच वापर करावा लागेल. भारतांतील सर्व राज्यांत सर्वसाधारणपणें आज इंग्रजीचाच वापर करण्यांत येत आहे."

त्याच वर्षाच्या एप्रिल महिन्यांत लालबहादूर शास्त्री यांनीं लोकसभेंत ऑफिशिअल लँग्वेजेस बिल मांडलें. जानेवारी १९६५ नंतर भारत सरकारच्या कारभारांत आणि लोकसभेच्या कार्यांत हिंदीबरोबर इंग्रजीचाहि वापर करण्यास हरकत नाहीं, असें या बिलांत म्हटलें होतें. (जानेवारी १९६५ पर्यंत हिंदी ही भारताची भाषा व्हावी, असा घटनेनें आदेश दिला आहे.)

भारताची राष्ट्रभाषा हिंदी झाल्यास केंद्रसरकारच्या नोकऱ्या मिळणें आपणास अवघड जाईल, अशी दक्षिण भारतीयांना जी भीति वाटत होती, ती भीति या बिलानें दूर झाली.

पण यासाठी सुरू झालेल्या द्रविड मुन्नेत्र कझगम चळवळीला मात्र लालबहादुरांनीं कणखरपणानें तोंड दिलें. अशा राष्ट्रविरोधी कारवाईची भारत सरकार कधींहि गय करणार नाहीं, असें या चळवळीचे नेते अन्नादोराई व त्यांचे हस्तक यांना त्यांनीं स्पष्टपणें बजावलें. ही त्यांची धमकी पोकळ नव्हती. भारतापासून फुटून जाण्याचे कोणतेहि प्रयत्न म्हणजे देशद्रोह होय असें बिल लौकरच भारत सरकारनें आणलें. २ मे १९६३ रोजीं कायदामंत्री श्री. अशोक सेन यांनीं हें बिल मांडलें. या बिलान्वयें घटनेच्या १९ व्या कलमांत योग्य त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या.

केरळांत कॉंग्रेस व समाजवादी यांचें संमिश्र मंत्रिमंडळ अधिकारावर होतें. या मंत्रिमंडळांत मतभेद होते. लालबहादुरांनीं ते मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांस यश आलें नाहीं. शिक्षणखातें कोणाकडे असावें याबद्दल विशेषें-करून वाद होता. प्रजासमाजवादी पक्षाचे मंत्री श्री. पट्टम ताणू पिल्ले यांच्याकडून हें खातें काढून घेऊन कॉंग्रेसचे दुय्यम मुख्यमंत्री श्री. आर. शंकर यांजकडे देण्यांत यावें आणि सरकारला सल्ला देण्यासाठीं एक सर्वपक्षीय मंडळ असावें असा शास्त्रींनीं या प्रकरणीं सल्ला दिला होता. मंत्र्यांविरुद्ध करण्यांत

आलेल्या लांचलुचपती वगैरे गंभीर आरोपांचा निर्णय पंतप्रधानांनी द्यावा अशी शास्त्रींची सूचना होती.

शास्त्रीजींच्या या सूचना व्यवहार्य होत्या, पण केरळमधील राजकारणाचें प्रकरणच इतकें विकोपाला गेलें होतें कीं आणीबाणीची व कडक शस्त्रक्रिया केल्याशिवाय हा रोग बरा होणारा नव्हता. केरळमधील मंत्रि मंडळांत या वेळीं एकूण ११ मंत्री होते. त्यांपैकीं ८ काँग्रेसचे व ३ प्रजासमाजवादी होते. मुख्यमंत्री मात्र प्रजासमाजवादी पक्षाचे होते. अशा वेळीं कुत्र्याच्या शेपटीनें कुत्र्याला हुकूम द्यावा, आणि तो कुत्र्यानें मानला नाहीं कीं मतभेद व तंटे निर्माण व्हावेत असा प्रकार घडूं लागला.

महत्त्वाच्या प्रत्येक प्रश्नावर मुख्य मंत्र्यांनीं काँग्रेस पक्षाचे दुय्यम मुख्य मंत्र्यांचा सल्ला घेतला पाहिजे, असा काँग्रेसमंत्र्यांचा आग्रह होता, पण मुख्य मंत्र्यांनीं ही सूचना फेटाळून लावली. या बाबतींत समेटाचे प्रयत्न झाले. वरवर तंटे मिटल्या-सारखे वाटले, पण परस्परांवरील अविश्वास आणि थंडें युद्ध यांमुळें तो समेट बारगळला. शेवटीं मुख्य मंत्री पट्टम ताणू पिल्ले यांची पंजाबचे गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यांत आली आणि त्यांच्या जागीं आर. शंकर यांना मुख्य मंत्री करण्यांत आलें, तेव्हां हा पेचप्रसंग सुटला.

मुंबईंतहि या वेळीं एक प्रकरण निर्माण झालें होतें. मुंबई प्रदेश काँग्रेस समितींत वादळ उठलें होतें. १९६२ मधील निवडणुकांनंतर श्री. स. का. पाटील व श्री. कृष्ण मेनन यांच्यांत मतभेद उत्पन्न झाले होते.

पण हीं प्रकरणें निपटीत असतांहि लालबहादूर यांनीं आपल्या खात्याकडे दुर्लक्ष केलें नाहीं. सरकारी कामकाजांत निष्कारण होत असलेला कालक्षेप थांबविणें, लांचलुचपत व नालायकी यांना आळा घालणें यांवर त्यांनीं उपाय योजले. एक मध्यवर्ती चौकशी समिति स्थापन करण्यांत आली. देशांतील व सरकारी जीवनांत निर्माण झालेली लांचलुचपतीची प्रवृत्ति नाहींशीं करण्यासाठीं श्री. संतानम् यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमण्यांत आलें. मागासलेल्या जातींतील लोकांचें सामाजिक व आर्थिक जीवन सुधारण्याकरितां गृहखात्याच्या विद्यमानें एक अखिल भारतीय बोर्ड स्थापन करण्यांत आलें.

भारतांत राष्ट्रीय एकात्मकता बाणावी ही या वेळीं एक आत्यंतिक गरज होती. म्हणून शास्त्रींनीं या प्रश्नाकडे लक्ष दिलें. नवी दिल्ली येथें राष्ट्रीय एका-

त्मता परिषद त्यांनीं बोलावली. या परिषदेसाठीं सर्वपक्षीय सभासदांना निमंत्रणें पाठविण्यांत आलीं होतीं. २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत चाललेल्या या परिषदेचें अध्यक्षस्थान पंतप्रधानांनीं स्वीकारलें होतें. सरकार व जनता या दोघांच्याहि दृष्टीनें आवश्यक असलेल्या या विषयाची या परिषदेंत सर्वांगीण चर्चा झाली.

देशांत पुन्हा एकदां ठाईठाईं फुटीर वृत्ति दिसून येऊं लागली होती. प्रादेशिक, भाषिक व जातीय वृत्ति सर्वत्र उफाळून येऊं लागल्या होत्या. म्हणून या परिषदेनें राष्ट्रीय एकात्मता समिति या नांवाची एक कायमची समिति निर्माण केली. विश्वविद्यालयीन शिक्षणांतील माध्यमाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं संपूर्णानंद समिति, जातीयवादाचा विचार करण्यासाठीं अशोक मेहता समिति आणि प्रादेशिक फुटीर वृत्तीचा विचार करण्यासाठीं सी. पी. रामस्वामी अय्यर समिति अशा तीन समित्याहि नेमण्यांत आल्या.

१७ ऑगस्ट १९६२ रोजीं मध्यवर्ती समितीची दुसरी बैठक भरली. राष्ट्रीय एकात्मता समितीच्या प्रादेशिक समितीचे सभासद व निरनिराळ्या राज्यांचे मुख्य मंत्री या सभेस हजर होते. लालबहादूर शास्त्री या सभेचे अध्यक्ष होते. भाषिक आणि इतर अल्पसंख्याकांसाठीं संरक्षणें निर्माण करण्याच्या बाबतींत निश्चित प्रगति होऊं लागलेली आहे, असा दिलासा त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत दिला.

पण या सर्वच प्रश्नाला अचानकपणें कलाटणी मिळाली. १९६२ च्या ऑक्टोबरमध्यें चीननें भारतावर आक्रमण केलें. या आक्रमणामुळें जनतेमध्यें राष्ट्रीयत्वाची आणि देशभक्तीची अशी एक प्रचंड लाट उसळली कीं राष्ट्रीय एकात्मता समितीची गरज राहिली नाहीं. भारत हा राजकीयदृष्ट्या एक आहे, तो कणखर आहे, खंबीर आहे याचें दर्शन या निमित्तानें जगाला घडलें.

रामस्वामी अय्यर समितीनेंहि आपलें काम संपवलें. समिति आपल्या अहवालांत म्हणते कीं, " चिनी आक्रमणामुळें भारतीय जनतेचें देशप्रेम आणि मातृभूमीबद्दल भक्ति यांचें दर्शन घडलें आहे. भारताच्या उत्तर सरहद्दीवरून आलेल्या या हल्ल्यामुळें सर्व नागरिक एक झाले आहेत. साहसवृत्ति आणि त्याग हे भारताचे गुण ठाईठाईं प्रकट होतात. "

फुटीर वृत्ति हा राजद्रोह समजण्यांत यावा अशी घटनेच्या १९ व्या कलमांत

दुरुस्ती करण्यांत यावी अशी समितीनें शिफारस केली.

अशोक मेहता समितीहि विसर्जन पावली. समिति आपल्या अहवालांत म्हणते, " आपण एक राष्ट्र आहों अशी भूमिका चिनी आक्रमणानंतर साऱ्या भारतांत आम्हांस आढळून आली आहे. या आक्रमणामुळें संकुचित वृत्ति नष्ट झालेली आहे. निराशा आणि स्थानिक राजकारणें यांच्या जागीं उत्साह, त्याग जागृत झालेला आहे. चीनच्या पाशवी आक्रमणाचा निर्धारानें प्रतिकार करण्याचा आणि आपलें स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा भारताचा निर्धार सर्वत्र नजरेस येत आहे."

पण चीनचें आक्रमण झाल्यानंतर त्याला तोंड देण्यासाठीं आपली कसलीहि तयारी नाहीं हें पाहून राष्ट्राला धक्का बसला. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी हातीं असलेल्या संरक्षणमंत्र्यांवर साहजिकपणेंच जनता क्षुब्ध झाली. जनतेच्या प्रभावी दडपणामुळें कृष्ण मेनन यांना संरक्षणमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. आजवर प्रत्येक वेळीं पं. नेहरू कृष्ण मेनन यांच्या साहाय्यासाठीं धांवून येत, पण या वेळीं लोकमतच इतकें खवळलें होतें कीं, त्याविरुद्ध जाणें पंडितजींना शक्यच नव्हतें.

२६ ऑक्टोबर १९६२ रोजीं राष्ट्राध्यक्षांनीं एक वटहुकूम काढून देशांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं जारी केलेल्या भारत संरक्षण कायद्याचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. वटहुकुमान्वयें सरकारला कोणतेहि वटहुकूम काढतां येत वा नियम जारी करतां येत.

वास्तविकरीत्या ह्या वटहुकुमानें राष्ट्राच्या जीवनांतील सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यांत आलें होतें. मालमत्ता व वाहतुकीचीं साधनें ताब्यांत घेणें, सेवेची सक्ति करणें, राजकीय पक्षांवर बंदी घालणें, नागरिकाला स्थानबद्ध करणें, वृत्तपत्रांवर नियंत्रणें लादणें, वस्तूंच्या किंमती ठरविणें हे सारे अधिकार सरकारनें आपल्याकडे घेतले. राष्ट्रीय संरक्षणमंडळ, व नागरिक समिति यांची स्थापना करून सरकारी व बिनसरकारी पातळींवरून युद्धप्रयत्नांची पराकाष्ठा करण्यांत आली.

आणीबाणीच्या या प्रसंगीं सर्व व्यवस्था ठेवण्याचें काम गृहमंत्री या नात्यानें लालबहादुरांकडेच आलें. १ डिसेंबर रोजीं चीननें युद्ध थांबविलें आणि आपलें सैन्य भारतीय हद्दींतून काढून घेतलें, पण धोका संपला नसल्यानें आणीबाणी चालूच होती. सरकार व जनता यांचें मतहि अनुकूल होतें.

वाइटांतूनहि कधीं कधीं चांगलें निघतें म्हणतात. चीनच्या आक्रमणानें दोन चांगल्या गोष्टी घडल्या. या आक्रमणामुळें राष्ट्रीय ऐक्य व देशप्रेम या दोन गोष्टी अधिक जागृत झाल्या. ही जागृति कायम टिकावी अशी सर्वांचीच इच्छा होती.

शिवाय प्रत्यक्ष युद्ध जरी थांबलेलें असलें तरी तें संपलेलें नव्हतें. चिनी सैन्य भारताच्या सरहद्दीपलीकडे खडें होतें आणि तें केव्हांहि चालून येण्याची शक्यता होती. म्हणून आणीबाणीची परिस्थिति चालूच ठेवावी लागली. युद्ध चालू नव्हतें खरें, पण युद्धप्रयत्न व युद्धाची तयारी चालू ठेवणेंच प्राप्त होतें. राज्यकर्त्यांना तें कठीण जात होतें. अशा परिस्थितींत लालबहादूर यांनीं असामान्य कर्तृत्व दाखविलें. जेथें आवश्यकता असेल तेथें ते खंबीर राहात. भारत-संरक्षण कायद्याचा त्यांनीं संयमपूर्वक व उदार वृत्तीनें वापर केला. वृत्तपत्रें व राजकीय पक्ष यांना त्यांनीं पूर्वीइतकेंच उच्चारस्वातंत्र्य दिलें, पण ज्यांनीं राष्ट्र-द्रोही व चीनच्या बाजूनें मतें प्रकट केलीं, त्यांची त्यांनीं गय केली नाहीं. चीनच्या बाजूला असणाऱ्या कम्युनिस्टांना अटक करून एक संकट त्यांनीं टाळलें.

३ फेब्रुवारी १९६३ रोजीं लालबहादूर यांनीं अंदमानला भेट दिली. त्या बेटाला भेट देणारे ते पहिलेच गृहमंत्री होत.

मार्च १९६३ मध्यें त्यांनीं नेपाळला दिलेली भेट म्हणजे त्यांच्या राजकारण-पटुतेचें एक बोलकें गमक होय. या वेळीं भारत व नेपाळ यांतील राजकीय संबंध दुरावल्यासारखे झाले होते. नेपाळ पाकिस्तान व चीन यांच्या बाजूला झुकतो कीं काय अशी शंका येऊं लागली होती. नेपाळी वृत्तपत्रें व नेपाळी पुढाऱ्यांचीं भाषणें यांतून भारताविरुद्ध गरळ ओकण्यांत येत होतें. गृहमंत्र्यांचें नेपाळमधील पहिलें स्वागत कांहींसें कोरडेंच झालें, पण त्यांनीं नेपाळांत पाऊल ठेवतांच त्यांच्या सौजन्यानें आणि स्नेहशील वृत्तीनें शंकाकुशंकांचे काळे ढग वितळूं लागले.

नेपाळचे राजे महेंद्र, मंत्रिमंडळाचे अध्यक्ष तुलसी गिरी व नेपाळचे गृहमंत्री विश्वबंधु थापा यांचेशीं शास्त्रींनीं बोलणीं केलीं. हीं बोलणीं स्नेहभावानें व परस्परांविषयींच्या आदरयुक्त भावनेनें झालीं. तीं उपयुक्त व फलदायी झालीं असें खुद्द लालबहादूर यांनीं या भेटीसंबंधीं बोलतांना सांगितलें. परस्परांविषयींचे गैरसमज दूर करण्याचा दोन्हीं बाजूंकडून प्रामाणिक प्रयत्न झाला असे उद्गार तुलसी गिरी यांनीं काढले. ज्या ज्या प्रश्नांवर चिडाचीड झाली होती, त्या

सर्वांचा मोकळेपणानें ऊहापोह झाला.

बोलणीं संपल्यानंतर ५ मार्च रोजीं लालबहादूर यांनीं वृत्तपत्रांना निवेदन दिलें. ते म्हणाले —

" भावी प्रगतीच्या बाबतींत मीं आशा बाळगून आहें. या दोन्ही देशांतील परस्परसंबंध सुधारतील अशी मला उमेद आहे. भारत व नेपाळ यांत आर्थिक सहकार्य अधिक प्रमाणावर झालें पाहिजे असें मला वाटतें. "

" या बाबतींत अजून कांहीं गैरसमज शिल्लक राहिले आहेत काय, " असें एका नेपाळी वृत्तपत्रप्रतिनिधीनें लालबहादुरांना विचारलें. लालबहादूर म्हणाले,

" याविषयीं न बोलणें बरें. दोन्ही देश आज जवळ येण्याचा प्रयत्न करीत आहेत अशा वेळीं जुन्या गोष्टी कां उगाळाव्या ? भारत व नेपाळ यांत अधिक जवळीक निर्माण होईल अशी कार्यवाही तुम्हीं करा. "

नेपाळचें पारडें चीनकडे झुकत आहे काय, असा आणखी एक प्रश्न त्यांना विचारण्यांत आला. शास्त्री म्हणाले, " या बाबतींत मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. तो पूर्णपणें नेपाळच्या अखत्यारींतला प्रश्न आहे. "

नेपाळ हें एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र आहे याची लालबहादूर यांना जाणीव होती. या राष्ट्राबद्दल त्यांना अतीव सहानुभूति वाटत होती व हें त्यांच्या प्रत्येक शब्दाशब्दांतून दिसून येत होतें.

भारताच्या सहकार्यानें नेपाळमध्यें त्रिशुळी हायडेल व इतर योजना हातीं घेण्यांत आल्या होत्या. त्यासंबंधीं विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतांना लालबहादूर म्हणाले, " ही मदत नव्हे; आमच्या शेजारच्या राष्ट्राच्या आवश्यक अशा आर्थिक प्रगतीसाठीं भारतानें दिलेलें तें सहकार्य आहे. हें सहकार्य अधिक जोमानें दिलें पाहिजे व नेपाळमध्यें आर्थिक सुधारणा झपाट्यानें झाल्या पाहिजेत. "

या वाटाघाटींनंतर उभय राष्ट्रांतर्फे एक संयुक्त पत्रक काढण्यांत आलें. भारत व नेपाळ यांत भौगोलिक, सांस्कृतिक व पारंपरिकदृष्ट्या अभेद्य असे संबंध निर्माण होणें अगत्याचें आहे, असें या पत्रकांत म्हटलें होतें. जागतिक परिस्थिति व सद्यस्थिति याबाबतच्या सर्व प्रश्नांवर साधकबाधक चर्चा झाली, असा या पत्रकांत उल्लेख करण्यांत आला होता. या दोन्ही देशांत ऐक्य व सलोखा नांदला पाहिजे आणि मनमोकळेपणानें चर्चा करून दोन्ही देशांतील मतभेद

मिटवितां येणें शक्य आहे, असा निर्वाळा या पत्रकान्वयें देण्यांत आला होता. पत्रकांत पुढें म्हटलें होतें, " भारत व नेपाळ हीं दोन स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रें आहेत. आणि नेपाळशीं घनिष्ठ संबंध असलेल्या भारताला मैत्रीखेरीज कशा-चीहि अपेक्षा नाहीं, हें भारताच्या गृहमंत्र्यांनीं या चर्चेच्या वेळीं निःसंदिग्धपणानें सांगितलें. "

भारत व नेपाळ यांच्या संबंधांत वर व्यक्त केलेली गृहमंत्र्यांची भावना हीच या चर्चेचा गाभा होती.

भारत आपल्यावर कुरघोडी करीत आहे, आपल्यासारख्या लहान राष्ट्राचें सार्वभौमत्व भारताला मंजूर नाहीं असें नेपाळला वाटत होतें. त्यांतूनच गैरसमज निर्माण झाले. हे गैरसमज दूर झाल्यानंतर भारताबद्दलची नेपाळची शंका नाहींशी होणें हें क्रमप्राप्त होतें. खाटमांडूचीं यशस्वी बोलणीं हा शास्त्रींचा आणखी एक विजय होता. ते तेथें चार दिवस राहिले होते. या चार दिवसांत त्यांनीं स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले. शंकाकुशंकांचा अडसर दूर झाला. पूर्वींचे सलोख्याचे व खेळीमेळीचे संबंध पुन्हा प्रस्थापित झाले.

ऑगस्ट १९६३ मध्यें कामराज योजना अमलांत आली. लालबहादूर व इतर पांचजणांनीं पंतप्रधानांकडे आपले राजीनामे सादर केले. काँग्रेसच्या संघटनेच्या कामीं स्वतःला वाहून घेण्याचें त्यांनीं ठरविलें. कारण कामराज योजनेचा तोच हेतु होता.

काँग्रेसची संघटना खिळखिळी होऊं लागली होती आणि काँग्रेसश्रेष्ठींना त्या बाबत काळजी वाटूं लागली होती. बुद्धिवान् व कर्तबगार व्यक्तींनीं अधिकाराच्या जागा अडवाव्या आणि दुय्यम-तिय्यम दर्जाच्या नेत्यांकडे संघटनेचें कार्य यावें यामुळें ही परिस्थिति निर्माण झाली आहे असें त्यांचें मत होतें. यामुळें एका बाजूला सत्तेसाठीं स्पर्धा, तर दुसरीकडे बेशिस्तीचा फैलाव असा प्रकार दृष्टोत्पत्तीस येत होता. यामुळें राज्यांतहि बखेडे माजूं लागले होते.

काँग्रेसनेते जनतासंपर्कापासून दूर जात होते ही गोष्टहि चिंताजनक होती.

या प्रकाराला आळा घालणें हें कामराज योजनेचें उद्दिष्ट होतें. मंत्रिमंडळा-तील श्रेष्ठ व्यक्तींनीं आपापलीं अधिकारपदें सोडावींत आणि काँग्रेस संघटना, जनतासंपर्क, काँग्रेसचें कार्य, ध्येय व धोरणें जनतेला समजावून सांगणें, हीं कामें करावींत अशी या योजनेची मूळ कल्पना होती.

यापूर्वी कांहीं महिने पाटणा येथें भरलेल्या एका जाहीर सभेंत ओरिसा काँग्रेसचे अध्वर्यु बिजू पटनाईक यांनीं या योजनेची प्रथम माहिती दिली. ते म्हणाले, " जून १९३३ मध्यें ही योजना तयार झाली. रांची येथें ओरिसा, पश्चिम बंगाल व बिहार या राज्यांचे मुख्य मंत्री यांची बैठक भरली होती. काँग्रेसचे त्या वेळचे अध्यक्ष संजीवय्या अध्यक्षस्थानीं होते. बिहारमधील झारखंड पक्षाचा यांत समावेश करण्याचा विचार या बैठकींत होणार होता. त्या अनुषंगानें काँग्रेस संघटना बलिष्ठ करण्यासंबंधीं विचारविनिमय झाला. काँग्रेसमध्यें बोकाळलेली अधिकारलालसा आम्हांला थांबवावयाची होती, म्हणून आम्ही कांहीं जणांनीं अधिकारसंन्यास घ्यावा असें ठरविलें व आमचें हें मत पंतप्रधानांकडे पाठविलें. नेहरूंना ही कल्पना पसंत पडली. कामराज व इतर काँग्रेस पुढारी यांचीं या बाबतींत मतें अजमावण्यांत आलीं आणि योजनेला मूर्त स्वरूप आलें. "

कामराज योजनेन्वयें मध्यवर्ती मंत्रिमंडळांतील ज्येष्ठ मंत्री, राज्यांतील मुख्य मंत्री व त्यांचीं मंत्रिमंडळें यांनीं आपापल्या जागांचे राजीनामे पंतप्रधानांच्या हातीं दिले. त्यांतील केंद्रीय मंत्रिमंडळापैकीं ६ व राज्यांतील मंत्रिमंडळांतील सहा असे बाराजणांचे राजीनामे पंडित नेहरूंनीं मंजूर केले.

लालबहादूर शास्त्री यांचें नांव मूळच्या यादींत नव्हतें, पण त्यांनींच आग्रह धरल्यानें त्यांचा राजीनामा स्वीकारण्यांत आला. लालबहादूर हे मंत्रिमंडळांत आवश्यक आहेत, त्यांना मुक्त करणें इष्ट होणार नाहीं, असें नेहरूंना वाटत होतें. पण लालबहादूर यांचा निग्रह पाहून शास्त्रींचा राजीनामा त्यांना नाइलाजानें स्वीकारावा लागला.

आपल्या नांवानें प्रख्यात झालेल्या या योजनेची माहिती भुवनेश्वर येथें खुद्द कामराजांनींच दिली. ते म्हणाले, " स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळांत नेत्यांचें मार्गदर्शन काँग्रेसला मिळत असे. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यकारभार चालविण्याची केंद्रसरकारांतील व राज्यसरकारांतील जबाबदारी काँग्रेसला उचलावी लागली. ही जबाबदारी उचलल्यामुळें या नव्या स्वतंत्र राष्ट्राचा पाया भक्कम झाला हें खरें, पण काँग्रेस मात्र ज्येष्ठ अशा नेत्यांच्या मार्गदर्शनाला मुकली. या परिस्थितींत मला एकच मार्ग दिसतो. काँग्रेसच्या नेत्यांनीं मधूनमधून अधिकाराच्या जागा सोडून काँग्रेस संघटनेंत काम करावें. त्यांनीं आपण होऊन हा फेरबदल मान्य केला, तर अधिकारवादी आणि कार्यवादी असे काँग्रेसमध्यें जे दोन तट

दिसतात, ते नाहींसे होतील. "

कामराजांची ही सूचना सर्वांनीं उचलून धरली. ज्येष्ठ नेत्यांना अधिकार-पदांपासून मुक्त करून कॉंग्रेसकार्याला उपलब्ध करून देण्याचें तत्त्व अखिल भारतीय कॉंग्रेस समितीनें आपण होऊन मान्य केलें. त्यामुळें हें अवघड काम सोपें झालें.

याबाबत बोलतांना कामराज म्हणाले, " स्वातंत्र्यलढ्याच्या वेळीं कॉंग्रेस-वाल्यांनीं जी त्यागाची भूमिका घेतली होती, ती अजून कायम आहे, याचा मला अभिमान वाटतो. देशाला जरूर लागेल त्या वेळीं कॉंग्रेसवाले आपले अधिकार अथवा आपली सत्ता सोडून देण्यास तयार होतील, ही गोष्टहि या निर्णय मुळें स्पष्ट झाली. "

कामराज यांचें हें भविष्य शंभर टक्के खरें ठरलें नाहीं. ज्या कॉंग्रेसवाद्यांनीं अधिकारपदें सोडलीं, त्यांनीं कॉंग्रेसकार्याला वाहून घेतलें, असें म्हणतां येणार नाहीं. उलट त्यांच्याजवळ असलेला वेळ आणि शक्ति प्रदेश कॉंग्रेसमध्यें लाथाळ्या निर्माण करण्यांतच ते खर्च करीत आहेत.

कॉंग्रेसश्रेष्ठींनींहि या लोकांचा कॉंग्रेसचें बळ वाढविण्याकडे अथवा जनता-संपर्क वाढविण्याकडे म्हणावा तसा उपयोग करून घेतला नाहीं. वास्तविक कामराज योजनेंतील हा एक महत्त्वाचा भाग होता.

राज्याचा मुख्य मंत्री ज्या वेळीं निवृत्त होई, त्या वेळीं आपला चेलाच आपल्या जागीं येईल आणि राज्यकारभारावर पूर्वीप्रमाणेंच आपला वरचष्मा राहील, अशी खबरदारी घेई. उत्तर प्रदेश आणि पंजाबांत दोन पक्षांची चुरस चालू आहे. राजस्थान, मध्यप्रदेश, केरळ व बिहार येथें गटबाजीचें राजकारण चालू आहे. त्यामुळें अशी शंका येते कीं मध्यवर्ती मंत्रिमंडळांतून मोरारजी देसाई आणि जगजीवनराम यांना बाहेर घालविण्यासाठींच तर कामराज योजना तयार करण्यांत आली नसेल ना ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ वि: ..................
स्थळ ........................ नों दि ..................

# १२

## भुवनेश्वरला काय घडलें ?

जानेवारी ७ ते १० पर्यंत भुवनेश्वर येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या ६८ व्या अधिवेशनावर नेहरूंच्या आजाराची कृष्णछाया पसरली होती. या अधिवेशनाच्या बाबतींत अनेक अपेक्षा होत्या. अध्यक्षस्थानीं कामराजांसारखा जनतेचा प्रतिनिधि असणारा पोलादी पुरुष होता. कॉंग्रेसचें समाजवादी ध्येयधोरण पक्कें करणें, समाजवादाची देशांतील गति वाढविणें आणि समाजवादाला कॉंग्रेसची मान्यता मिळविणें हें या अधिवेशनाचें कार्य होतें.

कॉंग्रेसचें अलीकडील काळांतील हें पहिलेंच अधिवेशन कीं जेथें परिचित आणि प्रभावी असें नेहरूंचें व्यक्तिमत्त्व अधिवेशनाचीं सूत्रें हलविण्यासाठीं व्यासपीठावर हजर नव्हतें. नेहरूंच्या गैरहजेरीमुळें अधिवेशनांत पोकळी निर्माण झाली. प्रेक्षक अस्वस्थ झाले. नेहरूसुद्धां आजारी पडतात, ते आज आहेत, तर उद्यां नसतील, केव्हां तरी त्यांच्याशिवाय आपणांस जगावें लागेल, ही कल्पनाच असह्य व शोकाकुल करणारी होती.

नेहरू आजारी असल्याची बातमी प्रथम ७ जानेवारी रोजीं लोकांत पसरली. विषयनियामक समितींत ती प्रथम बाहेर आली आणि प्रथमच सर्वांना एका महत्त्वाच्या प्रश्नाचा गंभीरपणें विचार करण्याची वेळ आली. "नेहरूंनंतर कोण ?" हा तो प्रश्न होता.

नेहरूंचें व्रत चालविणारा कोणी आढळतो का हें पाहण्यासाठीं गोपबंधु-

नगरांतील कॉंग्रेसजन सर्वत्र भिरीभिरी शोधूं लागले. मोरारजी देसाई? लाल-बहादूर शास्त्री? इंदिरा गांधी?—नेहरूंची जागा कोण घेणार? सर्वत्र दृष्टिक्षेप टाकल्यानंतर जनतेच्या डोळ्यांपुढें कुणाची मूर्ति साकार झाली असेल तर ती वामनमूर्ति लालबहादुरांची!

नेहरूंची प्रकृति अतिशय बिघडली आहे हें वृत्त ७ जानेवारी रोजीं विषय-नियामक समितींत लालबहादूर यांनींच प्रथम सांगितलें. सभा चिडीचिप्प बसली होती. शास्त्री म्हणाले, "आजच्या विषयनियामक समितीच्या बैठकीला पंडितजी आलेले नाहींत. त्यांच्या प्रकृतीसंबंधीं आपणांस माहिती देण्याचें काम कॉंग्रेसच्या अध्यक्षांनीं माझ्यावर सोंपविलें आहे."

नेहरूंच्या प्रकृतीसंबंधीं निघालेलें पत्रक शास्त्रींनीं वाचून दाखविलें. तें भीषण पत्रक असें होतें: "पंतप्रधानांवर गेले कांहीं दिवस कामाचा अत्यंत ताण पडला आहे. त्यामुळें त्यांचा रक्तदाब वाढण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. आज सकाळीं ते फार थकलेले व श्रांत दिसत होते. दिल्ली येथील त्यांच्या नेहमींच्या डॉक्टरांना तांतडीनें बोलावण्यांत आलें आहे. त्यांनीं पंडितजींना तपासलें असून पंडितजींची प्रकृति लौकर सुधारेल, अशी त्यांना आशा वाटत आहे. पण त्यांनीं पंडितजींना पूर्ण विश्रांति घेण्याचा सल्ला दिला असून सध्यां तरी त्यांचे सर्व कार्यक्रम रद्द करावेत असें सुचविलें आहे."

शास्त्री म्हणाले, "पंडितजींना येथें यावयाची उत्कट इच्छा होती, पण आम्हीं सर्वांनीं या विचारापासून त्यांना परावृत्त केलें आहे."

क्षणभर सर्वजण स्तब्ध झाले. आजच्या सभेपुढें नेहरूंनीं मांडावयाचा ठराव महत्त्वाचा होता. लोकशाही व समाजवाद याविषयींचा तो ठराव होता. आतां हा ठराव मांडणार कोण? मंत्रिमंडळांतील नेहरूंच्या खालोखाल स्थान असलेले समाजवादी गुलझारीलाल नंदा? नेहरूंइतके प्रभावी मोरारजी देसाई? छे! हा ठराव मांडणार होते लालबहादूर शास्त्री. पांच महिन्यांपूर्वी मंत्रिमंडळांतून बाहेर पडलेले शास्त्री! ज्यांच्या समाजवादी विचारांबद्दल कृष्ण मेनन व केशव-देव मालवीय या डाव्यांना शंका होती ते लालबहादूर!

अवघ्या दोन आठवड्यांतच लालबहादूर शास्त्री यांना मंत्रिमंडळांत परत बोलावण्यांत आलें. रहस्यावर थोडा थोडा प्रकाश पडूं लागला. त्यांच्याकडे खातें असें कोणतेंच नव्हतें, पण नेहरूंचीं बहुतेक खातीं त्यांनीं पाहावयाचीं होतीं.

६ जानेवारी रोजीं दुपारीं निकरपाऱ्याहून विमानानें निघून नेहरू भुवनेश्वरीं आले. त्या वेळीं ते थकलेले व मलूल दिसले. विमानांतून उतरण्यासहि त्यांना बिजू पटनाईक वगैरेंची मदत घ्यावी लागली. त्यांच्यासाठीं विमानतळावर जमलेल्या एन्. सी. सी.च्या तुकडीनें दिलेली लष्करी सलामी त्यांनीं कष्टाने स्वीकारली.

विमानतळावर स्वागतार्थ आलेल्या मुलांकडे पाहून मात्र त्यांचा चेहेरा खुलला. ध्वजवंदनाच्या समारंभास ते हजर होते, पण थकलेलेच दिसत होते. पण एवढें असूनहि सायंकाळी काँग्रेसच्या एका बैठकीला ते हजर राहिले. ही बैठक तीन तास चालू होती. आंतरराष्ट्रीय प्रश्नासंबंधीं काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनांत मांडावयाचा ठराव या बैठकींत तयार करावयाचा होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते आजारी पडले. ३००० शब्दांचा हा महत्त्वाचा ठराव मांडावयाची जबाबदारी लालबहादुरांवर येऊन पडली. अधिकारवाणीनें आणि अस्खलितपणें ते बोलले. श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध होऊन भाषण ऐकत होता. ते म्हणाले, " लोकशाही समाजवादाचा मार्ग आपण चोखाळला तरच प्रगति आणि सुबत्ता आपणाला लाभेल. अर्थात् हें करतांना व्यक्तीच्या प्रतिष्ठेला मात्र आपण जपलें पाहिजे. काँग्रेस ही लोककारणांत महत्त्वाची संस्था आहे. लोकांनीं आपण होऊन पुढें आलें पाहिजे आणि सरकारनेंहि या कार्यांतला आपला वांटा उचलला पाहिजे आणि खासगी प्रयत्नांना नाहीं म्हटलें तरी मर्यादा असणारच. " ते पुढें म्हणाले— " जनतेचें तत्त्वज्ञान हें केवळ तत्त्वज्ञान नव्हे कीं जादू नव्हे. डाव्यांनीं हें खूप समजून असावें कीं केवळ ध्येयवादानें कार्यसिद्धि होत नसते. त्याला व्यवहारवादाची जोड असावी लागते. असें केलें तरच बहुजनसमाज काँग्रेसच्या पाठीशीं उभा राहील. आपणांपुढें अनेक प्रश्न आहेत. सगळ्या गोष्टी सरकारकडून होणार नाहींत. अन्नधान्याचा प्रश्न घ्या. हा प्रश्न अवाढव्य आहे. तो सरकारला हाताळतां आला नाहीं, तर लांचलुचपत मात्र वाढेल आणि जनतेच्या अडचणींत व संकटांत अधिक भर मात्र पडेल. "

आपल्या भाषणांत टीकाकारांना त्यांनीं चोख उत्तरें दिलीं. त्यांचा दृष्टिकोन व्यवहारी होता. राष्ट्रीयीकरणाबाबत त्यांनीं ठामपणें आपलीं मतें मांडलीं. तांदूळ आणि गिठाच्या गिरण्या सरकारनें आपल्या ताब्यांत घ्याव्या असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. समाजवाद हें साध्य नसून साधन आहे आणि जनतेची परिस्थिति सुधारण्याच्या कामींच त्याचा उपयोग झाला पाहिजे, असें त्यांनीं आपल्या

भाषणांत प्रतिपादन केलें.

काँग्रेसच्या या अधिवेशनाचे अध्यक्ष होते कामराज. ते समाजवादाचे अध्वर्यु. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत परखडपणें आपले विचार मांडले. त्यांचें भाषण रोखठोक होतें आणि सामान्य माणसांच्या समस्या त्यांच्या भाषणांत प्रकर्षानें दिसत होत्या.

मक्तेदारीला आळा घालण्यासाठीं ब्रिटिशांच्या धर्तीवर एक समिति नेमावी, मागासलेल्या जमातींतील लोकांच्या उन्नतीसाठीं स्वतंत्र मंत्री असावा, प्राथमिक शिक्षण सर्वांना मुक्त असावें, अनाथ आणि वृद्ध नागरिकांना निवृत्त वेतन देण्याची व्यवस्था असावी, कर आकारणीची पद्धत सर्वंकष असावी. आर्थिक विषमता नष्ट करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न व्हावेत, जातीय तेढी नाहींशा होऊन भारतांत समाजवादी सत्तेचें रामराज्य व्हावें, अशा त्यांनीं आपल्या भाषणांत बहुमोल सूचना केल्या होत्या.

ज्यांचा लोकशाही व समाजवाद यांच्यावर विश्वास असेल त्यांनीं काँग्रेसला येऊन मिळावें, असें त्यांनीं आपल्या भाषणांत आवाहन केलें. काँग्रेस समाजवादाकडे वळणार नाहीं, असा ग्रह करून घेऊन जे काँग्रेसच्या बाहेर पडले होते, त्यांच्यासाठीं मुख्यत्वेंकरून तें आवाहन होतें. खासगी उद्योगधंद्यांच्या विरुद्ध, काँग्रेसचीं ध्येयधोरणें राहणार नाहींत, असा उद्योगपतींनाह यांनीं आपल्या भाषणांत दिलासा दिला होता.

लोकशाही व समाजवाद या विषयांवरील अधिवेशनांत मांडला जाणारा ठराव हा या अधिवेशनाचा मानदंड होता. हा ठराव एका खास उपसमितीनें तयार केला होता. अन्नधान्य, वस्त्र आणि निवारा, शिक्षण आणि आरोग्य या जनतेच्या किमान जीवनोपयोगी गरजा पुरविण्याची हमी या ठरावानें देण्यांत आली. देशांतील आर्थिक विषमता कमी करण्याचें आश्वासन या ठरावान्वयें देण्यांत आलें.

या ठरावावर तीन दिवस चर्चा झाली. ७० वक्ते बोलले. हा ठराव डावीकडे झुकणारा आहे, अशी काँग्रेसमधील उजव्या गटाची तक्रार होती, तर हा ठराव संदिग्ध आहे असें डाव्यांचें मत होतें. बँकांचें राष्ट्रीयीकरण करणें वगैरेसारखीं निश्चित धोरणें ठरविणें आवश्यक आहे असें ते म्हणत होते.

काँग्रेसच्या घटनेंत दुरुस्ती सुचविणारा एक महत्त्वाचा ठराव होता. पार्लमेंटरी लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेलें, शांततामय आणि घटनात्मक

मार्गांनीं साकारलेलें लोकसत्ताक राष्ट्र भारतांत निर्माण करणें, हें काँग्रेसचें ध्येय आहे, असा हा ठराव होता.

काँग्रेसमधील उजव्या गटाचे अध्वर्यु म्हणून समजले गेलेले श्री. स. का. पाटील यांनीं हा ठराव मांडला, याचें अनेकांना आश्चर्य वाटलें.

भुवनेश्वर येथील मुक्कामांत पंडितजी अंथरुणाला खिळून होते. तेथील कोणत्याहि बैठकीला ते हजर राहूं शकले नाहींत, पण त्यांची इच्छाशक्ति प्रबळ होती, म्हणूनच अवघ्या १॥ महिन्यांत ते पुन्हा कामाला लागले.

२२ जानेवारी रोजीं बिनखात्याचे मंत्री म्हणून लालबहादुरांची नेमणूक जाहीर करण्यांत आली. यासंबंधीं राष्ट्रपतिभवनांतून काढण्यांत आलेल्या पत्रकांत खालील मजकूर होता: " परराष्ट्र खातें, अणुशक्ति आणि मंत्रिमंडळांतील प्रश्न यासंबंधींचे कागदपत्र पाहण्याचें काम लालबहादूर शास्त्री करतील. त्यांच्याकडे खास असें कोणतेंच खातें देण्यांत आलेलें नाहीं. पंतप्रधानांच्या सल्ल्यानें व त्यांच्या आज्ञेनुसार हीं कामें ते पाहतील. "

२६ डिसेंबर १९६३ रोजीं श्रीनगर येथील हझरतबाल मशिदींतून महंमद पैगंबर यांचा केस चोरीला गेला होता. हा केस अर्थातच एक पवित्र वस्तु होती आणि तो चोरीला गेल्यामुळें सर्वत्र खळबळ माजली होती. मंत्रिपदाचीं सूत्रें हातीं घेतल्याबरोबर लालबहादुरांना प्रथम या घटनेकडे आपलें लक्ष द्यावें लागलें. शेख अबदुल्ला पक्षीय, पाकिस्तान्यांचे बगलबच्चे आणि बक्षी गुलाम महंमद यांचे विरोधक यांनीं या प्रकरणीं राळ उडविण्यास सुरुवात केली. परिस्थितीचा त्यांना फायदा घ्यावयाचा होता. त्यांनीं एक कृतिसमिति स्थापन केली. बक्षी गुलाम महंमद यांचें मंत्रिमंडळ उलथून पाडणें, शेख अबदुल्ला यांची मुक्तता करणें आणि काश्मिरांत सार्वत्रिक मतदानाची मागणी करणें हें या कृतिसमितीचें उद्दिष्ट होतें.

पण लालबहादूर यांचें कौशल्य आणि भारत सरकारचें गुप्तचर खातें यांच्या साहाय्यानें अवघ्या आठ दिवसांत म्हणजे ४ जानेवारी रोजीं तो पवित्र केस सांपडला. गृहखात्याचे चिटणीस श्री. व्ही. विश्वनाथन् यांनीं ताबडतोब श्रीनगरला जाऊन चौकशीचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. गुप्तचरांचा ससेमिरा असह्य झाल्यानें ज्यांनीं हा केस चोरला होता, त्यांनींच तो परत मूळच्या जागेवर नेऊन ठेवला.

हा केस ज्यांनीं पाहिला होता, त्या सर्वांना केस दाखवून तो खरा असल्याची त्यांनीं ग्वाही दिली. या प्रकरणीं चौकशी पुरी झाल्यांबरोबर अपराध्यावर खटले भरले जातील, अशी गृहखात्यातर्फे घोषणा करण्यांत आली.

पण या घोषणेनें कृतिसमितीचें समाधान झालें नाहीं. आपण नियुक्त करूं त्यांनीं जाहीरपणें या केसाच्या खरेपणाबद्दल ग्वाही दिली पाहिजे, असा त्यांनीं पुकारा केला. काश्मीर सरकार व भारत सरकार यांनीं या पोरकट सूचनेला थारा दिला नाहीं, हें सांगणें नकोच. कारण या निमित्तानें कृतिसमितीला आगींत फक्त तेल ओतावयाचें होतें.

अशा पार्श्वभूमीवर लालबहादुरांचें मंत्रिपद सुरू झालें. काश्मीरला जाण्यापूर्वी त्यांनीं पंडित नेहरूंशीं दीर्घकाळ चर्चा केली. काश्मीरमधील हा चिखल धुऊन टाकण्यासाठीं आणि काश्मीरमध्यें उदारमतवादी सरकार स्थापन करण्यासाठीं त्यांनीं नेहरूंची संमति घेतली. पंडितजींनीं त्यांच्या हातीं या प्रकरणासंबंधींचे सर्व अधिकार सुपूर्त केले.

३० जानेवारी रोजीं शास्त्री श्रीनगरमध्यें येऊन दाखल झाले आणि झपाट्यानें त्यांनीं कामास सुरुवात केली. कृतिसमितीशीं त्यांनीं वाटाघाटी सुरू केल्या. त्या समितींत जे विचारवंत व जबाबदार लोक होते, त्यांचीं मनें शास्त्रींनीं वळविली.

मौलाना महमद सईद मसूदी हे एक शांत जबाबदार गृहस्थ समितीचे सभासद होते. त्यांच्या शब्दाला वजन होतें. त्यांच्याशीं शास्त्रींनीं दीर्घकालपर्यंत बोलणीं केलीं. मसूदी यांचें समाधान झालें. त्यांनीं एक पत्रक काढलें. ३ फेब्रुवारी रोजीं सांपडलेल्या अस्सल केसाचे जाहीर दर्शन घेण्याची सोय करण्यांत येईल, असें या पत्रकांत म्हटलें होतें. या प्रकारास शास्त्रींचा प्रथम विरोध होता. पण केस अस्सल आहे कीं नाहीं हें ठरविण्याचें काम कृतिसमितीच्या कांहीं मौलवींकडे सोंपविण्यांत यावें असा समेट झाला.

ठरल्याप्रमाणें दीदार झाला. दीदार म्हणजे दर्शन. मौलवी आणि पीर मिळून १७ जणांनीं तो केस लक्षपूर्वक पाहिला आणि तो अस्सल असल्याचा निर्वाळा दिला. या प्रसंगाला स्वतः शास्त्रीजी हजर होते परीक्षा एक तासभर झाली. निर्णय जाहीर होतांच सर्वत्र आनंदाचें साम्राज्य पसरलें.

या प्रकरणीसुद्धां लालबहादूर यांचें धैर्य आणि अंतःस्फूर्ति यशस्वी झाली. धोका मोठा होता, विश्वनाथन् चिंताक्रांत होते. पण लालबहादुरांनी शर्यत जिंकली,

त्याबरोबर विरोधकांचीं मनेंहि !

चार आठवडे चालू असलेला धुमाकूळ थांबला. सर्वांचें समाधान झालें. भारत सरकारची प्रतिष्ठा वाढली.

लालबहादुरांनीं या प्रकरणामुळें काश्मिरी जनतेचें प्रेम व विश्वास संपादन केला. अवघड व गंभीर असा पेंचप्रसंग यशस्वीरीत्या सोडविल्याबद्दल कृति-समितीच्या सभासदांनींहि शास्त्रींना धन्यवाद दिले.

कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षाची एक खास सभा भरली व काश्मिरांतील हें प्रकरण यशस्वीरीत्या तडीस नेल्याबद्दल लालबहादूर यांचें अभिनंदन करण्यांत आलें.

पण काश्मीरचें राजकीय घोंगडें अजून भिजत पडलेंच होतें. शमसुद्दीन हे त्या वेळीं काश्मीरचे मुख्य मंत्री होते. हें मंत्रिमंडळ लोकप्रिय नव्हतें कीं कार्यक्षमहि नव्हतें. या मंत्रिमंडळावर बक्षी गुलाम महमद यांचें वर्चस्व होतें. हें मंत्रिमंडळ बदलण्याचा शास्त्रींनीं निर्णय घेतला. या कामाला ते लागले. सुरु-वातीस शमसुद्दीन आणि बक्षी गुलाम महमद यांनीं त्यांना विघ्नें आणण्याचा प्रयत्न केला. पण लालबहादुरांशीं बोलणीं पुरीं झाल्यानंतर शमसुद्दीन यांनीं आपला विरोध मागें घेतला. बक्षी गुलाम महमद यांना लालबहादुरांचा मुद्दा पटला. श्रीनगरमध्यें शांतता नांदावी व काश्मीरमधील सरकार स्थिर व्हावें, या दृष्टीनें त्यांनीं लालबहादुरांना सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली.

२७ फेब्रुवारी रोजीं काश्मीरमधील कायदेमंडळाच्या सदस्यांची बैठक भरली होती. बक्षी गुलाम महमद यांच्या इच्छेनुसार काश्मीरच्या मुख्य मंत्रिपदाचा आपण राजीनामा देण्याचें ठरविलें आहे असें शमसुद्दीन यांनीं या बैठकींत जाहीर केलें. दुसऱ्या दिवशीं गुलाम महमद सादिक यांची पक्षाच्या नेतेपदीं निवड करण्यांत आली. बक्षींनींच त्यांचें नांव सुचविलें.

काश्मीरप्रकरणांतील बक्षींचें वर्चस्व नाहीसें व्हावें अशी अनेकांची इच्छा होती. हें नेहरूंनाहि शक्य झालें नव्हतें. त्यामुळें एखाद्या अनियंत्रित राजाप्रमाणें काश्मीरवर बक्षींचे अधिराज्य चालू होतें. त्यांना विरोध करण्याची अथवा त्यांच्या दुष्कृत्यांवर टीका करण्याची कोणाची हिम्मत नव्हती. हें अवघड काम शास्त्रींनीं करून दाखविलें. वामनानें बळीराजाला नमविलें.

शेख अबदुल्ला यांचाहि प्रश्न शास्त्रींना हाताळावा लागला. ते तुरुंगांत होते. त्यांच्या प्रदीर्घ तुरुंगवासामुळें राजकीय क्षेत्रांत अस्वस्थता माजली होती. आंतर-

राष्ट्रीय वर्तुळांत या प्रकरणाची चर्चा सुरू होतीच; त्यामुळें त्यांची मुक्तता करणें अवश्य होतें. नेहरूंना लालबहादुरांचा हा मुद्दा ताबडतोब पटला. शेख अबदुल्ला हे नेहरूंचे स्नेही होते. आपल्या स्नेह्याला स्थानबद्धतेंत राहावें लागावें हें नेहरूंना फारसें रुचत नव्हतें; म्हणून या मसलतीस त्यांनीं ताबडतोब रुकार दिला. काश्मीरचे नवे पंतप्रधान सादिक यांची संमति मिळाली. सरकारला योग्य वाटेल त्या वेळीं व त्या दिवशीं शेख अबदुल्ला यांची मुक्तता करण्याचा आदेश सादिक यांना देण्यांत आला.

या प्रश्नासंबंधीं लोकसभेंत निवेदन करतांना शास्त्री म्हणाले, " या बाबतींत कांहींतरी करणें अवश्यच होतें. शेखसाहेबांना बंदिवासांत ठेवून काश्मीर आमच्या हातीं ठेवण्याची आमची इच्छा नाहीं. त्यांना मोकळें करून काश्मीर राखण्यांतच आमची खरी कसोटी आहे. "

८ एप्रिल १९६४ रोजीं शेख अबदुल्ला यांची मुक्तता करण्यांत आली. भारताचे आशीर्वाद आणि सादिक सरकारची मान्यता यामुळें त्यांचा पुष्कळ उदो उदो झाला. तुरुंगांतून सुटल्याबरोबर काश्मीरच्या स्वयंनिर्णयाचें तुणतुणें वाजविण्यास त्यांनीं सुरुवात केली. काश्मीरच्या भारतांत झालेल्या विलीनीकरणाबद्दल भारत सरकारावर ते प्रखर टीका करूं लागले. भारत, पाकिस्तान आणि काश्मीर असे या वादाचे तीन स्वतंत्र घटक आहेत, असें ते बोलूं लागले. काश्मीर-प्रश्नासंबंधींच्या भारताच्या अगदीं विरुद्ध अशा शेख अबदुल्ला यांच्या टीका होत्या.

अबदुल्ला यांचीं हीं विधानें धोक्याचीं आहेत असें नेहरूंना वाटत होतें. अबदुल्लांचें हें वर्तन शास्त्रींना अपेक्षित होतें, पण तुरुंगांतून सुटल्याबरोबर अबदुल्ला आपलें पूर्वींचें मत बोलूं लागतील असें त्यांना वाटलें नव्हतें. नेहरू-बरोबर अबदुल्लांचीं दिल्ली येथें भेट झाली म्हणजे भारत सरकारचें धोरण शेख अबदुल्ला यांना पटेल अशी सरकारला आशा आहे असें त्यांचें मत होतें. ही आशा निष्फळ आहे असें अनेकांना वाटत होतें. अबदुल्ला यांच्या बेजबाबदार घोषणांमुळें लोकांचें तसें मत झालें होतें

पण अहो आश्चर्यम्! सुटकेनंतर ८-१० दिवसांतच शेखसाहेबांचा जोर कमी झाला, त्यांचीं भाषणें संयमित होऊं लागलीं. भारत व पाकिस्तान यांत स्नेहभाव प्रस्थापित करण्याची उदात्त भूमिका त्यांनीं घेण्यास सुरुवात केली.

सादिक सरकारनें त्यांना संपूर्ण भाषणस्वातंत्र्य दिलें होतें. नेहरू, लालबहादूर, नंदा आणि कृष्णमाचारी यांनीं शेखसाहेबांच्या बाबतींत जनतेला सबूरीचा सल्ला दिला होता. अर्थातच काश्मीरचें भारतांत सामीलीकरण अंतिम व निर्णायक आहे, असें या पुढाऱ्यांनीं जाहीर केलेंच होतें. आपल्या भाषणांनीं आपत्ति ओढवून घेऊं नका, असा त्यांनीं अबदुल्लांना इशारा दिला होताच.

अबदुल्लांची मुक्तता करणें कितपत योग्य होतें याचा इतिहास निर्वाळा देईल. एका बाजूला काश्मीरचें सामीलीकरण अंतिम व निर्णायक असें म्हणावयाचें तर दुसऱ्या बाजूला या निर्णयाविरुद्ध उघडपणें प्रचार करणाऱ्या अबदुल्लांना बंधमुक्त करावयाचें याची संगति लागत नाहीं.

"वाटेल तें झालें तरी मी काश्मीरला स्वतंत्र करीन," ही अबदुल्लांची घोषणा ते उघडपणें मांडीत होते. याला भारत, पाकिस्तान व राष्ट्र संघ यांची मान्यता मिळाली तर उत्तमच, पण न मिळाली तरी त्यांच्या विरोधाला न जुमानतां आपलें ईप्सित ते साध्य करणार होते. भारताची भूमिका याच्या अगदीं उलट होती.

शेख अबदुल्लांची मुक्तता करून चिघळूं लागलेली परिस्थिति आम्हीं काबूंत आणली, काश्मीरचा कुजत पडलेला डाव उघड्यावर आणला, आणि भारताचें उदार धोरण जगाच्या नजरेला आणून दिलें असें यावर भारत सरकारचें म्हणणें होतें. शेख अबदुल्लांच्या मुक्ततेमुळें चिघळत पडलेली काश्मीरची समस्या चव्हाट्यावर तरी आली, काय निर्णय व्हायचा असेल तो होऊं दे, असाहि भारत सरकारचा दावा होता.

पण या परिस्थितीला नेहरूंच्या अचानक निधनामुळें धक्का बसला. भारत आणि पाकिस्तान यांना एकत्र आणण्याचे शेख अबदुल्लांचे प्रयत्न अधांतरींच राहिले. काश्मीरचा प्रश्न या उभय राष्ट्रांच्या संमतीनें घ्यावा ही कल्पना स्थगित झाली. होणार होतें काय म्हणा! गेलीं १७ वर्षें जें घडलें त्यापेक्षां कां कांहीं निराळें घडणार होतें! शेख अबदुल्ला यांनीं या दोन राष्ट्रांना जवळ आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला असता, तरी अधिक काय साधलें असतें?

नेहरूंचें निधन झालें त्या वेळीं अबदुल्ला पाकिस्तानमध्येंच होते. आझाद काश्मीरच्या दौऱ्यावर ते निघाले होते. त्यांनीं आपला कार्यक्रम स्थगित केला आणि ते दिल्लीस परतले.

इतर खात्यांबरोबर परराष्ट्र खातेंहि लालबहादूर यांना सांभाळावें लागत

होतें. त्यांनीं या खात्यातर्फे लोकसभेंत १९ फेब्रुवारी रोजीं केलेल्या एका निवेदना-नामुळें लोकांत उत्साह पसरला. त्यांच्या निवेदनाकडे सर्वांचें लक्ष वेधलें.

उपराष्ट्राध्यक्षांच्या भाषणावर पार्लमेंटांत चर्चा चालू होती. चीन व पाकिस्तान यांचे भारताशीं जे संघर्ष चालू होते त्यांच्यावर भाषणें चाललीं होतीं. या चर्चेंत भाग घेतांना लालबहादूर म्हणाले, "चर्चा आणि वाटाघाटी यांचे दरवाजे कधींहि बंद करूं नयेत, पण स्वदेशाचा मान आणि प्रतिष्ठा यांना बाध येईल अशा स्वरूपाचीं बोलणीं करण्याचें या देशांतील कोणाच्या मनांतहि येणार नाहीं. एकांतिक दृष्टिकोन घेऊं नये आणि कोणताहि प्रश्न अनिर्णित काळापर्यंत अनिर्णित ठेवूं नये. जगाचा हा सिद्धांत आहे."

वृत्तपत्रें आणि मुत्सद्दी यांनीं या निवेदनाचें संमिश्र स्वागत केलें. कोणीं टीका केली, कोणीं स्तुतिसुमनें वाहिलीं. पण शास्त्रीजींच्या या निवेदनामुळें विचारास नवें खाद्य मिळालें खास! खुद्द मंत्रिमंडळांत, कॉंग्रेस पक्षांत आणि विरोधी पक्षांतहि या निवेदनावर वादळ माजलें. शेवटीं लालबहादूर यांनीं आपल्या निवेदनाची धार कमी केली. आणि त्या निवेदनामुळें जनतेंत निष्कारण उत्पन्न झालेले गैरसमज दूर केले.

पाकिस्तान आणि चीन यांच्या बाबतींत लालबहादूर यांचीं काय मतें होतीं याची कल्पना या निवेदनावरून येईल.

शरणागति त्यांना मंजूर नव्हती. भारतानें घेतलेल्या भूमिकेपासून ते विचलित होणार नव्हते, पण कोणत्याहि प्रश्नाकडे पूर्वग्रहयुक्त भूमिकेनें व अट्टाहासानें पाहण्यास त्यांचें मन घेत नव्हतें. शांततामय वाटाघाटी हा युद्ध थांबविण्याचा पर्याय आहे, म्हणून शांततामय वाटाघाटींची कांस शक्यतों सोडूं नये, असें त्यांचें मत होतें.

# प्रभावी व्यक्तिमत्व

## १३

आपल्या समकालीनांपैकीं महात्माजींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव लालबहादुरां-वर सर्वांत अधिक पडला होता. ते म्हणतात, " गांधीजींच्या शिकवणुकीनें माझें राजकीय आयुष्य साकारलें, त्यांच्या आचरणानें मीं भारून गेलों. "

वास्तविक १० वर्षांचे असतांनाच लालबहादूर शास्त्री गांधीजींच्या प्रभावळींत आले आणि तेव्हांपासूनच त्यांनीं आपल्या आयुष्याला वळण लावण्यास सुरुवात केली. १२ वर्षें त्यांनीं पादत्राणें वापरण्याचेंहि सोडलें. उत्तर हिंदुस्थानां-तील प्रखर उन्हाळ्यांत तापलेल्या रस्त्यांवरून भर दुपारीं ते अनवाणी फिरत. लालबहादूर म्हणतात, " गांधींचें सत्य व अहिंसा व्रताचें पालन आणि शिकवण यांचा माझ्या मनावर मोठाच परिणाम झाला. मीं जसजसा मोठा होऊं लागलों, तसतसें या तत्त्वांचें महत्त्व मला अधिकच पटूं लागलें. जगाच्या उद्धारा-साठीं याच व्रताचा उपयोग होईल, अशी मला खात्री वाटूं लागली. गांधीजींची शिकवण नेहमींच व्यावहारिक असे, असें नाहीं, पण त्यांचें व्यक्तिमत्त्व अलौकिक होतें. " शास्त्री पुढें म्हणाले, " आपलीं सत्कृत्यें आणि आपली लायकी यांच्या साहाय्यानें मनुष्यानें आपली उन्नति करून घ्यावी हें तत्त्व मीं गांधीजींपासून शिकलों. "

शास्त्रींचें साधें जीवन, त्यांच्या मनाचा सरळपणा, त्यांची अलिप्तता आणि दुष्टपणाचा अभाव हे सारे गुण त्यांनीं गांधीजींपासून आत्मसात् केले. सौजन्य

हा त्यांचा दंभ नाहीं, ती त्यांची जीवनक्रमा आहे. असें असूनहि ते तत्त्वज्ञ आणि व्यवहारवादी आहेत. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी ते जाणून आहेत.

गांधींच्या खालोखाल लालबहादुरांवर नेहरूंचा प्रभाव पडला आहे. "सुरुवातीपासूनच पंडितजींचें माझ्यावर प्रेम होतें" असें लालबहादूर म्हणतात. "पंडितजींनीं अधिकाराची हांव धरली नाहीं कीं त्यासाठीं त्यांनीं राजकारणें लढविलीं नाहींत. अधिकार अथवा सत्ता यांचा अभिलाष कोणीं धरूं नये, शांतपणें व अलिप्ततेच्या भावनेनें आपलें कर्तव्य करावें, तें करतांना फलाची अपेक्षा धरूं नये, अशी गांधीजी व नेहरू यांची शिकवण होती," असें लालबहादूर कृतज्ञतेनें म्हणतात. त्यांचा स्वतःचा तोच अनुभव आहे. आपली वेळ येईतों वाट पाहणें, श्रद्धेनें आणि सेवावृत्तीनें आपलें काम करीत राहणें एवढें आयुष्याचें ध्येय ठरविलें कीं गुणग्रहण आपोआप होतें असें ते मानतात.

आपण नेहरूंचे केवळ होयबा होतों, स्वतःचें असें आपल्याला कधींच मत नव्हतें, असा लालबहादुरांवर कोणीं आरोप केला, तर त्याचा ते इन्कार करतात. या बाबतींत त्यांच्यासंबंधीं एक विनोदी दंतकथा सांगण्यांत येते. भुवनेश्वरला पंडितजी आजारी पडले. त्यांना रक्त देण्याचें ठरलें आणि डॉक्टरांनीं त्याबद्दल लालबहादुरांना विचारणा केली. लालबहादूर चटकन् म्हणाले, "मला पंडितजींना विचारलें पाहिजे."

शास्त्रींनीं पंडितजींना न आवडणारा सल्ला अनेक वेळां दिला आहे. त्यांच्यांत होणाऱ्या चर्चा केवळ गप्पाच नसत, आणि अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांची लालबहादुरांनीं उकल केली आहे, याचीं अनेक उदाहरणें आहेत.

१९६२ ची गोष्ट. निवडणुका नुकत्याच पार पडल्या होत्या. मध्यवर्ती मंत्रिमंडळाची पुनर्रचना आणि खातेंवांटप यांच्या वाटाघाटी चालू होत्या. नेहरूंनीं साहजिकच हा प्रश्न लालबहादूर यांचेशीं काढला. लालबहादूर यांनीं नेहरूंना एक यादी सादर केली. त्यांत कृष्ण मेनन यांचें नांव संरक्षण खात्याच्या मंत्रिपदाऐवजीं संरक्षणनिर्मिति खात्याच्या मंत्रिपदीं शास्त्रींनीं सुचविलें होतें. संरक्षण मंत्री म्हणून कृष्ण मेनन अप्रिय झालेले होते. त्यामुळें लालबहादूर यांनीं हा बदल केला होता. हा बदल नंतर अमलांतहि आला. आणि ९ नोव्हेंबर १९६२ रोजीं मेनन यांची मंत्रिमंडळांतून उचलबांगडी होण्याआधीं ९ दिवसच त्यांचें नांव संरक्षण उत्पादनखात्याचे मंत्री म्हणून सुचविण्यांत आलें होतें.

पंजाबचें प्रकरण असेंच. कोणाच्याहि ध्यानींमनीं नसतांहि प्रतापसिंग कैरों यांना पंजाब मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्यास सांगण्याचा सल्ला पंडितजींना लालबहादुरांनींच दिला. सिराजउद्दीन प्रकरणांत केशवदेव मालवीय गोंवले गेले आहेत, असें आढळून येतांच गृहमंत्री लालबहादूर शास्त्री यांनीं त्यांची चौकशी सुरू केली. काश्मीर राजकारणांतून बक्षींची उचलबांगडी करण्याचें श्रेय लालबहादूर यांनाच आहे.

नेहरूंबद्दल शास्त्रींना अतीव आदर होता, ही गोष्ट ते मोकळ्या मनानें मान्य करतात. " पंडितजींचें कार्य आणि त्यांचा अलिप्ततावाद यांनीं मी इतका भारून गेलों होतों कीं त्यांची सांगी शंभर टक्के बरोबर नसतांहि त्यांचें ऐकावें असें मला वाटे " असें ते म्हणतात.

लालबहादूर हे सत्‌शिष्य खरे, प्रामाणिक अनुयायी खरे, पण त्यांचें मूल्यमापन तर्कशुद्ध, स्वच्छ व निर्मळ असे. त्यामुळें कोणालाहि आदर्श मानणें त्यांना जड जाई.

पंडित गोविंद वल्लभपंत यांच्याबद्दल त्यांना नितांत आदर होता. ते पंतांना गुरुस्थानीं मानीत, पण पंडितांच्या राजकीय कारवाया आणि त्यांची गतानुगतिकता आपल्याला पसंत नव्हती, असें ते स्पष्टपणें सांगतात.

पुरुषोत्तमदास टंडन हेहि त्यांचे गुरु, पण राजकारणांतील टंडनजींच्या हिंदुत्व-पक्षपाती मतास त्यांचा विरोध होता.

पंतप्रधान म्हणून लालबहादूर शास्त्री हे स्वतंत्र विचाराचे नाहींत, आपलें निर्णय ते अमलांत आणूं शकत नाहींत, असा कोणीं त्यांचेवर आरोप केला कीं त्यांना वाईट वाटतें. याचा परिणाम असा होतो कीं ते दुसऱ्या टोकाला जातात. संबंधित मंत्र्यांचा ते सल्ला घेत नाहींत, ते तुसडे आहेत, असा त्यांचे कांहीं सहकारी शास्त्रींवर आरोप करतात, पण असे आरोप नेहरूंवरच काय, ॲटली, रॅम्से मॅक्डोनाल्ड अशा कितीतरी पंतप्रधानांवर करण्यांत आलेले आहेत !

" मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारी, शिवाय कामराजसारख्या बाहेर-च्यांचा सल्ला यामुळें तुमच्या निर्णयांना कांहीं धक्का बसतो का, " असा लाल-बहादूर यांना लेखकानें एकदां प्रश्न विचारला. ते म्हणाले, " मीं आत्मस्तुति करीत आहें, असें समजूं नका, पण माझे निर्णय मीं स्वतःच घेतों. फक्त असा निर्णय घेण्यापूर्वी त्या प्रश्नाशीं निगडित अशा सर्वजणांचीं मतें मीं अजमावतों. तीं मतें जर योग्य असलीं तर तीं मान्य करण्यांत मला कमीपणा वाटत नाहीं.

एवढें मात्र मीं निश्चितपणें म्हणूं शकतों कीं माझ्या कामांत कोणीं लुडबूड केलेली मला आवडत नाहीं. मीं कांहीं कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या हातांतील बाहुलें बनलों होतों, असा माझ्याबद्दल प्रवाद आहे. पण माझें मंत्रिमंडळ निवडतांना मीं कोणाचाहि सल्ला घेतला नाहीं. त्यांत केलेल्या दुरुस्त्या व बदल माझे स्वतःचेच आहेत. माझें हें विधान कोणीहि खोडून काढूं शकणार नाहीं, अथवा असें म्हणण्यांत कोणाचाहि अधिक्षेप करण्याचा माझा हेतु नाहीं. मंत्रिमंडळाची निवड करतांना मीं अत्यंत गुप्तता राखली होती. पुन्हा अशी वेळ आल्यास हाच मार्ग मीं अवलंबीन. ही सर्व जबाबदारी माझी आहे आणि मीं ती उचललीच पाहिजे. "

सरदार स्वरणसिंग यांची परराष्ट्रखात्याचे मंत्री म्हणून केलेली नेमणूक शास्त्रींनीं पूर्णपणें स्वतःच्या इच्छेनें केली. मंत्रिमंडळांतील सहकारी अथवा कॉंग्रेसचे अध्यक्ष यांचा त्यांनीं या बाबतींत मुळींच सल्ला घेतला नव्हता. माझ्या माहितीप्रमाणें नवी दिल्ली येथें ही घोषणा जाहीर झाल्यानंतर ४ तासांनीं कामराज यांना तें वृत्त कळलें.

या प्रवृत्तीमुळें लालबहादूर यांचे सहकारी व चिटणीस यांना काळजीपूर्वक राहावें लागतें. " अमुक करण्याचा माझा विचार आहे, " असें ज्या वेळीं ते म्हणतात, त्या वेळीं तो त्यांचा केवळ विचार नसून निर्णय असतो, हें त्यांना उमगतें.

" समाजवादासंबंधीं तुमच्या काय कल्पना आहेत ? " असें शास्त्रींना विचारतां ते म्हणाले, " भारताला आज प्रात्यक्षिक समाजवाद हवा आहे. भारतीय जनतेला अन्न-वस्त्र-निवारा, वैद्यकीय मदत आणि नोकऱ्या यांपैकीं किती बाबतींत व किती प्रमाणांत आपण स्वयंपूर्ण करूं शकूं, ही आजची महत्त्वाची समस्या आहे. गरीब आणि श्रीमंत यांतील विषमता आपण दूर केली पाहिजे. या गोष्टी आपण ज्या प्रमाणांत करूं शकूं त्या प्रमाणांत लोकशाहीचें ध्येय आपण साध्य केलें आहे, असें म्हणतां येईल. या दृष्टीनें भुवनेश्वर येथील ठरावाचा विचार झाला पाहिजे, अंमलबजावणी झाली पाहिजे. "

लालबहादूर यांचा हा वास्तवपूर्ण दृष्टिकोन, तात्त्विक समाजवादापेक्षां सामाजिक समतेवर त्यांनीं दिलेला भर यामुळें कॉंग्रेसमधील व इतर विरोधी पक्ष त्यांच्यावर टीका करतात.

लालबहादूर शास्त्री यांचें व्यक्तिगत जीवन म्हणजे गांधी-विचारांचें कृतींत

झालेलें परिवर्तन होय. आज ते जरी पंतप्रधान झाले असले, तरी त्यांची साधी राहणी बदललेली नाहीं. " कचेरींत दक्षता असावी, पण ताठा नसावा, " हें गांधीजीचें वाक्य त्यांचें अत्यंत आवडतें वाक्य आहे. उद्यां कांहीं कारणानें लालबहादुरांना पंतप्रधानपद जरी सोडावें लागलें, तरी थोड्याशा व मर्यादित उत्पन्नांत गुजारा करणें त्यांना मुळींच जड जाणार नाहीं.

लालबहादुरांची नम्रता, सौजन्य आणि साधेपणा यांमुळें जनतेला ते परके वाटत नाहींत, आपल्यापैकींच एक वाटतात. दलित आणि विरोधक यांचे ते प्रतिनिधि आहेत. या वर्गाचा त्यांना पाठिंबा आहे, शास्त्रींवर त्यांचा विश्वास आहे. त्यांनीं कधीं चुडीदार पायजमा घातला नाहीं कीं अचकन वापरली नाहीं. बहुजनसमाजांतील जनतेप्रमाणेंच ते जगतात, राहतात, त्यांच्यासारखेंच अन्न ते खातात आणि त्यांच्याप्रमाणेंच त्यांचा वेष असतो. राष्ट्रकुल पंतप्रधानांच्या परिषदेस हजर राहण्यासाठीं १९६४ च्या जुलै महिन्यांत त्यांना लंडनला जावयाचें होतें. ( डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार या परिषदेला ते जाऊं शकले नाहींत. ) लंडनच्या भेटीसाठीं त्यांनीं चुडीदार पायजमे व अचकन शिवून घ्यावेत असा मित्रांनीं सल्ला दिला. शास्त्रींनीं अर्थातच तो धुडकावून लावला आणि धोतर, सदरा व गांधी टोपी या वेषांत ते लंडनला रवाना झाले. नाहीं म्हणायला लंडनच्या थंडीपासून बचाव करण्यासाठीं कोट मात्र त्यांनीं बरोबर घेतला होता.

लालबहादूर सहसा कोणावर रागवत नाहींत. आपल्या मनावर आपला ताबा आहे याचा त्यांना अभिमान वाटतो. आपल्या मुलांच्या अंगावर त्यांनीं कधीं हात टाकला नाहीं कीं त्यांना ते टाकून बोलले नाहींत. फार वर्षांपूर्वींची गोष्ट. त्यांचा मुलगा हरि त्या वेळीं १० वर्षांचा होता. त्याच्या खोड्यांनीं लालबहादूर वैतागले होते. त्यांनीं हातांत एक काठी घेतली व हरीच्या मागें ते धांवू लागले. पण पळतां पळतां ते म्हणत होते. " हरि, न्हाणीघरांत जाऊन लपून बस, म्हणजे मला तूं सांपडायचा नाहींस. "

उत्तर प्रदेश मंत्रिमंडळांत ते चिटणीस असतांनाची गोष्ट. टांग्यांतून ते चालले होते. टांगेवाल्यानें मुद्दाम लांबचा रस्ता घेतल्यानें शास्त्रींना इष्ट जागीं पोहोंचण्यास उशीर झाला. शास्त्री रागावले आणि त्याला बोलले, पण त्याच वेळीं त्याचा टांगा जास्त वेळ वापरल्याबद्दल त्यांनीं टांगेवाल्याला ८ आण्यांऐवजीं दोन रुपये दिले !

वाईट मार्गानें मिळविलेल्या पैशाची चीड आणि नीतिमत्तेची चाड हे लालबहादुरांच्या घराण्याचें वैशिष्ट्य आहे. लालबहादूर आपल्या मुलांना पैशाचा लोभ धरूं नका, प्रामाणिकपणानें वागा आणि कष्ट करा, असाच नेहमीं उपदेश करीत असतात. " कष्ट करणें म्हणजेच प्रार्थना करणें होय, " हें त्यांचें लाडकें सूत्र आहे.

लालबहादूर भारताचे पंतप्रधान झाले, भारतांतील सर्वोच्च अधिकारी झाले. हें वृत्त ज्या वेळीं ८० वर्षांच्या त्यांच्या वृद्ध मातोश्री रामदुलारी देवी यांना कळलें, त्या वेळीं त्या म्हणाल्या, " मैं लालबहादूरसे चाहती हूं के जान चले तो जाय, मगर देश बना रहे ! " गरिबांना ज्यामुळें उपद्रव होईल, असें कांहीं करूं नकोस, अशी त्यांची लालबहादुरांना नेहमींचीच सांगी असते.

उत्तर प्रदेशचे ते गृहमंत्री झाल्यावर त्यांची कचेरी लखनौला आली. अलाहाबादचें त्यांचें घर त्यांना सोडावें लागलें. घर मिळविण्यासाठीं त्यांनीं आपल्या अधिकाराचा वापर करण्यास नकार दिला. ' बेघर गृहमंत्री ' अशी त्यांना संज्ञा मिळाली.

दिल्लींतील लालबहादुरांच्या निवासस्थानांतील वीज व पाणी यांचीं बिलें सरकार भरीत असे. हीं बिलें अवास्तव आहेत, अशी लोकसभेंत टीका झाली. तोंपर्यंत लालबहादुरांना याची कांहींच कल्पना नव्हती. त्यांनीं बिलें मागविलीं. बिलें खरोखरच अफाट आहेत, असें त्यांस आढळून आलें. विजेचें बिल त्या महिन्यांत ५५० रु. व पाण्याचें बिल रु. १५० झालें होतें. शास्त्रींनीं अधिक तपशीलवार चौकशी केली. नोकरांचीं घरें, कचेरीची जागा व रस्त्यांवरील दिवे या सर्वांसाठीं एकच मीटर होता. शास्त्रींचा स्वतःचा बिलाचा भाग एकूण बिलाच्या निम्म्यापेक्षां कमी होता. पण शास्त्रींनीं याबद्दल स्वतःला शिक्षा करून घेण्याचें ठरविलें. पुढील सहा महिनेपर्यंत वीज व पाणी यांचीं सर्व बिलें स्वतः भरण्याचें त्यांनीं ठरविलें. पंखे व दिवे काम संपल्यानंतर स्वतः बंद करण्याचा शास्त्रींचा फार जुना प्रघात आहे.

देशांत बोकाळलेल्या लांचलुचपतीसंबंधीं शास्त्रींचीं ठाम मतें आहेत. इतर देशांप्रमाणेंच आपल्याहि देशांत लांचलुचपत आहे, हें त्यांना मान्य आहे. पण हीं लांचलुचपत नाहींशी करण्यासाठीं आपण निश्चित व विधायक मार्ग अनुसरले पाहिजेत, असें ते म्हणतात. " या लांचलुचपतीची जाहिरात करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. त्यामुळें दुष्परिणाम मात्र होतात. आपण चांगले आहोंत, तसे वाईटहि

आहोंत. हळूहळू पुढाऱ्यांनीं योग्य मार्गाचा अवलंब केला, तर लोक सन्मार्गाला लागतील. उदाहरणापेक्षां आचरण हें महत्त्वाचें आहे, " असें त्यांनीं सांगितलें.

लाल बहादूर यांचें कार्यालय सचिवालयाच्या दक्षिण विभागांत परराष्ट्र खात्यांत आहे. येथें पूर्वीं नेहरूंचें कार्यालय होतें. त्या वेळीं तेथें बुद्धाचा एक सुंदर पुतळा व नक्षीदार टेबल होतें. तीन मूर्ति येथील नेहरूंच्या निवासस्थानीं उभारण्यांत येणाऱ्या नेहरू संग्रहालयांत या वस्तु आतां ठेवण्यांत आल्या आहेत. बाहेरच्या बाजूला भेटावयास येणाऱ्या पाहुण्यांसाठीं पूर्वीं उत्तम कोचें ठेवण्यांत आलीं होतीं. आजहि मंत्री आणि त्यांचे चिटणीस यांच्या कचेऱ्यांच्या बाहेरच्या बाजूस अशीं कोचें आढळून येतात.

नव्या पंतप्रधानांच्या खोलींतील सामान अगदीं साधें आहे. भिंतीवर देखावे व कलाकृति तर नाहींतच पण गांधीजी अथवा नेहरू यांचींहि छायाचित्रें नाहींत. खोलीच्या एका कोपऱ्यांत एक मोठें शेल्फ असून त्यावर अनेक ग्रंथ हारीनें व नेटकेपणानें लावून ठेवण्यांत आले आहेत. यांपैकीं पुष्कळ ग्रंथ नेहरूंच्या वेळेपासूनच आहेत.

लाल बहादूर यांचें टेबल नेहमीं स्वच्छ व नेटकें असतें. नुकतेच आलेले कागदपत्र व पाहून झालेल्या फाइली एवढ्याच वस्तु त्यांच्या टेबलावर सांपडतील. खुर्चींत ते ताठ बसतात आणि आलेल्या पाहुण्याला आपल्या भेदक नजरेनें निरखीत मृदु आणि स्पष्ट शब्दांत ते त्याच्याशीं बोलतात. आपलीं सार्वजनिक भाषणें ते आगाऊ तयार करतात. पंडितजी वेळेवर सुचेल त्याप्रमाणें बोलत असत. लालबहादूर भाषणांची भरपूर तयारी करतात. महत्त्वाचीं भाषणें वाचून दाखविण्यांत त्यांस कमीपणा वाटत नाहीं, त्यामुळें त्यांचीं निवेदनें मुद्याला धरून व व्यवस्थित असतात. आणि त्यांच्या भाषणांचा जनतेवर चांगला परिणाम होतो.

मोतीलाल नेहरू प्लेसवरील क्रमांक १ चा बंगला हें शास्त्रींचें निवासस्थान. उत्तर प्रदेश व भारतांतील इतर राज्यें येथील नागरिकांची त्यांच्याकडे नेहमीं रीघ असे. कोणी हिरवळीवर बसत, कोणी इकडे तिकडे हिंडत, कोणी गप्पागोष्टी करत. लालबहादुरांनीं आपणांशीं बोलावें, निदान आपल्याला त्यांचें दर्शन घडावें अशी त्यांची अपेक्षा असे. त्यांच्या आजारानंतर मात्र हें थांबविण्यांत आलें.

पूर्वीं दररोज सकाळीं लालबहादूर यांचा 'दरबार' भरत असे. आपल्या बंगल्याच्या हिरवळीवर ते फेऱ्या घालीत. यावेळीं लोक आपलें म्हणणें अथवा

तक्रारी त्यांच्यापुढें मांडीत. पण लालबहादुरांना हृदयविकाराचा दुसरा सौम्य झटका आल्यापासून डॉक्टरांनीं हा दरबार बंद केला आहे. ( त्यांना १९५९ साठीं पहिला झटका आला होता. )

पूर्वी ते दररोज १८ तास काम करीत असत. डॉक्टरांच्या आज्ञेवरून कामाचे तास सध्यां १४ झाले आहेत. हल्लीं सकाळीं ५ ऐवजीं ६ ला ते उठतात. हातीं असलेले सर्व कागदपत्र पुरे केल्याशिवाय पूर्वी ते झोपत नसत. पण आतां मध्यरात्रीनंतर जागण्याची त्यांना मनाई करण्यांत आली आहे.

दररोज सायंकाळीं ८॥ वाजतां जेवावें अशा डॉक्टरांच्या सूचना आहेत. पण तो नियम सहसा पाळला जात नाहीं. ' आपली वेळ संपली, बाहेर इतर लोक उभे आहेत, ' असे शब्द अजूनहि त्यांच्या तोंडून निघत नाहींत, त्यामुळें चिटणिसांनीं त्यांच्या भेटीचें ठरविलेलें वेळापत्रक निरुपयोगी ठरतें.

सकाळच्या या दरबारामुळें शास्त्रींना जनमताची नाडी बरोबर कळत असे. त्यामुळें हा दरबार बंद झाल्याची त्यांना हळहळ वाटते.

सकाळीं आपल्या कुटुंबियांसह चहापानाचा समारंभ मात्र नियमानें होतो. कुटुंबियांना लालबहादूर यांची अनौपचारिक भेट घेण्याची हीच एक संधि मिळते. सात वाजतां सुरू झालेलें हें चहापान सुमारें दोन तास चालतें. घरांतील मुलें या वेळीं हजर असलींच पाहिजेत, असा शास्त्रींचा कटाक्ष आहे. त्यांच्याच शय्यागृहांत हें चहापान होतें. आपलें पंतप्रधानपद या वेळीं ते विसरतात. मग एखाद्या मुलाचा ते गालगुचा घेतील, मोठ्या मुलांशीं विनोद करतील, घरांतील लहान-मोठ्या बाबींची चौकशी करतील. हें करीत असतांच त्यांचा दाढीचा कार्यक्रम उरकतो.

लालबहादुरांचें घराणें पूर्ण शाकाहारी आहे अर्थातच धूम्रपान अथवा मद्यपान यांचा तेथें प्रश्नच उपस्थित होत नाहीं. त्यांचें जेवण अत्यंत थोडें आहे. ते जवळजवळ चिमणीएवढें जेवतात म्हणा ना ! बटाटे ही त्यांची आवडती वस्तु आहे. मग ते शिजवलेले, भाजलेले अथवा उकडलेले असोत. त्यांच्या बंगल्यांत एकूण पांच शय्यागृहें आहेत आणि सबंध बंगल्यांत ४ मुलें, २ मुली व त्यांचे पति, ६ नातवंडें, एक सून, ऐंशी वर्षांच्या वृद्ध मातोश्री, ८५ वर्षांचे रामप्रसाद काका, लालबहादूर व त्यांची पत्नी अशीं एकूण १९ माणसें राहतात; याशिवाय कमींतकमी १०–१२ पाहुणे तरी दररोज असतातच.

लालबहादूर यांच्या पत्नी ५० वर्षांच्या असून धार्मिक व सनातनी वृत्तीच्या आहेत. रोज एक तास त्यांची पूजा चालते. आठवड्यांतील दोन दिवस त्यांचे उपास असतात. त्यांना कीर्तनांची आवड आहे. त्या कपाळावर मोठें कुंकू लावतात. घरांतील दररोजच्या स्वयंपाकावर त्या जातीनें लक्ष ठेवतात.

१९६३ सालीं लालबहादूर नेपाळला गेले, त्याच वेळीं ललितादेवी प्रथम त्यांच्याबरोबर गेल्या. पशुपतिनाथाचें व नेपाळांतील इतर देवळांचें दर्शन व्हावें हाच बहुधा त्यांचा हेतु असावा.

पंतप्रधानपदाचीं सूत्रें हातीं घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं महिलांचें एक शिष्ट-मंडळ ललितादेवींना भेटावयास आलें. पंतप्रधानांची पत्नी या नात्यानें देवींनीं सार्वजनिक चळवळींत भाग घ्यावा अशी शिष्टमंडळानें विनंती केली. ही विनंती लालबहादुरांनीं तत्काळ फेटाळून लावली. ते म्हणाले, "माझी पत्नी स्वयंपाक आणि पूजा यांत दिवसभर गुंतलेली असते. ती जर उद्यां सभांतून भाषणें करूं लागली, तर माझें व माझ्या कुटुंबाचें कसें व्हावयाचें ?"

आपल्या पतीचें हें मत ललितादेवींना एकदम मान्य आहे. त्या म्हणाल्या, "घर हेंच माझें कार्यक्षेत्र आहे. घरांत मला पुष्कळ कामें आहेत, आणि कुटुंबाकडे लक्ष ठेवणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे."

लालबहादूर यांना उर्दू काव्याचा षोक आहे. मुशायिऱ्याचें निमंत्रण ते सहसा नाकारीत नाहींत. एकदां ते पुण्याहून मुंबईस जातांना उर्दू शेर आणि काव्यें यांच्या भेंड्या लावण्याचें ठरलें. मुंबईला पोहोंचेपर्यंत तीन तासांत शास्त्रींनीं आपल्या मित्राचा सहज पराभव केला. तरी त्यांनीं आपला सगळा सांठा वापर-लाच नव्हता !

पंडित गोविंद वल्लभपंत व लालबहादूर शास्त्री यांची अनेक वेळां तुलना करण्यांत येते. अव्यस्थितपणा व अनियमितपणा यांत दोघे सारखे आहेत, असेंहि म्हटलें जातें. पण अशी तुलना करणें चुकीचें व अन्यायकारक आहे असें लालबहादुरांचें याला उत्तर असतें.

आपलीं सरकारी व खासगी कामें ठरल्याप्रमाणें ते पार पाडीत नाहींत असाहि त्यांजवर आरोप करण्यांत येतो, पण हा आरोपहि लालबहादूर यांना मान्य नाहीं. त्या आरोपाचा ते आवेशानें इन्कार करतात.

ते म्हणतात, "उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचा चिटणीस व नंतर अखिल

भारतीय काँग्रेस कमिटीचा मीं ज्या वेळीं सरचिटणीस होतों, त्या वेळीं माझ्या कामास शिस्त व टापटीप होती. कोणत्याहि कामाच्या बाबतींत माझा असाच लौकिक असे.

" हल्लीं मात्र माझ्या जेवणांत अनियमितपणा आला आहे. आणि समोर असलेले सर्व कागदपत्र संपल्याशिवाय थांबायचें नाहीं असा माझा निश्चय असल्यानें मला रात्रीं अधिक काळपर्यंत जागावें लागतें. "

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठा...
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि ..............

# १४

## उद्‌बोधक माहिती

लाल बहादुरांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीचें मूल्यमापन आतांच करण इष्ट होणार नाहीं. कारण या पदावर येऊन त्यांना केवळ चारच महिने झाले आहेत. त्यांपैकीं एक महिना आजारपणांतच गेला. म्हणून यासंबंधीं बोलतांना जपून बोललें पाहिजे.

एवढें मात्र निश्चित म्हणतां येईल कीं शास्त्रींचा राज्यकारभार पद्धतशीरपणें चालला आहे. नेहरूंच्या कारकीर्दीच्या शेवटच्या दोन वर्षांच्या मानानें पाहतां शास्त्रींच्या राज्यकारभाराला पुष्कळच स्थैर्य आलें आहे असें म्हणावें लागेल. आपलें धोरण काय आहे, आणि आपण कोठें चाललों आहों याची शास्त्री-सरकारला जाणीव आहे. अन्नधान्य-प्रश्नाबाबतच या सरकारवर ठपका आला.

नेहरूनंतर नेता निवडण्यासाठीं काँग्रेस पार्लमेंटरी पक्षाची जेव्हां बैठक भरली होती तेव्हां काँग्रेसचे अध्यक्ष कामराज यांनीं स्पष्ट इशारा दिला होता. ते म्हणाले होते, " नेहरू जिवंत होते तोंपर्यंत जनतेनें त्यांच्या सर्व चुका पोटांत घातल्या व काँग्रेसला पाठिंबा दिला. पण आतां जर आपण चुका केल्या तर जनता गय करणार नाहीं. "

कामराज यांचा हा इशारा लाल बहादूर व त्यांचे सहकारी यांनीं ध्यानांत ठेवलेला दिसतो. नेहरूंच्या काळांत सर्व निर्णय त्यांच्या एकट्यावर अवलंबून असत. त्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीहि छाती नव्हती. पण आतां सर्वजण

आपापल्या दृष्टीनें आणि परस्परांच्या सहकार्यानें परिस्थिति काबूंत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. प्रत्येक मंत्र्याला आपल्यावरील जबाबदारीची जाणीव झालेली आहे आणि आपलें काम चोखपणें कसें पार पडेल इकडे त्याचें लक्ष लागलें आहे. असें विधान करणें म्हणजे नेहरूंच्या कारभाराची निंदा करणें खासच नव्हे. येथें फक्त वस्तुस्थितीचें दर्शन घडविलें आहे.

" आपल्या मंत्रिमंडळासमोर सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कोणता आहे ? " असा प्रश्न वृत्तपत्रकारांनीं त्यांच्या पहिल्याच भेटींत विचारला होता. " भाववाढीच्या प्रश्नाकडे आम्हांस प्रथम लक्ष द्यावें लागेल " असें शास्त्रींनीं या प्रश्नाला उत्तर दिलें.

अन्नधान्याचा प्रश्न बिकट आहे खरा पण त्याचा दोष केवळ शास्त्री-सरकारला लावतां येणार नाहीं. गेलीं १७ वर्षें हा प्रश्न मधूनमधून डोकें वर काढीतच आहे.

सध्यांची भाववाढ ही मात्र अचिंत्य व अभूतपूर्व आहे. गेल्या १० वर्षांत वाढले नाहींत इतके म्हणजे १८ टक्के गेल्या १८ महिन्यांत धान्याचे भाव वाढले. या बाबतींत सरकारनें पावलें उचललीं आहेतच.

परदेशांतून भरपूर धान्य आयात करण्याचें ठरवून आजच्या तांतडीच्या अडचणींना सरकारनें तोंड देण्याचें ठरविलें आहे. पाकिस्तानकडून ७१,००० टन, थायलंडकडून १०,००० टन आणि कंबोडियाकडून ६०,००० टन धान्य आयात करण्याची व्यवस्था झाल्याचें लाल बहादूर यांनीं नुकतेंच जाहीर केलें आहे.

अमेरिकेनें एकूण ३ लक्ष टन तांदूळ भारताला देण्याचें मान्य केलें असून त्यापैकीं २ लाख टन तांदूळ ताबडतोब मिळणार आहे.

स्वस्त धान्यांचीं दुकानें वाढविण्यांत येत आहेत. यासाठीं १९६३ मध्यें सरकारकडून ३७ कोटी रुपये मदत मिळाली होती. मदतीचा हा आंकडा १९६४ सालीं ५० कोटी रुपये झाला आहे.

स्वस्त धान्यांच्या दुकानांत गोंधळ होतो अशा तक्रारी आल्यानें त्या-संबंधींची चौकशी करण्यासाठीं एक चौकशी समिति नेमण्यांत येत आहे.

तांतडीच्या तुटवडयाची व्यवस्था केली तरी अन्नधान्याबाबत दूरगामी कार्यक्रम आंखणें आवश्यक आहे. म्हणून सरकारनें अन्नधान्य खरेदीविक्री

संघ स्थापन केला आहे. हा संघ भारतांत पिकणारें धान्य योग्य किंमतीस विकत घेईल व त्याची योग्य वांटणी करील.

या संघाच्या कार्यवाहीस वेळ लागेल. म्हणून मुख्य मंत्र्यांचे व्यक्तिगत चिटणीस श्री. एल्. के. झा यांच्या अध्यक्षतेखालीं एक तात्पुरती समिति नेमण्यांत आली आहे. श्री. झा हे एक नाणावलेले अर्थशास्त्रज्ञ आहेत. शेतकऱ्याला द्यावयाची धान्याची किंमत, आणि घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना मिळावयाचे दर यांचा ही समिति विचार करील.

धान्याचें उत्पादन, वांटप आणि धान्याचे भाव यांचा संपूर्ण विचार करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. लोकसभेंत अन्नधान्य प्रश्नावर चर्चा चालू असतां अन्नमंत्री सुब्रह्मण्यम् यांनीं ही माहिती सांगितली. हें धोरण दूरगामी आहे.

देशांतील धान्याचें उत्पादन वाढावें म्हणून सरकारनें शेतकऱ्यांना धान्याचे सढळ भाव देण्याचें ठरविलें आहे. यासाठीं लौकरच शेतीमूल्यमापन समिति नेमण्यांत येणार आहे. रब्बी पिकांच्या हंगामाच्या सुरुवातीसच या समितीचें काम सुरू होईल. घाऊक व किरकोळ व्यापारी यांना धान्यविक्रीसाठीं, धान्य निवडणें, सांठवणें, वाहतूक, भौगोलिक परिस्थितीचा विचार, व बाजारांतील तेजीमंदी यांसाठीं जो खर्च येतो त्याचा विचार करून त्या प्रमाणांत विक्रीचे दर ठरविणें हें या समितीचें कार्य राहील.

धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं धरणें, कालवे वगैरेंच्या योजना हातीं घेण्यांत येत आहेत. बीं-बियाणांचा दर्जा वाढविण्यासाठीं कायदे करण्यांत येतील. १९७१ पर्यंत पिकांच्या संरक्षणाच्या योजना पुऱ्या होतील. भाताच्या गिरण्या व शेतीसाठीं आवश्यक असलेलीं साधनें यांची शक्यतों लौकर सोय करण्यांत येणार आहे.

अमेरिकेच्या साहाय्यानें खतांचे पांच प्रचंड कारखाने उभारण्यांत येणार आहेत. या कारखान्यांना २५० कोटी रुपये खर्च लागणार असून येत्या ३-४ वर्षांत दरवर्षी दहा लक्ष टन खत निर्माण होईल. ४ थ्या पंचवार्षिक योजनेंत एकूण २० लाख टन खत निर्माण करण्याची योजना आहे. त्यांपैकीं निम्मा हिस्सा आतांच पुरा होत आहे.

भारतदेश अन्नधान्याच्या बाबतींत स्वावलंबी व्हावा हा हेतु मनांत

धरून हे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

२० सप्टेंबर रोजीं कलकत्ता येथील एका भाषणांत लाल बहादूर यांनीं देशांतील अन्नधान्याचा मुद्दाम उल्लेख केला. नवीन तयार होणारें पीक, परदेशांतून धान्याची होणारी आयात यामुळें देशांतील अन्नधान्याची परिस्थिति सुधारेल असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला. पण याच वेळीं केरळ व इतर ठिकाणीं धान्य मिळविण्यासाठीं दंगे सुरू झाले, मंत्र्यांचीं वक्तव्यें आणि धान्याचा तुटवडा हीं दोन्ही सारख्याच गतीनें चालू होतीं.

कापडाच्या किंमती कायद्यानें नियंत्रित करण्याची मोहीम सुद्धां या वेळीं सरकारतर्फे सुरू झाली. १५ ऑगस्ट रोजीं लाल किल्ल्यावरून केलेल्या आपल्या भाषणांत लाल बहादूर म्हणाले, "कापड, साखर, तेल, भाज्या, काड्याच्या पेट्या, सायकली वाजवी किंमतीला मिळतील अशी व्यवस्था सरकार करीत आहे."

देशांतील चलनवाढीला आळा घालण्याच्या प्रश्नाकडेहि पंतप्रधान जातीनें लक्ष देत आहेत. सरकारी खर्चांत काटकसर करण्याच्या त्यांनीं आपल्या मंत्रि-मंडळाला सूचना दिल्या आहेत.

या संबंधांत ते म्हणतात, "आज जी परिस्थिति आहे, ती स्फोटक होण्याचा संभव आहे, त्यासाठीं आपण दक्ष राहिलें पाहिजे. सामान्य नागरिकास ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या पुरविण्याकडे आपण आपलें लक्ष केंद्रित केलें पाहिजे. सर्वसामान्य नागरिकाला अन्न, निवारा, वैद्यकीय मदत आणि नौकरीची संधि एवढ्यांचीच गरज असते. या गरजा पुरविण्याकडे सरकारनें प्रथम लक्ष देणें हें आवश्यक आहे."

ह्या सूचना कांहीं काळानें जाहीर झाल्या. कॉंग्रेसमधील डावे आणि कम्युनिस्ट यांनीं त्या सूचनांचा विपर्यास केला तेव्हां लाल बहादूर यांनीं आपल्या सूचनांस मुरड घातली. ज्या जड उद्योगधंद्यांच्या बाबतींत नव्यानें उभारणी करावयाची होती त्या तूर्त स्थगित ठेवाव्यात असें त्यांनीं सांगितलें. अर्थातच ही तहकुबी तात्पुरती आहे हें याच वेळीं त्यांनीं स्पष्ट केलें.

नव्या नव्या योजना आंखण्यापेक्षां ज्या योजना सध्यां आपण हातीं घेतल्या आहेत त्या पुऱ्या करणें, आणि ज्या योजना पुऱ्या झाल्या आहेत त्यांपासून फलनिष्पत्ति होत आहे किंवा नाहीं हें पाहणें, हा चवथ्या पंचवार्षिक योजनेचा

पाया आहे असें लाल बहादूर यांचें मत होतें.

जनतेवर गेलीं कांहीं वर्षें करांचा जो जबरदस्त बोजा पडला आहे तो न्याय्य आहे, त्यापासून त्यांना फायदे मिळत आहेत, असें जनतेस वाटलें पाहिजे असें त्यांनीं योजनांबाबत बोलतांना सांगितलें. जनतेनें या योजनांत करांच्या रूपानें जी गुंतवण केली, त्यासाठीं जो त्याग केला, वाढत्या करांचें जें ओझें सहन केलें त्यांचा जनतेस मिळावा तितका फायदा मिळाला नाहीं याची शास्त्रींना काळजी लागून राहिली होती.

या वर त्यांनीं उपायहि सांगितला. ज्या योजना व आंखण्या यांच्यावर पैसे खर्च झाले असतील अथवा नजीकच्या भविष्यकाळांत खर्च व्हावयाचे असतील त्यांचें अर्थमंत्री व योजना समितीचे उपाध्यक्ष यांनीं नव्यानें मूल्यमापन करावें, असें त्यांनीं सुचविलें. असें केल्यास काटकसर तर होईलच पण लांब मुदतीच्या योजना त्वरेनें पुऱ्या होतील असा त्यांचा अंदाज होता. हा अंदाज व या अपेक्षा कितपत फलद्रूप झाल्या हें अजून ठरायचें आहे.

गृहमंत्री नंदा यांनीं लांचलुचपतीविरुद्ध अभिनव अशा प्रकारचें धर्मयुद्ध पुकारलें आहे. अनिर्बंध भाववाढीला आळा घालणें व दडलेला 'काळा पैसा' बाहेर काढणें ही मोहीम अर्थमंत्री कृष्णमाचारी यांनीं जोरानें चालविली आहे. संरक्षणमंत्री चव्हाण यांनीं रशियाबरोबर यशस्वी बोलणीं करून ९० कोटी रुपयांची मदत मिळविली आहे. अमेरिकेचा विरोध या मदतीला नाहीं आणि या मदतीमुळें भारताचें लष्करी सामर्थ्य वाढेल हे या मदतीचे फायदे आहेत.

काळाबाजारवाले, धान्याचे सांठे करणारे, चोरटा व्यापार करणारे, आणि परकीय चलनाचा गैरवापर करणारे यांच्याविरुद्ध गृहमंत्री नंदा यांनीं प्रचंड मोहीम सुरू केली आहे. आजवर येवढी मोठी मोहीम कोणीं हातीं घेतल्याचें ऐकिवांत नाहीं. राष्ट्रांत व राज्यकारभारांत बोकाळलेली लांचलुचपत थांबविण्या-साठीं संतानम् कमिटीनें ज्या धडाडीच्या शिफारशी केल्या आहेत त्यांपैकीं अनेक शिफारशी अमलांत आणण्याचें नंदांनीं आश्वासन दिलें आहे.

मंत्र्यांच्या खासगी मालमत्तेबद्दल केंद्र सरकार कांहीं उपाययोजना करीत नाहीं अशी तक्रार आजवर ऐकूं येत होती. या बाबतींतहि शास्त्री-सरकारनें खंबीर पावलें टाकलीं आहेत. केंद्रीयमंत्र्यांनीं व राज्यमंत्र्यांनीं अधिकार-

स्वीकार करण्याच्या वेळीं आपल्या खासगी मालमत्तेची संपूर्ण व तपशीलवार माहिती अनुक्रमें पंतप्रधान व राज्यांचे मुख्य मंत्री यांना दिली पाहिजे असें त्यांच्यावर बंधन घालण्यांत आलें आहे. ही माहिती त्यानंतर त्यांनीं दरवर्षी द्यावयाची आहे.

आपले मित्र व नातलग यांच्या फायद्यासाठीं मंत्र्यांनीं आपली सत्ता वापरूं नये असा त्यांना आदेश देण्यांत आला आहे. राजकीय कारणांसाठीं फंड केव्हां जमवावेत व केव्हां जमवूं नयेत यासंबंधींच्या तपशीलवार सूचना मंत्र्यांना देण्यांत आल्या आहेत.

या नियमांचा एखाद्या मंत्र्यानें भंग केल्यास अथवा प्रामाणिकपणासंबंधीं त्याच्यावर आरोप करण्यांत आले असल्यास त्याचा कशा पद्धतीनें निर्णय लावावा याचा तपशील ठरविण्यांत आला आहे.

अर्थमंत्री यांनीं बँकरेट ४॥ वरून ५ वर वाढविला यामुळें किमतींचें अवमूल्यन थांबलें. शिवाय व्यापारी बँकांवर नियंत्रणें आलीं. रिझर्व्ह बँकेकडून मिळालेलें कर्ज व त्यांच्या स्वतःच्या मालमत्तेतून त्यांनीं दिलेलें कर्ज यांचाहि मेळ बसविणें शक्य झालें.

वॉशिंग्टन व मॉस्को येथील श्री. चव्हाण यांचीं बोलणीं अत्यंत यशदायी झालीं. त्यामुळें संरक्षणासाठीं १९६४–१९६९ या काळापुरती एक पंचवार्षिक योजना आंखणें शक्य झालें. या मुदतीच्या अखेर भारतीय सैन्यांत ८ लक्ष २५ हजार जवान, व ४५ विमानदलांचे विभाग असतील. या विभागांजवळ अद्यावत् शस्त्रसामुग्री असेल; आरमाराचें आधुनिकीकरण होईल; सरहद्दीवरील रस्ते, पुरवठ्याचे मार्ग आणि संरक्षण उत्पादनाचे कारखाने यांची वाढ होईल. या योजनेनें आपल्या देशाच्या संरक्षणविषयक सर्व गरजा भागतील.

मिग विमानें तयार करण्याची यंत्रसामुग्री व कारखाने कांहीं प्रमाणांत रशियाकडून आपणांस मिळणार आहेत. हवाईदलाची वाढ होणार आहे. हलके रणगाडे, २३ विमानें, पाणबुड्या वगैरे साधनेंहि आपणांस मिळावयाचीं आहेत. या सर्वांची परतफेड रुपयांत करावयाची असल्यानें परकीय चलनावर ताण पडणार नाहीं.

आपल्या परराष्ट्रीय खात्यासाठीं सरदार स्वरणसिंग यांना मंत्री म्हणून नेमण्यांत आलें आहे. त्यांच्याकडे इतर कोणतेंहि खातें नसल्यानें ते आपला

सर्व वेळ या खात्याला देऊं शकतील. मंत्रिपदावर आल्याबरोबर त्यांनीं अफगाणिस्तान, नेपाळ, ब्रह्मदेश व सिलोन या आपल्या शेजारच्या देशांना भेटी दिल्या, त्यामुळें या देशांमध्यें आपल्याबद्दल अधिक भ्रातृभाव निर्माण झाला आहे. सिलोनमध्यें ९ लक्ष ७० हजार भारतीय आहेत. त्यांना सिलोनचें नागरित्व मिळालेलें नाहीं. गेलीं १७ वर्षें हा प्रश्न अनिर्णित राहिला होता. १९५४ मध्यें या प्रश्नावर वाटाघाटी झाल्या, पण त्या फिसकटल्या.

भारत आणि त्याचा शेजारी यांच्यामध्यें महत्त्वाच्या प्रश्नावर झालेली अशी ही पहिलीच तडजोड होय. ३० ऑक्टोबर १९६४ रोजीं या करारावर उभय पक्षांच्या सह्या झाल्या. करारांत एकुण १० कलमें होतीं. सिलोनमधील एकूण भारतीयांपैकीं ३ लक्ष लोकांना सिलोनी नागरिकत्व देण्याचें सिलोननें या करारान्वयें मान्य केलें. ५ लक्ष २० हजार लोकांनीं भारतांत परतावें असें ठरलें. भारतांत परत येणाऱ्या भारतीयांना आपली सर्व मालमत्ता घेऊन येण्याची परवानगी मिळाली. ( हुंडणावळींसंबंधीं प्रचलित नियमांना धरून ).

१ लक्ष ५० हजार भारतीयांचें भवितव्य नंतर ठरवावयाचें आहे. मालमत्ता परत आणतांना इतर परकीयांवर जे निर्बंध लादण्यांत येतात तेच भारतीयांना लागूं करण्यांत येतील असें ठरलें.

भारत आणि पाकिस्तान यांच्यांत स्नेहाचे संबंध प्रस्थापित व्हावेत यासाठींहि शास्त्रीसरकारनें धडपड केली. यासाठीं जयप्रकाश नारायण यांच्या प्रयत्नांस भारत सरकारनें भर दिली. शेख अबदुल्ला हे काश्मीर स्वतंत्र राहावा अशा घोषणा करीत असतात. अशा घोषणा करणें हा भारताच्या कायद्यानुसार राष्ट्रद्रोह आहे; तरीसुद्धां शेख अबदुल्ला यांना संपूर्ण भाषणस्वातंत्र्य देण्यांत आलें.

अलिप्त राष्ट्रांच्या कैरो येथें भरलेल्या शिखर परिषदेहून परत येतांना १२ ऑक्टोबर रोजीं लाल बहादूर शास्त्री यांनीं खुद्द आयूब खानांची भेट घेतली. ही भेट जेवणाच्या निमित्तानें झाली आणि परस्पर परिचयापलीकडे तिला महत्त्व नव्हतें हें जरी खरें असलें तरी या बाबतींत सुरुवात झाली हेंहि नसें थोडकें ! या दोघां पुढाऱ्यांचे स्नेहसंबंध वाढीस लागावे अशी आपण आशा करूं या.

नागांचा प्रश्न ही शास्त्रीमंत्रिमंडळापुढें एक डोकेंदुखी आहे. या बाबतींत बिनसरकारी प्रयत्न चालूं आहेत. हे प्रयत्न भारतीय राज्यघटनेच्या चौकटींत

बसणारे असतील, नागांच्या रास्त अपेक्षा व्यक्त करणारे असतील तर त्यांचा भारत सरकारनें सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें ठरविलें आहे. ते असफल झाले तर त्यांचें खापर भारत सरकारवर खासच फुटणार नाहीं.

चिनी सरकारला शास्त्रीसरकार सहानुभूति दाखवायला बिल्कूल तयार नाहीं. कोलंबो योजनेच्याखालीं उतरून चीनशीं वाटाघाटी करायला भारत सरकारची मान्यता नाहीं. लडाखमधील चीननें बळकावलेलीं सात ठाणीं चीननें प्रथम सोडलीं पाहिजेत. सिलोन सरकारनें तशी सूचना केलेली आहे, ती चीननें मान्य केल्यासच भारत सरकार चीनबरोबर वाटाघाटी करण्याचा विचार करील. पण चीननें ही सूचना मान्य केलेली नाहीं.

लालबहादूर कैरोला जाण्यापूर्वी भारताचे राजनैतिक दूत आफ्रिकेंत दौरा करून आले. चिनी धोरणाबद्दल आणि काश्मीर प्रश्नांबद्दल या दूतांनीं भारताचें म्हणणें त्या देशांना कळविलें. आशिया व आफ्रिका यांच्यासंबंधींच्या प्रश्नांवर ऊहापोह करण्यांत आला.

कैरो येथील शिखर परिषद ही शास्त्रींच्या आंतरराष्ट्रीय कार्याची सुरुवात होती. त्यांत ते नुसते यशस्वीच झाले नाहींत तर चांगले चमकले. त्यांनीं मांडलेली पांच कलमी योजना सर्वांनीं एकमुखानें मान्य केली. जागतिक शांतता आणि शांततामय सहजीवन हीं नेहरूंचीं तत्त्वें मानणाऱ्या शास्त्रींना नेहरूंचा लायक वारस म्हणून मान्यता मिळाली. शास्त्रींनीं मांडलेल्या योजनेचें परिषदेच्या ठरावांत रूपांतर झालें.

भारताचा झेंडा परराष्ट्रांत फडकविण्याचें कार्य राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् यांनीं याच सुमारास केलें. रशिया व भारत यांत सलोखा आहे असें त्यांनीं मॉस्को येथें जाहीर केलें. शास्त्रीसरकारचा या धोरणास पाठिंबा आहे असें त्यांनीं सांगितलें. शांततामय सहजीवन आणि निःशस्त्रीकरण याबाबत भारत व रशिया यांत ऐक्य आहे याबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला. भारत अलिप्ततावादी राहील असें त्यांनीं मॉस्कोंत सांगितलें.

डब्लिन येथील मुक्कामांत काश्मीर-प्रकरणासंबंधीं आयर्लंडच्या अध्यक्षांचें मत भारताच्या बाजूनें अनुकूल करण्यांत त्यांना यश मिळालें. १९६२ मध्यें सुरक्षा समितींत आयरिश प्रतिनिधीनें भारताच्या विरुद्ध भूमिका घेतली होती म्हणून राष्ट्राध्यक्षांना हा प्रश्न आयर्लंडमध्यें उपस्थित करावा लागला.

राधाकृष्णन् यांच्याबरोबर जे भारतीय वृत्तपत्रकार गेले होते त्यांच्याशीं बोलतांना आयर्लंडचे पंतप्रधान सीन फ्रॅन्चेस लेमास म्हणाले, " काश्मीर प्रश्न कसा सोडवावा याबद्दल आयर्लंड कोणालाहि वचनबद्ध नाहीं." काश्मीर स्वतंत्र राहावा, एकाद्या अल्पसंख्यांक विभागानें राज्यांतून बाहेर पडावें ही कल्पना आपणांस मान्य नसल्याचें लेमास यांनीं जाहीर केलें.

या घटनेचें महत्त्व असें कीं काश्मीरचा स्वयंनिर्णयाचा पाकिस्तानचा दावा आपल्या देशास मान्य आहे असा १९६२ मध्यें सुरक्षा समितींत आयर्लंडच्या प्रतिनिधीनें केलेल्या भाषणांत सूर निघत होता.

अधिकारस्वीकारानंतर शास्त्रीसरकारनें पहिल्या ४ महिन्यांत केलेल्या कार्याचा हा धांवता आढावा आहे. लोकसभेच्या अधिवेशनांत सरकारवर अविश्वासाचा ठराव मांडण्यांत आला होता. काँग्रेसचें बहुमत हुकमी असल्यामुळें तो ठराव नापास झाला. परंतु सरकारनें सर्व बाजूनें केलेले प्रयत्न आणि विरोधकांनीं केलेल्या टीकेवरील सरकारचीं उत्तरें यामुळें शास्त्रीसरकारचा प्रभाव दिसून आला. या चर्चेला शास्त्रीजींनीं स्वाभिमानपूर्वक व तडफेनें उत्तर दिलें. नेहरूंशीं एकनिष्ठ राहूनहि बदलती परिस्थिति आणि निर्माण झालेल्या गरजा यांना अनुलक्षून कार्याचा ओघ वळविणें हा पंतप्रधानाचा अधिकार आहे असें त्यांनीं ठासून सांगितलें. मूळ आरोप हिरेन मुकर्जी या कम्युनिस्ट पक्षीय सभासदानें केला होता. त्याला उत्तर देतांना शास्त्री म्हणाले, " लोकशाहींत दिशा बदलणें अथवा दिशा बदलणारा असा प्रकार नसतो. लोकशाहीच्या कोशांत या शब्दांना स्थान नाहीं. पुनर्विचार करणें, नव्या कल्पना व नवीं धोरणें आंखण्याबाबत स्वातंत्र्य असणें यांना लोकशाहींत स्वातंत्र्य असतें." आपल्या भाषणांत त्यांनीं नेहरूंचा दाखला दिला. ते म्हणाले, " नेहरूंचें गांधींवर प्रेम होतें. गांधींशीं ते एकनिष्ठ होते. पण ज्या वेळीं नेहरूंनीं अधिकाराचीं सूत्रें हातीं घेतलीं त्या वेळीं गांधीजींची प्रत्येक कल्पना कृतींत आणणें नेहरूंना शक्य झालें नाहीं. गांधीजींची नेहरूंनीं प्रतारणा केली अथवा जें योग्य होतें तें केलें नाहीं असा याचा खासच अर्थ नव्हे. लेनिनचेंच उदाहरण घ्या. तें कम्युनिस्टांना पटेल. लेनिनला मार्क्सची तत्त्वप्रणाली बदलावी लागली, स्टालिनला लेनिनची बदलावी लागली, ख्रुश्चोव्हनें तर स्टालिनच्या पावलावर पाऊल टाकावयाचें नाकारलें. या सगळ्यांची मूलभूत धारणा एकच होती.

याचा अर्थ असा कीं नेता हा जर खऱ्या अर्थानें नेता असेल तर अंधानुकरण करीत नाहीं. राजकारणांत परिस्थिति पालटते, माणसें बदलतात, म्हणून या बदललेल्या परिस्थितीच्या अनुरोधानें नेत्याला आपलें धोरण ठरवावें लागतें. ”

या चर्चेतून लालबहादूर मानाचा तुरा घेऊन बाहेर पडले. त्यांची प्रतिष्ठा वाढली. शास्त्रीसरकार हें लेचेंपेचें नाहीं, खंबीर आहे याचा कम्युनिस्टांना पडताळा आला.

शास्त्री-मंत्रिमंडळ सामुदायिक जबाबदारीनें वागत आहे असें निःशंक मनानें म्हणतां येईल. मंत्रिमंडळाच्या बैठकींत सर्व प्रश्नांची चर्चा खुलेपणानें व संपूर्णपणें होते. संबंधित मंत्री आपली बाजू मांडतो. त्याचे सहकारी वादविवादांत भाग घेतात. त्यानंतर पंतप्रधान चर्चेचा गोषवारा सांगतात. हा गोषवारा म्हणजेच मंत्रिमंडळाचा निर्णय.

नेहरू-मंत्रिमंडळांत असा प्रघात नव्हता. तेथील चर्चेची पद्धत अशी : संबंधित मंत्र्यानें मंत्रिमंडळापुढें आपला प्रश्न मांडावयाचा, त्यावर नेहरूंनीं त्याच्याशीं पूर्वीच चर्चा केलेली असायची. या बाबतीत काय करावयाचें आहे हें नेहरूंनीं सांगावयाचें व मंत्रिमंडळानें नेहरूंचें मत मान्य करावयाचें कांहीं वेळां तर असें होई कीं सरकारी निर्णय अमलांत आल्यानंतरच मंत्र्यांना तो कळावयाचा. नवीन मंत्रिमंडळानें आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच पंजाबच्या बाबतींत घेतलेल्या निर्णयानें काँग्रेस पक्षांत मंत्रिमंडळाचा दबदबा वाढला. प्रतापसिंग कैरॉं हे पंजाबचे मुख्य मंत्री. त्यांना राजीनामा देण्यास सांगूनहि त्यांनीं तो दिला नाहीं. दास कमिशनचा निर्णय जाहीर झाल्यानंतर आणि तो कैरॉंच्याविरुद्ध आहे असें समजल्यानंतर अवघ्या २४ तासांचे आंत कैरॉंची उचलबांगडी करण्यांत आली. पण येवढ्यावरच हें प्रकरण संपत नव्हतें. कैरॉंनंतर कोण, हा प्रश्न डोकेंदुखी उत्पन्न करणारा होता. काँग्रेसश्रेष्ठींनीं या प्रश्नाबाबत पंजाबांतील काँग्रेसवाल्यांचा अंदाज घेतला आणि तडकाफडकीं रामकिशन यांची काँग्रेस पक्षाचे नेते व मुख्य मंत्री अशी नेमणूक केली. काँग्रेस पक्षांतील अधिकारारूढ व विरोधी अशा दोघांनाहि या निर्णयाविरुद्ध हरकत घ्यायला जागा राहिली नाहीं.

पंजाबमधील हें प्रकरण मिटवण्यासाठीं काँग्रेसश्रेष्ठींनीं सरदार स्वरणसिंग

यांची नियुक्ति केली होती. त्यांनीं आपलें काम चोख बजावलें. परस्परविरोधी अशा दोन्ही पक्षांवर शह–काटशह बसवून रामकिशन या तिऱ्हाइतालाच पंजाबच्या गादीवर स्वरणसिंगांनीं बसवलें. आनंदाची गोष्ट अशी कीं रामकिशन-मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यापासून पंजाबांतील तंटेबखेडे पुष्कळच कमी झालेले आहेत.

लालबहादुरांची पंतप्रधानकीची कारकीर्द सुरुवातीपासूनच गुलाबांच्या फुलां-प्रमाणें सुखद होती असें वरील विवेचनावरून वाटेल. पण या गुलाबांना कांटे होते. केरळचेंच उदाहरण घ्या. केरळमध्यें काँग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारावर होतें. पण काँग्रेसमधीलच कांहीं सभासदांनीं विरोधी पक्षांशीं हात-मिळवणी करून तें मंत्रिमंडळ उलथून टाकलें. ओरिसामध्यें काँग्रेसश्रेष्ठींचे आदेश धुडकावून लावण्यांत आले. उत्तरप्रदेश काँग्रेसमध्यें आपापसांत भांडाभांडी चालूच होती. तेथील गोंडा निवडणुकींत राज्यसरकारचेच हात बरबटलेले होते.

या सर्व प्रकरणांचे पडसाद दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकींत उमटले. नेहरूंच्या निधनानंतर भरलेली ही पहिली बैठक होती. या बैठकींत नेहरूंवर प्रखर टीका करण्यांत आली. सभेचें गांभीर्य नष्ट झालें. काँग्रेसमधील उजव्या गटाचे प्रतिनिधि आणि असंतुष्ट आत्मे पुढाऱ्यांवर टीकेची राळ उडवूं लागले. नेत्यांच्या हेतूंवर शिंतोडे उडवण्यांत आले. कॉलेजमधील बेजबाबदार विद्यार्थ्यांनीं अधिकाऱ्यांवर तोंडसुख घ्यावें असा प्रकार घडला.

या वेळीं लालबहादूर उठले. सर्व लोकांस त्यांनीं शांत केलें. नेहरूंवर केलेल्या टीकेचा समाचार घेतला. सभेंत शांतता नांदूं लागली. विरोधी ठराव मांडणाऱ्या सभासदानें ठराव मागें घेतला.

लालबहादूर यांनीं बैठकीला विश्वासांत घेतलें. कामराज-योजना कोणत्या परिस्थितीमुळें निर्माण झाली, ती कशी अमलांत आली याचें त्यांनीं सविस्तर विवेचन केलें. नेहरूंबरोबर झालेलें यासंबंधींचें बोलणें त्यांनीं सभेला तपशील-वार सांगितलें. मंत्रिमंडळांतील कांहीं मंत्र्यांना हुसकावून लावण्यासाठीं कामराज-योजना हा एक कट रचण्यांत आला होता हा आरोप त्यांनीं खोडून काढला.

लालबहादुरांच्या या संयमशील व सप्रमाण भाषणाचा बैठकीवर इष्ट असा परिणाम झाला. वारे अनुकूल वाहूं लागले. दिल्ली येथें भरलेली ही बैठक हा लालबहादुरांचा व्यक्तिगत व पराक्रमी विजय होता असें म्हटलें तरी चालेल.

एका आठवड्याचे आंतच काँग्रेसमधील डाव्या गटाचे सभासदांनीं हल्ले करण्यास सुरुवात केली. उत्तर भारत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या दिल्ली येथें भरलेल्या अधिवेशनाच्या निमित्तानें हे लोक जमले होते. नेहरूंचा विश्वासघात झाला, त्यांचें धोरण बाजूला सारण्यांत आलें असे या सभेंत आरोप करण्यांत आले. शास्त्रीमंत्रिमंडळ प्रतिगामी लोकांच्या हातांतील बाहुलें बनलें आहे अशी टीका सुरू झाली.

या अशा आणीबाणीचे वेळीं कामराजांनीं फड जिंकला. त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचें सामर्थ्य, त्यांचेवर पक्षाचा असलेला अढळ विश्वास यांचा उपयोग झाला. लालबहादूर शास्त्री यांचा खंबीरपणा, देशप्रेम आणि अखिल भारताचा पाठिंबा हे गुण येथें कसास लागले. यापुढें या दोघांची एकवाक्यता आणि मुत्सद्देगिरी यांची परीक्षा व्हावयाची आहे. ते एकत्र राहिले आणि युक्तिवाद व खंबीरपणा यांच्या जोरावर आजची आणीबाणीची परिस्थिति त्यांनीं यशस्वीरीत्या हाताळली तरच काँग्रेसला भले दिवस येतील. राज्यांतील काँग्रेसचे गट, दक्षिण व पूर्व भारतांतील काँग्रेसचा पाठिंबा, मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारी ही शास्त्री-कामराज यांच्या पाठीशीं उभी राहिली तर वादळांतून भारताची नौका मार्ग काढील. या युतीला जनतेचा पाठिंबा आहे. काँग्रेसमधील मध्यवर्ति गटाचाहि सहकार आहे.

योग्य उपदेश आणि तदनुसार कृति यांची श्रेष्ठींच्या बाबतींत अंमलबजावणी झाली पाहिजे. सामान्य काँग्रेसजनांच्या बाबतींत शिस्तीचा बडगा दाखविला पाहिजे. शहाणपणाचीं, तात्बडतोबीचीं आणि खंबीर अशीं धोरणें आणि कार्यें आंखलीं पाहिजेत; तरच काँग्रेसपक्षाचें वैभव वाढेल.

राज्यसरकारांचा वरचष्मा हा शास्त्रींच्या राज्यकारभारांतील दुबळा दुवा आहे. राज्यसरकारांचे मंत्री केंद्रसरकारला कांहीं बाबतींत जुमानीनासे झालेले आहेत. या कारवाया मुळांतच उपटून टाकल्या नाहींत, तर भवितव्य धोक्याचें होण्याचा संभव आहे.

# १५

## पंतप्रधानांचा राष्ट्राला संदेश*

मित्रहो, आजपर्यंत आपल्यांत वावरत असलेला हिमालयी पुरुष आतां आपल्यांत नाहीं. त्याचें नेतृत्व अथवा मार्गदर्शन आतां आपणांस मिळणार नाहीं. ज्या भारतावर पंडितजींनीं निरपेक्ष प्रेम केलें त्या भारताच्या मातींत आणि त्या भारताच्या जलाशयांत त्यांचे पार्थिव अवशेष मिसळून गेले आहेत. शरीरानें जवाहरलालजी आज आपल्याला दिसत नसतील पण त्यांचें कार्य आणि त्यांची स्फूर्ति अमर आहे. आणि त्यांचे बांधव, समकालीन व सहकारी या नात्यांनीं त्यांच्याशीं बद्ध झालेल्या आम्हांवर भावी कार्याची जबाबदारी येऊन पडली आहे. जवाहरलालविरहित भारत ही कल्पनाच आजवर आम्हांस असह्य होत असे, पण त्या परिस्थितीशीं मुकाबला करण्याची वेळ आमच्यावर आली आहे.

प्रत्येक राष्ट्राच्या आयुष्यांत असा क्षण येतो. इतिहासाच्या आणि भवितव्यतेच्या संगमाशीं तें राष्ट्र उभें असतें आणि आपण कोणत्या मार्गानें जावयाचें याचा निर्णय घेण्याची वेळ येते. सुदैवानें आपल्यापुढें असली समस्या नाहीं, अडचण नाहीं, संभ्रम नाहीं. आजूबाजूला शोधण्याची जरूर नाहीं आमचा मार्ग सरळ आणि स्पष्ट आहे. आम्हांला लोकशाही असलेला समाजवाद भारतांत निर्माण करावयाचा आहे. येथें सर्वांना स्वातंत्र्य आणि वैभव मिळालें

* ११ जुलै १९६४ रोजीं आकाशवाणीवरून केलेलें भाषण

पाहिजे. परराष्ट्रांशीं सलोख्याचे व शांततेचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. त्यांची मैत्री संपादन केली पाहिजे.

हा सरळ व सीधा रस्ता आम्हीं घेऊं, हीं तेजस्वी ध्येयें आम्हीं आचरूं अशी आज आपण शपथ घेऊं या.

या शपथेची सुरुवात मोठी मंगल आहे. आणीबाणीच्या काळांत माझे सहकारी एका झेंड्याखालीं गोळा झाले. माझ्यावर अवजड जबाबदारी पडत असतां आपण माझें खुल्या दिलानें स्वागत केलेंत. मी आपला अत्यंत आभारी आहें. यासाठीं मला तुमच्या हार्दिक सहकार्याची गरज आहे. आमची जनता हें आमच्या शक्तीचें उगमस्थान आहे. या उगमस्थानापासूनच मला स्फूर्ति मिळो.

आपल्यापुढें मोठमोठीं कामें उभीं आहेत. भारतांत एकी आणि अभेद्य वृत्ति वाढविणें हें पहिलें व महत्त्वाचें कार्य होय. संकट आलें असतां आपला देश सदैव सह्याद्रिप्रमाणें एकसंध उभा राहिला आहे. आमच्यांत अनेकता असेल पण एकीच्या सुवर्णसूत्रानें ती गुंफली आहे. राष्ट्रीय ऐक्य आणि कणखरपणा गृहीत कसा धरतां येणार ! शिवाय असेहि प्रसंग आहेत कीं ज्या वेळीं आमच्यांत दुर्दैवी व भीतिदायक दुफळ्या झाल्या आहेत. कांहीं वेळां तर त्यामध्यें पवित्र रक्तहि सांडलें गेलें आहे. जन्मभर निरलसपणें जातीय ऐक्याकरितां आणि सहनशीलतेकरितां धडपडणाऱ्या जवाहरलालजींना असल्या कृत्यांमुळें धक्का बसे, वेदना होत. भारतांत अनेक भागांत अनेक लोक आहेत. विशिष्ट प्रश्नांबाबत त्यांच्या बलवत्तर भावना आहेत. या लोकांनीं हें विसरूं नये कीं आपण प्रथम भारतीय आहोंत. एक देश आणि एकच राष्ट्र या अभेद्य चौकटींत आपण आपले मतभेद मिटविले पाहिजेत. ही एकात्मतेची भावना वाढविणें आणि राष्ट्रीय एकजुटीचा गाडा पुढें नेणें यासाठीं आपण निकराचा प्रयत्न करूं या. राष्ट्रीय एकात्मकता परिषदेनें १९६१ पासून हें कार्य हातीं घेतलें आहे हें आपणांस माहीत आहेच.

आपण आपल्या देशांत राजकीय लोकशाही रुजविली व राबविली हा आपला मोठा विजय आहे. याबाबतहि आपण जवाहरलालजींचे ऋणी असले पाहिजे. कारण राज्यकारभारांत काय किंवा जीवनांत काय त्यांना लोकशाहीचा मार्ग प्रिय होता. आपला सांस्कृतिक वारसाहि या प्रवृत्तीला अनुकूल आहे.

मानवी मूल्यें जतन करणें आणि संयमाचें प्रतिपालन करणें ही भारतीय जीवनाची अनादिकाळापासून चालत आलेली परंपरा आहे. हृदयपरिवर्तन आणि परस्परांची सोय, साम्य स्थळांचा सतत शोध आणि त्याबरहुकूम चाललेलें कार्य यांनींच लोकशाही उभारली जाईल याबद्दल मला शंका नाहीं. माझ्यावर जी जबाबदारी टाकण्यांत आली आहे, जीं कर्तव्यें करण्याची मला आज्ञा देण्यांत आली आहे त्यांना याच भावनेनें मी वाहून घेईन.

आपल्यापुढें प्रश्न अनेक आहेत पण आपल्याच देशबांधवांपैकीं लाखों लोकांचे सतत भीषण दारिद्र्य हा त्यांपैकीं एक भेसूर प्रश्न आहे. हें दारिद्र्य नाहींसें करण्याचा मार्ग मला सांपडला असता तर किती बरें झालें असतें. मागासलेल्या जाती व जमाती यांनीं शतकानुशतकें अपेष्टा सोसल्या आहेत. त्यांच्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. त्यांचा मला विसर पडणें शक्य नाहीं. समतेवर आधारलेली समाजरचना निर्माण करणें व त्यासाठीं धडपड करणें हें माझें कर्तव्य आहे; आणि तें कर्तव्य करण्याची संधि मिळाली तर मी स्वतःला भाग्यवान समजेन.

आपल्याला संरक्षणाची आज सिद्धता करावयाची आहे. हें ओझें अवजड आहे. पण त्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं असें नुकत्याच घडलेल्या घटनांवरून दिसून येत आहे. यांत कमतरता होऊन चालणार नाहीं. देशाच्या प्रगतीच्या कार्यांत मात्र आपण या निमित्तानें अडथळा येऊं देतां कामा नये. कारण देशाची आर्थिक परिस्थिति सुधारणें हें आपलें पहिलें व पवित्र कर्तव्य आहे.

आपण अनेक धोरणें व योजना आंखल्या आहेत. त्या पार पाडण्यासाठीं सामर्थ्य आणि कार्यक्षमता यांची आपणांस गरज आहे हाहि एक आपल्या-समोर असलेला महत्त्वाचा प्रश्न आहे.

राज्यकारभारांतहि निष्ठा व कार्यक्षमता यांची आवश्यकता असते. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर आपल्या सेवकांवर कामाचे अनेक डोंगर येऊन पडले. त्यांनीं त्यांस साथहि चांगली दिली. आर्थिक सुधारणा आणि सामाजिक पुनर्रचना स्थिर करा-वयाच्या असतील तर राज्यकारभार सुधारला पाहिजे असें अनेकांचें मत आहे. मला तें पटतें. लोकसेवकांनीं व्यक्तिगत नागरिकांच्या भावना आणि प्रेरणा यांची दखल घेणें अवश्य आहे. केवळ औपचारिक सौजन्य न दाखवतां सेवा, सहानुभूति व सहृदयता यांची त्यांनीं जाणीव ठेवली पाहिजे. राज्ययंत्रणा ही

राष्ट्राच्या आर्थिक सुधारणेची प्रतीक व्हावयाची असेल तर तिचे मार्ग व पद्धति यांत जिवंतपणा आला पाहिजे. या सर्व प्रश्नांकडे मी काळजीपूर्वक लक्ष देईन आणि राजकीय यंत्रणा सुधारण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करीन. आपली जनता उत्साही आहे; आणि राष्ट्र स्थिर व सुदृढ करण्याकरितां त्याग करण्याची तिची तयारी आहे हें मला माहीत आहे. पण कधीं कधीं उत्साहाचें रूपांतर उतावळेपणामध्यें होतें आणि दुःखदायक घटना निर्माण होतात; म्हणून शिस्त आणि एकत्रित कृति हेंच राष्ट्राचें खरें सामर्थ्य आहे. राष्ट्राची पुनर्रचना करण्याचे बाबतींत निरनिराळे राष्ट्रीय पक्ष याच भावनेनें मला साथ देतील का? वृत्तपत्रांची कामगिरीहि मोठी आहे. समाजावर त्यांचें वजन असतें, समाजाचें सामर्थ्य त्यांचे मागें असतें. हें सामर्थ्य व हें वजन देशहिताकरितां ते वापरतील असा मला विश्वास आहे. जनतेची सेवा हें आपलें समान ध्येय आहे. या ध्येयाचे मार्ग मात्र भिन्न आहेत. या मतभेदाबद्दल मला आदर वाटेल; पण ध्येयाकडेच आपलें लक्ष केंद्रित केलें पाहिजे असें मी म्हणेन.

परराष्ट्रांशीं आपण सलोख्याचे संबंध ठेवूं. त्यांचा ध्येयवाद आणि त्यांची राज्यव्यवस्था भिन्न असली तरी जागतिक प्रश्नांकडे आणि इतर राष्ट्रांशीं असलेल्या आपल्या संबंधांकडे पाहतांना अलिप्तता हेंच आपलें मूलभूत ध्येय राहील. शेजारच्या राष्ट्रांशीं वागतांना आपण संबंध अधिक दृढ करूं. सुदैवानें आपल्या बहुतेक शेजाऱ्यांशीं आपले स्नेहाचे व सहकार्याचे संबंध आहेत. ज्यांच्याशीं आपले मतभेद असतील ते आपण शांततेनें आणि सौजन्यानें सोडवूं; मात्र त्यांनीं आम्हांस बरोबरीनें व मानानें वागविलें पाहिजे.

भारत आणि पाकिस्तान यांचा इतिहास आणि संस्कृति यांत परंपरेचे संबंध आहेत. या उभयतांची मैत्री राहावी आणि अनेक क्षेत्रांत त्यांचें सहकार्य लाभावें हें साहजिक आहे. असें घडलें तर त्यांत उभयतांचा फायदा आहेच. पण अवघ्या आशिया खंडाची शांति आणि समृद्धि त्यांवर अवलंबून राहील.

दुर्दैवानें बराच काळपर्यंत या दोन राष्ट्रांचें एकमेकांशीं पटत नाहीं. त्यामुळें त्या दोन्ही राष्ट्रांतील जमातींमध्यें तेढ निर्माण झाली आहे. ही परिस्थिति आपण पालटूं या. पण तसें करण्यास सद्भाव आणि दृढनिश्चय यांची आवश्यकता आहे. अध्यक्ष आयूब खान यांच्या नुकत्याच झालेल्या भाषणांत बुद्धिमत्ता आणि समजूत आढळून आली; पण याहि बाबतींत अनुकूल काळाची

वाट पाहिली पाहिजे.

चीनशीं सलोख्याचे संबंध ठेवण्याची आमची इच्छा होती पण तेथील सरकारनें आमचे प्रयत्न अयशस्वी केले. चीननें आमच्यावर अन्याय केलेला आहे. आमच्यावर आक्रमण करून आमच्या सरकाराचा त्या राष्ट्रानें अपमान केला आहे. एवढें होऊन सुद्धां 'कोलंबो योजना' पूर्णांशानें मान्य करुन आम्हीं आमची सद्भावना व्यक्त केली आहे. चीननें आपल्या वागणुकीचा फेर-विचार करावा आणि सर्वत्र चालविलेला आपला भारतविरोधी प्रचार थांबवावा.

गेलीं अनेक वर्षें गांधी आणि नेहरू हीं नांवें परतंत्र राज्यांतील लोकांचीं स्वातंत्र्यदैवतें झालेलीं आहेत.

पारतंत्र्याच्या खाईंतून आम्हीहि गेलों असल्यामुळें दलित राष्ट्रांबद्दल आम्हांस सहानुभूति आहे. राष्ट्रसंघांत आणि इतरत्र परतंत्र राष्ट्रांची आम्हीं बाजू घेतलेली आहे. दुर्दैवानें जगाचे कांहीं भागांत अजूनहि वसाहतवाद चालू आहे. तेथील जनतेचें स्वातंत्र्य आणि मूलभूत हक्क यांची पायमल्ली होत आहे. वसाहतवाद नष्ट करणें, साम्राज्यवाद संपविणें, आणि जगांतील सर्व जनतेला आपलें भवितव्य घडवण्याचा हक्क देणें हें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

जवाहरलाल नेहरू हे आफ्रो-एशिअन चळवळीचे एक प्रणेते होते. आफ्रो-एशिअन चळवळ हें आम्ही साध्य समजत नाहीं, साधन समजतों. आशिया आणि आफ्रिका येथील जनतेला स्वातंत्र्य मिळवून देणें, त्यांच्याबद्दल इतर राष्ट्रांत सहानुभूति निर्माण करणें, त्यांची आर्थिक उन्नति करणें आणि त्यांचें जीवनमान सुधारणें या गोष्टी आम्हांस करावयाच्या आहेत. आम्हांस त्यांचें नेतृत्व नको आहे. जागतिक शांतता आणि जनतेचें स्वातंत्र्य हें ध्येय साधण्या-साठीं आम्ही त्यांच्याबरोबर सहभागी होऊं इच्छितों.

संयुक्त राष्ट्र संघाला आम्हीं सतत पाठिंबा दिलेला आहे. त्या बाबतींतील जबाबदारीचा सर्व वांटा आम्हीं उचललेला आहे. माझ्या सरकारचाहि राष्ट्र संघाला पाठिंबा राहील. मानवजातीला शांतता आणि स्वातंत्र्य मिळवून देणारा राष्ट्र संघ हा एकमेव आधार आहे. हें ध्येय साधण्यासाठीं भारतानें आजवर सक्रीय साहाय्य दिलें व यापुढेंहि देईल.

शांतता आणि निःशस्त्रीकरण हीच मानवजातीपुढील आजची महत्त्वाची समस्या आहे. युद्धें नुसतीं थांबवून उपयोगी नाहींत. तीं अशक्य झालीं पाहिजेत.

राष्ट्र संघाची ही जबाबदारी आहे. युद्धविरहित जग हेंच जवाहरलालजींचें योग्य स्मारक ठरेल असें अध्यक्ष जॉन्सन म्हणाले तें बरोबर आहे. हें ध्येय साध्य करण्यासाठीं इतर शांतताप्रिय राष्ट्रांना सहकार्य देणें हें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

माझें भाषण संपण्यापूर्वी मी पुन्हा सांगूं इच्छितों कीं माझेपुढें असलेलें प्रचंड काम आणि माझ्या देशांतील जनतेच्या सेवेची मजवर पडलेली जबाबदारी यांची मला पुरेपूर जाणीव आहे, सौजन्य आणि माझ्या देशबांधवांबद्दल मला वाटत असलेलें प्रेम व आदर यांमुळेंच मी हें करूं शकेन असा मला विश्वास वाटतो. माझ्या शक्तीनुसार मी सेवा करीन. आपल्या दिवंगत नेत्याची स्मृति सदैव ताजी राहील. गांधीजींनीं सुरू केलेलें युग जवाहरलालजींबरोबर संपलें. त्यांनीं घातलेल्या पायावर आपल्याला मंदिर उभारावयाचें आहे. चला, आपण कामाला लागूं या. स्वतंत्र, वैभवसंपन्न आणि सुदृढ असा भारत तसेंच शांत आणि युद्धविरहित जग हीच गांधीजी आणि जवाहरलाल यांचीं उचित अशीं स्मारकें होतील.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
दि: ....
अनुक्रम..........
नों दि: ....
क्रमांक ..........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.- ९४४०६०
REFBK-0014477